


# वेडेपीर

अनंत उमरीकर

# वेडेपीर

अनंत उमरीकर

जनशक्ती वाचक चळवळ

◎शासनमान्य यादीत शिफारस केलेले पुस्तक ◎ इ.स. २००३ - अनु. क्र. २८९

जनशक्ती
वाचक
चळवळ

वेडेपीर। अनंत उमरीकर
vedepeer - Anant Umrikar

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ
पिनाक, २४४-समर्थनगर,
औरंगाबाद-४३१४०१.
दूरभाष : ०२४०-२३४१००४.
Email : janshakti.wachak@gmail.com
website : www.granthasakha.com

© अनंत उमरीकर
नानल पेठ, परभणी-४३१४०१
मो. ९८९०३९६६५७

मुद्रक
रुद्रायणी, औरंगाबाद.


मुखपृष्ठ
सरदार

अक्षरजुळणी
भीमराव वाघमारे
जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद.

प्रथमावृत्ती
२८ मे २००३
द्वितीयावृत्ती
१९ ऑक्टोबर २००९
दीपावली पाडवा

मूल्य रु. २००/-

माझ्या लिखाणाचे
पहिले वाचक-श्रोते
**सौ. आशा**
**कृष्णा**
**श्रीकांत**
यांना




# भूमिका

गेल्या वीस वर्षांपासून अधिक काळ मी शेतकरी संघटनेत काम करतो आहे. या काळात माझी अनेक कार्यकर्त्यांशी ओळख झाली आहे. काही लोकांशी फार जवळून संबंध आलेला आहे. पैकी बहुतेक सर्वांची आर्थिक परिस्थिती सामान्य आहे.

अनेक लोकांना तर दुपारची भ्रांत आहे, तरीही लोक प्रचंड संख्येनं शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमात सहभागी होतात. संघटनेत कुठल्याही प्राप्तीची आशा नाही, कुठलंही सत्तेचं पद मिळणार नाही, प्रसिद्धी तर नाहीच नाही, दादागिरी करायचीसुद्धा संधी नाही.

लोक जवळचं आहे ते खर्चून, पोट बांधून संघटनेचं काम करतात. पृथ्वीवरील स्वर्ग समजल्या जाणाऱ्या स्वित्झर्लंडमधील लठ्ठ पगाराची नोकरी सोडून थेट आंबेठाणसारख्या सर्व सुखसोयींपासून दूर राहिलेल्या गावात राहणाऱ्या शरद जोशींपासून ते संघटना-कामात गुंतल्यामुळे पोटच्या पोराच्या लग्नालाही हजर न राहणाऱ्या लाहोटीसारख्या कार्यकर्त्यांना 'वेडेपीर' नाही तर काय म्हणायचे? अशा काही 'वेड्यापीरां'ची ओळख या पुस्तकातून करून देतो आहे. बड्या शेतकऱ्यांची संघटना म्हणून शेतकरी संघटनेला हिणवणाऱ्यांचे डोळे हे पुस्तक वाचून तरी उघडतील काय?

@@

# दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

वेडेपीर या माझ्या पुस्तकाला 'केसरी मराठा' संस्थेने 'न. चिं. केळकर' पुरस्कार देऊन गौरविले. राजाराम मोहन रॉय फौंडेशन यांनी त्यांच्या खरेदी योजनेत पुस्तकाचा समावेश केला. महाराष्ट्र शासनाने ग्रंथ शिफारस यादीत पुस्तक निवडले. इंद्रजित भालेराव यांचे 'मऱ्हाटवाडी'मधील परीक्षण परिशिष्टात समाविष्ट केले आहे. शेतकरी चळवळीची नोंद घेतल्या जाते आहे, याचे मला निश्चितच समाधान आहे. 'झपाटलेली माणसं' या पुस्तकाचा समावेश 'वेडेपीर'मध्ये करून ही नवीन सुधारित आवृत्ती आपल्या हाती देत आहे.

**अनंत उमरीकर**

**अनुक्रम**


हेमंत / ७
लाहोटी / १९
सरोजताई / ३४
विनय हर्डीकर / ५४
सर / ६९
आमदार वामनराव / ८२
बापू / ९८
नाना / ११८
भाऊ / १३१
वैजनाथराव / १४४
माधवराव मोरे /१५७
गोविंदभाऊ / १७४
शैलाताई /१८९
बबन शेलार / २००


**परिशिष्ट**


अनंत उमरीकर यांची
व्यक्तीचित्रे - इंद्रजित भालेराव/२१६


# हेमंत

आपण यांना पाहिलंत का हा प्रश्न निदान याच्या बाबतीत तरी येऊ शकत नाही हां, आपण कदाचित त्याला ओळखत नसालही; पण त्याला पाहिलं नाही, असे होणे नाही. शेतकरी संघटनेच्या कुठल्याही अधिवेशात, मेळाव्यात, सभेत मंचावर शरद जोशी यांची हजेरी असली, की मंचाच्या जवळपास कुठे तरी जोशी साहेबांना नजरेच्या टप्प्यात ठेवून त्यांचा रक्षक म्हणून हा हजर असणारच. आणि हे काम कुणी त्याच्यावर सोपवलं म्हणून तो करत नाही, तर आपणहून अंगावर घेतलेलं आणि इमाने इतबारे केलेलं. शरद जोशींच्या सुरक्षेचं महत्त्व शासनाला नाही वाटलं तरी कार्यकर्त्यांना वाटतंच ना. दिल्लीच्या मेळाव्यात महेंद्रसिंह टिकैच्या लठैतनी मंचावर घुसखोरी करून जो धिंगाणा केला त्याची दखल शासनानं न घेवो; पण निदान हेमंतनं घेतली आणि रक्षक म्हणून स्वत:ला नेमून घेतलं. हेमंतचं व्यक्तिमत्त्वही असं, की चार चौघांतच काय पण हजारांच्या जमावातही उठून दिसणारं. अधिवेशनाच्या लाखा लाखांच्या गर्दीतही तुम्ही कुठल्याही दूरवरच्या कोपऱ्यातून बघितलं तरी गर्दीच्या वर हातभर याची उंची, त्यामुळे तुम्हाला तो दिसणारच; मात्र सभा आटोपून साहेब मंचाबाहेर पडून मुक्कामी रवाना झाले, की हाही गायब! आणि मग 'ढूंढते रह जाओगे!' तरीही तो सापडणार नाही. परत भेटेल अशाच सभेच्या वेळी, साहेबांचा रक्षक म्हणून, मंचाच्या अवती भोवती कुठेतरी, साहेबांना नजरेच्या टप्प्यात ठेवत!

उचं मजबूत बांधा, चॉकलेटी रंग, सरळ नाक, उंच कपाळ. अधूनमधून रुपेरी झाक असलेले केस, नीट विंचरलेले. अंगावर पांढराशुभ्र कडक इस्त्रीचा, अर्ध्या बाह्यांचा बुशशर्ट, खाली गर्द निळ्या किंवा फिकट निळ्या रंगाची जीन्स, अशा वर्णनाचा कुणी तरुण दिसला, की समजावं हाच तो हेमंत देशमुख. तुम्ही त्याला स्टेजच्या परिसरात कैक वेळा पाहिलं असेल, पण स्टेजवर पाहिल्याचं कुणी सांगावं, भाषण दिल्याचं आठवावं आणि शंभर रुपये बक्षीस मिळवावं. दोन गोष्टींचं त्याला विलक्षण वावडं, एकतर स्टेजवर चमकणं आणि दुसरं प्रसिद्धीच्या झोतात येणं. अशा प्रसंगांना कशी बगल द्यावी हे शिकावं हेमंतकडून. आयुष्यात एकदाच हेमंत प्रकाशझोतात चमकला आणि मंचावर विराजमान झाला. जिवंतपणी तर नाहीच

नाही, मृत्यूनंतरच्या श्रद्धांजलीच्या सभेत, चित्ररूपात आणि लोकांनी उजळलेल्या आठवणीतून. अशा नि:स्वार्थी कार्यकर्त्यांची रेलचेल असलेल्या शेतकरी संघटनेकडे पाहिलं, की स्वातंत्र्यपूर्व काळातील चळवळ्या लोकांची आठवण येते.

हेमंतची कथा ही या देशातल्या हजारो शेतकरी कुटुंबांतल्या युवकांची कथा आहे. संपन्न शेतकरी कुटुंबात जन्म आणि वास्तव्य नांदेडजवळील धानोरा या गावी. संपन्न शेतकरी कुटुंब ही कल्पना नागरी संपन्न कुटुंबाच्या तुलनेत काहीशी फसवी आहे. संपन्न शेतकरी कुटुंब, म्हणजे शेतीतून मिळणारं धान्य, भरपूर भाजीपाला, घरचं दूध दूभतं, खूप मोठं घर, मोठं आवार, गावात मानमरातब... नगदी पैसा सोडून सबकुछ. अशा या संपन्न कुटुंबातलं हे शेंडेफळ. पदवीपर्यंतचं शिक्षण सरळ सरळ पार पडलं आणि १९७३ मध्अये पदवीधरांच्या यादीत आणखी एका पदवीधराची भर पडली.

पदवी तर पदरात पडली, पण पुढे काय? कॉलेजचं शिक्षण औरंगाबादी पार पडलं. औरंगाबादसारख्या मोठ्या शहरातून एकदम धानोऱ्यासारख्या खेड्यात परत जायचं ही कल्पना ठीक वाटेना. मराठी साहित्यातलं खेड्याचं वर्णन वाचायला ठीक वाटतं; पण असं वर्णन करून ग्रामीण जीवनाचं कौतुक करणारी मंडळी प्रत्यक्षात खेड्यात नाही राहत. तशात हेमंतचा स्वभाव धाडसी, काही तरी वेगळं करायचा विचार डोक्यात. घरची चिंता नव्हतीच. नवीन वाट धुंडाळायच्या कल्पनेनं डोक्यात घर घट्ट केलं अन् धानोऱ्याचा हा गडी चार पैसे गाठी घेऊन धडकला थेट मुंबईत. तीनचार वर्षे इकडेतिकडे छोट्यामोठ्या नोकऱ्या करण्यात गेली. मुंबईचं ते घाईगर्दीचं जीवन, तो बकालपणा, राहण्याची ती दुरवस्था, झोपडीपट्टीसमान भंगार राहण्याची अवस्था. प्रचंड आकाराच्या घरात राहायची सवय असलेल्या हेमंतचा श्वास मुंबईत गुदमरायला लागला. एव्हाना धानोऱ्याचं घर, ती छोटी नदी त्याला खुणवायला लागली.

'बहोत शहर घूमे लेकीन अब घर अच्छा लगता है।'

आता शेतीचं आकर्षण वाटायला लागलं. खूप वाचलं, ऐकलं, सिनेमातून पाहिलं, आपणही करून पाहूया शेती. काय कमी आहे आपल्याला? धानोरा गावी वाहणारी छोटी नदी. नदीच्या दोनही काठांना पसरलेली सलग साठेक एकर जमीन. काठच नदीचा, पाण्याला काय कमी? पाणी खेचू अन् शेतात सोन्यामोत्याच्या राशी पिकवू. १५ ऑगस्ट, २६ ज्ञानेवारीची पहाट होते ती, 'इस देश की धरती सोना उगले उगले हिरे मोती'ची धून घेऊन. पाहूया आपण तो प्रयोग



करून. अनेक सिनेमांत रंगवलेलं चित्र मनापुढे घेऊन हाती नांगर धरला.

आणि आता नवा दिनक्रम सुरू झाला. सकाळी उठून न्याहरी करून शेतावर जायचं, नांगर हाती धरायचा. दुपारी आलेली भाकर तृप्त मनाने खायची. संध्अयाकाळी घराकडे परतायचं. रात्रीचं जेवण करून उद्याची स्वप्नं पाहत रात्र घालवायची. रात्र गेली की दुसरी पहाट, मग तिसरी, चौथी. सिनेमातलं हेच चित्र पुन्हा पुन्हा. फक्त डोइवर टोपलं अन् टोपलीत भाकर घेवून शेतावर येणारी अन् 'धनी' म्हणून साद देणारी हिरोईन वगळायची. बाकी चित्र तेच. मोठ्या उमेदीनं आरंभ केलेला. आरंभ केला तोही भिकारबंबू सारखा नाही. नदीच्या ऐल-पैल तीरावर पसरलेली शेती, घरी मळणी यंत्र, गोबर गॅस, ट्रॅक्टर. सर्व सुखसोयींनी युक्त, माणसांनी भरलेलं घर. भरपूर मेहनत केली. आधुनिक तंत्रानं शेती केली. सहा-सात वर्षे हाही प्रयोग केला.

याच काळात केव्हातरी शेतकरी संघटनेचं नाव कानावरुन गेलेलं. शेतीच्या स्वप्नांचे रंग एव्हाना फिकट व्हायला लागलेले. स्वप्नील शेतीच्या प्रयोगाला वस्तुस्थितीचे चटकेही बसायला लागले. आपलं चुकलं की काय हा विचारही डोकवायला लागला. 'जाने वे कैसे लोग थे जिनके शेतीला भरगोस यश आले'. कुठे बरे असतील असे लोक? अशा मानसिकतेत असताना शरद जोशी यांचा महाराष्ट्र दौरा सुरू झाला. परभणी अधिवेशनाआधी साहेबांचं नाव ऐकलेलं. शेतकरी संघटनेचा नावलौकिकही कानी पडलेला. साहेबांची सभा धानोरा गावी घ्यावी हा विचार बळावला; पण तेव्हाच्या नांदेडस्थित कार्यकर्त्यांनी कांही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे तर जिद्द जास्तच बळावली. हेमंत आणि त्याच्या सहकाऱ्यांना साहेबांचा दौरा लोहा फाट्यावरून जाणार एवढं निश्चित कळलं. दिवसही कळला. या लोकांनी साहेबांचा अनधिकृत कार्यक्रम या लोहा फाट्यावर घ्यायचं ठरवलं; पण या कार्यक्रमाला मान्यता कुठे होती? 'वो बाद मे सोचेंगे!' जागा ठरली. आता गडी प्रचाराला लागला. लोहा आणि त्याच्या परिसरातील दहाबारा गावं प्रचारासाठी निवडली. पदरमोड करून प्रचाराची ही धूम उडवून दिली. साहेबांची प्रचार यात्रा लोह्याला आली, की त्यांना घेराव करायचा आणि भाषणाची मागणी करायची. नांदेडच्या प्रमुखांना याची खबरही नव्हती.

आणि 'डी' डे उगवला. लोहा फाट्यावर हा दहाबारा हजारांचा जमाव जमा झाला. स्टेज तयार झालं. लाउड स्पीकर्स लावले. कमानी उभारल्या. ढोल-ताशांचा कडकडाट सुरू झालेला. संघटनेच्या वाघाला घेरण्याची तयारी पूर्ण झालेली. साहेबांची यात्रा आली, आणि हेमंत सहकाऱ्यांना पुढे करून आपण पार मागे

जाऊन उभा राहिला. जमावानं साहेबांना घेरलं. हा प्रेमळ घेराव मोडणं साहेबांनाही शक्य नव्हतं. समोरचा प्रचंड जमाव पाहून साहेबांनाही स्फुरण चढलं आणि हेमंतच्या आयुष्याला एक नवीन कलाटणी मिळाली. कार्यक्रम तर यशस्वी झालाच झाला, साहेबही खूष झाले. एका नवीन नात्याची पायाभरणी या सभेनं झाली.

साहेबांची आणि हेमंतची ही पहिली भेट. प्रत्यक्ष भेट नाहीच, केवळ दृष्टभेट. डोळा भरून पाहिलं. त्याहीपेक्षा कान भरुन ऐकलं दूर दूर बसून. कुठं तरी प्रश्नाचं उत्तर सापडतंय असं वाटायला लागलं. पुढे चालून साहेबांबरोबर हेमंतचा जो दीर्घ प्रवास झाला, त्याची सुरूवात ही अशी झाली. भक्ताला देव भेटला; पण देवाला भक्त प्रत्यक्षात नाही भेटला. या भेटीबद्दल हेमंत नंतर मला बोलला. फार नंतर. कित्येक वर्षांनी, ‘‘या भेटीअगोदर तर साहेबांचं नाव बऱ्याच वेळेस ऐकलेलं होतं. त्यांच्याबाबतच्या बातम्याही वाचलेल्या; पण मला वाटायचं- शेतकऱ्यांना भुलवणारे अनेक डोंबारी, जादूगार निघाले. साऱ्यांनी शेतकऱ्यांचा वापर या पदावर पोचण्यासाठी पायऱ्या म्हणून केला. शरद जोशी हे त्यांच्यापैकीच एक नसतील कशावरून असं मला वाटायचं. नाही तरी अनेक राजकारण्यांनी सीआयएचे एजंट म्हणून साहेबांची हेटाळणी केलेली होतीच; पण साहेबांचं वागणं पाहिलं, बोलण ऐकलं अन् सार मळभ दूर झालं.’’

कळत न कळत एक आकर्षण आता निर्माण झालं. एव्हाना परभणी अधिवेशनही जवळ आलेलं. परभणीला जायचं ठरवलं अन् आपल्यासारख्या अनेक शेतकऱ्यांसह संघटनेचे हे वारकरी परभणीला आले, आपल्या इठूबाला ऐकायला, पाहायला. हेमंत परभणी अधिवेशनात आला. प्रतिनिधी मंडपात मागे बसून तीन दिवस सारी चर्चा ऐकली. प्रचंड संख्येनं आलेल्या लोकांचा अमाप उत्साह पाहिला. रात्री मैदानात पेटलेल्या चुली पाहिल्या. तीन दगडांच्या चुली. त्यात काटक्याकुटक्याचं जळतण. त्यावर भाजणाऱ्या भाकरींचा अन् सोबतच्या कालवणाचा खमंग वास घेतला. कुठे तरी एक विश्वास बळावत गेला. इतक्या दुरून, डोईवर बोचकी घेऊन, एवढ्या हाल अपेष्टा सहन करून गोरगरीब शेतकरी बायापोरांना घेउन येतात. हा कांही डोंबाऱ्याचा खेळ निश्चितच नाही, की जिथे पैसा फेका अन् तमाशा देखा हा प्रकार करावा. कुठेतरी एक अंतरीची ओढ त्यांना अधिवेशनाला खेचून आणते. पंढरपूरला नाही वारकरी साऱ्या काळज्या मागे ठेवून, हालअपेष्टा सहन करीत, शेकडो मैल चालत जातात. त्यांना विठोबा भेटो ना भेटो बिचारे भक्तिभाव ठेवून येतात. हेही तसेच वारकरी.

टीका करणारे भले म्हणोत शेतकरी संघटना ही बड्या बगायतदारांची संघटना.



मारणाऱ्याचा हात धरता येतो, बोलणाऱ्याचं तोंड अन् टीका करणाऱ्याची लेखणी कुणी धरावी! बडे शेतकरी अन् बागायतदार अशी डोईवर बोचकी घेऊन, खुल्या आकाशाखाली तीन धोंड्यांच्या चुलीवर भाकरी भाजतात की काय? ते तर त्यांच्या पहिलवानासह मुंबईच्या पंचतारांकीत हॉटेलात उतरतात, मुख्यमंत्रीपदाच्या रेसमध्ये हाणामारी करायला.

हे सगळं पाहिलं आणि त्याच्या लक्षात आलं हे पाणी कांही वेगळंच आहे. आतापर्यंतच्या प्रत्यक्ष अनुभवातून शेतीच्या हिरव्या हिरव्या स्वप्नाला नाही तरी तडा गेलेलाच होता. तीन दिवसांच्या अधिवेशनामुळे आतापावेतो कच्चं असलेलं हे मडकं आता मात्र पक्कं झालं.

परभणी अधिवेशन संपवून हा गडी धानोऱ्याला परतला. एक चलबिचल सुरू झाली. नवीन वाट धुंडाळायचा विचार मनात आला; पण नेमकं काय करायचं हे काही सुचलेलं नव्हतं. विचार केला, उडी तर मारूया. हात पाय मारले तर येईल की पोहायला. नवीन वळण घ्यायचं ठरलं अन् हा गडी गेला थेट औरंगाबादला. चार दोन महिने असेच घालवले मार्केटचा अभ्यास करण्यात. एक विशेष गुण होता हेमंतमध्ये. उदासीनता कधी येत नव्हती. तू नही तो और सही, और नही और सही. काही तरी करूयातच की हा पक्का विश्वास. स्वभाव बोलका, लाघवी. मित्रपरिवार खूप मोठा. ‘लोकमत’ मध्ये काम करणाऱ्या एक मित्रानं ऑफसेंट प्रिंटिंग प्रेसवाल्यांना लागणारा माल पुरवण्याचा व्यवसाय करायचं सुचवलं. कल्पना पटली, लगेच उचलली आणि हेमंतनं या नवीन व्यवसायाला सुरूवात केली. समर्थनगरमधील एका ओळखीच्या गृहस्थाच्या घराच्या बाजूच्या मोकळ्या जागेत पत्र्याची शेड उभी केली आणि स्वभावाप्रमाणे या व्यवसायात स्वत:ला झोकून दिलं. बघता बघता तो या व्यवसायात असा स्थिरावला, की पुन्हा धानोऱ्याच्या ‘हिरव्या हिरव्या स्वप्नांची’ याद सुद्धा आली नाही. या साऱ्या धामधुमीत एक डोळा संघटनेवर होताच. गडी प्रत्यक्ष संघटनेला भिडला नव्हता. तालमीला आणखी दुरून दुरून चक्कर मारणंच चालू होतं. शेवटी हा गडी हौद्यात उतरला.

पण उतरला कसा हा मात्र कळीचा प्रश्न होता. मलाही याच प्रश्नाची विशेष उत्सुकता होती. त्याहीपेक्षा उत्सुकता होती ती हेमंत साहेबांच्या एवढा जवळ कसा पोचला याची. आमच्या मुलाखतीवेळी मी नेमका हा प्रश्न विचारला अन् त्यानंही उत्साहानं सांगितलं, ‘‘तो तर भाऊजी मोठा योगायोग!’’ माझा मेहुणा भूषण कुलकर्णी अन् हेमंत हे जिगरी दोस्त. त्यामुळे हेमंतची माझी तशी त्याच्या विद्यार्थी काळापासून ओळख. भूषणाचा मी भाऊजी म्हणून हेमंतही मला भाऊजीच

म्हणायचा. संघटनेच्या फार आधीची आमची ओळख. संघटनेत तर मी चौऱ्याऐंशी मध्ये आलो हेमंत त्यानंतर आला. आमच्या वारंवार भेटी होऊ लागल्या. दोघांचं दैवतही एकच, त्यामुळे संघटना पातळीवर मैत्रीचं रसायन अधिकच घट्ट झालं. या लेखासाठी मी त्याची मुलाखत अपघाताआधी काही दिवस घेतली होती. काय योगायोग असतो पहा. हेमंतची मुलाखत घ्यावी म्हणून मी बरेच प्रयत्न केले; पण "जाऊद्या ना भाऊजी, मोठ्या कार्यकर्त्यांचा परिचय द्या हो. मी काय!" एक अदनासा इन्सान हेच त्याला म्हणायचं होतं. त्यानं भेट टाळली. शेवटी मीही जिद्द करून भेट घेतलीच आणि योग असा, की आता पुन्हा मागूनही भेट मिळणार नाही. पुढे घडणाऱ्या घटनेची काय कल्पना. आता वाटतं ती भेट टेप करायला पाहिजे होती. भक्तानं देवाचं गायिलेलं भजन सरळ भक्ताच्याच तोंडून ऐकायला मिळालं असतं!

हेमंत पुढे सांगायला लागला, "साहेबांच्या मुलीला-गौरीला कुठल्यातरी सर्व्हेसाठी औरंगाबादला काही दिवस राहावं लागणार होतं; पण औरंगाबादला राहायचं कुठे? एखाद्या कुटुंबात राहता यावं ही कल्पना होती. त्याहीशिवाय औरंगाबादच्या ग्रामीण भागात जो सर्व्हे करायचा, त्याचीही सोय लावायची होती. त्या दृष्टीने ते शोधात होते. औरंगाबादेत काही नावे सुचवलेली होती. कुणीतरी माझं नाव सुचवलं. एव्हाना फोनवर का होईना, माझी अन् साहेबांची आवाजी ओळख झालेली होती. साहेबांना औरंगाबादमार्गे कुठेही जाण्या येण्याचं काम पडलं तर आरक्षणाचं काम माझ्याकडे असायचं अन् त्यानिमित्त फोनवर संपर्क होताच." म्हणजे हेमंतसाठी साहेब कोकीळ पक्षीच. कुहू कुहू आवाज तर येतो. पण पाखरू झाडाच्या कुठल्या फांदीवर लपून बसलंय कुणास ठाऊक! "अचानक साहेबांनी मला फोन केला" आणि तिथून एका नव्या पर्वाला सुरुवात झाली. दोघांची कशी का होईना, पण भेट व्हावी 'ही तो श्रीची इच्छा!' इथून एका नात्याची सुरूवात झाली अन् संपली ती हेमंतच्या अंत्ययात्रेत. तस नातं काही संपत नसतं. आठवणींच्या रूपानं का होईना पण शिल्लक राहतेच. श्रद्धांजली अर्पण करतांना भरल्या सुरात साहेब म्हणाले होते, "मला मुलगा नाही. पण हेमंतन ही उणीव भरून काढली, आज आधाराची काठी गेली!"

हेमंतच्या स्वभावात आर्थिक शिस्त अन् बेशिस्त दोन्हीचं मिश्रण झालं होतं. संघटनेचा किंवा संस्थात्मक कामाचा प्रसंग आला म्हणजे हेमंत विलक्षण शिस्तीत वागायचा; पण वैयक्तिक पैशाच्या व्यवहारात गडी भलताच दिलदार. 'व्यवहार मे रत्ती और दान मे हाथी' असं काम त्याचं. हा त्याचा स्वभाव कसा बनला असेल?



त्याचं देशमुख हे वतन. गावाकडचे देशमुख म्हणजे छोटेमोठे जहागीरदारच. या वतनाबरोबरच काही बरेवाईट गुणही वारशाने वतनदारात येतात. जनसामान्यापासून आपण काही वेगळे आहोत. आपण जहागीरदार आणि बाकी आपली रयत, त्यामुळे एक गंड तयार होतो. आता वतनं- इनामं जप्त झालेली; पण भीकबाळी गेलेली असली तरी कानाची छिद्रं शिल्लक राहतातच की. जुन्या वैभवाच्या आठवणी स्वस्थ बसू देत नाहीत; पण का कोण जाणे, या साऱ्या गंडापासून हेमंतमात्र दूर राहिला. त्याच्या स्वभावात विलक्षण पोक्तपणा आलेला, वयाला न शोभणारा. त्याच्याशी बोलतानाही हा पोक्तपणा विशेषत्वाने जाणवायचा. औरंगाबादेतील त्याचं घर म्हणजे शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यासाठी आश्रयस्थान बनलेलं. स्वभावाप्रमाणे त्याचा हातही खूप मोकळा. कार्यकर्त्यांना छळणाऱ्या आर्थिक चणचणीची विलक्षण जाणीव त्याला होती. तेव्हा मदतीसाठी त्याचा हात नेहमी वरच असायचा. समोरच्या कार्यकर्त्यांच्या छातीवरील शेतकरी संघटनेचा बिल्ला म्हणजे विश्वासाचं प्रतीक मानून मागेल त्याला आणि न मागेल त्यालाही, त्याची अडचण जाणून मनानं आर्थिक मदत करणं हे तर हेमंतसाठी नित्याचं. आणि ही आर्थिक मदतही गुप्तदानाप्रमाणे. उजव्या हाताचा व्यवहार डाव्या हातालाही नाही कळणार. हेमंतच्या मृत्यूनंतर झालेल्या श्रद्धांजली सभेत एकानंतर एका कार्यकर्त्यांनी आपापले अनुभव सांगितले, ते तर थक्क करणारे होते. आता वाटतं, आपल्या एवढं जवळ असूनही हेमंतचं हे एवढं मोठेपण आपल्याला जाणवलं नाही, हे केवढं आश्चर्य! मला वाटतं, असं वाटणं यातच त्याचं मोठेपण लपलेलं. नेकी कर और दर्यामे डाल!

शरद जोशींना दिल्लीला असताना ह्यदयविकारचा झटका आला त्या वेळी सर्वांआधी दिल्लीला कुणी पोहोचलं असेल तर तो हेमंतच. शस्त्रक्रियेसाठी पैसाही लागेल आणि वेळेवर पैसा दिल्लीला उपलब्ध होतो न होतो म्हणून धावाधाव करून त्यानं औरंगाबादी पैसा उभा केला आणि विमान गाठून तडक दिल्ली गाठली. साहेबांना आराम पडेपर्यंत तो दिल्लीला राहिला. तोपावेतो औरंगाबादी घर कोण पाहणार, दुकान कोण पाहणार ही सारी चिंता भगवंताच्या माथी मारून हा गडी दिल्लीला मुक्काम करून राहिला. जोशी साहेबांवर मनापासून प्रेम करणारा, त्यांच्यातच भारताचं भविष्य पाहणारा, असा सखा विरळाच!

एव्हाना हेमंत संघटनेत चांगलाच स्थिरावला होता; पण आणखी कार्यकारिणीत वगैरेत यायचा होता. सध्या साहेबांच्यासाठी औरंगाबादेत संपर्कप्रमुख म्हणून कार्यरत होता. त्यापुढे नांदेड, धुळे, अमरावती, चांदवड अधिवेशनांतही मागच्या

बाकावरचीच भूमिका; पण औरंगाबाद अधिवेशन ठरलं आणि हेमंत एकदम प्रकाशझोतात आला. या अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षपदाचीच जबाबदारी त्याच्या अंगावर पडली आणि ती त्यानं पार पाडलीही, जवळच्याच पैठणच्या एकनाथांच्या काटेकोर हिशेबानं. त्या अधिवेशनात लोकांनी त्याला पाण्याच्या टाक्या धुण्यापासून तो आमंत्रण पत्रिका वाटण्यापर्यंत सर्व कामे करताना पाहिलंय. महाभारतातल्या यज्ञप्रसंगी कृष्णानं स्वत: भर पंगतीमधल्या खरकट्या पत्रावळ्या उचलल्या होत्या. ही अशी कथा आम्ही पुराणात ऐकली पण हेमंतचं हे रूप त्याही प्रसंगाची आठवण देणारं. साखर कारखान्यातल्या हंगामारंभीच्या उत्सवात उसाची मोळी टाकताना एकदा हात लावायला आणि पुढे साखर कारखान्यातल्या उसाच्या रसाचंच शोषण करायला चटावलेल्या नेत्यांनी शेतकरी संघटनेतील कार्यकर्त्यांचं हे हेमंती रूप पाहावं!

या अधिवेशनात त्याला मदत करावी म्हणून अधिवेशनाआधी आठ दिवस औरंगाबादी मी मुक्काम केला, तेव्हा त्याची धावपळ, प्रशासकीय कौशल्य, त्याच्याकडील माणसांचा राबता पाहिला. एव्हाना औरंगाबाद जिल्ह्यात संघटनेचा विस्तार फारसा झालेला नसल्यामुळे संघटनेला वाहून घेतलेल्या कार्यकर्त्यांची कमतरता आणि त्यामुळे हेमंतची होणारी कुत्तरओढ पाहिली. आम्ही काय फक्त शोभेचे बाहूले होतो. हेमंतला 'नैतिक' पाठिंबाच फक्त देऊ शकणारे, तरीही त्यानं आमच्या अनुपयुक्ततेची कधी जाणीव होऊ दिली नाही. तो म्हणायचा, ''भाऊजी तुम्ही बसून राहत जा इथे ऑफिसात. बाकी आम्ही सारं पाहून घेतो.'' गड्याजवळ जबर आत्मविश्वास होता.

होता म्हणतांना जीभ कचरते. इतक्या अल्पवयात इतक्या उमद्या माणसाचा असा शेवट व्हावा. तो सारा प्रसंगच चटका लावणारा. या शेवटाची सुरूवात एका फोन कॉलनं झाली.

१९ एप्रिल २००२ ला रात्री आठच्या सुमारास फोन खणखणला आणि त्यानंतर मध्यरात्रीपर्यंत खणखणतच राहिला. पहिला फोन आला तो सरांचा, सुरेशचंद्र म्हात्रे सरांचा आंबेठाणहून. पुढे येणाऱ्या धक्क्याची अजिबात कल्पना नसल्यामुळे शिवाय सरांचा फोनही बऱ्याच दिवसांनंतर आलेला असल्यामुळे मी जरा उत्साहातच बोलू लागलो; पण सरांचा आवाज गंभीर होता. शब्दही पटकन फुटत नव्हते. बहुधा ओठ दाबून, भावनांचे कढ आवरत ते बोलत असावेत. सरांना या पूर्वी मी कधी एवढं गंभीर ऐकलं, पाहिलं नव्हतं. त्यांनी ती बातमी ऐकवली आणि आकाशच कोसळलं. मध्येच केव्हातरी लाहोटीचा फोन आला जवळा बाजारहून.



त्यानं सहजच फोन केला. त्याला काय घडलं याची काही कल्पना नव्हती. ती त्याला बातमी कळवली आणि त्याला तर रडूच कोसळलं. लहान मुलासारखं तो धाय मोकलून रडायला लागला. फोनवर त्याची समजूत कशी घालावी काही कळेचना. मधेच केव्हातरी त्यानं फोन ठेवून दिला. काही वेळानं परत फोन आला,

''वकील साब मै जवळासे बोल रहा हुं. आपने क्या खबर दी के लाहोटी रोतेही जा रहा है?'' काय सांगणार? सारी संघटनाच सुन्न झालेली होती. रात्री साडेबाराच्या सुमारास शेवटचा फोन आला. ''मी गोविंद जोशी बोलतोय.'' बातमी तर केव्हाच कळलेली होती. कळली नसती तरी काही तरी अघटित घडलंय हे केवळ आवाजावरूनही कळल असतं. म्हात्रे सर, गोविंदभाऊ ही तशी फारशी भावनाप्रधान नसलेली माणसं. त्यांना हलवून सोडणारी अशी ही घटना. गोविंदभाऊ अधिक बोलण्याआधी मीच त्यांना म्हणालो, ''हो ! बातमी कळाली. सकाळी हायकोर्टनं निघतोय.''

सकाळी हायकोर्टनं औरंगाबादच्या स्टेशनवर पावणेदहा वाजता पोचलो आणि हेमंतच्या घरी गेलो. तो पार्थिव उचललेलं होतं. महायात्रा सुरू झालेली होती, 'हेमंत देशमुख अमर रहे'च्या गजरात. सव्वादहा साडेदहाची वेळ. आषाढी एकादशीचा दिवस. सकाळपासून सूर्यदर्शन झालेलं नव्हतं. आभाळ झाकोळून आलेलं. दूर कुठेतरी देवळात माणसांची गर्दी. दुरून भजनाचा आवाज ऐकू येवू लागला. 'ज्याचे जळे त्याला कळे.' या वेळी नेमकं हेच भजन म्हटलं जावं! योगायोग कसे असतात नाही. नाही तरी हेमंतचा अपघात हाच मुळी एक भयाण योगायोग. माणसाचं वय झालेलं असलं, आजारीपणाचं निमित्त झालेलं असलं तर निदान मानसिक तयारी झालेली असते. पण इतक्या तरुण वयात, संसाराचा डाव असा अर्ध्यावर टाकून...

महायात्रा पुढे सरकली. समोरच जालना रोडवरून आषाढी निमित्त जवळपास कुठल्यातरी देवळाकडे निघालेल्या यात्रेकरूंचा जथा आडवा गेला. टाळ, मृदंगाच्या गजरात, भजनाच्या नादात सामोरा आलेला वारकऱ्यांचा जथा, शुभशकुन समजायचा का? महायात्रेसाठी निघालेल्या माणसाला कशाचा शकुन अन् कशाचा अपशकुन? पण माझ्या भाविक मनाला थोडासा दिलासा तरीही मिळाला. कुणाचा विश्वास असो नसो. स्वर्गाचं दार नक्कीच उघडेल. इतकी समाजसेवा करणाऱ्या माणसाला असा बहुमान मिळणारच.

महायात्रा अंतिम स्थळी पोचली. इतका जमाव जमलेला; पण विलक्षण शांतता पसरलेली. या शांततेला स्मशानशांतता का म्हणतात ते आज उमगलं. यापूर्वी

अनेक महायात्रांना मी गेलो आहे. पार्थिव टेकवलं, की लोक आपापल्या सोयीप्रमाणे गटागटांनी गप्पाटप्पा मारत बसतात. 'ज्याचे जळे त्याला कळे', बाकीच्यांना काय? पण इथे तर कुणी कुजबुजतही नव्हतं. सारे चिडीचिप्प! अंत्येष्टीच्या चौथऱ्यावरील गर्दी हटवणाऱ्याचा काय तो आवाज. बाकी सारी गंभीर शांतता. कुणाचा मृत्यू इतका चटका लावणारा असतो!

महायात्रेत साहेबही होते. थोडं बाजूला बसलेले. चष्म्याआडून त्यांचे डोळे असे सुजून आल्यासारखे का बरं वाटताहेत? माझ्याशेजारी डॉ. श्याम अष्टेकर उभे होते. त्यांना मी हळूच विचारलं, ''साहेबांचे डोळे हे असे सुजल्यासारखे का बरं वाटताहेत? डोळ्यांच्या कडाही लाल झाल्या आहेत.'' माझं बोलणं त्यांना स्पष्ट ऐकू गेलं नसावं. त्याचं लक्ष तिकडे गेलं त्यावेळी साहेब मान किंचित खाली करून डोळे बंद करून पुटपुटत होते. माझ्या प्रश्नाचा रोख तिकडे आहे असं समजून डॉक्टर म्हणाले, ''कदाचित एखादा मंत्र म्हणत असतील किंवा गीतेचं पठण मनातल्या मनात करत असतील''.

अग्नी धडाडला. जळणाचा कडकड आवाज. बाकी स्मशानशांतता. श्रद्धांजलीचा कार्यक्रम. साहेब बोलले. ''आज आषाढी एकादशीचा दिवस. सत्पुरुषाचं लक्षण संस्कृत वचनात सांगितलं आहे. त्याचा सोप्या मराठीत अर्थ असा, की जो लोकांच्या कल्याणासाठी स्वत:ला धस लावून घेतो, तो सत्पुरुष! हेमंत या अर्थानं सत्पुरुष. मला त्याचा एवढा आधार होता, की आज माझी आधाराची काठी हरवली असं मला वाटत आहे.''

वैजनाथ रसाळांनी त्यांची एक आठवण सांगितली. त्यांची पत्नी अत्यवस्थ असतांना दवाखान्यात दाखल करण्यासाठी औरंगाबादला नेलं होतं. तिथे त्यांची ओळख ना पाळख. रात्री पोचायला खूप उशीर झालेला. तशाही रात्री त्यांनी हेमंतच्या घरी फोन केला. वहिनींनी फोन उचलला. रसाळांनी त्यांना अडचण सांगितली. त्यांनी लगेच हेमंतला झोपेतून जागं केल.

''वैजनाथराव, तुम्ही सरळ माझ्या घरी या, मी सारी व्यवस्था करतो.''

''नको, आम्ही सरळ दवाखान्यात जातो. तुम्ही फक्त तिकडे फोन करा, म्हणजे आमची सोय होईल.'' हेमंतनं दवाखान्याचं नाव सुचवलं आणि वैजनाथराव दवाखान्यात पोचण्या आधी हेमंत तिथे हजर. ''मी तुमच्या जेवणाची सोय करतो. काय लागलं- भागलं तर मला सांगा.'' खरं तर वैजनाथची मैत्री अशी नव्हती, दोघेही संघटनेचे निष्ठावान कार्यकर्ते, एवढीच त्यांची ओळख; पण सत्पुरुषांना कशाला पाहिजेत अशा सबबी? वैजनाथरावांच्या पत्नीने सूर्योदय काही पाहिला



नाही. बातमी कळली, तेव्हा हेमंत परत दवाखान्यात गेला. वैजनाथरावांचं सांत्वन केलं. वैजनाथरावांचा भिडस्त स्वभाव त्याला माहीत होता. पैशाची अडचण असली तरी ते सांगणार नाहीत हे जाणून हेमंत म्हणाला, ''हे बघा, दवाखान्याचं बिल भागवायचं आहे, ॲम्ब्युलन्सचे पैसे भरायचे आहेत, अंत्येष्टीचा खर्च आहे. तेव्हा हे पैसे राहू द्या. वेळेवर फजिती नको.'' वैजनाथरावांच्या नकळत दिनाजीच्या-वैजनाथरावांच्या भावाच्या हातात दहा हजाराचं बंडल कोबलं. 'वैष्णव जन तो तेणे कहिए, जेणे पीड पराई जाने रे!' परभणीला गेल्यावर ती रक्कम रसाळांनी लगेच परत केली हा भाग वेगळा. आजही ही आठवण सांगताना वैजनाथरावांचे डोळे पाणावतात. ''वकील साहेब, आमची ना ओळख ना देख. कोण सोय पाहणार होतं? हेमंतराव देवासारखे धावून आले.'' म्हणूनच देवालासुद्धा त्यांच्या मदतीची आवश्यकता वाटली की काय? इतक्या झटपट बोलावून घेतलं.

औरंगाबादच्या भास्करराव कुलकर्णी कुटुंबीयाशी हेमंतचा फार जुना, घनिष्ठ संबंध. त्यांच्या पत्नी सौ. प्रभाताई या हेमंतच्या मृत्यूची बातमी कळल्यावर त्याच्या घरी त्याच्या पत्नीला रात्रीची सोबत म्हणून गेल्या. नेमकं रात्री साहेबही तिथे आलेले. त्यावेळेचं वर्णन पुढे मला प्रभाताईनी सांगितलं. ''शरद जोशी आणि मी हेमंतच्या पत्नीचं सांत्वन करीत बसलो होतो. त्या वेळी शरद जोशी म्हणाले :

''मला मुलगा नाही; पण मुलाच्या मृत्यूचं दु:ख काय असतं याची जाणीव मला आज झाली. माझा फार मोठा आधार गेला...'' आणि त्यांना एकदम रडू कोसळलं. साहेबांचं हे रूप कोणी अनुभवलं नसेल. बऱ्याच वर्षांपूर्वी चांदवड महिला अधिवेशनाच्याही आधी, महिलांच्या एका मेळाव्यात सेलू मुक्कामी एक ग्रामीण महिला तिच्या हालअपेष्टांचं शुष्क शब्दांत वर्णन करीत होती तेव्हा एकदा आणि त्यानंतर इंद्रजीत भालेराव त्यांची कविता म्हणून दाखवत होते त्या वेळी साहेबांचे डोळे पाणावलेले मी पाहिले होते. एरवी सह्याद्रीच्या कड्यासारखे अविचल राहणारे साहेब; पण त्यांनाही हेमंतनं गदगदा हलवून सोडलं.

महायात्रा परतली. हेमंतच्या घरापुढील पटांगणात. तारेच्या कुंपणाजवळच लक्ष्मण वडले, राम नेवले अन् सदाभाऊ खोत उभे होते. त्या साऱ्यांना पाहून मी त्यांच्याजवळ गेलो. लक्ष्मणराव रडू रोखण्याचा प्रयत्न करीत सारखे मुसमुसत होते. मी त्यांच्याजवळ गेलो. तो ते गळ्यात पडले. आत्तापावेतो कसंबसं आवरून धरलेल रडू एकदम बाहेर पडलं, ''लक्ष्मणराव, तुम्ही असा धीर सोडलात तर तुमच्या सहकाऱ्यांनी कुणाकडे बघायचं?'' जिथे एवढ्या धीराचा सह्याद्रीही वाकला, तिथे या छोट्या मोठ्या टेकड्यांच काय?

या परिचयासाठी हेमंतची मुलाखत घ्यायला मी औरंगाबादी त्याला एकदाचं गाठलंच. तेव्हा मला शेवटी आलेलं पाहून त्यानं माझं हसत हसत स्वागत केलं आणि नेहमीप्रमाणे मागणी केली. ''भाऊजी, तुमच्यावाली सुपारी द्या.'' हेमंत म्हणजे माझ्या सुपारीला लागलेलं कुळ होतं. अशी अनेक कुळं यापुढेही मला भेटतील. पण हेमंतचं ते हास्य पुन्हा भेटेल कां?

■■



# लाहोटी

गेल्या नोव्हेंबरात केव्हा तरी कोर्टाच्या पायऱ्या चढतांना अचानक समोरुन वैशाली आली. वैशाली म्हणजे वैशाली रासवे. स्मार्ट, हसरी, नम्र, नव्याने वकिली सुरू केलेली एक तरुणी. ''सर, तुमचं अभिनंदन करायचंय!'' ज्युनियर वकील आम्हा सिनियरांना 'सर' म्हणतात; पण माझं अभिनंदन कशासाठी बुवा? एखाद्या गाजलेलल्या खटल्याचा अशात निकाल लागलेला नव्हता. मी कुणा राजकीय पक्षाच्या झळाळीत वावरणारा कार्यकर्ताही नव्हतो एखाद्या पदावर, समितीवर नेमणूक व्हायला किंवा सरकारी वकिल म्हणून नेमणुकीची खिरापत वाट्याला यायला! शेतकरी संघटनेबाबत एखाद दुसरं पुस्तक मी लिहिलेलं आहे; पण या पुस्तकाला पुरस्कार मिळण्याचीही शक्यता नाही. मग ही पोरगी अभिनंदन कशासाठी करते आहे? यावर तिनेच खुलासा केला ''सर. आमच्या गावातला एक माणूस, खूपच पिदक्कड असलेला गेल्या दीड एक वर्षापासून तुमच्या शेतकरी संघटनेत आला आणि आता त्याच्यात आमूलाग्र बदल झालाय. त्याची दारू तर पुरती सुटली आहे, पण बायकोला होणारी मारहाण, आर्थिक नुकसान सारं सारं संपून गेलंय. हाताबाहेर गेलेली केस परत अशी माणसात आलीय, म्हणून तुमचं अभिनंदन केलं.'' खूप बरं वाटलं हे सारं ऐकून. कुणीतरी माझं अभिनंदन केलं याच्यापेक्षा माझ्या संघटनेचं अभिनंदन केलं आणि तेही त्रयस्थ माणसाने, अनपेक्षितरीत्या याचा जास्त आनंद वाटला. मी मनात म्हटलं, बाई अनेक 'अहल्या शिळा संघटने उद्धरिल्या' हे तुला काय माहीत? त्यापैकी हे एक उदाहरण. असे अनेक वाल्यांचे वाल्मीक ऋषी झालेत संघटनेत. वाल्याचा असाच वाल्मीकी झालेला एक कार्यकर्ता म्हणजे लाहोटी. वसमत तालुक्यातल्या जवळा बाजारचा पुरुषोत्तम लाहोटी!

लाहोटी-बटुवामन. गव्हाळ काळा रंग, काळेशार डोळे, छोटं कपाळ अन् कपाळाच्या एका कोपऱ्यावर झेपावणारे दाट काळेभोर केस. त्याच्या हिशेबी कपडे म्हणजे केवळ अंग झाकण्यासाठी लागणारे कसल्याही रंगाचे, आकाराचे सुती कपडे एवढंच. कधी विजार-कुडता, कधी जीन्स-टी शर्ट, जर्सी. काही का असेना,

अंगावर कपडे ठेवतो हेच उपकार म्हणायचे! विलक्षण बोलघेवडा स्वभाव अन् मराठी-हिंदीचं मस्त राजस्थानी भाषिक रसायन. झोपेतच फक्त तोंड बंद असेल, बाकी नॉन स्टॉप मिर्ची रेडिओ! शेतकरी संघटनेतील बहुतेक सर्व जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची ओळख. संघटनेतील सर्वाधिक परिचित कार्यकर्त्यांची यादी बनवली तर पहिले दोन क्रमांक परभणी जिल्ह्याला मिळतील. एक ब. ल. तामसकर आणि दोन पुरुषोत्तम लाहोटी. लाहोटीनं मराठवाड्यातील हिंगोली, परभणी आणि जालना या तीन जिल्ह्यात व्यापक प्रमाणावर काम केलेलं. महिला अधिवेशनाच्या प्रचारानिमित्त आणि एका सर्वात्रिक निवडणुकीत धारणी मतदारसंघात प्रचारानिमीत्त अमरावती जिल्ह्यात व्यापक काम केलेला हा कार्यकर्ता. परभणी- हिंगोली हे दोन जिल्हे मूळचे एक. तेव्हा त्यांचा स्वत:चा जिल्हा म्हणून काम, तर जालना जिल्हा प्रचारासाठी लाहोटीला 'दत्तक' दिलेला म्हणून तिथेही व्यापक काम.

मुळात गप्पीष्ट स्वभाव. गप्पा मारण्यासाठी समोरचा माणूस ओळखीचाच असावा असंही कांही नाही. समोर ऐकणारा कुणीही चालतो. रेल्वेत, बसमध्ये असा कुणीही माणूस शेजारी, समोर असला, की चालतो-चालतो काय चक्क पळतो. खरं म्हणजे चर्चेची लाहोटीलाच मुळात खाज. त्यामुळे तोच सामनेवाल्या माणसाला खाजवून अवधान आणतो. मग सुरू होते लाहोटीची तुफानी 'बोलंदाजी'! प्रवासात समोरच्या कुणी छेडलं, की लाहोटीनं धरलाच समजा त्याचा गळा. तशी शारीरिक हाणामारी नाही; पण ती परवडली असा शाब्दिक छळ होतो सामनेवाल्याचा. छातीवरचा बिल्ला पाहिलं की समोरचा माणूस सहजच विचारतो, ''काय शरद जोशींची संघटना का?'' ''हो!'' ''काही अधिवेशन वगैरे आहे का?'' मग लागते भाषणाची लड आणि समोरचा माणूस कर्मचारी असेल तर तो हेच प्रश्न खोचकपणे विचारतो. लाहोटीचं दर्शनी रूप तसं साधं, सरळ. तेव्हा आपण गांधील माशांच्या पोळीला हात घालतो आहोत हे त्या कर्मचाऱ्याच्या लक्षातच येत नाही आणि एकदा का लाहोटीच्या प्रभाव क्षेत्रात तो आला, की मग हा जो सुटणार तो समोरचा माणूस शरण आल्यावरच थांबणार! 'चर्चा नको, लाहोटी आवरा' असे त्याचे चेहऱ्यावरील भाव शेजारी बसलेल्या आमच्यासारख्यांना दिसायचे. एव्हाना याचं उतरण्याचं ठिकाण आलेलं असतं, तेव्हा आम्हाला उतरतांना पाहून सामनेवाला 'सुटलो बुवा' असं म्हणत चक्क कपाळावरचा घाम पुसतो.

लाहोटीचं पूर्वायुष्य पाहिलं म्हणजे हा संघटनेत आलाच कसा याचं आजही आश्चर्य वाटतं. खरं म्हणजे करून भागले आणि संघटनेच्या नादी लागले असंच



झालं असावं कदाचित. १९५२ मध्ये एका मध्यमवर्गीय राजस्थानी कुटुंबात जन्मलेला लाहोटी शिक्षणापासून वंचित कसा राहिला याचं आश्चर्य वाटतं. किमान शालेय शिक्षण तरी पूर्ण केलेलं असावं अशी या समाजात अपेक्षा असतेच. त्याची पुढची वाटचाल पाहिली, की एवढं तरी कसा काय शिकला असेल अशी शंका येते. कुणाची कुठलीही अपेक्षा पूर्ण करायची नाही असाच जणू पण केलाय त्यानं. अपेक्षेविरुद्ध त्यानं पुकारलेल्या युद्धाची सुरवात झाली ती थेट सातवीच्या निकालापासून. सातवीचं निकाल पत्र घेऊन गडी घरी आला, तो पुढं शिकायचं नाही ही दारुण प्रतिज्ञा करूनच. ''शिकसन बिक्सन में कई पड्यो! चार पैसे तो ऐसे भी कमालूं!'' या तत्त्वज्ञानाने शाळा सोडली. घरी बसून काय करायचं म्हणून छोट्या छोट्या गावातले तरुण करतात तेच यानं केलं-म्हणजे शेती! घरची जेमतेम दहा एकर जमीन अन् तीही कोरडवाहू. गावातच बन्सी काकांचीही जमीन. तेव्हा त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि साहाय्याने याने शेती सुरू केली. आता कुणाच्याही शेती प्रयोगाचं काय होतं, हे का सांगायला पाहिजे आणि झालंही तसंच. बन्सीकाकांची गोष्ट वेगळी होती. त्यांचे शेतीशिवाय इतरही व्यवसाय होते. शेती तर केवळ एक शौक होता आणि नेमकं हे लाहोटी विसरला. तीनचार वर्षात आपल्या नातवानं शेतीत लावलेले दिवे पाहून आजोबांनी शेती विकून टाकली आणि लाहोटी इतर प्रयोग करायला मोकळा झाला.

आणि यानं भरपूर फायदा घेतला या मोकळेपणाचा. पहिले छूट त्यानं जवळाबाजारला एक हॉटेल सुरू केलं. जेमतेम सहा महिने हा धंदा चालला. त्यात काही राम वाटला नाही म्हणून गुत्तेदारी सुरू केली. दोनेक वर्ष हाही उद्योग करून पाहिला. बरं वाटलं. पैसाही ठीक मिळाला आणि इथेच घोटाळा झाला. पैसा मिळाला म्हणून तीन एकर शेती ठोक्यानं केली. गव्हाचं अमाप पीक आलं; पण नेमकं सर्वांनाच अमाप पीक आलं गव्हाचं आणि भाव इतके कोसळले, की गुत्तेदारीचा पैसा 'मातीत' गेला. 'आमों की कमाई जामों में' गेली आणि परत लाहोटी आला रस्त्यावर. मग तीनेक महिने बीडला 'अशोक थिएटर' वर मॅनेजर म्हणून नोकरी. तीही संपली आणि अल्पकाळ परभणीला नोकरी 'तलरेजा थिएटर'वर. तिथे काही मन लागेना. म्हणून तीही नोकरी सोडून 'घर के बुद्दू घर लौट आए!' आता रिकामं कसं बसावं म्हणून जवळ्यालाच थंड पेयाचं हॉटेल काढलं. सगळं करून पाहिलं आणि शेवटी कांहीच खरं नाही या असलीयत पर आ गए! दुकान गुंडाळलं आणि हायबरनेशनचा काळ सुरू झाला. खरं तर मुळात एक अस्वस्थता होती. कांही तरी आगळंवेगळं करण्यासाठी धडपड चाललेली

होती. नक्की काय पाहिजे हे कळत नव्हतं. कळत न कळत शोध चालू होता, चाचपणं चाललेलं होतं.

आता सारे उद्योग संपले होते. काम तर नव्हतंच. बहुतेक सारा वेळ डॉक्टर देसाई यांच्याकडे जाऊ लागला. पैसा मिळाला, की मटका खेळायचा. आणखी पैसे मिळाले, की रात्रभर रमी खेळायची. घरच्यांनी एरवीच आशा सोडल्या होत्या. आता तर विचारणंही सोडलं होतं. म्हणतात ना सर्व दरवाजे बंद झाले म्हणजे दैव प्रकाशाची एखादी खिडकी उघडतं अन् रस्ता दाखवतं. हा रस्ता दाखवला शेषराव मोहिते आणि ब.ल. तामसकरांनी!

१९८४ साल नुकतंच उजाडलं होतं. परभणीत शेतकरी संघटनेचं अधिवेशन येऊ घातलं होत. अधिवेशनाच्या तयारीसाठी ब.ल. तामसकर आणि शेषराव मोहिते बाहेर पडलेले होते. जवळा बाजारात स्थायिक झालेले डॉ. देसाई आणि ब.ल. हे पुराने दोस्त. गाव बदललं पण दोस्ती कायम राहिली. त्या दोस्तीची आठवण ठेवून प्रचारकामी त्यांचं साह्य मागण्यासाठी ब.ल. आणि शेषराव मोहिते जवळ्याला एके दिवशी आले. योगायोगाने लाहोटी डॉक्टरांकडे बसलेला होता. बल आणि मोहिते यांनी आपली अधिवेशनामागची भूमिका मांडली. शेतकरी संघटनेनं जी नवीन शेती अर्थशास्त्राची भूमिका मांडली, तिचं सांगोपांग विवेचन केलं आणि प्रचारकामी मदतीचा हात मागितला. त्यांनी हात नाही तर अख्खा 'लाहोटी' संघटनेला दिला. लाहोटी संघटनेसाठी मोठीच देणगी ठरला. सगळे धंदे करून निराश झालेल्या लाहोटीला कुठे तरी प्रकाशकिरण दिसले. डोकं लखलखलं आणि त्यानं उडी घेतली प्रचारकामात. डॉ. देसाई यांनी स्वत:च्या व्यवसायिक मर्यादा लक्षात घेऊन स्वत:ऐवजी लाहोटीला पुढे केलं. ते केवळ एवढं करून थांबले नाहीत तर त्यांनी प्रचारासाठी आपली मोटारसायकल, त्यासाठी लागणारं पेट्रोल आणि हातखर्चासाठी पैसे उपलब्ध करून दिले. लाहोटीनं मोटारसायकलवर मांड ठोकली ती ठोकलीच. वेळोवेळी मांडीखालची मोटारसायकल बदलली; पण स्वारमात्र कायम राहिला. याचा संघटनेला तर फायदा झालाच झाला; पण या भेटीमुळे लाहोटीचं आयुष्य बदललं. या भेटीतच लाहोटी संघटनेच्या अंकित झाला असं नाही; पण त्या रस्त्यावरची वाटचाल सुरू झाली. योगायोगानं त्या वेळी बाराशिवची जत्रा होती. जत्रा खूप मोठी होती-सर्कस, तमाशा, टूरिंग थिएटरांचे तंबू लागलेले होते. लाहोटी जाऊन जत्रेत अनाऊन्समेंट करी. सर्व तंबूवाल्यांना विनंती करून त्यांच्याच लाउडस्पीकर वरून प्रचार करी. तमाशातील घुंगरानं नादावलेली माणसं हा प्रचार ऐकत. त्या वेळी प्रचार काम म्हणजे कुठल्यातरी



विचारसरणीला बांधिलकी म्हणून नव्हतं तर रिकामटेकडेपणाचा एक उद्योग, एक करमणूक एवढीच भावना होती; पण वसमत तालुक्यातील लोकांसमवेत परभणीच्या अधिवेशनात त्यानं हजेरी लावली. साहेबांचं आणि माधव खंडेराव मोरेंचं भाषण ऐकलं, त्याच सुमारास भारतीय शेतीची पराधीनता हे पुस्तक वाचलं. नाही तरी सुरवातीच्या काळात शेतीचा भलाबुरा अनुभव घेतलेला होताच, त्यात भर पडली या पुस्तकाची आणि शेवटी बत्ती लावली ती साहेबांच्या आणि माधव खंडेराव मोरे यांच्या भाषणानं.

लाहोटीनं मला परवा परवा सांगितलं, ''मी शेतकरी संघटनेचा पूर्णवेळ कार्यकर्ता केंव्हा, कसा झालो हे मला कळलंच नाही. यूं भी मैं पागल तो थाही, पण या वेळी एका चांगल्या कामासाठी पागल झालो याचा मला अभिमान आहे. शेतीच्या प्रश्नाचं विवेचन तुकडोजींनी किती सार्थ केलं आहे ते माझ्या पक्कं डोक्यात बसलंय :

*कच्चा माल मातीच्या भावे । पक्का होताची चौपटीने घ्यावे ।*
*ऐसेनी ग्रामजन कैसेचि सुखी व्हावे । पिकवूनी उपाशी ॥*

तुकडोजींचं हे सांगणं आणि शरद जोशींचं प्रतिपादन यात मला शेतकऱ्यांच्या मुक्तीचा मार्ग दिसला.''

लाहोटीनं एरवीच घरदार सोडल्यासारखं होतं. आता तर दिशा मिळाली, मार्ग दिसला. ज्या कामात आत्मिक समाधान आहे, काम केल्याचा आनंद आहे असं काम मिळालं. आंदोलन छेडण्यासाठी त्याच्याकडे तर कावळ्याची दृष्टी आहे. विविध प्रकारची आंदोलन छेडण्यात त्याचा हात कुणी धरू शकणार नाही. 'दमकोंडी आंदोलन', 'गुदगुल्या आंदोलन', 'प्रेतयात्रा आंदोलन', 'टॉवरवरून उडी मारण्याचे आंदोलन', 'नेहरू पुतळा दहन मोर्चा', 'दारू बाटली-एंड्रिन डबा आंदोलन', आणि काय काय आंदोलन ते लाहोटीच जाणे. या आंदोलनांच्या जोडीला वेळोवेळी पत्रके काढणे आणि शासनाला वेळोवेळी निवेदने देणे आणि रोज दैनंदिनी लिहिणे. त्याच्याकडे अशा वीस- बावीस वर्षांच्या रोजनिशी लिहिलेल्या आहेत. असतो छंद एकेका माणसाला झालं!

त्याच्या कामाची एक खास पद्धत आहे. केव्हा तरी अचानक येऊन धडकणार अन् म्हणणार, ''वकील साब एक नयी आयडिया है ! आपको आरळ आना पडता.'' ''आरळला काय आहे?'', ''आरळचा आपला एक वयोवृद्ध कार्यकर्ता आहे. गावात त्याची एकट्याची पिठाची गिरणी आहे. कसल्यातरी थकबाकीच्या निमित्ताने तहसीलदारांनी त्या गिरणीला कुलूप ठोकलं आहे. एक तर त्यामुळे गावात लोकांचं खऱ्या अर्थाने आटापाणी बंद आहे, शिवाय तो संघटनेचा कार्यकर्ता

आहे म्हणून मुद्दाम त्याच्या गिरणीला कुलूप ठोकलं आहे.'' ''बरं ! मग यात आपला काय संबंध आहे?'' ''आपकी उपस्थितीमें मैं वो कुलूप तोडनेवाला हूं. देखना है शासन क्या करती है.'' झालं. शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत, हलगीच्या नादात, मोर्चाने लाहोटी गिरणीवर जाणार, कुलूप तोडणार, फोटो काढणार. नाही तरी कुलूप ठोकायची कामगिरी ही नावालाच होती. लाजेकाजे शासन काहीतरी थातुर मातुर गुन्हा लावून केस नोंदवणार अन् प्रकरण हळूहळू दबून जाणार. वैयक्तिक पातळीवरील ही अशी झाली चुटफूट आंदोलने; पण अशा फुटकळ आंदोलनाने त्याचं समाधान होणार नव्हतं. त्याचं लक्ष होतं एखाद्या मोठ्या व्यापक आंदोलनावर. असं आंदोलन ज्यामुळे अख्खा तालुका, जिल्हा पेट घेईल आणि त्याला आयती संधी मिळाली ती बंडिंग आणि तीनपट पाणी पट्टीच्या प्रश्नानं.

परभणी जिल्ह्यात, विशेषत: वसमत तालुक्यात (आताचा हिंगोली जिल्हा) शेतकऱ्यांना तीनपट पाणीपट्टी आणि बंडिंगच्या वसुलीच्या नोटिसा व्यापक प्रमाणावर सुटल्या. कुणाला चाळीस, पन्नास हजार, कुणाला सत्तर ते लाखा लाखांच्या नोटिसा सुटल्या. या नोटिसांमुळे सारा तालुका हादरून गेला. एवढ्या रकमा द्यायच्या कुठून अन् कशासाठी? आकाशातून एकदम वीज पडावी तसं झालं लोकांना आणि विलक्षण असंतोष पसरला. मुळात बंडिंगचं काम झालं किंवा नाही, झालं तर केव्हा, किती, कुठे कुणाला नोटीस देऊन-सारा सारा अंधार. लोकांनी जावं कुणीकडे? सत्तारुढ असो किंवा विरोधी आमदार असो, ते घोटाळणार सत्तेच्या परिघातच. तेव्हा त्यांच्याकडून कांही मदतीची अपेक्षा करणं कठीणच. तेच मदत करू शकणार नाहीत तर त्यांच्या स्थानिक चमच्यांकडून काय अपेक्षा करायची. लोक साहजिकच धावले शेतकरी संघटनेकडे . काही शेतकऱ्यांना आलेल्या नोटिसा घेऊन लाहोटी माझ्याकडे आला. ''वकील साब, कुछ तो करना पडेगा. लोग बहुत परेशान हैं !'' आता करना पडता म्हणजे तरी काय करना पडता? पण हे विचारायचं कुणाला? ते काहीही असो. विचार केला, आला लाहोटी अंगावर तर घेऊ त्याला शिंगावर. मग भू-संवर्धन खात्यातील कांही मित्रांशी संपर्क साधून एकूण प्रकरणाची माहिती घेतली आणि इच्छा तिथे मार्ग सापडला. सर्वांत महत्वाची बाब म्हणजे सारा मामला चक्क बनवाबनवीचा. संबंधित कार्यालयाजवळ काही कागदपत्रच उपलब्ध नव्हते. मग या कार्यालयाकडून त्या कार्यालयाकडे अशी ढकलपट्टी सुरू झाली. म्हणजे दाल मे नक्कीच काला होतं. प्रकरणे बऱ्याच वर्षांपूर्वीची त्यामुळे असलंच रेकॉर्ड कधी काळात, तर ते वाळवींनी



किंवा माणसांनी खाऊन टाकलेलं. सरकारी कार्यालयात कालच्या कामाची कागदपत्रे जिथे उपलब्ध होत नाहीत तिथे काही वर्षांपूर्वीच्या कागदपत्रांचं काय विचारायचं! लाहोटीच्या आंदोलनाला यश येईल असा विश्वास आला. भूमिका तयार झाली. आता आंदोलन उभं करायचं म्हणजे गावोगावच्या शेतकऱ्यांना संघटित करायचं, प्रश्न समजावून सांगायचा.

परत लाहोटीचा फोन, ''रविवारी वसमतला प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक ठेवली आहे. तिथे या प्रश्नावर आपली भूमिका तुम्ही मांडावी अशी विनंती आहे. लोगोमें भारी असंतोष है और अब तो ये प्रश्न अपने लिए प्रतिष्ठा का बन गया है.'' लाहोटीसाठी तर हर सवाल प्रतिष्ठेचा असतो. इतक्या वर्षांच्या अनुभवानं आणखीही मला हे कळत नाही, की मी लाहोटीच्या प्रत्येक योजनेत अडकत जातो कसा? तो येतो किंवा फोन करतो आणि मी केव्हा, कसा अडकलो मला कळतसुद्धा नाही आणि कळतं तेव्हा इतका पुढे गेलेला असतो, की मागे वळण्याचा विचारसुद्धा करता येत नाही.

आता सुरू झालं आमचं प्रचारसत्र. एखाद्या दरवेशानं अस्वलाला गल्लोगल्ली फिरवावं आणि बेटा सलाम करो म्हटलं की त्यानं सलाम करावा तसं आमचं झालं. गावोगावच्या सभेत लाहोटीनं सांगावं, ''आणि आता वकील साहेब या प्रश्नावर संघटनेची भूमिका मांडतील आणि पुढील आंदोलनाची दिशा दाखवतील.'' की लगेच अस्वलासारखी मान डोलवायची, सलाम करायचा आणि सुरवात करायची, ''माझ्या भावांनो आणि घरादारात बसून या लाउडस्पीकरचा आवाज ऐकणाऱ्या माझ्या मायबहिणींनो......'' दरवेशाचा हा खेळ गावोगावी झाला. परिणामी वसमतला जेव्हा मोर्चा निघाला तेव्हा सारं वसमत शहर त्या मोर्चाचं प्रचंड रूप पाहून अवाक् झालं. आमचं निवेदन स्वीकारायला तहसीलदार हजर होते. जाणूनबुजून शासकीय कर्मचारी ते. त्यांची नेमणूकच मुळी काम न होऊ देण्यासाठी असते. तेव्हा त्यांच्याकडून काम होईल ही अपेक्षा करणंच मुळात चूक. शिवाय बंडिंगच्या प्रश्नासंबंधी त्यांना अजिबात कल्पना नव्हती. हे चाललंय काय हा प्रश्न त्यांनी तोंडानं विचारला नाही एवढंच; मात्र त्यांच्या चेहऱ्यावर हा प्रश्न स्पष्ट दिसत होता. शेवटी त्यांची नेमणूकच मुळात ज्या कामासाठी होती ते त्यांनी केलं. ते म्हणाले, ''आपलं निवेदन मी वर पोंचवतो.'' म्हणजे काय करतो ते आमच्या लक्षात आलं तेव्हा आम्हीही निवेदन देऊन बाहेर पडलो.

या प्रयोगासाठी शेतकऱ्यांना संघटित करण्यात लाहोटीला खूपच यश मिळालेलं असलं तरी मागण्या पदरात पाडून घेण्यात यश मिळवता नाही आलं. वसुलीचा

तगादा थांबवण्यापुरतं मर्यादित यश मिळालं; पण या अनुभवावरून अधिक व्यापक आंदोलन करण्याचं त्यानं ठरवलं. आता सबंध परभणी जिल्ह्यात दौरे करायचे अन् जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा न्यायचा अशी आखणी ठरली. त्यासाठी आधी जिल्ह्यावर एक प्रतीनिधिक बैठक, मग तालुक्यातालुक्यात बैठका, त्या पुढे गावागावात प्रचार या पद्धतीनं काम करून मोर्चाचा दिवस ठरवला आणि नेहमीप्रमाणे मोंढ्यातून मोर्चा निघून जिल्हाधिकारी कार्यालयावर पोचला. एरवीच संघटनेच्या मोर्चाला पोलिसांची गरज नसते. कदाचित त्यांची भावना असेल, की मोर्चाला 'संरक्षण' दिलं नाही तर या महिन्याचा अधिकृत पगार होणार नाही त्यामुळे बिचारे मोर्चाला साथ देतात. तेव्हा त्यांच्या संरक्षणात हा प्रचंड मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर गेला. तिथे अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली, निवेदन हाती दिलं आणि संघटनेचं प्रतिनिधी मंडळ परतलं. तोपावेतो कार्यालयाबाहेर थांबलेल्या हजारो मोर्चेकऱ्यांसमोर एका हातात पाण्याचा प्याला आणि दुसऱ्या हातात माईक घेऊन ब.ल. तामसकर भाषण देत राहिले. अधिकाऱ्यांनी काही आश्वासन दिलं नसलं तरी तीनपट पाणी पट्टी आणि बंडिंगचह वसुली हे प्रश्न कायमचे निकाली निघाले आणि हे यश संपादून मोर्चेकरी गावोगावी परतले.

लाहोटीचा धाडसी स्वभाव आणि काम करण्याचं हे कौशल्य पाहून संघटनेतील अवघडात अवघड कामंही त्याच्यावर टाकण्यात येऊ लागली. निवडणुकीच्या कामाचंही असंच झालं. एकदा निवडणुका व्यापक प्रमाणावर लढवण्याचा खेळ खेळून पाहण्याचं ठरवलं गेलं. धारणीचा अती दुर्गम मतदारसंघ आदिवासींसाठी राखून ठेवलेला होता. संघटनेनं त्यासाठी एका आदिवासी महिलेला उभं केलं. अडचणींची रास कशी होती बघा. आधीच धारणीचा भूभाग दुर्गम, त्यात आदिवासी राखीव. उमेदवार अशिक्षित आदिवासी महिला आणि संघटना शेतकऱ्यांची. म्हणजे साधन,संपत्ती साराच आनंदी आनंद ! असा हा अवघड डोंगर चढायची कामगिरी लाहोटींवर सोपवण्यात आली. त्यानं आख्खा मतदारसंघ पालथा घातला. यश तर अपेक्षित नव्हतचं; पण संघटनेच्या उमेदवारानं मिळवलेली मतं मात्र अनपेक्षितरीत्या चांगली होती.

कामावरची लाहोटीची निष्ठा वाखाणण्यासारखी. त्याच्या कामाच्या एकेक कथा ऐकल्या म्हणजे पावन खिंड राखणाऱ्या बाजीप्रभूची आठवण यावी! असाच एकदा त्याचा फोन आला केव्हा तरी, नेहमीप्रमाणे, ''वकील साब, मैं बहुत संकट में हुं, मेरी इज्जत बचाना केवल आपके हाथमे है !'' लाहोटीचा फोन म्हटलं की एरवीच माझ्या पोटात गोळा उठतो. संकट तर त्याच्या पाचवीला पुजलेलं आणि



इज्जत का सवाल तर नेहमीचाच; पण यावेळी आवाज विशेष गंभीर होता. म्हणून मी त्याला विचारलं ''क्यूं भाई, क्या बात है? बहुत गंभीर लग रहे हो?'' ''वो तो मैं कल आनेपरही बताउंगा. बस एवढं लक्षात ठेवा, की उद्या आपल्याला जवळ्याला जायचं आहे.'' मी विचार करीत राहिलो, लाहोटी काही कुणी गांव की गोरी नव्हता, की ज्याच्या इज्जतीशी गावचा कुणी चौधरी खिलवाड करीत असेल. खैर पाहूया. उद्या कळेलच की.

दुसऱ्या दिवशी लाहोटी आला तो भेदरलेल्या चेहऱ्यानं. त्यानं सांगितलं आणि सारा खुलासा झाला. त्याचं असं झालं; १९९४ च्या निवडणुकीत संघटनेच्या वतीनं उभे राहिलेल्या उमेदवारांपैकी एक उमेदवार म्हणजे लक्ष्मण वडले-जालना मतदार संघात- साहेबांनी त्याच्या प्रचाराचा जिम्मा लाहोटीवर टाकलेला, हा आदेश देऊन, 'निवडणूक संपेपर्यंत हा मतदारसंघ सोडायचा नाही. सोडायचा तो निकालाचा गुलाल उधळूनच!' तो हुकूम सर ऑखोंपर मानून लाहोटीनं जालन्यात मुक्काम ठोकला. ऐन मतदानाच्या दिवशी लाहोटीच्या मुलाच्या लग्नाचा मुहूर्त ! आणि लाहोटी म्हणजे तर लक्ष्मणच्या प्रचारयंत्रणेतील कळीची डिबरी! ऐन मतदानाचा दिवस आणि लग्नाचाही. त्याची घालमेल चालली; पण जालना कांही सोडवेना. शेवटी ठरवलं-आधी लगीन कोंडाण्याचं; त्यामुळे स्वतःच्या मुलाच्या लग्नात त्याला हजर राहता आलं नाही. आता लग्नात खुद्द वरपिताच नाही म्हटल्यावर सगळ्या वऱ्हाड्यांना काय वाटलं असेल! आणि त्याहीपेक्षा नवरीकडच्या लोकांना काय वाटलं असेल! खैर लग्न तर पार पडलं. लग्न घरी परतलं; पण बापाला लाहोटीला प्रश्न पडला घरी कुठल्या तोंडानं जायचं? शेवटी जावं तर लागणारंच होतं, तेव्हा त्यानं मला आणि पाशा पटेलला गळ घातली. आमचा उपयोग ढालीसारखा करून त्याला घरच्यांच्या तोफखान्याला तोंड द्यायचं होतं. आम्ही गेलो खरे. तिकडून पाशा पटेल आणि वसुंधराताई आल्या. आम्हाला सोबत पाहून घरच्यांना राग गिळून घ्यावा लागला; पण त्यांच्या डोळ्यातील राग पाहून आम्हाला वाटलं, धरतीनं गिळून घेतलेलं बरं ! संघटनाकामात गुंतल्यामुळे पोटच्या पोराच्या लग्नालाही हजर न राहणाऱ्यांना 'पागल' नाही तर काय म्हणायचं? अशी पागल मंडळी संघटनेत आहे म्हणून तर संघटना एवढ्या ताकदीने, ताठ मानेने उभी आहे.

अंत्ययात्रेचा आणि लाहोटीचा काही तरी विलक्षण संबंध आहे. म्हणजे अंत्ययात्रेचा लाहोटीला छंद आहे असं नाही; पण ज्या अंत्ययात्रांना हजर राहणं त्याच्यासाठी अत्यंत आवश्यक , त्या वेळी हा नेमका गैरहजर राहणार आणि भलभलत्या गोष्टीच्या अंत्ययात्रा मात्र आवर्जून 'साजऱ्या' करणार ! घरच्यांच्या

अनेक अंत्ययात्रांना संघटनाकामात गुंतल्यामुळे त्याला हजर राहता आलं नाही.

जालन्याला एकदा असाच संघटनेचा मेळावा आयोजित केलेला होता, त्यासाठी तेव्हाचे संघटना अध्यक्ष मोहन गुंजाळ हजर राहणार होते आणि त्यांच्याच अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार होता. मेळाव्याची तारीख ठरली आणि नेमकी तीच तारीख लक्ष्मण वडले यांच्या मुलाच्या निदानासाठी मुंबईचीही ठरली. त्यामुळे जालना मेळाव्यात लक्ष्मणला हजर राहणं जमणं शक्यच नव्हतं. मुंबईची तारीख बदलता येत नव्हती आणि मेळाव्याची तारीखही. तेव्हा सारी जबाबदारी लाहोटीच्या अंगावर. मेळाव्याचा दिवस आला आणि लाहोटीला निरोप आला, त्याच्या मामाच्या मृत्यूचा. त्या मामाला मुलगा नव्हता त्यामुळे त्याच्या अंत्यविधीसाठीच लाहोटीला निरोप होता. अंत्यविधीला जावं तर क्रियाकर्म सारे लाहोटीलाच करावे लागणार आणि समाजरीतीप्रमाणे काही काळ घर सोडून जाताही आलं नसतं. शिवाय अंत्यविधीला गेलं तर मेळाव्याचं काय? लाहोटीनं विचार केला, आपण नाही गेलो तर दुसरा कुणी भाऊ सारे क्रियाकर्म पार पाडेल; पण मेळाव्याचं काम या घटकेला दुसरं कुणी पार नाही पाडू शकणार. तेव्हा लाहोटीनं मेळावा पार पाडायचा असंच ठरवलं.

असाच आणखी एक प्रसंग त्याच्या आजोबाच्या मृत्यूचा. परभणीच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर पूर्ण जोशो खरोशसे बंडिंग प्रश्नी प्रचंड मोर्चाचा दिवस आलेला. मोर्चाची कल्पनाच मुळी लाहोटीची. प्रचारासाठी रात्रंदिवस त्यानं गावोगावी दौरे केलेले, प्रचार सभा आयोजित केलेल्या आणि ऐन मोर्चाच्या दिवशी त्याच्या आजोबांचा मृत्यू झालेला, परत तोच प्रश्न. अंत्ययात्रा की मेळावा? परत तेच उत्तर. क्रियाकर्म काय कुणी दुसरा भाऊही करु शकेल की पण मोर्चा कोण सांभाळणार? लाहोटीशिवाय मोर्चा म्हणजे मारुतीशिवाय रामायण! शेवटी वजन मोर्चाच्याच पारड्यात.

आणि एवढ्यावरच हा योगायोग थांबला नाही. इजा, बिजा आणि तिजा! या वेळी मृत्यूचा प्रसंग लाहोटीच्या आजोबांच्या धाकट्या भावाचा. लाहोटी म्हणजे घरच्यांनी गावावर ओवाळून टाकलेला-निकम्मा पोरगा. पण या निकम्म्यावर या आजोबांचं विलक्षण प्रेम. दोघांतल्या या रसायनाचं काही कारण सांगता येत नाही; पण असं रसायन होतं खरं. त्याच्या मृत्यूच्या बातमीनं लाहोटी पार हादरून गेला. नेमकं या वेळेस चाकण ते नागपूर या धडक मोर्चासाठी ज्या वीस कार्यकर्त्यांची निवड झाली होती त्यांत लाहोटीचा समावेश होता. ही आघाडी सोडायची आणि परत मायेच्या जंजाळात गुंतून पडायचं. मनाला बांध घातला,



शरद जोशींचं स्मरण केलं, मन घट्ट करून त्यानं मोर्चाला परत एकदा प्राधान्य दिलं!

इजा-बिजा-तिजाच्या पुढे आपण काही ऐकलं नाही; पण त्याही नंतर 'चौजा' असेल तर लाहोटीच्या बाबतीत इजा-बीजा-तिजा आणि चौजाही झालं. म्हणून तर योगायोगाच आश्चर्य वाटतं. या वेळी मृत्यू होता तो चुलत आजीचा. वडिलांच्या चुलतीचा. या वेळी लाहोटी गुंतला होता जालना जिल्ह्यातील निवडणूक कामी. रात्री मुक्कामाला जालना-मंठा रोडवरील शेतकरी संघटनेच्या सहानुभूतीदार ढाब्यावर. लाहोटीच्या मोटारसायकलवर शेतकरी संघटनेचा मोठ्ठा बिल्ला रंगवलेला आणि ही मोटार सायकल रस्त्यावर ढाब्याच्या उजेडात लावलेली. लाहोटीच्या नातेवाइकांची एक जीप या ढाब्यावरून चाललेली. त्यांनी ही मोटारसायकल पाहून जीप थांबवून चौकशी केली आणि लाहोटीला बातमी दिली आजीच्या मृत्यूची. अत्यंत अडचणीत सापडलेल्या लाहोटीने त्या नातेवाइकांना कळकळीची विनंती केली, "मी भेटल्याचं घरी सांगू नका. मला निवडणूक सोडून येता येणार नाही आणि न आलो तर घरच्यांना राग येईल. तेव्हा मी भेटलो हे सांगू नका.'' त्यांनी घरच्यांना कळवलं असेल किंवा नसेलही पण एका-मागे एक अशा चार प्रसंगी लाहोटीनं अंत्ययात्रेला टाळणं घरच्यांना संशयास्पद वाटलं असेलच. पण लाहोटीच्या दृष्टीने अंगावर घेतलंलं काम कुठल्याही निमित्ताने टाळणे हा भगोडेपणा झाला असता आणि कुठलाही रोष पत्करायची त्याची तयारी असते; पण 'भगोडेपणाचा' डाग नको!

कुटुंबीयांच्या अंत्ययात्रेला योगायोगाने हजर न राहू शकलेल्या लाहोटीने इतर प्रसंगी आंदोलनाचा एक भाग म्हणून वेळोवळी अंत्ययात्रा मात्र काढल्या. कोलमडलेल्या शेती पाणी-पुरवठा योजनेबद्दल पूर्णा पाटबंधारे कार्यालयावर अंत्ययात्रा नेली. पाणीपुरवठा यंत्रणेचा पुतळा तयार करून रामनामाच्या गजरात ही अंत्ययात्रा काढली. विजेचा तर नेहमीचाच खेळखंडोबा चाललेला. वीज आली म्हणून धावत धावत मोटार सुरू करावी अन् दारं धरायला जावं, तो दांड भिजे भिजे पर्यंत वीज गायब. शेतीसाठी वीज़ म्हणजे हदय. त्याची धडधड चालली तर धमन्यातून रक्त वाहणार. वीज नाही तर पाणी नाही, पाणी नाही तर पीक नाही. पीक नाही तर नाथांच्या भारुडासारखं आहे सारं. या सतावणाऱ्या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी हिंगोलीच्या वीजबोर्डाच्या कार्यालयावर 'विजेची' अंत्ययात्रा नेली होती. हिंगोली शहरातून या अंत्ययात्रेत कुतूहलापोटी शहरवासीयसुद्धा आले होते. विजेच्या पुतळ्याचं कार्यालयासमोर, 'विधिवत' दहन करण्यात आलं.

तिसरी यात्रा काढली ती कापसाच्या किमतीच्या चुकाऱ्याच्या प्रश्नावर. यासाठी लाहोटीनं दुहेरी आंदोलन छेडलं. आधी फेब्रुवारी २००२ मध्ये उंच मनोऱ्यावरून शेतकरी उड्या मारतील हे आंदोलन जाहीर केलं. उंच मनोऱ्यावरुन उडी मारणं म्हणजे चक्क आत्महत्याच; पण तरीही 'आत्महत्या' आंदोलन असं नाही म्हणायचं, म्हणायचं ते उडी आंदोलन! आता ही उडी कोण कोण, कुठे कुठे मारणार, सारं सारं गुप्त ठेवलं गेलं. पोलिस यंत्रणा, महसूल खातं आणि विशेषेकरून कापूस पणन महासंघाचे अधिकारी त्रस्त झाले; पण स्थळाचा, माणसांचा माग लागू दिला नाही. शेवटी पणन महासंघाच्या अधिकाऱ्यांनी कापसाच्या किमतीचा चुकारा फेब्रुवारीअखेर केला जाईल असं निश्चित आश्वासन दिल्यावर लाहोटीनं हे 'उडी' आंदोलन परत घेतलं. पैशाचा चुकारा करून हे आश्वासन देतानाच हे खोटं आश्वासन आहे हे पणन महासंघाला आणि शासनालाही माहीत होतं; पण माहीत नव्हतं बळिराजाला. आशेवरच आयुष्य कंठणाऱ्या बळिराजानं शासनाच्या शब्दाला मान दिला आणि शासनानं त्याची मान कापली. आश्वासन पाळलं गेलं नाही म्हणून पणन महासंघाच्या पुतळ्याची अंत्ययात्रा काढण्याचं आंदोलन लाहोटीनं जाहीर केलं. नेहमीच्या पद्धतीनं प्रचार केला आणि परभणीच्या मोंढ्यातून ही प्रेतयात्रा काढण्यात आली. प्रेतयात्रा तर निघाली; पण 'प्रेत' मात्र पोलिसांनी जप्त केलं. यात्रा जाऊ दिली. मोंढ्यातून, गर्जत ही प्रेतयात्रा पणन महासंघाच्या कार्यालयापुढे गेली. अंत्ययात्रेतील शेतकरी रडत रडत घोषणा देत होते: ''कापसाचे पैसे न देताच मेला की हो.'' नेहमीच्या अंत्ययात्रेच्या प्रसंगी बायका गहिवरुन गळा काढून म्हणातात तशा आवाजातल्या या घोषणांनी शासनाच्या इज्जतीची लक्तरे पुरती निघाली. चुकलो, लाज असती तर लाजेची लक्तरे निघाली असती म्हणा. कापूस प्रश्नावरील निषेध नोंदवणारी इतकी बोचरी टीका करण्याची कल्पना केवळ लाहोटीलाच सुचू शकते.

२००२ च्या मे महिन्यात लाहोटीनं एक मोर्चा काढला. ज्या प्रसंगानं हा मोर्चा काढला गेला, तो प्रसंग गेल्या कांही वर्षांपासून भारतातीतल अनेक राज्यांतून घडतो आहे. कर्जबाजारीपणामुळे आणि बँकांच्या तगाद्यामुळे ठिकठिकाणी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. असाच एक प्रसंग घडला. वसमत तालुक्यातील भोरिप गावच्या दिनाजी सावंत यांनी बँकेने चालवलेल्या सततच्या तगाद्याला आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून एंड्रिन हे पीक फवारणीचं औषध पिऊन आत्महत्या केली. शासनाला वाटलं, त्यात काय मोठंसं? अशा आत्महत्या तर गेल्या दहा वर्षांत हजारो शेतकऱ्यांनी केल्या. एवढा मोठा करोडो लोकसंख्येचा आपला देश,



त्यातल्या हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असतील तर चिंता करण्यासारखं काय आहे? या देशात शेतकऱ्यांनी आत्महत्या नाही करायच्या तर काय करायचं? पण मुर्दाड बनलेल्या शासनाला लाहोटीनं आव्हान दिलं आणि या प्रश्नाच्या चौकशीची मागणी केली. शासनानं मागणी मान्य केली आणि कुणी शिनगारे नावाच्या उप- जिल्हाधिकाऱ्याची नेमणूक केली या चौकशीसाठी. या गृहस्थांनी अहवाल काय द्यायचा हे आधीच ठरवलं असावं. त्यानं व्हिसेराचा अहवाल येण्याची वाट न पाहता आपली चौकशी गुंडाळली आणि निकाल दिला. त्याचा मथितार्थ असा की सदरहू दिनाजी सावंत हा खूप दारू प्यालेला होता आणि दारूच्या नशेत आपण काय करतो हे न समजल्यामुळे त्याने दारू समजून एंड्रिन घेतलं. सबब ही कर्जबारीपणामुळे केलेली आत्महत्या नाही. या शिनगारे साहेबांनी तर रहस्यकथा लेखक किंवा हिंदी चित्रपटाचा पटकथाकार व्हायला पाहिजे होतं. या अहवालानं चिडून जाऊन लाहोटीनं एंड्रिन- दारू मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर न्यायचं आंदोलन जाहीर केलं. ''दारूअमाप प्यालेला माणूस आत्महत्या करण्यासाठी एंड्रिन पिऊ शकतो का?'' हे सप्रमाण दाखवण्यासाठी एका हातात दारूची बाटली आणि दुसऱ्या हातात एंड्रिनचा डबा असं हे आंदोलन जाहीर करण्यात आलं. पण या वेळी प्रसिद्ध पोलिस अधीक्षक श्री. विक्रम बोके हे परभणीचे अधीक्षक होते. त्यांनी या आंदोलनामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो हे हेरलं. शिनगारे महाशयांच्या 'बुद्धिमान' अहवालामुळे शासनाच्या इज्जतीचे आधीच तीनतेरा वाजलेले होतेच; पण कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन त्यात भर पडू नये म्हणून श्री. बोके साहेबांनी १४४ कलम लागू केलं आणि हे आंदोलन बारगळलं. कार्यकर्ते घरोघरी परतले. शासनाच्या दबावाखाली नोकरशाही कोणत्या पातळीवर जाऊ शकते याचं 'शिनगारे अहवाल' हे एक उदाहरण आहे.

आणि आता हे ताजं ताजं लाहोटी आंदोलन प्रकरण. सहकारी बँकेने म्हणजे परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांच्या मालमत्तेचा जप्ती व लिलावाचा धडक कार्यक्रम जाहीर केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार श्री. रामप्रसाद बोर्डीकर हे नुकतेच बँकेचे अध्यक्ष झालेले. निरनिराळ्या पक्षांच्या नेतेगणांची 'साखळी' करून निवडणुका जिंकलेल्या. साऱ्यांनाच 'शेतकऱ्याचा कळवळा'. तेव्हा या बँकेची आर्थिक पत सुधारण्यासाठी कर्जवसुलीची मोहीम कडकपणाने राबवण्याचं ठरवलं आणि याच्या अंमलबजावणीसाठी गोरगरीब शेतकऱ्याशिवाय दुसरं कोण 'गिऱ्हाईक' यांना सापडणार? तेंव्हा या मोहिमेला

उत्तर देण्यासाठी औंढा तालुक्यातील गोजेगाव या गावी मध्यवर्ती सहकारी बँकेच्या भागधारकांचा एक मेळावा आयोजित केला. या मेळाव्यासाठी माहिती गोळा केली असता असं निदर्शनाला आलं, की संचालक मंडळाच्या नात्यागोत्यातील, राजकीय पक्षोपक्षांच्या नेतागणांच्या ताब्यातील बिगर शेती संस्थांकडे 'केवळ १५७ कोटीच्यावर' कर्ज वर्षानुवर्षे थकलेले आहे तर शेतकऱ्याकडे मात्र '१५ कोटींच्या वर' एवढी बाकी थकलेली आहे ! अबब ! केवढी ही शेतकऱ्याकडील थकबाकी लाहोटीनं मागणी केली, की आधी या बड्या धेंडांकडील १५७ कोटींची थकबाकी वसूल करा आणि नंतरच शेतकऱ्यांच्या मालमत्तेला हात घाला. नसता भागधारक शेतकरी संचालक मंडळाच्या थकबाकी वसुलीसाठी त्यांची मालमत्ता प्रतिजप्ती आंदोलन करतील. या धमकीनं काम चोख केलं. गावोगावी जप्तीसाठी अधिकारी फिरकलेच नाहीत!

लाहोटीच्या कामाची व्याप्ती केवळ आंदोलने आणि प्रचार एवढ्यापुरतीच मर्यादित नाही. त्यांनी वेळोवेळी, विशेषत: परप्रांतातल्या दौरा प्रसंगी साहेबांची पाठराखणही केलेली आहे. ''गव्हाच्या आंदोलनात साहेबांनी पंजाबचा दौरा केला होता. पंजाबातील तेव्हाचं दहशतीचं वातावरण पाहता साहेबांना घातपात होण्याची शक्यताही गृहीत धरायला पाहिजे होती. खलिस्तान आंदोलन परमसीमेवर असतांना काहीही अनपेक्षित असू शकत नव्हतं. साहेब तर थेट वाघा बॉर्डरपर्यंत गेलेले होते. टेमुर्डे, वामनराव चटप आणि कै. हेमंत देशमुख यांनी मला साहेबांचा रक्षक म्हणूनच काम सोपवलं होतं. हे लोक मला थट्टेने 'मार्शल' म्हणायचे. मला ते टोपणनाव आवडलं आणि साहेबांची पाठराखण करायचं कामही मनापासून आवडलं. एवढ्या मोठ्या माणसाच्या सहवासात राहण्याची संधी मिळणं यापरता मोठं बक्षिस काय असू शकेल?'' असं लाहोटीनं नंतर मला सांगितलं.

अशीच कामगिरी आणखी एक वेळेस करावी लागली. नर्मदा सागर आंदोलनात मेधा पाटकर आणि समाजवादी, पर्यावरणवाद्यांनी विरोध केल्याने आंतरराष्ट्रीय दबावाखाली काम ठप्प झालेलं होतं. अशा परिस्थितीत नर्मदा सागर परिसराला कांही काळ प्रतिबंधित क्षेत्र स्वरूप आलेलं होतं. या वेळी महाराष्ट्रातून शेतकरी संघटनेनं 'नर्मदा धरण बचाव आंदोलन' पुकारलं होतं आणि या आंदोलनात सहभागी होण्यासाठी हजारो कार्यकर्ते गुजराथकडे रवाना झाले होते. या कार्यकर्त्यांना गुजरातमध्ये प्रवेश करण्यापूर्वीच रोखण्यात आलेलं होतं. तेव्हा शरद जोशी काही मोजक्या कार्यकर्त्यांसह लपतछपत, सरकारी यंत्रणेला चुकवत आंदोलन स्थळी अचानक प्रकट झाले. त्या वेळी काट्याकुट्याच्या अवघड रस्त्यातून साहेबांची



सतत पाठराखण करायचं कामही लाहोटीनं केलेलं. त्याच्या सोबत या वेळी मदन दिवाण हा आणखी एक युवक होता.

मटका खेळणारा, रात्रंदिवस रमीत रमणारा, घरच्यांनी जवळजवळ वाळीत टाकलेला एक तरुण केवळ योगायोगानं संघटनेकडे येतो. शरद जोशींच्या विचाराने भारावून जातो, आयुष्याचं सोनं करून घेतो, वाल्याचा वाल्मीक ऋषी होणं या परतं काय वेगळं असेल?

ही सगळी वाटचाल पाहिली, की लालबहादूर शास्त्रींचं ते वाक्य आठवतं-पाकिस्तानाशी झालेल्या दुसऱ्या युद्धांत भारतीय सैनिकांनी थेट लाहोरात धडक मारली आणि पाकिस्तानाला दाती तृण धरून शरण यावं लागलं. त्या वेळी शास्त्रीजी म्हणाले होते, ''छोटे आदमी भी कभी कभार बडे काम कर जाते हैं.''

■ ■

# सरोजताई

त्यांची पहिली भेट झाल्याला किती वर्षं झाली असतील? दिवस नक्की सांगू शकतो. नऊ-दोन-एकोणीसशे चौऱ्याऐंशी. भेटीचा दिवस पक्का आठवायला त्या कुणी फार मोठ्या नेत्या, व्ही. आय. पी. म्हणून नव्हे, तर शेतकरी संघटनेच्या दुसऱ्या अधिवेशनाचा (परभणी अधिवेशन) दुसरा दिवस होता म्हणून तो दिवस पक्का लक्षात राहिला. त्याही वेळेस प्रत्यक्षात तशी भेट झाली नाही. झाली ती नजरभेट. झालं ते असं.

शाळेत नव्याने जाऊ लागलेल्या शाळकरी पोराच्या उत्सुकतेनं मी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी अधिवेशनस्थळी जायला तयार झालो, तो सकाळी लवकर उठून गाडी पकडायची घाई करावी तशा घाईनं नारायण जाधव आला. म्हणाला, ''वकील साहेब मैदानावर निघाला काय?'' मी 'हो' म्हटल्यावर त्यानं एक काम सांगितलं.'' मी देतो तो संघटनेच्या ठरावांचा गठ्ठा मैदानावर पोचवता का?'' कार्यालय मैदानावरच होतं, तेव्हा हा निरोप देणं तसं सोपंच काम होतं. मी त्याच्या निरोपाची वाट पाहत ओट्यावर उभा राहिलो. नारायणचं घर आमचं घर टाकून दोन घरांवरच होतं. त्याच्या घराच्या ओट्यावर तीन महिला उभ्या होत्या. त्यांच्याकडे पाहिलं, की लक्षात आलं, बाहेरगावच्या असाव्यात. परभणी तसं छोट गाव, शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या ओळखी पिढ्यान् पिढ्यांपासून. तेव्हा नवं माणूस पटकन् ओळखू येतं. नारायणच्या घरी या कोण आल्या असाव्यात? नारायण निरोप घेऊन आल्यावर मी त्याला विचारलं, ''या कोण रे?'' ''तुम्ही नाही ओळखलं? त्या अलीकडच्या आहेत ना. त्या आहेत सरोजताई आणि पलीकडच्या दोघी साहेबांच्या मुली श्रेया आणि गौरी. सरोजताई म्हणजे आपल्या रविबाबूंच्या पत्नी.'' नारायणनं मला माहिती पुरवली, नारायण मला वयानं किती तरी लहान; पण संघटनेतील वयानं मला सिनीयर. तेव्हा 'आपले' रविबाबू म्हणजे नारायणप्रमाणे 'ते ही' संघटनेतील जुने कार्यकर्ते एवढं कळलं. नारायणाच्या बोलण्याचा ढंग असा होता, ''एवढंही तुम्हाला माहीत नाही? काय हे अज्ञान!'' नारायणच्या सांगण्यामुळे एवढं मात्र ज्ञान मला झालं, की सरोजताई म्हणजे कुणा रविबाबूंच्या पत्नी आणि रविबाबू म्हणजे संघटनेतील कुणी बडी असामी. एव्हाना 'साहेब'



म्हणजे शरद जोशी हेही मला समजलं होतं. तेव्हा हळूहळू मीही ज्ञानी होत गेलो. ज्ञानी व्हायला अगदीच काही वटवृक्षाखालीच बसायला नको म्हणा.

१९८४ च्या परभणी अधिवेशनापासून संघटनेच्या एकेका उपक्रमात मी गुंतत गेलो आणि हळूहळू मलाही संघटनेत बढती मिळत गेली. त्यामुळे कार्यकारिणीच्या बैठकांतून सहभागी होण्याची संधी मला मिळत गेली. भेटीगाठी होत गेल्या. भेटीगाठी म्हणजे परत नजरभेटीच; पण एव्हाना किमान नावानं तरी एकमेकांच्या ओळखी झाल्या. अधूनमधून नमस्कार व्हायचे; पण तेवढच. गप्पांची मैफल होत नव्हती. गप्पा मारण्याच्या, निमित्ताने कळत न कळत गट पडत असत. रविबाबू, अनिल गोटे, बद्री देवकर, नरेंद्र अहिरे, बाबूलाल परदेशी, सरोजताई, मृणालिनी, अनिलची पत्नी असा गट व्हायचा. हे सारे साधारण समवयस्क आणि संघटनेतील 'जुने आणि जाणते' कार्यकर्ते, साहजिकच या साऱ्यांचा एक गट व्हायचा.

सुरवातीच्या काळात या बैठकांतून महिलांची उपस्थिती तर असायची; पण सहभाग कमी असायचा. साहेब मात्र त्यांना बोलतं करत आणि त्यांच्या प्रतिक्रिया आवर्जून जाणून घेत. त्यामुळे महिलाही हळूहळू बोलत्या झाल्या. कुठल्या तरी कार्यक्रमाच्या प्रचारासाठी संघटनेतील महिलांनी महाराष्ट्राचा दौरा केला. या दौऱ्याच्या निमित्ताने सरोजताई, शैलाताई या परभणीस आल्या होत्या. त्या आल्या तो दिवस नेमका कुठला तरी उपवासाचा वार होता आणि या दोघींनाही त्या दिवशी उपवास होता. का कोण जाणे; पण या दोघी पारंपरिक पद्धतीच्या आणि उपवास करणाऱ्या महिला असतील असं वाटलं नाही. त्यामुळे त्यांचा उपवास विशेष लक्षात राहिला. त्याहीपेक्षा लक्षात राहिलं ते त्या दोघींचं 'बाईपण'! आमच्या घरी आल्यावर त्या दोघी आवर्जून स्वयंपाकघरात गेल्या. पाट टाकून खाली बसल्या आणि माझ्या पत्नीशी गप्पा मारू लागल्या. उपवासाचा फराळ केला, तोही स्वयंपाक घरात. त्यांच्या या 'बाईपणा'मुळे आमच्या कुटुंबात आजही त्यांच्या आठवणी निघतात. कळत न कळत केलेली लहानशी कृतीही अशी छाप पाडून जाते.

बाईपणावरुन आठवलं. आतापावेतो आमच्या नजरेसमोर महिला कार्यकर्त्या म्हणजे शोभेच्या बाहुल्या! सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला म्हणजे पु.ल. देशपांडेंच्या नाटकातील अति विशाल महिला. मराठवाडी वातावरणात स्वातंत्र्यपूर्व काळ वगळता महिला कार्यकर्त्या कमीच. त्याही घरसंसार सांभाळून फावल्या वेळात समाजकार्य करणाऱ्या. तेव्हा आमच्या नजरेसमोर आहेत त्या ऐंशीच्या पुढच्या काळातल्या महिला कार्यकर्त्या. एका गोष्टीचं मात्र आश्चर्य वाटतं,

स्वातंत्र्यपूर्व काळातील मुसलमानी अमदानीत हैदराबाद संस्थानातील वातावरण दूषित आणि असुरक्षित आणि मराठवाडा तसा मागास असूनही स्वातंत्र्यचळवळीत महिला अग्रणी होत्या. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात त्या कोषात जाऊन बसल्या, हे असं कां व्हावं? मी म्हणतो आहे ते ऐंशीच्या पुढच्या काळातील महिला कार्यकर्त्यांबद्दल. कदाचित आमच्या मनासमोर जे चित्र उभे राहत आहे ते मराठी साहित्यातून महिला कार्यकर्त्यांचं जे उपहासिक चित्र आहे त्या मुळे किंवा राजकारणात स्थिर होण्यासाठी पुढेपुढे करणाऱ्या महिला 'पुढाऱ्या'मुळेही असेल; मात्र शेतकरी संघटनेतील महिला कार्यकर्त्यांचं चित्र या वरील चित्राला पूर्ण छेद देणारं. संघटनेच्या महिला कार्यकर्त्या म्हणजे अंगभर साडी पेहरणाऱ्या, तिपेडी वेणी घातली आणि स्वच्छ तोंड धुतलं, की झालं सौंदर्य प्रसाधन या परंपरेतल्या.

पुढे केव्हा तरी मुंबईला मंत्रालयात काही कामासाठी जावं लागलं तेव्हा मंत्र्याच्या भेटीसाठी बाहेर बैठकीत बसलेल्या काही महिला कार्यकर्त्या पाहिल्या. वय लपवण्यासाठी त्यांनी जी कसरत केली तीमुळे वय अधिक बटबटीतपणे स्पष्ट होत होतं. तो बटबटीतपणा चांगलाच लक्षात राहिला. त्या पार्श्वभूमीवर ही राहणी तर अधिकच चांगली, म्हणून लक्षणीय.

चांदवड अधिवेशनानंतर बीजिंगला जागतिक पातळीवर एक महिला परिषद झाली होती. त्या परिषदेत सहभागी होण्यासाठी भारतातून एक प्रतिनिधी मंडळ गेलं होतं. या महिला परिषदेला अमाप प्रसिद्धी मिळाली होती. त्या परिषदेचा वृत्तांत आणि संमत झालेले ठराव यांना वृत्तपत्रांनी तपशिलाने स्थान दिलेलं होतं. या ठरावाची आणि तिथे झालेल्या भाषणांची खरपूस भाषेत दखल घेतली होती सरोजताईंनी. त्यांनी 'बेजिंगची चिंधी' या नावाने एक पुस्तिकाच प्रसिद्ध केली. ही पुस्तिका संघटना वर्तुळात खूपच गाजली. बेजिंगची महिला परिषद महिलांच्या मूलभूत प्रश्नांना तर छेदूच शकली नाही; पण वरवरच्या प्रश्नांनाही नीट नीट हात नाही घालू शकली. लेडीज क्लबच्या सदस्यांनी ग्रामसफाईसाठी फोटोपुरतं हातात झाडू घ्यावा असला काही तरी हा सारा प्रकार होता. पुढे एका बैठकीत सरोजताईंनी चांदवड ते बेजिंग महिला परिषद या काळातील महिला चळवळीचा आढावा घेणारा एक अहवाल सादर केला. हाही अहवाल पुस्तकरूपानं प्रसिद्ध करता येईल का याबाबत चर्चा चालली होती. या पुस्तिकेचं नाव काय असावं असा प्रश्न साहेबांनी सहज विचारला. चटकन् मी म्हणालो, ''चांदवड ते चिंधी.'' यावर साहेबांसह सारी बैठक खळाळून हसली. तेव्हा त्यात महिला कार्यकर्त्याही मनापासून सामील झाल्या. बैठकीतल्या गंभीर चर्चेला असं सैल करणारं वळण अधूनमधून यायचं.



ताईंचं बाह्य चित्र तसं काहीसं फसवं आहे. मध्यम चणीच्या, बारीक अंगाच्या ताईंचं राहणं साधं आहे. वागणं-बोलणं सामान्य माणसासारखं. काही काळ त्या आमदार होत्या, महिला आघाडीच्या आणि आंतरराज्य समन्वय समितीच्या त्या अध्यक्ष राहिल्या. याबद्दलचा ताठा त्यांच्या वागण्याबोलण्यात अजिबात नाही. चारचौघींत मिसळून जाण्यासारख त्यांच व्यक्तिमत्त्व; पण त्यांचे डोळे पाहिले की वाटतं, हे पाणी काही वेगळंच आहे. डोळे जणू वॉर्निंग देतात, '*युं हमसे उलझना खेल नही, हम फुल भी हैं तलवार भी हैं!*' कुणाशी कसं वागावं, कुठे नरम व्हावं, कुठे कडक, त्यांना हे चांगलं अवधान आहे.

सरोजताई आणि रविबाबू काशीकर हे जोडपं संघटनेसाठी वरदान ठरलं आहे. दोघांनीही संघटनेसाठी स्वत:ला वाहून घेतलेले आहे. रविबाबू तर पार ८१ पासून संघटनेत आहेत. साहेबांच्या पहिल्या वर्धा दौऱ्यापासून. ताई चांदवड अधिवेशनापासून कार्यरत झाल्या; पण या नाही त्या मार्गाने दोघेही अगदी सुरवातीच्या काळापासून संघटनेशी निगडित. दोघांच्या व्यक्तिमत्त्वात मात्र बरीच तफावत आहे. ताईंचा स्वभाव अबोल नसला तरी आवरून सावरून आहे. या उलट रविबाबू म्हणजे मस्त अन् अघळपघळ माणूस. चारचौघात बोलू लागले म्हणजे भाषण दिल्या सारख्या आवाजात आणि भाषण देऊ लागले म्हणजे समोर लाऊड स्पीकर नाही असं समजून अधिक मोठ्या आवाजात बोलणार. अवती भोवती मित्रांचा, कार्यकर्त्यांचा गराडा. सैलसर पांढरा नेहरूशर्ट अन् पांढरा पायजमा, अर्थातच खादी किंवा सूती. या ड्रेसचं जणू त्यांनी कॉपीराईटच घेतल असावं. सरोजताईंच्या संघटनेतील वाटचालीत त्यांचं निश्चितच प्रोत्साहन असलं पाहिजे. सुरवातीला रविबाबूंनी स्वत:ला कामासाठी झोकून दिलेलं होतं; पण जसजशी ताईंची कामात गुंतवणूक वाढत गेली तसतसं रविबाबूंनी व्यवसायाकडे अधिक लक्ष द्यायला सुरवात केली. 'अंकुर सीड्स' या बीजोत्पादक कंपनीचे ते चालक, मालक. तेव्हा हा व्याप सांभाळून ते संघटनेत सक्रिय आहेतच; पण सरोजताईंना त्यांनी संघटनेसाठी पूर्ण परवाना दिलेला आहे. संघटनेत कांही जोड्या उल्लेखनीय आहेत. डॉ. श्याम व सौ. रत्ना आष्टेकर, श्याम अगरवाल व सौ. सुमनताई इ.

पुढच्या एका टप्यात संघटनेच्या वतीने निवडणूक लढवून विजयी झालेल्या पाच आमदारांपैकी सरोजताई याही एक आहेत; पण आमदारकीचा तोरा मिरवतांना या पाचापैकी कुणालाही कुणीही पाहिलेले नसेल. आमदार होते तेव्हाही नाही आणि नंतरही. त्या आमदार होत्या त्या काळातली एक आठवण आहे. आंबेठाणची एक बैठक आटोपून आम्ही चाकणहून पुण्याला बसने परतत होतो. आम्ही म्हणजे

मी आणि वैजनाथ रसाळ. बसमध्ये आधी चढलो म्हणून बसमध्ये आम्हा दोघांनाही बसायला जागा मिळाली. गाडी सुरू होता होता ताई आणि त्यांच्याबरोबर शैलजा देशपांडे या आल्या. त्या दोघींनाही बसायला जागा मिळाली नाही. त्यांना उभ्याने प्रवास कराण्याची वेळ आली; पण त्यांनी धाकदपटशा दाखवून आमदारांची हक्काची जागा काही मागितली नाही. मागच्या वर्षी दिल्लीहून संसदसत्र आटोपून बिहारचे खासदार विमानाने परतत होते. त्यांना पाटण्याला जायचं होतं. विमानाचा थांबा काही पाटण्याला नव्हता. हे त्या बिहारी खासदारांनाही माहीत होतं; पण त्यांनी एवढा हंगामा केला आणि विमान चालकांना इतकं भंडावून सोडलं, की चालकांना कांही समजेना, की थांबा नसतांना विमान पाटण्याला उतरवायचं कसं. शेवटी मोबाईलवरून खासदारांनी तेव्हाच्या उड्डयनमंत्र्याशी संपर्क करून पाटण्याला विमान उतरवण्यास भाग पाडलं. याला म्हणतात 'खासदार पॉवर' ! परवा नाही का दिल्लीचे माजी मुख्यमंत्री साहिब सिंग वर्मा यांनी असाच बखेडा विमानतळावर केला. एवढंच नाही तर संबंधितांची काहीही चूक नसताना त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली, त्याला धक्का बुक्की केली. याला म्हणतात 'मंत्री पॉवर' ! पण अशी पॉवर जवळ असूनही पॉवरचा वापर न करता आपल्या विनम्रतेनं छाप पाडणाऱ्या सरोजताई म्हणजे जणू व्रतीच! पण हेही तेवढच खरं, की त्यांच्या या नम्रतेचा कुणी गैर अर्थ काढू नये. याच बसप्रवासातील आणखी एक आठवण आहे. ताई व शैलजा देशपांडे यांना आम्ही आमच्या जागी बसवलं. शेजारी एक ग्रामीण महिला बसलेली होती. गाडीतली ही गर्दी पाहून आणि गरमीने बेजार होऊन त्या महिलेच्या जवळील एक छोटी मुलगी धाय मोकलून रडायला लागली. तिचं ते रडणं ऐकून गाडीतले सारे प्रवासी डोळे वटारून त्या महिलेकडे बघत होते. त्या नजरा पाहून ती बिचारी बाई आणखीनच अवघडली. काय करावं हे काही तिला सुचेना. तिच्या मदतीला कांही कुणी येईना. तेव्हा सरोजताईंनी त्यांच्याजवळच्या पिशवीतून एक चिकू काढला, त्याच्या दोन फोडी केल्या आणि त्या फोडी आणि चमचा हे त्या बाईला देऊन चिकूचा गर त्या रडणाऱ्या मुलीला द्यायला सांगितलं. त्या महिलेनं अत्यंत कृतज्ञतेनं ताईकडं पाहिलं आणि चिकूचा गर त्या मुलीला खायला दिला. नंतर ताईंनी जवळच्या पाण्याच्या बाटलीतून पेलाभर पाणी दिलं आणि मगच ती पोरगी शांत झाली. बसमध्ये इतरही स्त्रिया होत्याच की; पण वेळ निभावून न्यायचं अवधान पाहिजे ना. रसाळ या वेळी मला हळूच म्हणाले, ''अशी माणुसकी पाहिजे. आमदारकीही अशी माणुसकीनं निभवायला पाहिजे.''



आम्ही ग्रामीण भागातली माणसं. आम्हाला प्रामाणिकपणे वाटतं स्त्रियांनी बाईपण सांभाळाव, पुरुष होऊ नये. असं बाईपण सांभाळलेलं ताईमध्ये आम्ही पाहतो. अमरावतीच्या अधिवेशनात महिलांच्या बाजूने प्रश्न हिरिरीने मांडतांना आम्ही त्यांना पाहिलंय, तसचं पाहिलंय त्यांच रूप हेमंत देशमुखच्या श्रद्धांजली सभेत. त्यांना त्या सभेत बोलण्यासाठी पाचारण केलं तेव्हा त्यांनी नकार दिला. डोळे आणि गळा एवढा भरून आला होता, की तशा अवस्थेत बोलणं शक्यच नव्हतं. आणि बोलून लोकांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या न बोलताही ताईंनी व्यक्त केल्या. कधी कधी मौनच जास्त बोलक असतं.

ताईंची कामगिरी चारपदरी आहे. आधी गृहिणी, मग शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा, त्यानंतर आमदार आणि शेवटी आंतरराज्य समन्वय समितीच्या अध्यक्षा. चारही क्षेत्रात त्या यशस्वी ठरल्या. 'ही चतुर किती ललना' या नाट्यपदासारख्या. ज्या क्षेत्रात स्पर्श केला त्याचं सोनं केलं ताईंनी. त्यांच्या या चौपदरी कामगिरीमुळे त्यांना 'अष्टभुजा सरोजा' म्हणायला काय हरकत आहे !

ताईंचा जन्मच मुळी १९५० च्या दिवाळीतल्या लक्ष्मीपूजनाच्या दिवशी झालेला. त्यांचं मूळचं घराणं मध्य प्रदेशातलं. गेल्या तीनचार पिढ्यांपासून शुक्लांचं हे कुटुंब नागपुरात स्थायिक झालेलं. गौरीशंकर शुक्ला हे त्यांचे आजोबा. ते संतपुरुष म्हणून ख्यातकीर्त होते. यामुळे घरातील वातावरण अध्यात्मिक संस्कारांचं आणि काहीसं सनातनी. घरात माणसांचा हा राबता. त्यामुळे चूल अखंड पेटलेली. पाव्हण्यारावळ्यांचं आगतस्वागत करण्यात कुटुंबीय मग्न. अशा या माणसांनी भरलेल्या कुटुंबातील सरोजताई हे पहिलं मूल. त्यामुळे साऱ्यांचीच ती लाडकी. म्हणच आहे मुळी, 'पहिली बेटी, तूप रोटी'. अखंड माणसांत राहण्याची सवय त्यांच्या अंगी बाणली, ती या अशा परिस्थितीमुळे. नागपूर ही पूर्वीच्या मध्यभारत या राज्याची राजधानी. राजभाषा हिंदी त्यामुळे नागपूरची एक वेगळी संस्कृती. वेगळी जीवनपद्धती आणि मराठी कम हिंदी अशी एक वेगळीच भाषा बनली. राहण्या-बोलण्यात एक नवाबी स्टाईल आलेली. हे सारे संस्कार ताईंत आवर्जून दिसतात. त्यांचं बालपण, शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण नागपूरातच झालं. अर्थशास्त्र या विषयात त्यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलं.

सरोजताई आणि रविबाबू यांचा विवाह म्हणजे एक अस्सल हिंदी फिल्मी कथा. त्यांचं घर म्हणजे मध्यप्रदेशी संस्कृतीचा वारसा सांगणारं हिंदी भाषक. तर रविबाबू म्हणजे नाग विदर्भ संस्कृतीतले मराठी भाषक. मात्र दोन घरांत एक साखळी होती. सरोजताईचे आजोबा म्हणजे गौरीशंकर शुक्ला हे संतपुरुष आणि एका

अर्थानं शुक्लांचं हे घर म्हणजे रविबाबूंसाठी गुरूघर. तेव्हा काशीकरांचं या घरी नेहमी जाणंयेणं. चला जानपहचान तर झाली. रविबाबूंनी आपल्या या चकरांत कधी तरी ताईंना हेरलं आणि प्रत्यक्षात घेरलंच. पहिल्या नजरेतच रवीबाबू खल्लास झाले पण सरोजताईंनी प्रतिसाद दिला नाही. अब क्या करें ? प्रस्ताव तर ठेवूया. त्यांनी ताईंना प्रपोज तर केलं पण शुक्ला कुटुंबीयांना हा संबंध काही पटेना. ताईंनी रवीबाबूंच्या कानी घरच्यांचा विरोध घातला. यावर रविबाबूंनी सिनेमातला खतरा डायलॉग मारला 'करूंगा तो तुम्हीसे शादी करूंगा, वरना जिंदगीभर कुंवारा रहूंगा !' या डायलॉगमुळे ताईंच्या 'पत्थर दिला'लाही पाझर फुटला. त्या तयार झाल्या; पण घरच्यांना हा संबंध अजिबात पटेना. खानदान की इज्जत. कहानीला परत एक खतरनाक मोड. आता कसं? कशाचं कसं, अहो जिथे मियां अन् बिबी राजी, तिथे काझिला विचारतं कोण? सरोजताई सब बंधन तोड के वर्ध्याला काशीकरांच्या घरी आल्या आणि तिथे त्यांचं लग्न संपन्न झालं. या लग्नाला माहेरचं कुणीही नव्हतं. फक्त लहाना भाऊ तेवढा हजर, ताईंच्या एका डोळ्यात पाणी दु:खाचं, माहेरचं कुणी आलं नाही म्हणून तर दुसऱ्या डोळ्यात संसाराची स्वप्न तरळत होती.

आणि आता कळीचा प्रश्न. त्या शेतकरी संघटनेकडे कशा वळल्या? त्यांच्याच शब्दांत, ''तशी मला गृहिणीचीच भूमिका आवडायची. माहेरप्रमाणे सासरीसुद्धा माणसांचा राबता खूप. मला माहेरी सवय होतीच, घरकामाची आवडही होती. त्यामुळे आलेल्या पाहुण्यांसाठी रांधायचा, वाढायचा, आवरायचा मला कधी कंटाळा नाही आला. माहेरी अन् सासरीही कमीजास्त का असेना; पण शेती ही होतीच पण दोन्ही कडे शेतीशिवाय नोकरी, व्यवसायाची जोडही होती. त्यामुळे शेतीची तशी झळ कधी पोहोचली नाही. रविबाबू, विजय जावंधिया यांना शेतीविषक प्रश्नात रस होता. प्रसंगी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करता यावं या दृष्टीने त्यांनी एक अनौपचारिकरीत्या शेतकरी अन्याय निवारण समिती स्थापन केली होती. या समितीच्या कामाचं स्वरूपही अत्यंत जुजुबी होतं. त्यांत मोर्चे, सभा निषेध असा काही कार्यक्रम नव्हता. स्वातंत्र्यपूर्व काळात आरामखुर्ची राजकारणी करायचे तशा स्वरूपात, वैयक्तिक पातळीवरील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे हाच कामाचा मंत्र.'' पण एवढं मात्र खरं, या समितीच्या रूपाने का होईना; पण एक निखारा होता, फुलायची वाट पाहत असलेला.

तशी धडपड चालू होती. एकत्र बैठका होत, अनुकूल-प्रतिकूल चर्चाही होत असे; पण गाडं पुढे सरकत नव्हतं. तशात शरद जोशींचं नाव पेपरातून झळकायला



लागलं. आपल्या पंथातला कुणी माणूस दिसतोय असंही त्यांना वाटलं. साहजिकच शरद जोशींना भेटण्याची उत्सुकता लागली. तेव्हा १९८१ च्या सुमारास रविबाबूंनी शरद जोशींना विदर्भ दौऱ्याचं आमंत्रण दिलं आणि साहेबांनीही ते आनंदानं स्वीकारलं.

''त्यांना हॉटेलात उतरवणं यांना काही प्रशस्त वाटेना म्हणून त्यांना आमच्या घरीच उतरवायचं ठरलं.'' ताई पुढे सांगू लागल्या, ''साहेब वर्ध्याला आले, आमच्या घरी उतरले आणि हीच माझी आणि साहेबांची पहिली भेट.'' याही वेळेस ताई संघटनेबाहेरच. साहेबांची बडदास्त ठेवणे एवढंच मर्यादित काम. त्याही आधी शेतकरी अन्याय निवारण समिती कार्यरत होती; पण त्यांच्याही कार्यात ताईंचा प्रत्यक्ष सहभाग नव्हताच. या समितीचं कामकाज रविबाबूंच्या घरून चालायचं. त्यामुळे चर्चा कानावरून जायची. येणाऱ्या कार्यकर्त्यांची प्रसंगी व्यवस्था, चहापान इत्यादी करणे यापुरताच अप्रत्यक्ष सहभाग होता.

साहेबांच्या या दौऱ्यानिमित्त कार्यकर्त्यांचं प्रशिक्षण झालं आणि तेव्हापासून वर्धा जिल्हा कामाला अधिक जोमाने लागला. याही वेळेस ताई त्रयस्थच; पण पुढे संघटना कार्यकर्त्यांचा राबता घरी सुरू झाला. कार्यकर्ते प्रचारासाठी मिळेल त्या वाहनाने गावोगावी जात आणि मुक्कामासाठी वर्ध्याला रवीबाबूंकडे येत. म्हणजे जेवणाखाण्याची व्यवस्था परत ताईंकडेच. रात्री-अपरात्री ही जेवणं पार पडणार आणि तोपावेतो ताई 'विटेवरी' उभ्याच; पण असं चोहीकडून संघटनेचं वातावरण असूनही 'पाणीच पाणी चहूकडे' अन् ताई मात्र कोरड्याच.

संघटनेचा 'बाट' लागण्याआधी १९८१-८३ च्या दरम्यान केव्हा तरी एका दौऱ्यात साहेबांबरोबर लीलाताईही वर्ध्याला आल्या. मुक्काम अर्थातच ताईंकडेच. या वेळेस लीलाताई भाषण देणार होत्या. त्यांच्या भाषणाबद्दल सरोजताईंना विशेष उत्सुकता. भाषण रात्री होणार होतं. रवीबाबूंबरोबर ताईही भाषणाला हजर राहिल्या. कार्यक्रम संपायला रात्र झाली. रवीबाबूंनी सवयीप्रमाणे तेवढ्या रात्रीही पाच पन्नास लोकांना जेवायला बोलावलंच. साऱ्यांची जेवणं आटोपून आवराआवर करायला अन् त्यानंतर अंथरुणाला पाठ टेकायला ताईला पहाटेचे तीन वाजले. सवयीप्रमाणे साहेब पहाटे पाच वाजता उठले. त्यांच्याबरोबर लीलाताईही उठल्या. सरोजताई आणि घरचं इतर कुणी तोपावेतो उठलेलं नव्हतं. तेव्हा लीलाताईनी स्वत: चहा तयार केला आणि साहेबांना दिला. सकाळी हे रवीबाबूंना कळलं. आपल्या घरी आलेल्या पाहुण्यांना स्वत:च्या हाताने चहा करावा लागला याचा त्यांना राग आला आणि ते ताईवर उखडले. ताईंना दुहेरी मार पडला. लीलाताईंना स्वत:ला चहा

करावा लागला याचं तर वाईट वाटलंच पण रवीबाबूंनी झापल्याचंही वाईट वाटलं. रात्री जागरण झाल्याने त्यांना जाग आली नाही. यात त्यांचा तसा काही दोष नव्हता. रवीबाबूंचं रागावणं साहेबांना समजल्यावर ते रवीवर उखडले. ''का रे, तू रात्री चौकात भाषणाला आलेल्या सर्वांना रात्री, अपरात्री जेवायला घरी बोलावणार आणि सकाळी उठायला उशीर झाला म्हणून परत झापणार. यात सरोजवहिनींचा काय दोष आहे रे.'' आणि हाही प्रकार ताईंसमोर झाला. ताईंच्या डोळ्यातल्या पाण्याला कुठे तरी न्याय मिळाला. आपल्या दौऱ्यानिमित्त कुठे कुणाच्या घरी उतरण्याचा प्रसंग आला तर त्या घरातील महिलांच्या कष्टाची साहेब आवर्जून दखल घेत. याही वेळेस ताई संघटनेबाहेरच.

१९८३ मध्ये वर्ध्याला आंतरराज्य समन्वय समितीची एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी परप्रांतांतून येणाऱ्या पाहुण्यांचं स्वागत करण्यासाठी केवळ महिलांचा मोर्चा काढावा अशी कल्पना मांडण्यात आली आणि महिला कार्यकर्त्यांनी ती उचलून धरली. आतापावेतो कळत न कळत सरोजताई संघटनेकडे आकृष्ट झालेल्या होत्या; पण त्यांच हे आकृष्ट होणं म्हणजे तळ्याच्या काठा काठाने फिरण्यासारखं होतं. प्रत्यक्ष तळ्यात उडी घ्यावयाचा प्रसंग आणखी आला नव्हता; पण तशी संधी या मोर्चा निमित्ते आली आणि त्यांनीही या वेळेस काठ सोडून पाण्यात उडी मारलीच! या वेळेस त्यांची प्रतिक्रिया अशी होती, ''आतापावेतो मी मोर्चात, मिरवणुकीत कधी सामील झाले नव्हते. त्यामुळे आपल्याच गावात भर बाजारपेठेतून मोर्चाने जाताना बरीच अवघडले होते. त्यातही हात वर करून घोषणाही द्यायच्या होत्या. शाळा-कॉलेजात असतांना काय आरडाओरडा केला असेल तो केला. ते पोरवय होतं; पण आता ओळखीच्या लोकांसमोरून घोषणा देत मोर्चाचे जाणे हा एक अनुभवच होता.'' ते काहीही असलं तरी या निमित्तानं ताईंच्या संघटनाप्रवेशावर शिक्कामोर्तब झालं. इथून सुरू झाली दीर्घ वाटचाल, रोमहर्षक संघर्षाची सुरवात.

ताईंची मुलाखात घेतांना मला एक प्रश्न पडला होता. इतका काळ घरचं वातावरण शेतकरी संघटनेनं भरून गेलेलं, स्वत: रवीबाबूंनी कामाला जुंपून घेतलेलं. संघटना माणसांचा घरी राबता, स्वतः साहेब, लीलाताईही घरी आलेल्या अन् तरीही या 'नर्मदा काठच्या' कशा काय राहिल्या? मी त्यांना तसं विचालही. यावर त्या म्हणाल्या, ''मुळात शेतकरी संघटित होतील यावर माझा विश्वासच नव्हता. त्याही पुढे जाऊन शेतकरी संघटित करणं तर केवळ अशक्यप्राय असं मला वाटायच. मी साहेबांना माझी ही शंका बोलून दाखवली. यावर साहेब मला म्हणाले,



''शेतकऱ्यांना त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करून देणे ही तर पहिली पायरी आहे. या गुलामगिरीची जाणीव झाली, की त्याला संघटित करणं सोपं होईल आणि संघटन ही दुसरी पायरी. या टप्प्यावर महिलांना जाणीव करून द्यायची, की तुम्ही तर गुलामाच्याही गुलाम आणि ही जाणीव त्यांच्यात निर्माण झाली, की त्यांनाही संघटित करणं सोपं जाईल.'' साहेब असं बोलले खरं; पण माझ्या मनातली शंका दूर काही झाली नाही.''तरीही एव्हाना मन दोलायमान झालेलं. शिवाय अवतीभवतीचं वातावरण एवढं भारलेल असताना त्या एकट्याच दूर कशा काय राहतील? तेव्हा पुढे, ''१९८४ च्या परभणी अधिवेशनात मी हजर राहिले. त्यातील भाषणं, चर्चा सारं सारं ऐकलं, अधिवेशनासाठी असलेली प्रचंड उपस्थिती पाहिली, मैल न् मैल चालत आलेली, डोक्यावर बोचके घेतलेली मंडळी पाहिली आणि कुठे तरी खोल दडलेल्या विश्वासानं मान वर काढली.'' तरीही ताई बाहेरच. आत्ता कुठे श्रवण भक्तिच्या टप्प्यात ताई आलेल्या. परभणी अधिवेशन फक्त ऐकलेलं. त्यामुळे ताईंच्या विचारांचं मडकं भाजायच्या अवस्थेला आलेलं.

आता चांदवडचं महिला अधिवेशन जाहीर झालेलं, त्या अधिवेशनाच्या तयारीसाठी आंबेठाणला महिला कार्यकर्त्यांचं एक शिबिर आयोजित करण्यात आलेलं होतं. या शिबिरासाठी वर्ध्याहून सुमनताई गेलेल्या. वर्ध्याहून परत आल्यावर ताईंच्या घरी वर्ध्याच्या महिला कार्यकर्त्यांची एक बैठक बोलावण्यात आली. या बैठकीला सुमनताई, सरोजताई, शैलाताई आणि इतर महिला आलेल्या होत्या. या जमलेल्या महिलांना सुमनताईंनी आंबेठाणच्या शिबिराचा वृत्तांत कथन केला. ग्रामीण भागातील महिलांच्या परिस्थितीचं वर्णन करताना त्या भावनाविवश झाल्या. त्या महिलांसाठी संघटन किती आवश्यक आहे हे त्यांनी ठसवण्याचा प्रयत्न केला. सुमनताईंच्या डोळ्यातल्या पाण्यानं उंटाच्या पाठीवरील शेवटच्या काडीचं काम केलं. रवीबाबूंकडे होणाऱ्या चर्चा, येणाऱ्या माणसांच्या भेटीगाठी, साहेब आणि लीलाताईंची भेट, परभणी अधिवेशन या साऱ्या ओझ्याखाली उंट दबलेला होताच; पण त्याच्या विरोधाला मोडून काढायला सुमनताईंच्या अश्रूंनी शेवटच्या काडीचं काम केलं आणि सरोजताई संघटनेत प्रवेश करत्या झाल्या.

सुरवात केली ती आंबेठाणच्या शिबिराच्या आयोजनापासून. त्यानंतर वर्धा जिल्ह्यात अनेक गावांत महिला शिबिर, चर्चा, प्रचार असा भाग सुरू झाला. पहिली बैठक झाली ती आर्वी तालुक्यातील धनोडी या गावी. एका मोठा वाड्यात, बंद दरवाजामागे. या बैठक-कम-सभेत ताईंनी संघटनेतलं आपलं पहिलं भाषण दिलं आणि आतापावेतो या भाषणात खंड नाही पडला. आता प्रत्यक्ष प्रचाराला

सुरवात झाली. या महिला आठ दहा जणींचा गट करून गावोगावी जायला लागल्या रात्रंदिवसात पंधरा ते वीस बैठक-सभा व्हायला लागल्या. लोकांत महिलांच्या प्रचाराबद्दल एवढी उत्सुकता, की एका गावाहून दुसऱ्या ठरावीक गावाला जाताना मधल्या वगळलेल्या गावचे लोक 'घेराव' घालायचे आणि बैठक- सभा घ्यायला लावायचे. या सभांमुळे घरी परतायला रात्रीचे एक-दोन वाजायचे. या महिलांचा प्रतिसाद कसा होता? ''आम्ही शहरच्या महिला म्हणून त्यांना उत्सुकता असायची. सामान्यत: खेड्यातून शहरात जाणं हा प्रकार नेहमीचाच; पण शहरातून महिलांनी प्रचारकामासाठी येणं हा प्रकार तसा विरळाच. खेड्यापाड्यातून कृत्रिम धाग्याच्या साड्या या वापरात जास्त, स्वस्त आणि सोयीच्या, चमकदार रंग म्हणून. आमच्या अंगावर सुती साड्या मात्र कलप लावून इस्त्री केलेल्या. यामुळे या बायका आमच्या साड्यांना हात लावून पाहायच्या. त्यांचा प्रतिसाद उत्सुकतेचा असायचा. शहरी बायकांना ऐकायला मिळतं. याहीमुळे कदाचित प्रतिसाद जास्त मिळत असेल आम्हाला मात्र शहरी आवडीनिवडी बाजूला ठेवून ग्रामीण भागाशी मिळतं घ्यावं लागलं; पण हा काही अवघड बदल नव्हता.'' प्रचारात भाग घेऊन संघटनेत पदार्पण तर केलं प्रत्यक्षात चांदवडच्या अधिवेशनात एक श्रोता म्हणूनच त्यांचा सहभाग होता.

१९८४ मध्ये संघटनेच्या वतीने उमेदवार म्हणून पुलोद या आघाडीतर्फे डॉ. बोंडे यांनी निवडणुक लढवावी असं ठरल. त्यांच्या प्रचारासाठी महिलांनी बाहेर पडावं म्हणून रवीबाबूंनी सरोजताईंकडे आग्रह धरला; पण निवडणूकीच्या राजकारणाबद्दल ताईंना रागच होता. निवडणुका लढवणं तर सोडाच सोडा, प्रचारातही भाग घ्यायला त्यांची तयारी नव्हती. रवीबाबूंचा सर्व आग्रह मोडून काढीत त्यांनी स्पष्ट नकार दिला. एवढंच नाही तर, ''तुम्हीसुद्धा प्रचारत भाग घेऊ नका.'' ''अगं, पण का'', ''या वेळी तुम्ही त्यांच्या प्रचारात भाग घेणार आणि पुढच्या वेळेस तुम्हाला तिकीट देतील. तुम्हाला निवडणूक लढवायचा आग्रह होईल आणि लक्षात ठेवा, तुम्ही निवडणुकीला उभं राहण्याच्या फंदात पडलात तर मी तुम्हाला चक्क सोडून जाईन !'' ताईंचा हा अवतार पाहिल्यावर रवीबाबूंनी माघार घेतली आणि पक्कं आश्वासन दिलं, ''नाही बाई, मी अजिबात निवडणूक लढवणार नाही. तेव्हा तुला घर सोडायचा प्रसंग येणारच नाही. मग तर झालं!'' ताई मात्र निश्चयाला पक्क्या राहिल्या. त्या या निवडणुकीत प्रचाराला बाहेरच नाही पडल्या.

काय योगायोग असतो बघा, पुढे १९९४ च्या निवडणुकांत नेमकं ताईंना तिकीट



देण्यात आलं. जहां डर वही शाम ! ताईंनी तिकीट मागितलं नव्हतं . त्यांची तयारीही नव्हती. मात्र आंबेठाणला झालेल्या बैठकीत ताईंचं नाव पुलगाव मतदारसंघासाठी निश्चित करण्यात आलं. ९४ मध्ये जनता दलाशी संघटनेचा समझोता झाला आणि महाराष्ट्रातून कांही जागा जनता दलाच्या चिन्हावर शेतकरी संघटनेनं लढवाव्यात असं ठरलं. त्यासाठी झालेल्या वाटाघाटीत पुलगावची जागा संघटनेच्या वाट्याला आली. संघटनेनं ताईंचं नाव पक्कं केलं. इकडे ताईंना या गोष्टीचा पत्ताही नव्हता. त्यांच्या कानावर हा प्रकार आला. त्यांनी निवडणुक लढवण्यास साफ नकार दिला. कितीही मनवलं तरी त्या आपल्या नकारावर ठाम होत्या. अगदी डोळ्यात पाणी आणून त्यांनी रवीबाबुंना स्पष्ट नकार कळवला. त्यांच्या या हट्टापुढे रवीबाबूंनी हात टेकले आणि शेवटी आंबेठाणला फोन करून नकार कळवला. या नकाराला स्वीकारायला साहेब मुळीच तयार नव्हते. फोनवर ते रवीबाबूंना म्हणाले, ''मी नकार ऐकायला तयार नाही. सरोजवहिनींना म्हणावं त्यांची विनवणी करायला मी स्वत: वर्ध्याला येतो आहे; पण कुठल्याही परिस्थितीत त्यांना उभं रहावं लागणारच आहे.'' साहेबांच्या या निर्वाणीच्या भाषेमुळं रवीबाबूही ताईंवर उखडले; ''एवढ्या मोठ्या माणसानं इथे तुझी विनवणी करायला यावं म्हणजे काय, एवढा मान घ्यायचा का ?'' त्यांचा रुद्रावतार आणि साहेबांच्या विनंतीपुढे शेवटी ताईंना आपलं रडणं आवरतं घ्याव लागलं.

पुलगावचा उमेदवार तर ठरला. जबरी घोड्यावर त्यांना बसवण्यात आलं. समोर होता कॉंग्रेसचा तगडा उमेदवार. अनेक निवडणुकांचा अनुभव असलेला. पाठीशी पक्ष आणि पैसा. सोबत मंत्रिपद. निवडणूक जिंकायला एवढं भांडवल पुरेसं. याउलट सरोजताई म्हणजे अननुभवी, सत्ता नाही, पैसा नाही; पण नव्याने आलेली हिंमत, कार्यकर्त्यांचं प्रचंड पाठबळ, संघटनेची पुण्याई आणि आघाडीमुळे सर्वपक्षीय पाठिंबा; तरीही लढाई ही असमतोलच. एकीकडे चाणूर मुष्टिरासारखे बलाढ्य मल्ल आणि समोर कोवळे बलराम-कृष्ण. हा लढा ताईंनी दिला कसा?

''फॉर्म भरेपर्यंत मी निवडणुकीतल्या प्रचाराचं भाषणही कधी दिलेलं नव्हतं. ती खोटी आश्वासनं देणं आपल्याला जमणार नव्हतं. समोरच्या उमेदवाराला शिव्या देणं, त्याची वैयक्तिक उणीदुणी काढणं हेही मला जमणार नव्हतं. उखाळ्यापाखाळ्या काढायचा तर प्रश्नच नव्हता. मी तर साऱ्यांना बजावून ठेवलं होतं, की माझ्या मंचावरुन प्रचार हा पातळी सोडणारा असता कामा नये.'' या साऱ्या अपेक्षा म्हणजे आखूड शिंगाची, कमी खाणारी, जास्त दूध देणारी, शिवाय स्वस्त अशी दुभती गाय मिळवण्यासारखं. कसं जमायचं? ''मला तर भाषणही

देता येत नव्हतं, निवडणुकीचं म्हणते मी. म्हणून मी आमच्या मतदारसंघातले ज्येष्ठ कम्युनिस्ट कार्यकर्ते घंगारे काका यांच्याकडे गेले आणि त्यांना विनवणी केली मार्गदर्शनासाठी. भाषणाची दीक्षा द्या असंही मी त्यांना म्हणाले आणि त्यांनीपण मला संपूर्ण सहकार्य दिलं.''

मुळात ताईं जवळ विलक्षण समय सूचकता आहे. आल्या प्रसंगाला कसं तोंड द्यावं हे शिकावं त्यांच्याकडून. शिवाय स्वच्छ आणि प्रामाणिक मन हे तर मोठंच भांडवल होतं ताईंकडे. या निवडणुकीत खूप शिकायला मिळालं त्यांना. कांही अनुभव सांगण्यासारखे आहेत. केव्हातरी विशिष्ट परिस्थितीत साहेब म्हणाले होते, की मी निवडणुकीत उभा राहिलो तर मला जोड्यानं मारा ! साहेब बाकी काय म्हणाले, इतर राजकीय पक्षाचे लोक कपडे बदलावे तसे पक्ष बदलतात, कालची आश्वासनं आज बदलतात. पण त्यांना कुणी काही म्हणत नाही; पण साहेबांनी केलेलं हे विधान संदर्भ विसरून लोकांनी नेमकं हत्यार म्हणून वेळोवेळी वापरलं, ''मी प्रचारासाठी सालोड या गावी गेले. हे गाव काँग्रेसवाल्यांचं. मी गेल्या गेल्या माझे कार्यकर्ते येऊन मला म्हणाले, 'ताई, या गावातला कार्यक्रम रद्द करा. काँग्रेसचे लोक म्हणताहेत जोशी म्हणाले होते ना मत मागितलं तर मला जोडे मारा, तेव्हा तुम्ही मत मागितलं की ते तुम्हाला जोडे मारणार.' तरी मी सभा घ्यायचा माझा निश्चय ढळू दिला नाही. मी माझ्या कार्यकर्त्यांना म्हणाले, मला त्या जोडे मारणाऱ्या कार्यकर्त्याकडे घेऊन चला. तेव्हा माझी आणि त्यांची बैठक झाली. मी त्यांना म्हणाले, मत मी मागणार आहे. माझे कार्यकर्ते नाही.तेव्हा तुम्हाला जो काय कार्यक्रम करायचा आहे तो माझ्यावर करावा, पण माझ्या कार्यकर्त्यांवर नाही. हे तुम्हाला मान्य आहे का? यावर ते 'हो' म्हणाले. एक तर ठरलं. माझ्या कार्यकर्त्यांना ते त्रास देणार नाहीत. नंतर मी त्यांना विचारलं, तुम्ही जोड्याचा कार्यक्रम भाषणाअगोदर किंवा नंतर करणार? यावर विचार करून ते म्हणाले भाषणानंतर. मी विचार केला. सभा तर पार पडणार आहे तेव्हा काही हरकत नाही.''त्यानंतर सभा तर पार पाडली. या वेळी सभेत ताईंनी असं बहारदार भाषण केलं, की विरोधकांचे जोडे पायातच राहिले. एवढंच नाही तर ज्या गावात माझं स्वागत जोड्यानं होणार होतं त्या गावानं मला मताधिक्य दिलं !''

प्रचाराचा शेवटाचा दिवस उगवला. त्या दिवशी वेगवेगळ्या उमेदवारांना वेगवेगळी मैदानं दिली होती सभेसाठी. प्रभा राव आणि आणि ताईंना शेजारची मैदानं दिली होती. त्या आधीच्या सभा आटोपून ताईंना यायला उशीर झाला. त्यांच्या गाडीनं वेळोवेळी रुसून दगा दिला. सारखी बंद पडायला लागली. तेव्हा



ताई येणारच नाहीत असं वाटलं. पण उशिरा का होईना त्या आल्या. अनेक श्रोते थोडं इकडचं, थोडं तिकडचं ऐकत. ताई उभे राहण्याआधी कार्यकर्त्यांनी येऊन सांगितलं, प्रभा रावांनी त्यांच्या भाषणात ताईंना शिव्या दिल्या. काही अपशब्द वापरले. तेव्हा ताईंनीही तसंच त्यांच्याच भाषेत उत्तर द्यावं. ताई उभ्या राहिल्या तेंव्हा लोकांना उत्सुकता शिव्यांच्या भाषेचीच. ताईंनी माईक हातात घेतला. ''मला असं समजलं, की प्रभा रावांनी त्यांच्या भाषणात मला शिव्या दिल्या. मी वयाने त्यांच्यापेक्षा खूपच लहान आहे. तेव्हा मला शिव्या द्याव्यात हा त्यांचा अधिकार आहे. त्या वयाने मला खूप मोठ्या असल्यामुळे त्यांनी दिलेल्या शिव्या मी मला मिळालेला आशीर्वाद समजते आणि स्वीकारते. त्यांच्या शिव्यांना मीही शिव्यांनी उत्तर द्यावं अशी अपेक्षा काही लोकांनी व्यक्त केली; पण मी तसं करणार नाही. ज्या संस्कारात मी जन्मले, वाढले त्या संस्कारात शिव्या देणे हा भाग बसत नाही. ही निवडणुक मी मुद्यांवर लढते आहे. गुद्यांवर नाही.''ताईंच्या या शेवटच्या भाषणाने लोक हेलावून गेले. केवळ हेलावले नाहीत तर त्यांनी प्रस्थापितांना गदगदा हलवलं आणि प्रभा रावांना पहिल्या प्रथम पराभूत केलं. कृष्ण-बलरामांनी चाणूर-मुष्टिरांना आस्मान दाखवलं.

या अत्यंत अटीतटीच्या लढतीत ताई जिंकल्या तेव्हा, ''माझ्या कार्यकर्त्यांच्या डोळ्यातील भाव पाहून मी पार हरखून गेले. त्या क्षणाच्या आनंदाची बरोबरी कशालाच येणार नाही !''

ताई आमदार झाल्या शेतकरी संघटनेचा आवाज बुलंद करायला, शेतकऱ्यांची गाऱ्हाणी वेशीवर टांगायला. शपथविधीला त्या उभ्या राहिल्या तेव्हा त्यांच्या अंगावर बिल्ला होताच. वास्तविक पाहता विधानसभेत प्रवेश करतांनाच बिल्ला वगैरेच्या खुणा, पक्षाची चिन्हे ही बाहेर काढून टाकावी लागतात; पण ताईंच्या अंगावर बिल्ला तसाच आहे हे कुणाच्या लक्षात नाही आलं. कुणाच्या लक्षात आलं नाही असं नाही. दत्ता पाटलांनी आक्षेप घेतला, ''छातीवर बिल्ला ठेवून शपथ घेतली असल्यामुळे ही शपथ अवैध आहे.'' तेव्हा कुठे सर्वांच्या लक्षात आलं; पण सभापतींनी दत्ता पाटलांना विनंती केली आणि त्यांनी हा आक्षेप परत घेतला. ताईंनी निवडणूक तर गाजवलीच गाजवली; पण प्रत्यक्ष शपथविधीचा प्रसंगही गाजवला. म्हणजे पदार्पणच मुळी सनसनीखेज ! ताईंच्या शालीन व्यक्तिमत्त्वाकडे पाहिलं, की त्या एवढ्या वादळी असतील असं वाटतही नाही.

''ज्या दत्ता पाटलांनी पदार्पणात मला आक्षेप घेतला, तेच माझ्या आमदारकीच्या काळात माझे गुरू झाले. मी आमदार झाले आणि आधी त्यांचा

आशीर्वाद घेतला. आणि वेळोवेळी मी त्यांचं मार्गदर्शन घेतलं. वैधानिक कामातील त्यांचा अभ्यास, अनुभव दांडगा. तेव्हा त्यांच्या मार्गदर्शनाचा मला वेळोवेळी लाभ झाला. माझ्या पहिल्यावहिल्या भाषणालाही मी त्यांचं मार्गदर्शन घेतलं.'' ते भाषण इतकं चांगल झालं, की स्वत: के. एम. बापूंनी चिठ्ठी पाठवून ताईंचं अभिनंदन केलं. वार्ताहर कक्षात हजर राहणाऱ्या पत्रकारांनी आवर्जून ताईंच अभिनंदन केलं.

विधानसभेचं कामकाज चालवण्यासाठी अध्यक्षांचं एक पॅनल बनवलं जातं. या पॅनलवर आतापावेतो एकाही महिलेची नियुक्ती झाली नव्हती. या वेळेस मात्र या पॅनलवर ताईंची नियुक्ती झाली आणि सभापती म्हणून काम करण्याचा पहिला प्रसंग त्यांच्यावर आला. बाईंची परीक्षा पाहण्यासाठी कुणा एका आमदारानं प्रश्न विचारला, ''आम्ही आपल्याला काय म्हणून संबोधावं?'' यावर ताई लगेच उत्तरल्या, ''ही खुर्ची अध्यक्षांची आहे. कुणा व्यक्तीची नाही. खुर्चीत बसेल तो अध्यक्ष. तेव्हा मी स्त्री असले तरी या क्षणी अध्यक्ष आहे. तेव्हा आपण मला अध्यक्ष महोदय असंच संबोधावं!'' ताईंच्या समयसूचकेतेची परीक्षा पाहण्यासाठी मुद्दाम हा प्रश्न टाकला गेला. पत्रकार त्यांच्या कक्षातून ही 'लढाई' पाहत होते. त्यांनी नंतर येऊन ताईंच परत अभिनंदन केलं.

त्यांच्या आमदारकीच्या काळातच दिल्लीला राज्यातील सर्व अध्यक्षीय पॅनेलवरील सदस्यांची एक परिषद बोलावण्यात आली होती. या परिषदेला स्वत: अटलबिहारी बाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी उपस्थित होते. महाराष्ट्राच्या प्रतिनिधी मंडळात ताईंचा समावेश होता. या परिषदेत बोलण्यासाठी ताईंनी चांगली अभ्यासपूर्ण तयारी केली होती. उद्घाटनाची औपचारिकता पार पडली. अडवाणी आणि अटलजींची भाषणं झाली आणि ते दोघे जाण्याच्या तयारीने जागेवरून उठले. आता बोलायची पाळी होती ताईंची; पण अटलजींच्या भाषणानंतर आपण काय बोलणार या विचारानं ताईंनी या प्रतिनिधी मंडळीतील एक ज्येष्ठ सदस्य आमदार गणपतराव देशमुख यांच्याशी विचारविनिमय केला. तेव्हा ते म्हणाले, ''तू अभ्यास केला आहेस, टिपणं काढली आहेस, आपला मुद्दा मांडणं जरुरी आहे.'' त्यांनी दिलेल्या सल्ल्यामुळे ताई बोलायला उठल्या. एव्हाना अटलजी आणि अडवाणीजी जाण्यासाठी उठून उभेही राहिले होते; पण ताईंचा बोलण्याचा आवाज त्यांनी ऐकला. ते थबकले. आणि पूर्ण भाषण होईपावेतो जागेवरच बसून राहिले. त्यांनी भाषण झाल्यावर ताईंची पाठ थोपटली. ''तो क्षण माझ्या आयुष्यातील एक संस्मरणीय क्षण ! आठवून आजही मी मोहरून जाते.



अटलजीसारख्या पट्टीच्या वक्त्याने कौतुक करावं म्हणजे काय !''

महिलांच्या बाबतीत काही आमदार का कोण जाणे पण अनुदार भूमिका बजावीत असा ताईंचा अनुभव आहे. ''मी एकदा सबसिडीसंबंधी प्रतिपादन करत होते तेव्हा सबसिडी देऊन शासनानं शेतकऱ्यांना भिकारी केलेलं आहे असं म्हणाले. यावर आमदार लक्ष्मणराव ढोबळे म्हणाले''....अरेरे, शेतकऱ्यांच्या कार्यकर्त्या आणि शेतकऱ्यालाच भिकारी म्हणताहेत, अरेरे !'' एकदा ते म्हणाले, तरी मी माझं भाषण चालूच ठेवलं. यावर ते परत म्हणाले ''अरेरे, शेतकऱ्यांच्या कार्यकर्त्या आणि शेतकऱ्यालाच भिकारी म्हणताहेत, अरेरे !'' यावेळी मात्र मी त्यांच्यावर, 'अरे चूप' असे ओरडले. त्यामुळे ढोबळे तर वरमून गप्प बसले; पण सारं सभागृह शांत झालं. विधान सदनाच्या नियमाप्रमाणे अशा तऱ्हेने उद्गारणं गैर आहे. पण त्या वेळी हा मुद्दा कुणाच्या लक्षातही नाही आला. कदाचित ढोबळ्यांची ही अनुदारता इतर सदस्यांना आवडलीही नसेल.''

आमदारकी म्हणजे एक मोठं मोहजाल आहे. आमदारांना मिळणाऱ्या सोयीसवलती या फार मोठ्या आकर्षणाचा विषय आहेत. आमदारांना साखर कारखाने, बँका- सोसायट्यांचे परवाने, शैक्षणिक-सामाजिक संस्था, ठिकठिकाणी सदनिका, निवासस्थाने यांची खिरापत वाटली जाते. आयुष्यभर बसून खाता येईल एवढी कमाई रास्त मार्गाने करता येते. आपल्या आवतीभोवती असलेल्या मंत्री, आमदार, खासदार यांची पूर्वाश्रमीची अवस्था आणि नंतरची श्रीमंती यावरूनच हे लक्षात येण्यासारखं आहे; पण ताईंचं वैशिष्ट्य हे, की त्यांनी या साऱ्या मोहापासून स्वत:ला दूर तर ठेवलंच ठेवलं, पण मुंबईसारख्या ठिकाणी उपलब्ध होऊ शकणाऱ्या सदनिकेच्या लाभालाही दूर ठेवलं. आपल्या पाच वर्षांच्या काळात एकही संस्था, कारखाना, सोसायटी पदरात पाडून नाही घेतली. इतकं निर्लेप कसं काय राहिलात असं मी विचारलं तेव्हा त्या म्हणाल्या, ''साहेबांनी पूर्वी सांगून ठेवलेलं आहे. सीतेचा शोध घेण्यासाठी लंकेला गेलेला हनुमान अशोक वनातली फळं खात बसला असता तर सीतेची सुटका कधीच झाली नसती. साहेबांचं हे सांगणं डोक्यात घट्ट बसलंय. आम्ही विधानसभेत गेलो ते सीतेच्या सुटकेसाठी. तेव्हा फळाच्या मोहात कसे पडणार?'' त्यांच्या कर्तबगारीमुळे संघटनेच्या कार्यकर्त्यांची छाती फुलून येते.

ताईंनी शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा म्हणूनही कामगिरी बजावली आहे. लक्ष्मीमुक्ती आणि दारुबंदीचे कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवले. साहेबांनी लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम दिला तो अत्यंत नावीन्यपूर्ण. शेतकऱ्यांनी आपल्या

लक्ष्मीच्या नावे किमान दोन एकर जमीन कायम मालकी हक्काने करून द्यायची. त्या जमिनीतील उत्पन्नाची ती मालक. आपल्या लक्ष्मीनं आयुष्यभर घरासाठी आणि कुटुंबासाठी जे कष्ट घेतले, त्या कष्टाच्या ऋणातून मुक्त होण्याचा एक मार्ग म्हणून हा उपक्रम राबवला गेला. ज्या गावातून किमान १०० शेतकरी या उपक्रमात सहभागी होतील त्या गावाला साहेब स्वत: भेट देणार. त्याप्रमाणे साहेबांनी शेकडो गावांना भेटी दिल्या आणि प्रमाणपत्रांचं वाटप केलं. अशा प्रकारे जमीन लक्ष्मीच्या नावे करणाऱ्या शेतकऱ्याचा अर्ज आला तर ताबडतोब फेरफार घेण्यात यावा असा जीआर काढावा हा प्रश्न शेतकरी संघटनेच्या पांचही आमदारांनी लावून धरला आणि शेवटी शासनाला तसा जीआर काढावा लागला. दारूबंदीचा कार्यक्रमही असाच राबवला. ज्या गावातील पन्नास टक्के महिला गावसभेत गावात दारूबंदी व्हावी म्हणून मागणी करतील त्या गावात दारुबंदी लागू करावी या प्रश्नावरही विधानसभेत संघटनेत वेळोवेळी चर्चा घडवून आणली आणि तसा जीआरही शासनाला काढावा लागला. दुदैवाने दारूच्या प्रश्नात खालपासून थेट वरपर्यंत हात ओले असल्यामुळे ठराव होऊनही प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नाही. चंद्रपूर जिल्ह्यातील कडोली या गावी ताईंच्या नेतृत्वाखाली महिलांनी दारूदुकानावर मोर्चा काढला आणि दारुच्या बाटल्या फोडल्या गेल्या. त्या वेळी पोलिसांनी दारू दुकानाच्या मालकाच्या सांगण्यावरुन 'गल्ल्यातील साडेतीन हजार रुपये डाका घालून जबरी नेले' असा आरोप लावला आणि ताईंच्या विरुद्ध डाक्याची केस नोंदल्या गेली. वा रे पोलिस तेरा खेल, चोर बाहर, साब अंदर! साहजिकच आहे. दारूवाले, मटकेवाले आणि पोलिस यांचं आपसात चोली-दामनचं नातं असतं !

चांदवड अधिवेशनाच्या प्रचारकामी ताईंनी एक अभिनव मोर्चा काढण्याचं ठरवलं. महिलांचा बैलगाडी मोर्चा ! आपल्या महिला साथीदारांशी विचारविनिमय करूनच हा निर्णय झाला होता. हा निर्णय जाहीर करण्यासाठी त्यांनी एक पत्रकार परिषद बोलावली. एका पत्रकारानं विचारलं, ''महिलांचा मोर्चा म्हणजे गाडी पुरुष चालवणार आणि मोर्चात महिला सामील होणार असं स्वरूप राहणार!'' खरं म्हणजे याबाबतीत आधी विचार झालेला नव्हता किंवा हा प्रश्नही तोपावेतो समोर आलेला नव्हता; पण आता प्रश्न आला तेव्हा ताई पटकन म्हणून गेल्या, ''अर्थातच संपूर्ण महिला मोर्चा. गाडीवानही आणि मोर्चेकरीही !'' नंतर ताईंच्या सहकारिणीही म्हणायला लागल्या, ''अगं, बाया गाडी कशी चालवणार?'' ''का नाही? बायका कार चालवतात, स्कूटर , सायकल चालवतात, मग बैलगाडी कां नाही?'' आणि मग ताईंनी आधी आपल्या सासूबाईंना विचारलं बैलगाडी चालवण्यासंबंधी,



यावर त्या म्हणाल्या, ''हो, मी तर पहिली गाडीवान राहीन!'' मग त्या साऱ्याजणी तयार झाल्या. मोर्चा दिवशी तब्बल पाचशे बैलगाड्या वर्ध्यातून या महिलांनी चालवल्या. गाडीवान महिला. मोर्चेकरी महिला. हा मोर्चा पाहायला आख्खं वर्धा गाव रस्त्यावर उलटलं होतं. सारे म्हणायला लागले, सरोजताई म्हणजे बस्स! जे ठरवतील ते करूनच दाखवतील !'

धाडस तर त्यांच्या अंगी बाणलेलं. असाच एक प्रसंग. संघटनेनं मंत्र्यांना गावबंदी जाहीर केलेली आणि ही बंदी माहीत असूनही वर्ध्याला एक कार्यक्रम आयोजित केला काँग्रेसनं. प्रमोद शेंडे, भाई सावंत आणि श्रीकांत जिचकार या कार्यक्रमाला येणार होते. सभेत मागच्या बाजुला ताई आणि त्यांच्या सहकारिणी बसलेल्या. प्रमोद शेंडेंचे भाषण पार पडलं आणि भाई उठले. त्यांनी बोलायला सुरवात केली, तोच ताई आणि महिला घोषणा देत उठल्या आणि स्टेज समोर जाऊन सामंतांना म्हणाल्या. ''बाकी बोलू नका. कापसाचं बोला.'' घोषणांचा दणका चालू राहिला. रागारागाने भाई सामंत सभागृहाबाहेर पडले. ताईंनी माईकचा ताबा घेतला आणि कापसाचा प्रश्न सांगायला सुरवात केली. सभा उधळली गेली. मंत्र्यांना बाहेर पडणं मुश्किल झालं. प्रसंग एवढ्यावर संपला नाही. सामंतांना राग आवरला नाही. त्यांनी पोलिस अधीक्षकांना तोंडी आदेश दिला, ताईंवर केस दाखल करा आणि त्यांना रातोरात अटक करा. पोलिस अधीक्षक भले गृहस्थ. त्यांचा आणि काशीकरांचा चांगला परिचय; पण आले नेत्याच्या मना तिथे कोणाचे चालेना. रात्री ते अटक करण्यासाठी ताईंच्या घरी गेले तेव्हा ताई म्हणाल्या, '' बाकी महिला तर गावोगावी, घरोघरी गेल्या. आता त्यांना मी कुठून आणणार?'' तेव्हा पोलिसांनी ताई आणि तिथे असलेल्या कांही महिलांना अटक करून लॉकपमधे ठेवलं. ताईंना अटक झाल्याचं कळलं, की लोकांच्या झुंडीच्या झुंडी यायला लागल्या, पोलिस स्टेशनवर ताईंना भेटायला. आता पोलिसांनाच लॉकअप नको, भेटी आवर म्हणायची वेळ आली. ताई अधीक्षकांना म्हणाल्या, ''मी काही लोकांना भेटीला येऊ नका असं म्हणणार नाही; पण उद्या तुम्ही जेव्हा मला न्यायाधीशापुढे उभी कराल तेव्हा मात्र मी त्यांना सांगेन, की मला यांनी रात्रीच्या वेळी अटक केली. एक तर नियमाप्रमाणे रात्री महिलांना अटक करणं मुळातच बेकायदेशीर आहे, शिवाय एकही महिला पोलिस सोबत नसताना तुम्हा महिलांना अटक केलीत आणि लॉकअप मधे ठेवलंत हेंही बेकायदेशीर. तेव्हा न्यायाधीशांना काय उत्तर द्यायचं ते तुमचं तुम्ही पहा.'' एरवीच अधीक्षकांना ताईंबद्दल आदर होता. त्यात ही भर पडली. तेव्हा त्यांनी हात जोडले आणि रात्री पोलिसांच्या गाडीत त्यांना घरी नेऊन सोडलं, 'जय माता दी !

अष्टभुजा सरोजा !'

बहुधा १९९८ या वर्षीचं रेल्वे रोको आंदोलन असावं. तसं रेल्वे रोको आणि रास्ता रोको आंदोलनं संघटनेनं वेळोवेळी पुकारलेली आहेत. पैकी हे एक. म्हणून म्हटलं बहुधा १९९८ चं आंदोलन. रेल रोखायची हा संघटनेचा निर्धार आणि तसं होऊ द्यायचं नाही हा शासनाचा निश्चय. दोन्ही बाजू तटीला पेटल्या. आंदोलन होऊ द्यायचं नाही म्हणजे सरोजताई आणि त्यांच्या सहकाऱ्यांना आंदोलनपूर्व अटक जरुरी. शासनाकडून हे अपेक्षित म्हणून या महिला भूमीगत झालेल्या. त्यांना पकडण्यासाठी जंग जंग पछाडले. जळी, स्थळी, काष्टी पाषाणी जिथे शक्य आहे तिथे तपासल. पण अं हं ! शेवटी एका कॉलेजच्या परिसरात त्यांना पोलिसांनी घेरलं. आता ताईंना पकडलं तर कार्यक्रमच फुस्स होणार ही भीती. तेव्हा पोलिसांना हुलकावणी कशी देता येईल या विचारात ताई होत्या. इतक्यात कॉलेजच्या आवारात ताईंचा एक परिचित युवक शेंडे हा स्कूटरवर समोरून आला. तेव्हा ताईंनी त्याची पळती स्कूटर मागच्या सीटला घट्ट धरून रोखली आणि त्याला ओरडून म्हणाल्या, मला ताबडतोब बाहेर घेऊन चल. समोरून पोलिस आला तरी त्याला चुकवून जोरात ने. शेंडेनंही प्रसंग ओळखला आणि पोलिसांना चुकवत स्कूटर ही दामटली आणि ताईंना त्यांच्या मैत्रिणीच्या घरी नेऊन सोडलं आणि स्वत: गायब झाला. गेल्या गेल्या शैलाताई आणि इतर दोन-तीन कार्यकर्त्यांना बोलावून घेतलं. पोलिस तर 'ढूंढते रह गये !' पण मैत्रिणीच्या घरात असं किती काळ लपून बसता येणार? त्यासाठी घराबाहेर पडावं लागणार. बाहेर तर पोलिसांच्या फेऱ्या चालू. शेवटी वेशांतर करून पळून जायचं ठरवलं. त्यांनी ओळखीच्या घरून चार पाच सलवारी अन् खमीज बोलावले. शैलाताई म्हणाल्या, ''बाई, आपण आजपावेतो सलवार खमीज कधी घातला नाही आणि आता मला तर अवघड वाटतं.'' ''अवघड तर मलाही वाटतं; पण दुसरा पर्याय काय?'' तेव्हा चौघींनी सलवार खमीज घातला. थोडी केशभूषा बदलली आणि खाड खाड सँडली वाजवत पोलिसांच्या समोरून त्या निघून गेल्या अन् पोलिस देखते रह गये ! त्या निघाल्या त्या तडक सुमनताई अगरवालच्या शेतावर दडून बसल्या. त्यांचा अवतार पाहून सुमनताईंनाही गंमत वाटली. रात्रभर साऱ्यांनी तिथे मुक्काम केला आणि रेल्वेच्या ऐन वेळेवर त्या रुळावर येऊन बसल्या. काय होतंय हे पोलिसांना कळेचना. एव्हाना गाडीही येतच होती. ड्रायव्हरनं प्रकार ताडला आणि गाडी थांबवली. झालं रेल रोको तर पार पडलं. अक्षत पडली, टाळी वाजली. रुळावरून महिला पोलिसांनी त्यांना फरफटत नेलं. अटक केली. ही अशी फरफट तर आणखी



चालू आहे. अटकसत्रही आता सवयीचं झालेलं आहे. ताई सांगतात, ''आम्ही सुमनताईंच्या शेतावर गेलो, सलवार- खमीज सोडून साडी नेसली तेव्हा कुठे आम्हाला माणसांत आल्यासारखं वाटलं !''

चार भिंतीच्या आत राहून संसारात सुख मानणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाला फुलवण्याचं केवढं मोठं काम शेतकरी संघटनेनं केलं. अशा शेकडो उदाहरणां पैकी सरोजताईंच उदाहरण हे एक आहे. टीव्ही वर नेहमी दाखवल्या जाणाऱ्या एका कार्टून फिल्ममध्ये पालकाचा रस प्याला, की त्याच्या अंगात अमाप शक्ती येते अशी एक व्यक्ति रेखा आहे. अर्थातच व्यंगपटातील विनोदी पद्धतीनं दाखवलेली. शेतकरी संघटनेनं दिलेल्या विचाराच्या रससेवनानं शेतकरी महिला आघाडीच्या महिला अशाच शक्तिशाली झालेल्या आहेत आणि शेतकरी संघटनेच्या पुरुष कार्यकर्त्यांच्या खांद्याला खांदा लावून उभ्या आहेत.

■ ■

# विनय हर्डीकर

सगळीकडे कसा चिप्प अंधार दाटला होता. वातावरणात भयाण शांतता पसरली होती. कुणी हूं का चूं करीत नव्हतं. घरात बोलतानाही घरातली माणसं कुजबुजत्या आवाजात बोलायची. काय माहीत, एखाद्या भिंतीच्या कानानं ऐकलं आणि सरकारच्या कानावर गेलं तर? मोठ्यानं बोलायची चोरी. चौकशी नाही, कोर्टकचेरी नाही, बचाव नाही, काही नाही. मध्यरात्री पोलिसांची व्हॅन येणार, तुम्हाला उचलणार आणि टाकणार जेलात. तेव्हा हळू, अगदी हळू बोला. नाही तर असं करा ना, बोलूच नका. तुमच्या माझ्यासारख्या सामान्य माणसांची ही अवस्था. सामान्य माणसांची तर बातच सोडा. पण ज्यांनी अशा प्रसंगी ताठ उभं राहावं, लोकांना धीर द्यावा, मार्गदर्शन करावं, त्यांचाच मार्ग भरकटलेला. राष्ट्रपतिपद म्हणजे देशातलं सर्वोच्च पद. नंतर त्या पदावर आरूढ झालेले ग्यानी झैलसिंग म्हणाले होते, ''मला इंदिराजींनी सांगितलं तर मी झाडूही मारायला तयार आहे !'' देशातील सर्वांत जुना पक्ष काँग्रेस. शेपन्नास वर्षांची परंपरा असलेला. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अग्रभागी असलेला. त्या पक्षाचे तेव्हाचे अध्यक्ष देवकांत बरुआ म्हणाले, ''इंदिरा इज इंडिया ॲण्ड इंडिया इज इंदिरा !'' राष्ट्रसंत म्हणून ज्यांना गौरवलं गेलं, ज्यांच्याकडून मार्गदर्शनासाठी मोठमोठे लोक येत, ज्यांना खासगी जीवन असं काहीही राहिलं नव्हतं आणि खऱ्या अर्थाने जे नि:संग झाले होते ते विनोबा भावे म्हणाले होते, 'अनुशासन पर्व !' देशातील सर्वांत मोठ्या माणसांची ही अवस्था, नावाच्याच बड्या माणसांचा तर विचारच करायला नको. त्यांच्यापैकी बहुतेक सर्व जण अम्माच्या दावणीला बांधलेले. तिच्या कृपाकटाक्षासाठी तरसणारे. रोज येऊन अम्मापुढे लोटांगण घालण्याऱ्यांची तर गिनतीच नाही. अशा वेळी आवाज उठवला तो सामान्य माणसांनी, सामान्य कसली, अशा प्रसंगी धैर्य दाखवणारी ही माणसं असामान्यच. असंच एक असामान्य नाव-विनय हर्डीकर !

या असामान्य धैर्याची कहाणी म्हणजे आणीबाणीची कहाणी. ज्या दिवशी ही आणीबाणी पुकारली गेली तो दिवस म्हणजे २५ जून १९७५ चा. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सर्वांत काळाकुट्ट दिवस. त्या दिवसापासून सुरवात झाली एका यातनायात्रेची. प्रचंड प्रमाणावर धरपकड झाली. नवनिर्माण आंदोलनाचे प्रवर्तक, महान स्वातंत्र्यसैनिक जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मोरारजी देसाई, चंद्रशेखर या शिखरावरील नेत्यांपासून ते गल्लीतल्या कृष्णा मोहरीर, डॉ. मधुकर चौधरीपर्यंत धरपकड झालेली. अम्माला सलाम करणारे काँग्रेसवाले सोडले तर सारे सारे तुरुंगात. या अटकसत्रातून सामाजिक कार्यकर्तेही सुटले नाहीत.



देशाच्या स्वातंत्र्याला लागलेल्या या ग्रहणापासून देश मुक्त कसा करावा या चिंतेत सामान्य माणूस होता. विरोधी पक्षातले अनेक कार्यकर्ते भूमिगत झाले. भूमिगत राहून चळवळ जिवंत ठेवायची, पत्रके काढायची, वाटायची-स्वातंत्र्यपूर्व काळातलं वातावरण हळूहळू तयार झालं. नव्हत्या मिरवणूका, मोर्चे, निदर्शने, पूर्वीसारख्या प्रभात फेऱ्या.

हां, अगदीच नव्हतं असं नाही. याही अंधारयुगातले प्रकाशकिरण तुरुंगात असले तरी अधूनमधून काजवे चमकत. ते मिरवणुकीने, घोषणा देत, शासनाच्या दमनशक्तीला आव्हान देत सत्याग्रह करत. समोर तुरुंगवासाची शिक्षा दिसत असूनही असाच सत्याग्रह केला विनयबाबूंनी. १४ जानेवारी १९७६ या दिवशी. त्यांना अटक करून न्यायाधीशापुढे हजर केलं. ''तुम्हाला एक महिना तुरुंगवास आणि पन्नास रुपये दंड आणि दंड न भरल्यास आणखी एक महिना तुरुंगवास अशी शिक्षा सुनावण्यात येते.'' दंड भरण्याचा तर प्रश्नच नव्हता. शिक्षा ही भोगायची असा निश्चयच होता. तेव्हा संपूर्ण शिक्षा भोगायला काही दिवस कमी असतांनाच त्यांची सुटका झाली. हे असं कसं झालं हे त्यांना समजेना. वेळेआधी सुटका कशी? तेव्हा कळलं शिक्षा संपायला तीन दिवसांचा अवधी असतांनाच कुणीतरी कायद्याच्या अज्ञानामुळे दंडाची रक्कम भरली.

हा सत्याग्रह करताना कोणती प्रेरणा होती? तरुण वय, निधडी छाती, सळसळतं रक्त, अन्यायाविरुद्ध तुटून पडण्याची हिंमत की मुळात प्रवाहाविरुद्ध पोहण्याची बंडखोर वृत्ती. एखाद्या पक्षाशी संबंधित ते असते आणि पक्षाचा आदेश म्हणून सत्याग्रह केला असता तर ते एक वेळ समजता आलं असतं; पण असं सुट्या माणसानं-मी विनयबाबूंनाच विचारल, ''कां?'' ''कां नाही ? अशा अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचा हक्क केवळ राजकीय पक्षांनाच असतो की काय? देशावर संकट आलेलं असेल, समस्या निर्माण झालेली असेल, आव्हाने उभी राहिली असतील, अशा वेळी कुणाच्या आवाहनाची वाट पाहायची नसते. स्वत:हून धावून जायचं, संकटाशी भिडायचं. सर्व नागरिकांचं हे कर्तव्यच आहे. हे भान ठेवलं तरच लोकशाही सुरक्षित राहील. मी आणीबाणीविरोधात सत्याग्रह केला तो या

भावनेतून. अशा वेळी अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या फौजेत सर्वांनी सैनिक म्हणून सामील व्हायला पाहिजे!'' जेमतेम पंचविशी ओलांडलेल्या, कॉलेज जेमतेम सुटलेल्या युवकाचे हे विचार किती पोक्तपणाचे!

पण विनयबाबू नावारूपाला आले ते या सत्याग्रहामुळे नाही. अशी हिंमत दाखवणारी सामान्य माणसंही खूप निघाली, म्हणून तर लोकशाही अजूनही जिवंत आहे. आजूबाजूला लोकशाही झुंडशाहीच्या आगीत होरपळत असतानाही आणीबाणी संपली आणि या लोकांच्या त्यागाला सारे सारे विसरून गेले. पण विनयबाबूंनी तो काळ जतन करून ठेवला पुढच्या पिढ्यांसाठी. त्यांनी आणीबाणीच्या प्रवृत्तीला आव्हान निर्माण करून ठेवलं. शासनाच्या लज्जेची लक्तरं वेशीवर टांगली. ते सारं प्रकरणच विलक्षण आहे. झालं ते असं झालं!

विनय बाबू तुरुंगाबाहेर आले ८ मार्च ७६ ला आणि पुढच्याच वर्षी आणीबाणी उठवण्यात आली, ती २५ मार्च ७७ ला. त्यानंतर निवडणुका झाल्या आणि या निवडणुकांनी इतिहास घडवला. स्वत: इंदिराजी, संजय यांच्यापासून तो सर्वच प्रमुख काँग्रेसी नेत्यांची या निवडणुकीत वाताहत झाली. त्याच सुमारास 'माणूस'च्या माजगावकरांनी विनयकडे लेखाची मागणी केली. ऑगस्ट/ सप्टेंबर ७७ च्या सुमारास त्यांनी लेख लिहायला सुरवात केली आणि लिहिता लिहिता त्यांच्या लक्षात आलं, विषयाचा आवाका खूप मोठा आहे आणि आणीबाणीसारख्या विषयावरील या लेखाचा आकारही खूप मोठा होतोय. तेव्हा त्यांनी नीट पुस्तकच लिहायला सुरवात केली. माजगावकरांनीही लेखाच्या रूपात प्रसिद्ध करण्याऐवजी पुस्तक रुपातच प्रसिद्ध करायचं ठरवलं आणि 'जनांचा प्रवाहो चालिला' या नावाने राजहंस प्रकाशनाच्या वतीने हे पुस्तक प्रसिद्ध झालं. या पुस्तकात आणीबाणी पुकारली तो दिवस म्हणजे २५ जून ७५ ते २५ मार्च ७७ या काळातल्या गोष्टींच्या नोंदी आहेत. याच नोंदी जेव्हा पुस्तकरूपात त्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून प्रकट झाल्या तेव्हा त्या स्फोटक झाल्या. इतक्या स्फोटक, की आणीबाणीतून सुटलेल्या विनयबाबूंना आणखी एका आणीबाणीला तोंड द्यावं लागलं.

आणीबाणी नंतर झालेल्या निवडणुकीत दिल्लीत आणि गल्लीतही काँग्रेसचा पराभव झाला आणि दिल्लीत जनता पार्टीचं तर महाराष्ट्रात पुलोदचं सरकार सत्तेत आलं. शासनानं १९७८ सालच्या सर्वोत्कृष्ट साहित्यिक पुरस्कारासाठी 'जनांचा प्रवाहो चालिला' या पुस्तकाची निवड केली. त्या वेळी पुलोदचे मुख्यमंत्री होते शरद पवार आणि निवड समितीवर होते गंगाधर गाडगीळ, नरहर कुरुंदकर, राम



शेवाळकर आणि विजया राजाध्यक्ष. हा पुरस्कार जाहिर झाला १९८० मध्ये आणि योगायोग असा, की त्या वर्षी झालेल्या मध्यावधी निवडणुकांत केंद्रात जनता पक्षाचा पराभच झाल्यामुळे महाराष्ट्रात पुलोद सरकार गडगडलं आणि काँग्रेस सरकार सत्तेमध्ये आलं. आता आलेलं काँग्रेस सरकार त्यांचीच लक्तरं वेशीवर टांगणाऱ्या या पुस्तकाला पुरस्कार कसा देणार? या पुस्तकाला पुरस्कार देणं म्हणजे आपणच केलेल्या आणीबाणीतील अत्याचाराला आपणच प्रमाणपत्र देण्यासारखं आहे. आणीबाणी उठवताना भलेही हे सरकार माफी मागून मोकळं झालेलं असेल; पण त्यांना माहीत होतं की लोक काय आजचा राग उद्या विसरतात पण अशा पुस्तकांना पुरस्कार म्हणजे जन्मभरासाठी लांछन घेण्यासारखं. तेव्हा या सरकारनं हा पुरस्कार रद्द केला. पुरस्कार रद्द केला ही बातमी साहित्यिक क्षेत्रात वाऱ्यासारखी पसरली आणि या बातमीने तुफान उभं केलं. साहित्यिक, वाचक, रसिक यांच्यात असंतोषाची लाटच पसरली. सरकारचा सर्वत्र निषेध व्हायला लागला. निषेधाचे ठराव तर ठिकठिकाणी व्हायला लागले. या निषेधाला आणि कुप्रसिद्धीला तोंड देण्यापेक्षा पुरस्कार दिलेला परवडला असता असं त्यांना वाटायला लागल. पण आता मागेही जाता येईना आणि पुढेही.

आता बहुसंख्य साहित्यिक, वाचक, समीक्षक हे पुस्तकाच्या बाजूने उभे ठाकले. अभिव्यक्ति स्वातंत्र्यावर ही गदा आहे आणि असे कुठलेही प्रयत्न हाणून पाडले पाहिजेत या एका मुद्द्यावर सर्वांच एकमत झालं. शासनाने नेमलेली समिती जेंव्हा निर्णय देते तेव्हा तो निर्णय शासनावर बंधनकारक असायलाच पाहिजे. या एकूण प्रकरणातून शासनाची नाचक्की झाली. मात्र विनयबाबू एकदम प्रकाशझोतात आले. अनेक वृत्तपत्रांनी त्यांच्या मुलाखती छापल्या, अनेक साहित्यिक, विचारवंतांच्या प्रतिक्रिया छापल्या. एरवी कदाचित या पुस्तकाला एवढा प्रतिसाद मिळाला नसता; पण या प्रकरणामुळे या पुस्तकाची तडाखेबंद विक्री झाली आणि बोल बोल म्हणता पहिली आवृती संपली. दुसरी आवृत्ती संजय प्रकाशनाने काढली. इतका काळ लोटलाय या घटनेला; पण आठवणी आणखी ताज्या आहेत. परवा परवा श्री. गंगाधर गाडगीळ सपत्नीक पुण्याला आले होते तेव्हा त्यांना भेटण्यासाठी विनयबाबू त्यांच्याकडे गेले. त्या वेळी एक अनोळखी गृहस्थ तिथे बसलेले होते. त्या गृहस्थाला विनयची ओळख करून देतांना गाडगीळांच्या पत्नी म्हणाल्या, ''यांनी एकच पुस्तक लिहिलं आणि इतिहास घडवला!''

इतिहास घडवणारा माणूस म्हणजे कुणीतरी भव्य व्यक्तिमत्वाचा माणूस असेल असं आपल्याला वाटतं. अकारण असो किंवा सकारण; पण वाटतं एवढं मात्र

खरं. मात्र विनयबाबू या कल्पनेत न बसणाऱ्या व्यक्तिमत्वाचे धनी. मद्धयम उंची, गौर वर्ण, उभट चेहरा, कमावलेली अंगकाठी, आखूड मान, सरळ खांदे, त्यामुळे खांद्यात मान बसवल्यासारखी दिसते. दाट अस्ताव्यस्त केस आणि चेहराभर दाढी. यात ऐतिहासिक ते काय; पण डोळे मात्र सामनेवाल्याचा वेध घेणारे.

विनयबाबूंच्या स्वभावातच एक बंडखोरी आहे. प्रस्थापितांविरुद्ध दंड ठोकून उभं राहायची एक ऊर्मी आहे त्यांच्या स्वभावात. छोट्या छोट्या प्रसंगातूनही ही प्रवृत्ती डोकावते. काही वर्षांपूर्वी शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत घडलेली एक गोष्ट. सुरवातीच्या काळातली. त्या काळी कार्यकारिणीची बैठक म्हणजे जिल्हाप्रमुख आणि काही इतर अशी तिसाच्या आसपास संख्या असायची. त्यामुळे चर्चा सखोल व्हायची. खुल्या मनाने लोक आक्षेप मांडायचे आणि मग साहेब बोलायचे. साहेब काय भूमिका घेणार हे माहीत नसल्यामुळे कार्यकर्ते आपली भूमिका खुल्या मनाने मांडायचे आणि साहेबही या विचारांची दखल घेत. हल्ली कार्यकारिणी म्हणजे कार्यकर्त्यांची ही गर्दी.... आणि गर्दी म्हटली, की चर्चा कसली, भाषणबाजीच. तर पूर्वीच्या एका बैठकीत 'शेतकरी संघटक' हाच विषय चर्चेसाठी ठेवलेला. 'संघटकचे' स्वरूप बदलावं काय? बदललंच तर नवीन स्वरूप काय असावं? जाहिराती घ्याव्यात काय ? संपादक बदलावा काय? इत्यादी बाबत चर्चा अपेक्षित होती. दुसरा एखादा विषय असता तर चर्चा खूप गरमागरम झाली असती; पण 'संघटक' म्हणजे म्हात्रे सरांचं क्षेत्र आणि संघटनेतील सारी मंडळी त्यांच्या प्रेमातली. आता 'संघटक'वर टीका म्हणजे सरांवर टीका. आणि सरांवर टीका म्हणजे प्रेमातल्या माणसावर टीका. त्यामुळे चर्चेला तोंड काही फुटेना. शेवटी वाट पाहून विनयबाबू उठले आणि तुटून पडले 'संघटक'वर. त्यांची कडक टीका ऐकून सारे गंभीर बनले. लगेच मी उठलो आणि सरांची बाजू त्वेषाने मांडली . 'संघटक'ची जबाबदारी सरांवरच राहू द्यावी आणि निर्णय घेण्याचे अधिकारही त्यांचेकडेच राहू द्यावेत असा प्रस्ताव मी मांडला. साऱ्यांनी निःश्वास सोडला आणि माझा ठराव संमत झाला. लगेच बैठक दुसऱ्या विषयावर आली आणि गरमागरम चर्चेला सुरवात झाली. मध्यंतरात विनयबाबूंनी मला गाठलं आणि माझ्यावर ते बरसले, ''अनंतराव, एवढी काय घाई झाली होती तुम्हाला लगेच सरांच्या बचावासाठी धावून जायला. अहो, कुणीतरी विरुद्ध बाजू नाही मांडली तर चर्चा होणार कशी? साहेबांना सांगोपांग चर्चा हवी असते आणि अशी चर्चा व्हावी म्हणून खाटकाचं काम मला करावं लागतं. नाही तर सर सोडून दुसरं कुणीही एवढ्या समर्थपणे 'संघटक'ची जबाबदारी पेलू शकत नाही हे मला कळत



नाही की काय? विनाकारण घाई केली तुम्ही.'' पुढेही अनेक बैठकांतून विनयबाबत हाच अनुभव आला. आपली भूमिका रोखठोक मांडायची, भले मग ती प्रवाहाविरुद्धअसेना का.

विनयबाबूंच्या स्वभावातील बंडखोरी, त्यांचं बहुआयामी व्यक्तिमत्त्व, त्यांची बहुभाषिकता या साऱ्यांची मुळं त्यांच्या पूर्वेतिहासात सापडतात. १९४९ च्या जून महिन्यात कोल्हापूरला आईच्या माहेरी त्यांचा जन्म झाला. वडिलांचं मूळचं गाव कर्नाटकच्या शिमोगा जिल्ह्यात कुठे तरी. तिथे त्यांच्या शेतजमिनी होत्या. वडील तेव्हाच्या धारवाड जिल्ह्यातलं तिळवल्ली गाव सोडून शिक्षणासाठी मुंबईला आले आणि तिथेच स्थायिक झाले. विनयबाबूंचं शालेय शिक्षण मुंबईला आणि उच्च शिक्षण पुण्यात झालं. बुद्धीने तल्लख असूनही इतर मुलांप्रमाणे विज्ञान विषयाकडे न वळता त्यांनी इंग्रजी विषय घेऊन त्यात एम. ए. केलं. कोल्हापूर, मुंबई आणि पुणे अशी वाटचाल झाल्यामुळे एक अस्थिरतेची भावना आलेली. अस्थिरतेतून कळत न कळत एक बंडखोरीही येते. प्रत्येक वेळी गाव बदललं, की नवीन वातावरण, नवीन ओळखी, नवीन संबंध, क्वचित भाषासुद्धा नवीन. या सर्व बाबींचा एक परिणाम निश्चितच होत असावा. आणि विनयबाबूंच्या बाबतीत नेमकं हेच घडलं.

मळलेली वाट चालायची नाही हे कुठे तरी मनात ठसलं असावं. त्यामुळे एम. ए. होऊनही कुठे नोकरी धरायचा विचार नाही आला. सामाजिक कामाची धडपड होतीच. शाळेत असतांना संघ, पुढे शैक्षणिक, विकासात्मक चळवळी. काही काळ 'ज्ञान प्रबोधिनी' आणि 'ग्रामायन' या चळवळींशी संबंध; पण कुठे स्थिरता नाही. या वाटचालीमुळे आपोआपच बहुभाषिकत्व. कन्नड, मराठी, हिंदी, संस्कृत, गुजराती, इंग्रजी या भाषांवर प्रभुत्व. तमिळ आणि बंगला भाषा समजतात. या बहुभाषिकत्वामुळे व्यक्तिमत्त्व व्युत्पन्न होण्यास मदत.

विनयबाबूंना साहित्यात विशेष रस. स्वतः ते कवी आहेत; पण कवितासंग्रह प्रकाशित करण्यास त्यांचा विरोध. साहित्याची चांगली जाण त्यामुळे उत्कृष्ट समीक्षक. साहित्य क्षेत्रात लोक त्यांना चांगलंच मानतात, त्यांच्या टीकेची गांभीर्याने दखल घेतली जाते. 'जनांचा प्रवाहो चालीला' हे अत्यंत गाजलेलं पुस्तक. त्यानंतर 'श्रद्धांजली'हे व्यक्तिचित्रणाचं पुस्तक. मर्ढेकरांच्या काव्यावरचं 'कारुण्योपनिषद' अशी तीन पुस्तके प्रकाशित आहेत. खांडेकर चरित्रपट, सांजरंग (कादंबरी), कुरुंदकरांची पत्रे आणि किशोरी आमोणकरांवरील 'गानसरस्वती' या निवडक चार पुस्तकांना दीर्घ प्रस्तावना त्यांनी लिहिल्या आहेत. या चारही प्रस्तावना मुळातून वाचण्यासारख्या आहेत. या सर्व साहित्यातून त्यांचा व्यासंग जाणवतो. आज

पुण्याच्या देशमुख आणि कं. या प्रसिद्ध प्रकाशन संस्थेचे ते संपादक म्हणून काम पाहताहेत.

त्यांचा संगीत क्षेत्रातील अभ्यासही दांडगा आहे. स्वत: रसिक तर आहेतच, शिवाय शास्त्रीय संगीत शिकलेलेही आहेत. कुमार गंधर्व, मल्लिकार्जुन मन्सुरांवरील त्यांचा लेख तसेच किशोरी आमोणकरांवरच्या गानसरस्वती या पुस्तकाला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना, सतारवादक उस्मान खाँ यांची त्यांनी घेतलेली दीर्घ मुलाखत वाचली, की त्यांचा व्यासंग जाणवतो.

विनयकडे पाहिलं, की कधी कधी वाटतं, परमेश्वरा, तुझा तराजू न्यायाचा आहे म्हणतात हे काही खरं नाही बुवा. एकाच माणसाला एवढं सारं गुणसंपन्न करायचं. उत्तम वक्ता म्हणून नावलौकिक, उत्तम ग्रहणशक्ती, स्मरणशक्ती, आकलनशक्ती, साहित्याची उत्तम जाण, संगीताची उत्तम जाण, आणखी काय काय ते सारं विनयला द्यावं आणि... तराजू त्याच्याकडे इतका झुकावा? आणि आम्ही मात्र 'गुण मेरे एकहू नाही,' आमचं पारडं इतकं वर जावं ! हे कांही ठीक नाही देवा; पण मग आठवलं आणीबाणीच्या काळात जेव्हा आम्ही 'तेरे तख्त की जय, तेरे ताज की जय' म्हणत अम्माला दंडवत घालत होतो अन् उजळ माथ्याने वावरत गुलगुले खात होतो तेव्हा हा बाबा तुरुंगात अडकून पडला होता, सत्याग्रह करून, रोष पत्करून. अगदी खडी फोडत नसला-हो हल्ली सक्तमजुरीची शिक्षा भोगणारे सुद्धा तुरुंगात खडी फोडत नाहीत म्हणा-तरी शेवटी तुरुंग तो तुरुंगच. बरं एवढं करूनही स्वातंत्र्य सैनिकाची पेन्शन नाही रेल्वेचा पास नाही. नेकी करायची अन् दरियात टाकायची. नाही देवा. तुझी काठी बरोबर मार देते. आवाज न करता. म्हणून तर गुलाबालाही काटे असतात. म्हणून तर बघा ना आजही विनयबाबूंना पक्की सुरक्षित नोकरी नाही.

सभासंमेलनातून आक्रमक असलेले विनयबाबू खासगीत मात्र मिश्किल आहेत. वातावरण हसतं ठेवण्यात त्यांचा हात किंवा 'तोंड'कुणी धरू शकणार नाही. समोरचा माणूस कितीही मोठा असो, पुढे पुढे अजिबात करणार नाहीत, त्याचा मान जरूर ठेवतील पण आपला आब राखून. तसंच समोरचा माणूस कितीही सामान्य असला तरी त्याला आपल्याबरोबरीचा समजून वागवणार, मान देणार. एकीकडे स्वभावातील ही बंडखोरी, तर दुसरीकडे मिश्किलपणा, असं परस्परविरोधी अनेक गुणांचं मिश्रण त्यांच्या स्वभावात आहे.

त्यांचा स्वभाव विलक्षण बोलका. तुम्ही गिरसप्पाचा धबधबा पाहिला काय? नसू दे. मी तरी कुठं पाहिला आहे? पण धबधब्यासारखं अखंड बोलणं चालू



असतं आपण स्वत: बोलणार अन् समोरच्यालाही बोलतं करणार. आमच्या घरी आले म्हणजे माझ्याशी बोलतील. मी कामात असलो तर माझ्या मुलांशी बोलतील. तेही नसतील तर स्वयंपाकघरात जाऊन मुलांच्या आईशी बोलतील. आणि या साऱ्यांशी बोलतांना विषय कधीही कमी पडणार नाहीत. थट्टामस्करी, दोन दे-दोन घे हे सारं चालू असतं. त्यामुळे आमच्या घरात विनयबाबूंचं नेहमी स्वागतच असतं. त्यांच्या या स्वभावामुळे त्यांनी गावोगावी मैत्रीचे संबंध जोडले आहेत अन् टिकवलेही आहेत. जवळपासच्या गावी काहीही कामानिमित्त चक्कर झाली, की भेट घेण्यासाठी हमखास परभणीस येणार. आजच्या तुटक होत जाणाऱ्या संबंधांच्या काळात हा गुण सापडणं कठीण ! त्यांना एरवीच प्रवासाची आवड. आणि भाषाणासाठी कुठे जायचं झालं तर आडवा तिडवा प्रवास करून मुक्कामी पोंचणार. भेटीगाठी घेणार, भेटीच्या घरात गेलं म्हणजे सामान्यत: यजमानाची, घराची, स्वयंपाकाची स्तुती केली जाते. इथे हा प्रकार अजिबात नाही. हसतखेळत, गप्पा मारीत, चिमटे काढत. आमच्याकडे आले म्हणजे कृष्णाला म्हणजे माझ्या मोठ्या मुलाला म्हणणार, "तुमचा कसला चहा रे. तो चहा नाही, चहापत्तीचं वरण!" यावर माझा मुलगा उत्तर देणार, "ओ हर्डीकर, तुमच्या फुळूक पाण्यापेक्षा आमचं वरण बरं!" कधी आमच्या पत्नीला म्हणणार, "काय हे नवऱ्याचं वागणं. घर सोडायचं, संसार सोडायचा अन् तुरुंगात जाऊन बसायचं. कधी या गावाला जा, कधी त्या गावाला. काही संसार वगैरे आहे का नाही?" यातलं कौतुक लक्षात घेऊन पत्नी उत्तर देणार, "आणि हे मला सांगणार कोण, तर सत्याग्रह करून आणीबाणीत तुरुंगात जाणारे, बारा पिंपळावरचे मुंजे तुम्ही." त्याच्या या घेवाणदेवाणीमुळे घरातल्या वातावरणात ते पटकन मिसळून जातात.

विनयबाबूंचा संघटनाप्रवेश पारंपरिक पद्धतीनेच झाला. म्हणजे आधी शरद जोशींचं नाव ऐकलेलं. नंतर संघटनेच्या कामासंबंधी आणि वैचारिक मांडणीसंबंधी वाचलेलं. त्यानंतर केव्हातरी शरद जोशींशी भेट आणि त्यातून संघटनेत प्रवेश ही वाटचाल ठरल्यासारखीच आहे. विनयबाबूंच्या बाबतीतही असंच झालं. मार्च १९८१ च्या सुमारास निपाणी (कर्नाटक) इथे झालेलं आंदोलन १३ तंबाकु शेतकरी हुतात्मा झाल्याने खूपच गाजलं. शेतकरी संघटना प्रसिद्धीच्या झोतात आली ती या आंदोलनाने. त्या वेळी विनयबाबू हे इंडियन एक्स्प्रेस या इंग्रजी दैनिकासाठी काम करीत होते. पिंपळगाव बसवंतच्या मेळाव्याचं वार्तांकन आणि संघटनानेते शरद जोशी यांच्याशी वार्तालाप या उद्देशांनी विनयबाबू सप्टेंबर १९८१ मध्ये पिंपळगावी गेले. तोपावेतो दोघांची ओळखही नव्हती. प्रत्यक्ष ओळख नसली

तरी जोशींची प्रसिद्धी विनयच्या कानावर आलेली आणि शेतकरी संघटनाही आंदोलनामुळे प्रसिद्ध झालेली. म्हणून तर विनयबाबू पिंपळगावी गेलेले. दोघांची ही पहिलीच भेट. यावेळी झालेल्या वार्तालापाने दोघेही प्रभावित झालेले. दोघांची आतापावेतोची अभ्यासक्षेत्रे वेगवेगळी; पण दोघांची बहुआयामी आवड, चौफेरपणा हा समान. त्यामुळे दोघांची भेट उल्लेखनीय ठरली. साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाने, प्रतिपादनाने आणि आंदोलनाच्या आवाक्याने विनयबाबू प्रभावित झाले. विनयबाबूंनी मुलाखतीत जी चर्चा केली त्यामुळे साहेबही प्रभावित झाले असावेत. ''तुम्ही चांगले बोलता. असंच लिहीत चला.'' यावर विनयबाबूंनी त्यांना 'जनांचा प्रवाहो चालिला' या पुस्तकाबद्दल आणि त्या पुस्तकाने निर्माण केलेल्या वादळाबद्दल सांगितलं . पुढे पुण्याला परतल्यावर साहेबांना ते पुस्तक नेऊन दिलं. साहेबांनी ते पुस्तक वाचून काढलं. त्या पुस्तकामुळे दोघांत आणखी जवळीक निर्माण केली.

विनयबाबूंची पत्रकारितेची स्वत:ची एक स्टाईल होती. सामान्यत: पत्रकार आक्रमकतेचा वापर करतात. सामनेवाल्याला अडचणीत टाकणारे प्रश्न विचारायचे, वादग्रस्त विषयाला हात घालायचा, हे तंत्र अवलंबले जाते. हे तंत्र सोपं आहे. सामनेवाला माणूस अशावेळी बचावात्मक भूमिका घेतो; मात्र या तंत्राने पाहिजे ती माहिती हाती येतेच असं नाही. उलट संबंधांत ताण येतात. पण विनयबाबूंचं तंत्र अगदी याविरुद्ध. समोरच्या माणसांची मतं समजून घ्यायची असा सकारात्मक दृष्टिकोन त्यांचा असायचा. कदाचित त्यामुळेही साहेब आणि विनय यांची रास जुळली असेल. तसं पाहिलं तर दोघांच्या वयात चौदा वर्षांचं अंतर . पण बौद्धिक पातळीवर रास जुळल्यावर वयातील अंतर गौण ठरतं.

दोघांच्या संबंधांतील उत्तम काळ म्हणजे १९८२-८३ चा. या काळात दोघांच्या नेहमी भेटीगाठी होत. साहेबांना आणि विनयला इंग्रजी सिनेमाची आवड. तेव्हा अधून मधून दोघेही सिनेमाला जात. अनेक वेळा दोघांचं जेवणही एकत्रच होत असे. त्या काळी विनय पुण्याला कुठे तरी कॉट बेसिसवर राहत असे. सडाफटिंग. जेव्हा जेव्हा साहेबांना रिकामपण असे तेव्हा त्यांच्या त्या वेगप्रसिद्ध बुलेटवर बसून आंबेठाणच्या शेतावर जात, किंवा इतरत्र कुठेही जायचे. त्या काळात वर्णन विनयबाबू 'नक्षत्रांची रेस' असं करतात.

या रेसच्या काळातही चकमकी व्हायच्या पण त्या बौद्धिक पातळीवर. त्यात संघटना कुठेही नव्हती. हळूहळू संघटनाही गप्पात येत गेली. ''अर्थशास्त्र हा माझा विषय नव्हता. इंग्रजी हा होता; पण पत्रकार झाल्यावर सर्वच विषयांचा अभ्यास



होत गेला. त्यात अर्थशास्त्राची तोंडओळखही झालेली.'' विनयबाबू तोंडओळख म्हणतात पण त्यांच्या बुद्धीचा आवाका पाहता ही तोंडओळख बरीच आतपर्यंत झालेली. महाविद्यालयीन अभ्यासाच्या दृष्टीने कदाचित हा अभ्यास कमी असेल; पण चर्चा करण्यासाठी, संघटना समजून घेण्यासाठी पुरेसाच नाही तर भरपूर होता. साहेबांच्या संबंधात आल्यामुळे संघटनेची ओळखही हळूहळू होत होतीच. शिवाय त्यांच्या अभ्यासातून, आकलनातून त्यांचं असं ठाम मत बनलं होतं, ''देशाच्या आर्थिक उत्थापनासाठी पैसा शहराकडून खेड्याकडे जाणं आवश्यक आहे. ज्या देशातील सत्तर टक्क्यांवर लोक शेतीवर अवलंबून आहेत आणि जवळजवळ तेवढेच लोक खेड्यात राहतात, त्या देशाच्या नियोजनात शेती आणि खेडी केंद्रस्थानी असायला हवीत आणि त्यासाठी पैसा हा खेड्याकडे गेला पाहिजे. नेमकं या मुद्याकडे बहुतेक राजकारण्यांचं दुर्लक्ष. आणि नेमकं याच प्रश्नावर शेतकरी संघटनेन लक्ष केंद्रित केलं. मी यामुळे प्रभावित झालो आणि संघटनेकडे वळलो.'' विनयबाबूंनी सांगीतलं.

विनयबाबू संघटनेत आले; पण त्यांच राहणं पुणे-मुंबई अशा मोठ्या शहरातलं. अशा शहरात संघटनेच्या तत्त्वज्ञानांचं आकर्षण कुणाला असणं कठीण. त्यामुळे संघटना बांधली जाणं अपेक्षित नव्हतं. त्यामुळे संघटना बांधणी पातळीवर विनयबाबू कामगिरी बजावू शकले नसले तरी सभासंमेलने, अधिवेशने यांत त्यांचा क्रियाशील सहभाग असायचा. संमेलन, अधिवेशनातून आपलं मत ठामपणे मांडणं ही तर त्यांची विशेषता. संघटनेतील एक विचारवंत म्हणून त्यांच्याकडे आदराने पाहिलं जायचं. तसं १९८६ ते ८८ या काळात मध्य महाराष्ट्र प्रमुख म्हणून त्यांनी काम पाहिलेलं आहे; पण ते अल्पकाळ. त्याशिवाय संघटनेतील जबाबदारीचं पद त्यांनी सांभाळलं नाही. संघटनेच्या कामगिरीकडे त्रयस्थ दृष्टीने पाहणे त्यांना जसं जमलं तसं इतरांना नाही. विनयबाबूंना एरवीच प्रवासाची आवड. संघटनेच्या कामानिमित्त होणाऱ्या दौऱ्यांची त्यात भर पडली. ते स्वत: उत्तम वक्ते. ओळखीपाळखी खूप. त्यामुळे संघटनेच्या कार्यक्रमासाठी त्यांना मागणीही भरपूर.

पूर्णपणे शहरी, इंग्रजी-पत्रकार, वेष अमेरिकन असा विनय शेतकरी संघटनेचा पूर्णवेळ कार्यकर्ता का आणि कसा झाला, याची मलाही उत्सुकता होती. ते विचारल्यावर विनयबाबूंचं उत्तर असं-

''शरद जोशींशी वैचारिक जवळीक दाट झाल्यावर मी त्यांना १९८४ मध्ये म्हणाले, 'या कामासाठी इंडियन एक्स्प्रेस सोडून ३ ते ५ वर्षे मी तूम्हाला पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून देऊ इच्छितो-', 'अरे बाबा, तू आहेत तिथेच तुझा संघटनेला

जास्त उपयोग आहे. अशी गडबड करू नकोस-' साहेब म्हणाले. 'पण मला केवळ तुमचा आवडता सहकारी अशी माझी ओळख व्हायलानको आहे, मला संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये मिसळून काम करायचं आहे.' मी हट्ट सोडत नव्हतो, हे पाहून शरद जोशींनी सांगितलं,' योग्य वेळ आली की मी तुला सांगेन, मग तू राजीनामा देव' पण ते तसं सांगत नव्हते. मात्र १९८६ च्या जानेवारीच्या शेवटी त्यांना जबरदस्त (दुसरा) हार्ट अटॅक आला. ते पुण्यात होते, मी नाशिकला (त्याच दिवशी संध्याकाळी मला किरकोळ अपघात झाला होता.). मी (लंगडत) पुण्याला पोचलो ते नाशिकहून राजीनाम पाठवूनच. शरद जोशी जहांगीर नर्सिंग होममध्ये होते. मला पाहताच (मी नसांगताच) त्यांनी काय झालं ते ताडलं- रागावून म्हणाले, 'नोकरी सोडून आलास ना ?' मी हो म्हटलं. पुढे म्हणाले, 'मला न विचारला का सोडलीस नोकरी? आपलं काय ठरलं होतं?','पण तुम्ही असे गंभीर आजारी असताना तुम्हाला 'विश्रांती घ्या' म्हणायचं आणि आपण आपली नोकरी करायची हा ढोंगीपणा मला जमणार नाही. तेव्हा या विषयाची चर्चा नको- छान बरे व्हा- मग आपण बोलू.' विनयबाबूंनी हा प्रसंग मनात जपून ठेवला आहे- जोशीसाहेब आणि त्यांच्यामध्ये एकमेकाचे विचार न सांगता एकमेकांना कळत होते याची साक्ष म्हणून! ' तो माझ्या दृष्टीने आमच्या मैत्रीचा उत्कर्ष बिंदू होता !' विनयबाबू म्हणाले, 'पण एका अर्थी त्यांचं बरोबर होतं. मी पूर्णवेळ काम करू लागलो आणि आमच्यात मतभेद सुरू झाले!'

विनयचा आवाका लक्षात आल्यानंतर साहेबांनी त्यांना शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीत घेतलं आणि 'अन्य संघटना संपर्क' हे खातं दिलं. म्हणजे विनयबाबू संघटनेचे 'ॲम्बॅसिडर' झाले. महाराष्ट्र आणि देशातही बिगर-राजकीय स्वरूप ठेवूनही 'भारत-इंडिया' या संघर्षरेषेवर आंदोलन-संघटन करणाऱ्या अनेक चळवळी/संघटना होत्या. त्या सर्वांशी संपर्क ठेवून सहकार्याच्या शक्यता अजमावून पाहण्याच्या दृष्टीने शेतकरी संघटनेच्या वतीने चर्चा करण्याचे सर्वाधिकार दिले. यातूनच स्वामी अग्निवेष, शंकर गुहा नियोगी यांच्यासारखी माणसे संघटनेशी जोडली गेली. विनयबाबूंनी दिल्लीत ८६-८९ या तीन वर्षात हेलपाटे घालून एक राष्ट्रीय पातळीवर संपर्क समिती उभी केली होती. अरूण शौरी, कुलदीप नायर (त्यांच्या घरीच बैठका होत), सुरेंद्र मोहन असे दिग्गज संघटनेशी जोडले गेले होते. निरनिराळ्या क्षेत्रातल्या मान्यवरांनी लोकसभेची निवडणूक लढवावी अशी भूमिका घेवून उमेदवारांची मतदारसंघनिहाय यादी बनवण्याचं काम या समितीने केलं होतं. ४००/४५० लोकांची यादी तयार झाली होती. शिवाय संघटनेचं प्रचार



साहित्य तयार करणे, मोठ्या कार्यक्रमात पत्रकारांना आवश्यक ती माहिती पुरवत राहणे व शरद जोशींना (विशेषत: इतर संघटनांच्या बाबतीत) आवश्यक ती माहिती पुरवणे आणि पुढली दिशा सुचवणे ही महत्त्वाची कामेही विनय हर्डीकर करीत होते. सर्व प्रमुख राजकीय पक्षांच्या दिल्लीत असणाऱ्या नेत्यांशी नियमित संपर्क ठेवून शेतकरी संघटनेच्या भूमिका समजावून देत होते.

शेतकरी संघटनेच्या आजच्या परिस्थितीबद्दल आणि आंदोलनाबद्दल बोलताना त्यांनी त्यांच्या खास शैलीत हे असं मत व्यक्त केलं: ''सततची आंदोलने हा प्रकार कीड आणि कीडनियंत्रण पद्धतीसारखा आहे. सुरवातीच्या काळात कीडनियंत्रणासाठी कीटनाशकांचा वापर केला जायचा. ही औषधं प्रभावशाली होती; त्यामुळे कीड नियंत्रणही मोठ्या प्रमाणावर होत गेलं. पुढे झालं असं, की सततच्या वापरामुळे कीटकांतही ही औषधं पचवायची क्षमता निर्माण झाली. त्यामुळे ही औषध परिणामकारक ठरवण्यासाठी अधिक तीव्र करण्यात आली. हळूहळू कीटक याही औषधींना पचवू लागले आणि त्यामुळे ही औषधं परत निकामी ठरायला लागली; आणि ही प्रक्रिया चालू राहते. असाच काहीसा प्रकार शेतकरी संघटनेच्या आंदोलनाबाबत होतो आहे. सुरवातीच्या काळात नाशिक-आग्रा रोड बंद करणे, पिंपळगाव बसवंतचा रास्ता रोको ही आंदोलने नाविन्यपूर्ण; त्यामुळे प्रतिसाद प्रचंड मिळाला. या एवढ्या प्रतिसादाची शासनाला अपेक्षा नव्हती. त्यामुळे या आंदोलनांचा प्रतिकार कसा करावा हेही त्यांना कळेना. पुढील काही काळात आंदोलने त्याच पद्धतीने चालत राहिली आणि या आंदोलनांची हाताळणी कशी करायची याचं एक तंत्रही शासनानं ठरवून दिलं. त्यामुळे पुढे पुढे ही आंदोलने तेवढीशी परिणामकारक होईनात. संघटनेची अधिवेशनं प्रचंड प्रतिसादामुळे गाजली. ही प्रचंड गर्दी हे एक फार मोठं आकर्षण बनून राहिलं होतं. त्यामुळे सुरवातीच्या काळात ज्या प्रमाणात आंदोलनांची आणि अधिवेशनांची दखल घेतली जायची तशी दखल घेणं नंतरच्या काळात बंद झालं. त्याचबरोबर ही आंदोलनं अयशस्वी कशी करता येतील याचं शासनानंही कांही प्रमाणात उत्तर शोधून काढलं. तेव्हा यापुढील आंदोलने वेगळ्या स्वरूपात आली पाहिजेत आणि प्रश्नाची मांडणी काही वेगळ्या पद्धतीने येईल का याचाही विचार व्हायला पाहिजे.''

औरंगाबाद अधिवेशन आणि त्याही नंतर कांही काळ विनयबाबू सर्व कार्यक्रमातून हजेरी लावत. सहभागही देत; पण गेल्या काही वर्षांपासून त्यांचा सहभाग जाणवत नाही. हे असं का? दोनतीन शक्यता असू शकतात. एक - राजकीय वाट धुंडाळण्याच्या मोहामुळे. जसं शंकर धोंडगे, अनिल गोटे, पाशा

पटेल यांनी वेगवेगळे राजकीय पक्ष निवडले, आपल्या कार्यासाठी. विनयबा
असं काही असेल असं वाटत नाही. ते पूर्वीही कुठल्या राजकीय पक्षात न
आणि आजही कुठे प्रवेश घेतला नाही. दुसरी शक्यता सततच्या आंदोलनां
अनेक कार्यकर्ते थकले आणि घरी बसले. अशी तर अनेक माणसे आहे
विनयच्या बाबतीत तर तीही शक्यता दिसत नाही. थकून बाजूला होण्याइत
काळ त्यांनी संघटनेत आंदोलक म्हणून घालवला नाही. आर्थिक झळ थोडीब
जरूर पोचली असेल, पण तशी झळ सोसणारे तर हजारो आहेत. त्यामुळे
बाजूला झाले हे कदाचित कांही प्रमाणात शक्यही असेल; पण तेच एक
कारण असेल हे पटलं नाही. एवढं मात्र म्हणता येईल, की ज्या काळात शि
संपवून नोकरी शोधायची आणि स्थिरस्थावर व्हायचं त्या काळात ते संघट
राहिले. त्यामुळे आर्थिक स्थैर्य येऊ शकलं नाही; पण याहीसाठी ते स्वत: जबाब
आहेत. त्यांच्यापुढे त्या काळी सर्व दरवाजे उघडे होते. त्यांनी समजूनउमजून
रस्ता निवडला. सुखाचा धोपटमार्ग सोडून हा काट्याकुट्याचा मार्ग निवडला.

तिसरी शक्यता मतभेदाची, ''मतभेदाचा प्रश्नच येत नाही. संघटनेत कामा
लागलो तो समजूनउमजून, विचार स्वीकारून. तपशिलात मतभेद असू शकता
पण ते तर घराघरातही असतात. पण झालं असं, की नंतरच्या काळात मा
घुसमट होते आहे असं मला वाटायला लागलं. चर्चेत सहभागी होत असताना
टीकाकाराची भूमिका बजावत होतो; पण त्यामुळे लोकांचे गैरसमज व्हाय
लागले. एखाद्या प्रश्नावर मी दुसरी बाजू मांडायचा प्रयत्न करीत असे. पण
करण्यामागे माझा हेतू शुद्ध असायचा; पण हेतू हा शेवटी सबजेक्टिव्ह. तेव्हा मा
सूचना ही प्रामाणिक किंवा अप्रामाणिक हे ठरवायचं कसं? त्यातून गैरसम
व्हायला लागले. मी कुठल्याही राजकीय पक्षात प्रवेश केलेला नाही. शेत
संघटनेच्या विचाराचा मी त्यागही केलेला नाही. माझा प्रवेश हा सैद्धांतिक आ
म्हणून आजही मी स्वत:ला वैचारिक पातळीवर संघटनेचाच मानतो. आज
इतरत्र संधी मिळेल तेव्हा भाषणातून चर्चेतून मी संघटनेच्याच विचाराची मांड
करतो. आजही मी संघटना कार्यकर्त्यांशी संबंध ठेवून आहे.''

एवढं मात्र खरं, की विनयचा पिंड हा टीकाकाराचा. समीक्षकाचा आ
साहित्यिक क्षेत्रात त्यांनी एक उत्तम समीक्षक म्हणून नाव कमावलेले आ
त्यानिमित्त कॉलेजांतून, संमेलनांतून त्यांच्या भाषणाचे अनेक कार्यक्रम होता
भाषणाने सभा जिंकणारे अनेक वक्ते आहेत. त्यांची शैली वेगवेगळी. का
वक्त्यांच्या जिभेवर सरस्वती नाचते. अटल बिहारी वाजपेयी, शिवाजीराव भोस



राम शेवाळकर, बापूसाहेब काळदाते हे या वर्गातले. कांही वक्ते सभा जिंकतात, ते आंतरिक तळमळ आणि आपल्या सच्चेपणाने. अनंत भालेराव या वर्गात मोडायचे. शरद जोशी लाखालाखाच्या सभा जिंकतात, ते आपल्या मुद्देसूद, तर्कसंगत मांडणीमूळे. अनेक मुलूखमैदानी तोफांच्या भाषणांनंतर मी मी म्हणणारे उभे राहताना कचरायचे पण या तोफानंतर भाषणाला उभे राहून, लाखा लाखांच्या सभा जिंकायचं कसब केवळ शरद जोशींकडे. आणि विनयबाबू सभा बगलेत मारायचे ते एखाद्या वकीलाने कौशल्यपूर्वक मांडणी करून अवघड केस जिंकावी तशा कसबी वक्तृत्वाने. त्यांच्या भाषणात अभिनिवेश नाही, वाक्यांच्या फुलझड्या नाहीत, शब्दांचा फुलोरा नाही; पण प्रतिपादनाच विलक्षण कसब सभेला जिंकायला पुरेसं असायचं.

विनयबाबू इंग्रजी विषयातले एम्.ए.; पण शरद जोशींच्या सहवासात आल्यामुळे संघटनेच्या संदर्भातलं तत्त्वज्ञान वाचल्या, ऐकल्यामुळे त्यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास केला. ते स्वत: रसिक साहित्यिक, साहित्याचे जाणकार, त्यामुळे, ''संघटनेत मला साहित्यावर बोलावं लागतं आणि वाङ्मयीन क्षेत्रात अर्थशास्त्रावर असं काहीसं झालेलं आहे.'' विनयबाबू सांगतात. डंकेल प्रस्ताव आणि जागतिक व्यापार परिषदेबाबत बराचसा अभ्यास शरद जोशींच्या सहवासामुळे झाला. ''या प्रस्तावात स्मॉल प्रिंट खूपच आहे आणि दुर्दैवाने या स्मॉल प्रिंटकडे आपले दुर्लक्ष झालेलं आहे. याबाबत जागरूक केवळ शेतकरी संघटना आहे. याबाबत भारतीय प्रशासन दुर्दैवाने शेतकरी संघटनेला लक्षात घेत नाही. त्यामुळे या स्मॉल प्रिंटचा भार ज्या शेतकऱ्यावर पडणार आहे. त्यांचा विचारच होत नाही.'' हा मुद्दा अधिक खुलाशाने सांगताना ते म्हणतात, ''भारत सरकारच्या वतीने या विषयावरील चर्चेसाठी जी प्रतिनिधी मंडळे जातात, त्यांच्यात परदेशी दौरा करू इच्छिणारे खासदार मंत्री आणि ज्येष्ठ सनदी नोकर असतात. जागतिक व्यापार परिषदेतर्फे प्रसारित केल्या जाणाऱ्या मसुद्यात बारके तपशील वाचण्याइतका वेळ आणि पेशन्स खासदार/मंत्र्यात नाही, राहता राहिले ज्येष्ठ सनदी अधिकारी. त्यांचं लक्ष व्यापार परिषदेतील व्यापारासंबंधीच्या सवलतीभोवती घोटाळत असतं. त्यांना विशेष रस आहे तो परकीय भांडवल या देशात कसं येईल यांत. यात त्यांचा एक स्वार्थ आहे. या निमित्ताने परदेशांतील तांत्रिक विकासकामात यांना किंवा यांच्या पुत्रपौत्रांना सहभाग देता येईल. त्यामुळे या सवलती मिळवता कशा येतील याकडे त्यांचं लक्ष जास्त. आपल्याकडे संशोधनाची वृत्ती मुळात कमी, त्यात अशा प्रकारच्या वृत्ती जोपासायला वातावरणही अनुकूल नाही. त्यामुळे रेडीमेड परकीय तंत्रज्ञान कसे

आणता येईल याचा विचार जास्त होतो आणि सर्वांत कडी होते ते आजच्या युगातील परवलीचा शब्द म्हणजे 'जागतिकीकरण'. जागतिकीकरणाची घाई या सनदी अधिकाऱ्यांना एवढी लागली आहे, की आयात बंधने खुली करण्याआधी इतर देशांनी कृषि क्षेत्र खुले केले आहे किंवा नाही याचा फारसा विचारही या लोकांनी केलेला नाही आणि हा मुद्दा आपल्यासाठी फार घातक ठरणार आहे. आज सर्व प्रगत राष्ट्रांची भिस्त व्यापार, उद्योगधंद्यावर तर आपली भिस्त शेती उद्योगावर. तेव्हा आपल्या या शेती उद्योगाला संरक्षण देणं आणि आयात धोरण यांची व्यवहार्य सांगड घालणं आवश्यक आहे. दुर्दैवाने सनदी अधिकारी हे प्रामुख्याने शहराळलेले, शहरी मानसिकतेमधले आणि शेती प्रश्नाची अजिबात जाण नसलेले. त्यामुळे जागतिकीकरण म्हणजे माहिती तंत्रज्ञान, उद्योगधंदे, वाढ या नेहरूनीतीचा बडेजाव माजवणारे. मग शेतकऱ्यांचा विचार कोण करणार? आज एक फार मोठा विरोधाभास मला दिसतो आहे. ज्यांच्याकडे सत्ता आहे त्यांचा अभ्यास नाही आणि ज्यांचा अभ्यास आहे (विनयबाबूंचा इशारा शरद जोशींकडे असावा) त्यांच्या हातात सत्ता नाही. भारतीय शेतीची नौका जागतिक व्यापार परिषदेच्या खडकावर फुटते की काय अशी मला भीती वाटते.''

विनयबाबूंशी परवा परवा बोललो. त्यांच्या बोलण्यातून संघटनेबद्दलचा ओलावा जाणवण्याइतपत पाझरत होता. त्यांच्याबद्दल काय गैरसमज असतील ते दूर व्हायला पाहिजेत. त्यांच्यासारख्यांची संघटनेला गरज आहे. इतका काळ गेला आहे ते दूर झाल्याला; पण आजही संघटनेच्या आठवणी दाटून येतात. आजही साहेबांबद्दलची आदरयुक्त मैत्री त्यांना अस्वस्थ करते.

■ ■



# सर

शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसाठी १९८४ हे वर्ष फारच धामधुमीचं ठरलं. फेब्रुवारीत शेतकरी संघटनेचं दुसरं अधिवेशन संपन्न झालं. या अधिवेशनाची तयारी, प्रचार याची धामधूम थेट जानेवारीपासूनच काय डिसेंबरपासूनच सुरू. अधिवेशन संपतं न संपतं तोच मार्चमध्ये चंदीगडला पंजाबच्या राजभवनाला घेराओचा कार्यक्रम जाहीर झालेला. या कार्यक्रमासाठी हजारो कार्यकर्ते महाराष्ट्रातून रवाना झाले. ऑगस्ट महिन्यात पंजाबचे जेलभरो आंदोलन शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली. त्यासाठी महाराष्ट्रातून दहा जणांचं एक प्रतिनिधी मंडळ तिकडे रवाना झालं. सप्टेंबरात चाकण ते कोपरगाव मोटारसायकल रॅली, महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यातून जाणार. त्याच्या तयारीसाठी कार्यकर्ते कामात गुंतून पडलेले. त्याला लागूनच २ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर बारडोली ते टेहरे अशी महाराष्ट्र प्रचार यात्रा, ती परत महाराष्ट्रातील बहुतेक सर्व जिल्ह्यांतून जाणार.

पैकी मोटारसायकल रॅलीचा शेवट कोपरगावी होणार होता. रॅलीत सातशेवर मोटारसायकली महाराष्ट्रभरातून आलेल्या. एका एका मोटारसायकलवर दोघे दोघे बसणार. सोबत यंत्र दुरुस्तीसाठी यांत्रिक मंडळी आणि त्यांच्या साहित्यासाठी लागणारं सामान ठेवायला आणि मोटारसायकल स्वारांचा बाडबिस्तारा ठेवायला एक दोन टेम्पो-ट्रक. मोटारसायकल यात्रा ज्या रस्त्यावरुन जाई, तो रस्ता तास तास आपोआप बंद होत असे. वाटेवरची खेडी, शहरे, छोट्या मोठ्या गावांतील लोक उत्सुकतेनं हा सातशेवर मोटार सायकलींचा ताफा पाहात, कुतूहलानं चौकशी करीत. कुणीतरी खुलाशानं सांगे आणि प्रचाराचं काम आपोआप होई, मुद्दामहून रस्ता रोखण्याची गरजच नव्हती. दोन दोनच्या रांगेने सातशे मोटार सायकली धाड धाड जाणार म्हणजे रस्ता आपोआपच अडवला जाणार. त्यामुळे ही प्रचार यात्रा एक कौतुकाचा, चर्चेचा विषय झालेली होती. वाटेत मुक्कामाच्या वेळी, स्थळी छोट्यामोठ्या सभा, या सभेत चर्चा, प्रश्नोत्तरे, भाषणे होत. विश्रांतीची वेळ संपली, की रॅली चालली पुढे पुढे . यात्रेचं ठिकठिकाणी शेतकऱ्यांनी प्रचंड स्वागत केलं. या यात्रेचा शेवट कोपरगावला होणार म्हणून समारोपाच्या कार्यक्रमाला मी गेलो होतो कोपरगावला.

कोपरगावी ती माझी पहिली भेट होती. त्यामुळे गाडीतळावर उतरून चौक
करीत करीत यात्रेच्या आगमनाच्या ठिकाणाकडे मी निघालो. वाटेतच सर म
भेटले. म्हणाले, ''चला, वकीलसाहेब. आपण यात्रेकरूंचं स्वागत करू. ज
निवांत ठिकाण निवडू.'' मीही एकटा, सरही एकटे तेव्हा आम्ही दोघे एके
एकमेकांबरोबर निघालो. यात्रा ज्या ठिकाणाहून गावात प्रवेश करणार म्हणून ति
स्वागत होणार होतं, त्या ठिकाणी आम्ही थांबलो. यात्रेच्या स्वागतासाठी भ
टनाटनाची मंडळी थांबली होती. काही आजी आमदार, काही माजी आणि का
उद्या होऊ घातलेली आमदार मंडळी. या राजकीय पुढ्याऱ्यांचं वेळेचं निदान फ
अचूक असतं. त्या वेळी शेतकरी संघटनेचं नाणं चालू होतं, तेव्हा ते नाणं क
करण्यासाठी ही त्यांची धडपड चालली होती. एरवी त्यांना शेतकऱ्याशी का
घेणंदेणं नाही आणि शेतकरी संघटनेशीही, तरीही ते हजर होते. संख्येनं हजर हो
यात्रा येऊ लागल्याचा आवाज दुरून यायला लागला. सातशे मोटारसायकलीं
आवाज असा थोडी लपणार. गर्जत, वाजत, घोषणांच्या निनादात यात्रा आल
स्वागत घेतलं आणि आली तशी घोषणांच्या गर्जनांत, दडदडत गेली. केव्ह
आली केव्हा गेली हे कळलं सुद्धा नाही. स्वागताच्या ज्या क्षणासाठी आप
आलो तो क्षण एवढा छोटा? आला आणि गेला. मला कवितेच्या दोन ओ
आठवल्या.

*वस्ल की रात और इतनी मुख्तसर*
*उठाने में पर्दा देर थी की सहर हो गयी*

यात्रेमागे आम्ही समारोपस्थळाकडे निघालो. वाटेत एके ठिकाणी प्रचारयात्रे
एक मोठं पोस्टर पडलं होतं. आता सर काय करणार याची मला उत्सूकता लागल
सरांनी पुढे जाऊन ते पोस्टर उचललं, त्याची घडी घातली आणि पालथ्या हात
ते पुसून, झटकून ती घडी शबनममध्ये टाकली. त्यांची ही कृती पाहून मी हसल
ते पाहून सर मला म्हणाले, ''कां हो काय झालं?'' त्यावर मी म्हणालो, ''स
त्या पोस्टरकडे माझंही लक्ष होतं. तुम्ही ते उचलणारच असा माझा होरा होत
पण माझा हा होरा खरा ठरणार की नाही हे मला पाहायचं होतं. माझं वाटणं ख
ठरलं. याचं मला हसू आलं.'' बाब तशी फार छोटी, साधी; पण सरांच्या स्वभावाच्य
पैलूवर प्रकाश टाकणारी, म्हणून हा माझ्या आठवणीत नोंदलेला प्रसंग आज लिहिल

हे सर, म्हणजे म्हात्रे सर. सुरेशचंद्र म्हात्रे. सर संघटनेत येण्यापूर्वी अलिबागच्य
महाविद्यालयात प्राध्यापक होते. त्यामुळे त्यांची तेव्हाची 'सर' की संघटनेत काय
राहिली. तत्त्वाला घट्ट धरणारे, विलक्षण स्वाभिमानी सर शिस्तीचे भोक्ते. स्वभाव



कडक, त्यांच्या स्वभावातले कांही गुण पाहता, एवढ्या प्रचंड संघटनेत इतका दीर्घ काळ ते टिकलेच कसे याचं आश्चर्य वाटतं. कदाचित असंही असेल, एवढ्या संघटनेत कुणी तरी कडक शिस्त बाळगणारं माणूस आवश्यकच असतं. कडू वाळकं तोडायचं काम करायला कुणी तरी एक जण पाहिजे असतं. मी त्यांना थेट ८४ सालापासून ओळखतो आहे, अगदी परभणी अधिवेशनापासून. आमच्या भेटीगाठी संघटनेच्या मेळावे, अधिवेशनांतून झालेल्या. आंबेठाणला मी बऱ्याच वेळा गेलो आहे आणि सरही दोनतीन वेळेस परभणीला आलेले आहेत; पण इतका दीर्घ सहवास असूनही आमचे संबंध नमस्कार-चमत्कार, 'कसंकाय चाललंय' यापलीकडे गेलेले नाहीत. औरंगाबाद अधिवेशनकाळात सातआठ दिवस सर आणि मी हेमंतच्या अधिवेशन कार्यालयात बसून असू; पण सरांना मी कोंडाळं करून गप्पाटप्पा मारत बसलेलं पाहिलं नाही. गेल्या वर्षीच्या डिसेंबर अखेरीस आंबेठाणला चक्क एक रात्र, दोन दिवस राहिलो. साहेब त्या वेळी नर्मदा परिक्रमेला गेलेले आणि आख्ख्या 'अंगारमळ्यात' सर, मी आणि बबनचा भाऊ नाना एवढी मंडळी बोलत बसलो होतो या मुलाखतीवेळी, तेव्हा त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू दिसून आले. पूर्वी लक्षात आलेल्या पैलूंची कारणमीमांसाही कळली. त्यांचा स्वभाव हल्ली काहीसा भावुक झालेला वाटला. काळाच्या ओघात हा फरक झाला की सर मुळातलेच तसे, कोण जाणे!

सरांचा स्वभाव कडक; पण या कडक स्वभावालाही दोन अपवाद आहेत. एक आहे त्यांचा आवाज. आवाजात एक मुलायमपणा आहे. सरांना संगीताची आवड आहे; पण त्यांच्या आवाजातला हा मुलायमपणा रियाज केल्याने आलेला नाही. किती लोकांना माहीत आहे, की त्यांना संगीत आवडतं. कधी आपण त्यांना गाणी ऐकताना पाहिलं नाही. त्यांचं एक लाडकं मत आहे, गणित, व्याकरण आणि संगीत हे एकत्र जातात. पैकी जनसामान्यांच्या दृष्टीने गणित आणि व्याकरण त्यांच्या रूक्षपणामुळे एकत्र जात असतील किंवा विद्यार्थ्यांना एकत्र त्रास देत असतीलही; पण संगीताबरोबर ही दोन शास्त्रे असतील. सरांत एकाच वेळी कडकपणा आणि मुलामयपणा असणे हेही एक उदाहरण आहेच की. हां आणि दुसरा अपवाद आहे, लहान मुलांचा! मुलांच्या बाबतीत सर बरेच हळवे होतात. बबन शेलारच्या मुलांना हे हाक मारतात तेव्हा त्यांचा आवाज ऐकावा. त्यांच्या अभ्यासाची, शाळेची चौकशी करतात तेव्हा त्यांचा आवाज ऐकावा. अशा वेळी ते खास ठेवणीतला आवाज काढतात. शेतकरी संघटनेच्या अधिवेशनातून कुणाचं तरी बाळ खांद्यावर घेऊन मिरवताना तुम्ही अनेक वेळा त्यांना पाहिलंही

असेल. औरंगाबाद अधिवेशनाचं कार्यालय ज्या जागेत थाटलेलं ती जागा पेडगावकरांच्या मालकीची. मालक स्वत: शेजारीच राहतात. त्यांचा छोटा मुलगा अधिवेशनकाळात सतत सरांजवळच राहायचा. तसं पाहिलं तर सरांची आणि पेडगांवकरांची पूर्वीची ओळख नव्हती; पण कुणावर जीव जडवायला पूर्वसंबंध हवेतच कशाला? मुलांची तरी काय गंमत आहे पाहा. झाडांची मुळं जसं पाणी शोधतात, तसंच छोटी मुलंही प्रेम शोधतात-एरवी रूक्ष वाटणाऱ्या सरांजवळ नेमकी मुलंमात्र आनंदाने राहतात. मी पाहिलंय- पेडगांवकरांचा हा मुलगा आईनं हाक दिली तरी सरांना सोडायचा नाही.

संघटनेच्या जवळजवळ जन्मापासूनच सर संघटनेत आहेत. संघटनेचा पाळणा त्यांनी हलवला नाही एवढंच! आजही ते संघटनेतच आहेत. एवढा वीसबावीस वर्षांचा दीर्घ प्रवास; पण त्यांनी आपल्या भोवती कोंडाळं जमा केलेलं नाही. असं का? एखाद्या संघटनेवर इतकं जिवापाड प्रेम करणारा माणूस, रस्त्यावर पडलेलं पोस्टर उचलून घडी घालून झटकून पिशवीत ठेवणारा कार्यकर्ता इतका अलिप्त कसा राहू शकतो. आणि इतका अलिप्त राहणारा, एरवी कडक वाटणारा माणूस मुलांच्या बाबतीत एवढा भावुक कसा होऊ शकतो? हेमंतच्या मृत्यूची बातमी सरांनी फोनवरून मला दिली तेव्हा त्यांच्या स्वरातल्या वेदना त्यांच्या आवाजावरूनही जाणवल्या, पण प्रत्यक्षात हा माणूस हेमंतवर इतकं प्रेम करत असावा असा प्रसंग कांही मला आठवला नाही. जाणूनबुजून आपल्या भावनांना आवर घालायचा त्यांचा प्रयत्न असतो. मला तर बुवा सर म्हणजे एक कोडं वाटतं.

कदाचित असं असेल, की कुठे तर जीव गुंतवून ठेवावा, कशावर तरी जिवापाड प्रेम करावं अशीच त्यांची मानसिकता असूनही, पुढे चालून जे आयुष्य त्यांना जगायचं त्याची पूर्वतयारी म्हणून भावनेचे हे दोर त्यांनी कापून टाकले असावेत. एरवी संगीतावर, मुलांवर प्रेम करणारा माणूस रूक्ष कसा असेल?

सर मूळचे रायगड जिल्ह्यातले. वडील महसूल खात्यात कारकुनापासून डेप्युटी कलेक्टरच्या जागेपर्यंत वाटचाल केलेले. घरात पाच भाऊ आणि सहा बहिणी असं मोठं कुटुंब. घरी शेती, वाशी/पेण येथे; पण शेती व्यवसाय नाही. कॉलेजचं पदवीपर्यंतचं शिक्षण अलिबागला झालं. घरचा कुटुंबकबिला एवढा मोठा, त्यामुळे शिक्षण पदवीलाच संपण्याची शक्यता होती; पण सर म्हणजे कॉलेजच्या प्राचार्यांचे आवडते विद्यार्थी. सरांना गणित या विषयात विशेष गोडी. तेव्हा इतका चांगला विद्यार्थी आपल्या हातचा जाऊ नये असं त्यांना वाटायचं. म्हणून प्राचार्यांनी सरांना कॉलेजातच नोकरी दिली. एवढंच नाही तर एम्. एस्सी. करण्याची परवानगीही



दिली. काही काळ नोकरी, काही काळ अभ्यास- कॉलेज करीत सरांनी पदव्युत्तर शिक्षण गणित या विषयात पूर्ण केलं आणि प्राध्यापक म्हणून त्याच कॉलेजात त्यांना नोकरी मिळाली. शिक्षण त्यांची गरज आणि त्याहीपेक्षा आवड होती. तेव्हा हौसमौज ही जी कॉलेजची वैशिष्ट्ये त्यांपासून सर दूरच राहिले. एक प्रकारे संन्यस्त जीवन जगले.

सरांची संघटनेकडे जी वाटचाल झाली, ती अरविंद वामन कुलकर्णी यांच्यामूळे. अरविंद वामन हे त्याच कॉलेजात प्राध्यापक. सरांचे मित्र; पण त्यांना सिनिअर. योगायोगानेच सर संघटनेकडे आकृष्ट झाले; पण त्याला कारण घडलं ते अरविंद वामन यांनी लिहिलेल्या लेखाचं. १९८० मध्ये शेतकरी संघटनेनं छेडलेल्या कांदा आंदोलनानं विलक्षण जोर पकडला. साऱ्या भारतात ते आंदोलन गाजलं. या आंदोलनासंदर्भात अरविंद वामन कुलकर्णी यांनी काही लेख लिहिले. त्यावेळी शरद जोशी हे निपाणीला आंदोलनात बसले होते. कुणीतरी बोलण्यात या लेखांचा उल्लेख केला. साहेबांनी ते लेख वाचले आणि अरविंद वामन यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. तिथे हजर असलेल्या पैकी कुणीतरी अरविंद वामन कुलकर्णी यांचा पत्ता मिळवला आणि निपाणीला येण्यासंबंधी त्यांना तार केली. तोपावेतो अरविंद वामन यांची साहेबांशी ओळख नव्हती; पण आंदोलनबद्दल, शेतकरी संघटनेबद्दल काहीशी उत्सुकता जरूर होती. आता स्वत: शरद जोशी यांनीच त्यांच्या भेटीची उत्सुकता दाखवली म्हटल्यावर अरविंद वामनांनाही आनंद झाला आणि त्यांनी निपाणीला जाण्याचं ठरवलं. पल्ला बराच लांबचा तेव्हा त्यांनी सरांना चलता का म्हणून विचारलं. सरही हो म्हणाले. तेव्हा दोघेही मोटारसायकलवर बसून अलिबागेहून थेट निपाणीला रवाना झाले. वाटेत एका ठिकाणी रस्ता रोको आंदोलनात ते अडकले. सरांनी साहेबांची तार दाखवली तेव्हा कुठे त्यांची सुटका झाली. याच्यावरून एक प्रसंग आठवला. माझ्या भाच्याच्या मुलीचं लग्न होतं वसमतला. लग्न येणार होतं पार दूर तावसी या गावावरून. वाटेत दोनतीन जिल्हे ओलांडायचे होते. लग्न ठरून बरेच दिवस झाले होते आणि नेमकं त्याच दिवशी संघटनेचं रास्ता रोको आंदोलन महाराष्ट्रभर. तेव्हा आमच्या भाच्यानं डोकं लढवलं, त्यानं माझ्याकडून 'माझ्या भाच्याच्या मुलीच्या लग्नाचं हे वऱ्हाड आहे तेव्हा कृपया यांची गाडी रोखू नये.' असं पत्र लिहून घेतलं. एकाच दिवशी दोन लग्न आणि दोन ठिकाणांहून वऱ्हाडी येणार. काही लोक खासगी वाहनाने येणार. तेव्हा या पत्राच्या झेरॉक्स प्रती काढल्या आणि सर्वांना देण्याची व्यवस्था केली. त्यामुळे कुठेही रास्ता रोकोमधे बस, गाडी अडवली की पत्र दाखवायचं आणि पुढे निघायचं.

कधी नाही तो मामाचा भाव संघटनेमुळे वाढला. ''आम्ही निपाणीला पोचलो तेव्हा साहेब आणि त्यांच्यो अवतीभोवती बरीच मंडळी बसलेली होती. आम्ही शरद जोशींना आमची ओळख करून दिली. ती आमची जोशींशी पहिली भेट आणि तो दिवस होता तीन एप्रिल ८१ चा.'' सरांनी सांगितलं, अर्थातच तारखेसह. चार तारखेला पाडवा. पाचला आंदोलन चालूच. सहाला गोळीबार व शरद जोशींना अटक. त्यानंतर ही जोडी अलिबागला परत. सरांना पेपर तपासायचं मोठं काम होतं. ते काम त्यांनी हातावेगळं केलं. आता ओढ लागली होती शरद जोशींची. काम संपलं आणि सर एकटेच परतले निपाणीला. एव्हाना शरद जोशी अटकेतच होते. सर परत आले, त्या दिवशी साहेबांना कोर्टापुढे हजर केलं. तिथे न्यायाधीशांनी विचारपूस केली. त्या वेळी साहेबांनी जे निवेदन करायचं होतं ते त्यांनी केलं. त्यांचं निवेदन न्यायाधीशांनी शांतपणे ऐकून घेतले आणि ते म्हणाले, ''इतक्या मोठ्या माणसाशी शासन असा व्यवहार करतं, तिथे सामान्य माणसाची अवस्था काय असेल !'' या उद्गारानिशी त्यांनी साहेबांची जामिनावर सुटका केली. साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव हा असा जादुई होता. न्यायाधीशाच्या खुर्चीवर बसलले न्यायाधीश कोर्टातल्या श्रोत्यांत बसलेले सर दोघेही एकाच फटक्यात प्रभावित झाले.

यापुढच्या घटना वेगाने होत गेल्या. साहेब अटेकबाहेर आले आणि एक मे हा दिवस विजय दिन म्हणून साजरा करावा असा निर्णय संघटनेनं घेतला. यावर शासनानं एक घर पुढे जाऊन साहेबांना तालुका बंदी जाहीर केली. इकडे निपाणीला एक मेच्या विजय दिनाची तयारी चाललेली आणि तिकडे शासनानं हा दिवस हाणून पाडण्याची योजना तयार केली. आता संघटनेपुढे प्रश्न पडला- ही सभा घ्यायची कुठे? तालुकाबंदीतून मार्ग काढायचा कसा? पण जेवढ्या अडचणी तेवढेच मार्गही. कार्यकर्त्यांनी डोकं खाजवलं आणि त्यांच्या लक्षात आलं, निपाणीच्या अर्जुननगरात एक जागा अशी होती, की कॉलेजची इमारत महाराष्ट्रात तर कुंपण होतं कर्नाटकात मग सभा जाहीर केली, ती या अशा अडचणीच्या ठिकाणी आणि प्रत्यक्षात घेतली एका शेतात, ज्या ठिकाणी सभा होऊ शकेल अशी कल्पनाही कुणी करू शकलं नसतं. लोक तर अडचणीत आले. धारियाजी आले-साहेब तर लपून राहिले होते. लपतछपत ते एकदम मैदानावर 'प्रकटले' आणि दन्ना सभा घेऊन दाखवली त्यांनी. पोलिस नेहमी प्रमाणे 'देखते ही रह गये'. या सभेला लीलाताईही होत्या. साहेबांची आणि सरांची ही दुसरी भेट; पण अद्याप सरांनी 'दीक्षा' घेतली नव्हती. ते स्वत:ला आणखी निरीक्षकच मानीत होते; पण



हे निरीक्षण जवळून होतं. म्हणजेच वाटचाल सुरू झालेली होती, मुक्कामही ठरलेला होता. फक्त मुक्काम आणखी यायचा होता एवढंच. एव्हाना सरांनी साहेबांना पाहिलं, अजमावलं, त्यांचं काम पाहिलं आणि साहेबांची भेट घेऊन सांगितलं, ''आजपासून मी तुमच्याबरोबर राहायचं ठरवलं आहे. ज्या दिवशी तुम्हाला माझी अडचण वाटेल त्या दिवशी मी बाजूला सरकेन.'' साहेबांच्या या संघटनेत येणारे तर हजारो हजारो आहेत; पण असं रोखठोक बोलणारा हा एकमेव माणूस. साहेबांनी त्यांना आपादमस्तक न्याहाळलं. साहेबांपुढे सर म्हणजे वामनमूर्ती. मनोमन साहेबांनी हात जोडले असतील. तेव्हापासून सर हे संघटनेशी जुळले ते जुळलेच. साहेबांना सरांची अडचण आहे किंवा नाही कुणास ठाऊक; पण सरांनी साहेबांची साथ आजपावेतो सोडली नाही. सरांची पहिली भेट ही चाचपणीसाठी होती, तर दुसरी भेट प्रवेशाची. हा निर्णय सरांनी केवळ दुसऱ्या भेटीतच घेतला. सर स्वभावानं भावुक नाहीत. हा निर्णय भावनेच्या भरात तर निश्चितच नाही घेतला. मग इतक्या झटपट, केवळ दुसऱ्या भेटीतच हा निर्णय झाला, हे कसं? साहेबांभोवती जमलेली माणसं पाहिली, की हा प्रश्न नेहमी पडतो कां? कसं? आज इतकी वर्षं सरांनी स्वत:ला संघटनेसाठी वाहून घेतलेलं आहे अगदी शब्दश: राहणं, बोलणं सारं सारं संघटनेसाठी. तिन्ही त्रिकाळ-बारा महिने. मुक्कामच मुळी संघटना कार्यालयात आंबेठाणला. ज्या अरविंद वामनांच्या बरोबर सर संघटनेत आले ते अरविंद वामन आज घरी बसलेले पण सर आजही संघटनेत आणि क्रियाशीलही.

संघटनेसाठी चोवीस तास स्वत:ला वाहून घेणारी दोन माणसं आहेत. एक स्वत: शरद जोशी आणि दुसरे सर. संघटनेचं मूळ तत्त्वज्ञानच साहेबांच्या डोक्यातून आलेलं. आणि आजही काही आंदोलन करायचं झालं तर आम्ही सारे बैठकीत म्हणतो, ''साहेब, या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आपणच काही तरी प्रभावशाली आंदोलन सुचवावं.'' म्हणजेच साहेब संघटनेचे मेंदू, तर सर हृदय आहेत. हृदय हा शब्द भावनिक अर्थानं वापरला नाही. शरीरातील रक्त खेळतं ठेवण्याचं काम करणारा अवयव या अर्थानं हा शब्द योजला आहे. आंबेठाणच्या मुख्यालयातून सर शेतकरी संघटना आणि आंतरराज्य समन्वय समितीचा सारा कारभार पाहतात. भारताला पूर्वी नेहमी प्रश्न पडलेला असायचा, नेहरूनंतर कोण? पण इंदिराजींनी तो प्रश्न सोडवला आणि आता तर गांधी/ नेहरू घराण्यानं आरक्षण करून ठेवलं असल्यामुळे हल्ली हल्ली तो प्रश्न संपून गेला; पण संघटनेला मात्र हा खरंच प्रश्न पडलाय. सरांनंतर कोण. स्वत: सरांनाही हा प्रश्न पडलेला असावा. कदाचित आपण आपल्याला पर्याय शोधू नाही शकलो, याची खंतही त्यांना

वाटत असेल. दोन एक वर्षापूर्वी रामटेकला धान परिषद झाली तेव्हा सरांनी मला अचानकविचारलं, "उमरीकर तुमच्या व्यवसायाला निवृत्ती नसते का?" सरांनी अचानक हा प्रश्न कां विचारला मला कळेचना. खरं सांगायचं म्हणजे आमचा व्यवसाय असा आहे, की त्याला फक्त आरंभ असतो. शेवट होणार तो चारचौघांच्या खांद्यावरच. आम्ही तर असं ऐकलंय, की एका वकिलाची अंत्ययात्रा चालली होती. त्याच्यावरून कुणीतरी पैसे उधळून टाकीत होतं. पैशांचा आवाज ऐकला, की तो ताडकन् उठून बसला. घरी जाऊन एक दावा लिहून नंतरच तो तिरडीवर झोपला. मी सरांना हा चुटका सांगणार नव्हतो म्हणा. सर जरा गंभीर मुडमध्येच होते. मी म्हणालो, "नाही, आम्हाला निवृत्ती नसते. पण का?" यावर सर म्हणाले, "नाही, पण तुम्ही आता निवृत्ती घ्यायला पाहिजे. तुमची मुलं मार्गी लागली आहेत. त्यांचे संसार मार्गी लागले आहेत." यावर मी म्हणालो,

"नाही, पण मी दोनतीन वर्षांनी निवृत्त होणार आहे. मला संघटनेचा इतिहास आणि साहेबांचं चरित्र लिहायचं आहे; पण हा विषय तुम्ही का छेडलात?"

"मला असं वाटतं. तुम्ही आणि वहिनींनी आंबेठाणला यावं आणि हे सारं सांभाळावं! मी किती काळ सांभाळणार?"

आमचं बोलणं तिथेच खुंटलं. तोपावेतो धान परिषदेच्या मंचावर आम्ही पोचलो होतो आणि सरांना तिथला माईक वगैरे लावायचा होता; पण मी नंतर गंभीरपणाने विचार केला. खरंच सरांसारखं राहून आपण हा डोलारा सांभाळू शकू का? आतापर्यंतचं आयुष्य सुखासीनतेत गेलेलं, त्यागाची सवय नाही, आपल्याला हे शिवधनुष्य पेलेल का? आपला रावण होईल. सरांची गोष्ट वेगळी आहे. त्यांनी आपल्या आयुष्यालाच असं वळण दिलं, की कमीत कमी गरजा भागवू शकणाऱ्या खर्चातच भागवायचं. पारंपरिक भाषेत सांगायचं म्हणजे सर चंदनाचं लाकूड आहेत. स्वतः झिजून संघटनेला सुवास द्यायचा. आयुष्यभर अविवाहित राहून अशी सेवा करणं सरच जाणो. आपण नाही. सरांशी तुलना नाही हेच खरं.

सरांचं राहणं तुम्ही पाहिलंत? आपल्या गरजा त्यांनी इतक्या कमी केल्या आहेत, की त्यांच्याकडे पाहिलं, की पुराणकाळातले ऋषीमुनी केवळ हवा, पाणी, कंदमुळे खाऊन जगायचे हे अगदी खरं असलं पाहिजे असं वाटतं. त्यांचे कपडे अगदी साधे, घरधुलाईचे, बीन इस्त्रीचे. भणंग माणसासारखं राहतात यासाठी, की संघटनेवर आपला बोजा पडायला नको. एखाद्या वैराग्यासारखं राहणं सरच जाणो. हां एक शौक त्यांना जरूर आहे मिश्रीचा!

सर म्हणजे संघटनेच्या बातम्यांचा खजिना. एकेक आठवण अशी जपून ठेवली



आहे. गप्पांच्या मुडात ते येतात की नाही माहीत नाही. पण मी त्यांची मुलाखत घेतली या परिचयासाठी तेव्हा त्यांनी एकेक आठवण स्मृतीच्या पोतड्यातून काढली, "मी आणि अरविंद वामन १५ ऑगस्ट १९८१ या दिवशी साहेबांना आंबेठाणला भेटण्यासाठी गेलो होतो. आमची एकत्र अशी ही दुसरी भेट. तेव्हा साहेबांनी स्वतः आपल्या हातांनी डाळभात शिजवून खाऊ घातला आम्हाला." त्यांनी ही आठवण अशी सांगितली जणू त्या डाळभाताचा वास आणखी त्यांच्या बोटांना येतोय. सरांना तारखा कशा काय आठवतात कुणास ठाऊक? आम्हाला आपली जन्मतारीख सांगतानासुद्धा क्षणभर विचार करावा लागतो. नाही तरी जन्मतारखेचा घोळ आहेच. "तिच्या लग्नात मी नऊ महिन्यांची होते बघ." तिला विचारलं "तुझं लग्न केव्हा झालं ग?" ती सांगते, "अरे, आई तुझ्यावेळी नऊ महिन्यांची होती ना, तेव्हा झालं बघ." आता ठरवा जन्मतारीख अन् आठवा.

"वीस नऊ एक्याऐंशीला पिंपळगाव बसवंतला एक मोठा मेळावा होता..." सर सांगू लागले. आता एवढी पक्की तारीख सांगताहेत म्हणजे ते सरच असणार. "या मेळाव्यात शरद जोशींनी सटाणा अधिवेशनाची घोषणा केली." सरांची एक खासियत आहे. ते साहेबांना शरद जोशी असंच म्हणणार. आम्ही भले 'साहेब साहेब' करोत. या सटाणा अधिवेशनासाठी शरद जोशींनी एक घोषणा तयार केली. शक्ती, युक्ती, भक्ती आणि एका वर्षात मुक्ती! हे घोषवाक्य त्यांनी जाहीर केलं आणि विनय हर्डीकर म्हणाला, "साहेब, पेपरवाले हेड लाईन टाकण्यासाठी इतके सारे 'क्त' आणणार तरी कुठून !" विनय आणि सर पुण्याला पदव्युत्तर शिक्षणासाठी एकाच कॉलेजात होते. तसे हे दोघे जुने दोस्त; पण या दोस्तीचा वास्ता सरांनी कधी दिला नाही. ही नातीगोती, ही मैत्री, जवळीक सारं सारं त्यांनी दोन हात दूर ठेवलेलं. सरांच्या या पैलूचं मला नेहमी आश्चर्य वाटत आलेलं आहे. साहेबांवर, सॉरी शरद जोशींवर जिवापाड प्रेम करणाऱ्या सरांना दुसरा सानी नाही हे जेवढं खरं, तेवढंच हेही खरं, की साहेबांपासून त्यांनी ठरावीक अंतर ठेवलेलं आहे. सरांच्या वागण्यात जाणवतं, की त्यांनी एक लक्ष्मणरेषा आखून घेतली आहे. दस फार अॅण्ड नो फरदर!

संघटनेची बैठक चालली असली म्हणजे मंचाच्या जवळ टेपरेकॉर्डर घेऊन सर बसलेले असतात. भाषण द्यायला कुणी उभं राहिलं म्हणजे लाऊडस्पीकर खाली वर करून देतील. जे जमेल ते काम स्वतः करणार. दुसऱ्या कुणाला काम सांगतांना कुणी त्यांना पाहिलं नसेल. परवाच्या दोन मेच्या बैठकीत साहेबांसाठी ठेवलेल्या तांब्यातलं पाणी संपलं. त्यांची गोळी, औषधं घेण्याची वेळ बहुधा झालेली असावी.

ाणी संपलेलं. बैठक चालू. लाऊडस्पीकर आणि टेप रेकॉर्डरकडे त्याच वेळी लक्ष देणं जरुरी. कुणाला काम सांगावे आणि स्वता: तर बाहेर जाणं त्या क्षणी जमेना. त्यांची ही घालमेल जवळ बसलेल्या गुणवंत पाटलांच्या लक्षात आली. त्यांनी एका कार्यकर्त्याला पाणी आणायला सांगितलं. ते पाणी आलं, प्याला भरून त्यांनी साहेबांना दिलं, तेव्हा त्यांचा जीव भांड्यात पडला. ''वीस नऊ एक्याऐंशीच्या पिंपळगाव बसवंतच्या मेळाव्यातील आणखी एक आठवण.'' परत तारीख. सरांच्या बोलण्यात तारखा पटापट उड्या मारतात. मला वाटतं- यापुढे सरांना सुरेशचंद्र म्हात्रे सर असं न म्हणता, 'तारीखचंद्र म्हात्रे सर' असंच म्हणायला पाहिजे. ''ऊन भयानक पडलेलं. सभेतील लोक सारखे चुळबूळ करीत होते. सावलीसाठी इकडेतिकडे धावपळ करीत होते. परत साऱ्यांनाच शरद जोशी यांच्या भाषणाची उत्सुकता होतीच. लोकांची ही उत्सुकता बघून माधवराव खंडेराव उखडले. त्यांनी फुल्या फुल्यांच्या भाषेत लोकांची जी हजेरी घेतली, त्यामुळे चुळबूळ शांत झाली आणि मगच सभा पार पडली. योगायोगानं त्यानंतर पाऊस पडला आणि वातावरणही शांत झालं. या सभेत सटाणा अधिवेशनाची घोषणा झाली.''

'शेतकरी संघटक' हे संघटनेचं मुखपत्र. त्याची जबाबदारी सरांवर पडली होतीच. त्याचबरोबर संघटनेच्या वतीने प्रसिद्ध होऊ घातलेल्या प्रकाशनांची जबाबदारीही त्यांच्यावरच पडत गेली. 'नमाज पढने गये और मस्जिद गले पड गयी' असं त्यांना झालं. या प्रकाशनांबाबत ते सांगू लागले, ''अंबाजोगाईच्या शिबिरात कॅसेटवरून मी 'शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती' हे पुस्तक लिहायला घेतलं. पहिलं प्रकरण मी तयार केलं आणि शरद जोशींना वाचायला दिलं. तेव्हा ते थट्टेनं म्हणाले, ''पाठीवर पोतं भरून घ्या आणि गल्लोगल्ली फिरून पुस्तकं विका!'' हे ~~मात्र खरं; पण अंशत:च ! मला तर असं- वाटतं साहेबांना आणखी कुणी पुरते~~ ओळखलेलं नाही. त्यातल्या त्यात ओळखीच्या बरंच जवळ जाऊ शकणारे दोघेच. एक सर आणि दुसरे विनय हर्डीकर. आणि यालाही कारण एकच. दोघेही लिप्तता आणि अलिप्तता यांतील लक्ष्मणरेषा जाणतात. दोघांत त्रयस्थाची एक दृष्टी आहे. भावनिकतेचा पलीकडची. बाकी आम्ही मंडळी म्हणजे हात जोडणारी आणि माना डोलावणारी. निदान तेवढं तरी, आम्ही साहेब काय चीज आहे हे ओळखतो. याउलट साहेबांना बिलकूलच न ओळखणारं कुणी असेल तर ते म्हणजे सरकार. त्यांनी जर खरंच साहेबांना ओळखलं असतं तर संघटनेला आजही आपल्या मागण्यांसाठी आंदोलनं करावी लागली नसती. त्याला काय इलाज, 'कहती है बुढिया सुनता है कौन !'



दहा अकरा ब्याऐंशीला संघटनेच्या तीन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा झाला पुण्याला. सर्वश्री वि. म. दांडेकर, प्रल्हाद पाटील कऱ्हाड, माधव खंडेराव मोरे आणि शरद जोशी यांच्या उपस्थितीत. ही पुस्तके म्हणजे, 'शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती' संकलन-म्हात्रे सर; दुसरं पुस्तक वर्धा शिबिरातल्या शरद जोशी यांच्या भाषणांच्या दोन कॅसेटवरून सुरेश घाटे यांनी संकलित केलेलं- 'भारतीय शेतीची पराधीनता' हे आणि तिसरं पुस्तक म्हणजे, 'प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश' संकलक : म्हात्रे सर. याच सभेतील भाषणांवर आधारित एक पुस्तक 'खंडन मंडन' हे पुढे प्रकाशित करण्यात आलं.

सरांच्या जमेला दोन ठळक नोंदी आहेत. एक आंबेठाणचं कार्यालय आणि दुसरं संघटनेचं प्रकाशन. त्यांनी ही कामं इतक्या प्रामाणिकपणे आणि नियमित केली आहेत की म्हणावंस वाटतं, 'जब तक संघटना आबाद रहेगी, तुम्हारा नाम रोशन रहेगा !' शेतकरी संघटक या पाक्षिकाच्या प्रकाशनाच्या सहा आणि वीस तारखा सहसा टळत नाहीत आणि काही कारणाने हे अंक यायला उशीर झाला तर वाचकांत चर्चा सुरू होते. मध्ये काही काळ, 'ग्यानबा' या साप्ताहिकाचा प्रयोग झाला. काही काळ ते चांगलं चाललंही आणि मग अनेक मराठी नियतकालिकांचं जे होतं, तेच 'ग्यानबा'चं झालं. मोठमोठ्या नाट्य संस्था, मोठमोठ्या भागीदारी संस्था, अर्थात मराठी माणसांच्या, यांचं जे झालं तेच 'ग्यानबा'चं झालं आणि हे जहाज वादाच्या खडकावर आपटून फुटलं! पण 'शेतकरी संघटक'मात्र नियमितपणे चालू आहे, आजपर्यंत. याचं श्रेय अर्थातच सरांना. घेतलेल्या कामात त्यांना टंगळमंगळ अजिबात चालत नाही. या परिचयासाठी मला सरांची आणखी एक मुलाखत हवी होती, ''सर, मी तीसला आंबेठाणला तुमच्या भेटीसाठी येतो आहे.'' ''नको मी पुण्याला कामात आहे.'' ''मग मी एकला येतो.'' ''नको. दोनला पुण्याला बैठकीची तयारी आहे. त्यासाठी एकला मी कामात असेन. दोनला तर अजिबात वेळ नाही.'' ''मग तीन चालेल?'' ''तीनला संघटकची छपाई व तयारी. त्यानंतर चार व पाचला वाटप आणि शरद जोशींच्या अमेरिका वारीची तयारी. सहानंतर मी मोकळा आहे !'' सहापासून माझ्या अडचणी. माझा हा परिचय छापून पुस्तकंही तयार होईल; पण सरांची दुसरी भेट होणं नाही. 'संघटक'च्या प्रत्येक अंकातील शरद जोशी यांचा लेख हे तर प्रमुख आकर्षण आहेच, पण संघटक नियमित निघतो म्हणून तर साहेबांचा संदेश लोकापर्यंत पोंचतो. सरांचं हे 'कबूतर जा जा' नियमित आहे यालाच खरं श्रेय.

''संघटक'ची कल्पना कशी आली?'' मी विचारलं. ''८ ऑगस्ट ८२ ला

पुण्यात एक बैठक झाली. संघटनेची. '' सरांनी परत तारीख फेकली. धन्य आहे बुवा या बुवाची ! ''या बैठकीतच संघटनेच्या वतीने एक नियतकालिक असावं असं ठरलं. पूर्वी वारकरी या नावानं साप्ताहिकाचा एक प्रयोग झाला होता, पण आता 'संघटक' या नावावर शिक्कामोर्तब झालं. त्याही वेळेस ही जबाबदारी माझ्यावर येणार याची मला कल्पना नव्हती. कुणी तरी माझं नाव सुचवलं आणि ते मान्य झालं. 'शेतकरी संघटक' हे नाव बाबूलाल परेदशी यांच्या नावे रजिष्टर झालं. एप्रिल ८३ ला 'शेतकरी संघटक' चा पहिला अंक प्रकाशित झाला'' आणि आतापावेतो संघटक नियमित प्रकाशित होतो आहे. याचे मानकरी अर्थातच सर!

''शेतकरी संघटक'ची कल्पना नेमकी याच वेळी यावी यालाही एक पार्श्वभूमी आहे. जून ८२ ला पहिलं दूध आंदोलन पुकारण्यात आलं. या आंदोलनाच्या काळात आता भारतभर प्रसिद्ध झालेला शेतकरी संघटनेचा बिल्ला प्रसिद्ध करण्यात आला. त्याचा आकार, रंग, त्यावरील ठळक अक्षरे यांतून रसिकता तर दिसतेच; पण बिल्ला भिंतीवर वा इतर कुठेही रंगवण्यासाठी किती सोयीचा झालेला आहे हेही लक्षात येतं. बिल्ल्यावर एखादी आकृती असती तर ती आकृती रंगवताना किती त्रास झाला असता हे लक्षात घेण्यासारखं आहे. लहान मुलांना तर लाल रंगामुळे या बिल्ल्याचं विशेष आकर्षण वाटतं. शेतकरी संघटनेचे बहुतेक कार्यकर्ते हे 'बालबुद्धि' समजायचे की काय? हे दूध आंदोलन पार फसलं. याला कारण दूध सोसायट्यांचा असहकार आणि सरकारी धोरण. बहुतेक साऱ्या दुध सोसायट्या या काँग्रेसच्या ताब्यात तर दूध पुरवठा यंत्रणा शासनाच्या, म्हणजे परत काँग्रेसच्या ताब्यात. हे आंदोलन यशस्वी होण्यासाठी शहरांचा दूध पुरवठा बंद होणं आवश्यक होतं. हा पुरवठा बंद करणं म्हणजे शहराच नाक बंद करण्यासारखं. त्याचं नाक बंद झालं, की मग आयतंच सरकारचं तोंड म्हणजे 'खिसा' मोकळा झाला असता; पण असं व्हायचं नव्हतं. काँग्रेसच्या ताब्यातील सर्व दूध सोसायट्यांचा हत्यार म्हणून वापर केला सरकारनं आणि दूध पुरवठा चालू ठेवला. राहता राहिले खेड्यातले लोक. त्यांना काय, दूध असलं काय आणि नसलं काय? फारसा फरक पडत नाही आणि म्हणून हे आंदोलन फसलं. या साऱ्या बाबींचा विचार करण्यासाठी आणि कामाची आणि कामाची पुढील दिशा ठरवण्यासाठी ८२ च्या ऑगस्ट महिन्यात एक बैठक बोलावण्यात आली. त्या बैठकीत या साऱ्या बाबींचा विचार झाला. त्याच बैठकीत प्रचारासाठी आणि अधिकृत संदेश कार्यकर्त्यांना पोंचवता यावा म्हणून एक पाक्षिक काढावं असा निर्णय झाला. त्या बैठकीचं पिलू म्हणजे हे पाक्षिक, 'शेतकरी संघटक'.



मुलाखतीच्या ओघात एक दु:खी आठवण सांगितली सरांनी. 'तीस/ एकतीस ऑक्टोबर १९८२ ला वर्ध्याला आंतर राज्य समन्वय समितीची एक बैठक आयोजित केलेली होती. याच सुमारास शरद जोशी यांनी आमरण उपोषणाची घोषणा केलेली. त्यांनी या उपोषणाला बसू नये यायाठी शरद जोशींवर बरीच दडपणे आली; पण शरद जोशी काही ऐकायला तयार होईनात. त्याच वेळी लीलाताई कुठे तरी गेलेल्या; पण त्यांचा पत्ता काही लागेना. जवळपास चौकशी केली, इकडेतिकडे फोन लावले; पण त्यांचा पत्ता नाही. शरद जोशींना विलक्षण काळजी लागलेली. घरातून त्यांचा पाय ओढेना आणि नेमकं याच वेळेस वर्ध्याला आंतर राज्य किसान समन्वय समितीची महत्वपूर्ण बैठक होती आणि या बैठकीला प्रांतोप्रांताचे प्रतिनिधी येणार होते. तेव्हा तिथेही शरद जोशींची उपस्थिती आवश्यक. इकडे आड आणि तिकडे केसीसी म्हणजे किसान को-ऑर्डीनेशन कमिटीची बैठक. शेवटी निर्णय झाला तो आधी लगीन कोंडाण्याचं या परंपरेतला. साहेब वर्ध्याला पोंचले तो नाशिकहून भलं मोठं प्रतिनिधी मंडळ आलेलं, त्यांना उपोषणाच्या निर्णयापासून परावृत्त करायला; पण शरद जोशींचा निर्णय पक्का झालेला. प्रत्यक्ष देवच खाली आला तरच काय की! देव खाली आला, पण वाईट बातमी घेऊन. केसीसीची बैठक चालू झाली आणि ती वाईट बातमी आली. बातमी होती लीलाताईंच्या आत्महत्येची. घराच्या गच्चीवरच त्यांचा देह सापडला होता. सर्वत्र चौकशी चालली होती तेव्हा कुणाच्या डोक्यात ही कल्पनाही नसेल, की लीलाताईंचा देह गच्चीवरच असेल. आता प्रश्न पडला, शरद जोशींना ही बातमी सांगायची कुणी. शेवटी प्रल्हाद पाटलांनी शरद जोशींना कळवलं, की फोनवर निरोप आला आहे लीलाताईंची तब्येत गंभीर आहे आणि त्वरित पुण्याला जाणं जरुरी आहे. मग स्वत: प्रल्हाद पाटलांनी गाडी चालवत शरद जोशींना पुण्याला नेलं. तीथं बातमी कळली. आतापावेतो आवरून धरलेला बांध फुटला आणि शरद जोशी ढसढसा रडले.''

सर एकेक प्रसंग सांगत होते आणि मी तर ऐकण्यात गुंगून गेलो होतो. टिपणं करायचंही विसरलो. सरांची कथा म्हणजे संघटनेची कथा, असीम त्यागाची कथा. मला पूर्ण खात्री आहे, हे असं लिहिलेलं त्यांना आवडणार नाही. ते तर असंच महणणार, ''मी कुणासाठी काही केलं असं नाही. मी केलं ते मला आनंद देणारं, म्हणून केलं. त्यात कसला त्याग?''

■ ■

# आमदार वामनराव

मुंबईचं विधानभवन म्हणजे महाराष्ट्राचं हृदय. ते तर नेहमीच गजबजलेलं. अधिवेशनाच्या काळात तर विचारायची सोय नाही. येणाऱ्याजाणाऱ्यांची प्रचंड वर्दळ. कधी कधी वाटतं अख्खा महाराष्ट्र 'चालतो विधानभवनाची वाट!' एकाच वेळी इतक्या मोठ्या प्रमाणावर इतके व्ही. आय. पी. एकत्र पाहताना ऊर दडपून कसा जात नसेल? आज तर विशेष गडबड.

विधानभवनातील कौन्सिल हॉल आमदारांनी खच्च भरलेला. आज त्यांच्या वार्षिक परीक्षेचा निकाल लागणार होता. आमदारांची ही परीक्षा तशी लेखी नसते. हां काही हद्दी पावेतो 'तोंडी' जरूर असते. तोंडी म्हणजे प्रत्यक्षात नसते; पण वर्षभरात काय आणि कसा 'तोंडाळपणा' केला याचा लेखाजोखा असतो. त्यामुळे या परीक्षार्थी विद्यार्थ्यांवर दडपण कसलंच नसतं; पण वर्षभराच्या कामगिरीचं हे मूल्यमापन असतं, त्यामुळे एक उत्सुकता जरूर असते.

तसा निकाल होता १९९६-९७ या वर्षातील कामगिरीचा; पण जाहीर व्हायला उजाडला होता २१ एप्रिल १९९८ चा दिवस. वार्षिक परीक्षेचा निकाल पाहायला विद्यार्थी गर्दी करतात तशी गर्दी केली होती याही 'विद्यार्थ्यांनी'! विधानसभा आणि विधान परिषदेचे सर्व सदस्य उपस्थित होते. आमदार विद्यार्थी नेहमीच नटून थटून असतात तसेच याही वेळेस होते. कडक इस्त्री केलेले खादीचे शुभ्र कपडे, फरफर आवाज करणारे. एखादा गणवेश असावा तसा सर्वांनीच पांढरा गणवेश परिधान केलेला. सर्वांनी नव्हे, पण बहुतेकांनी. त्यांच्या जोडीला राष्ट्रकुल सांसदीय मंडळाचे आजीमाजी सदस्यही या विशेष बैठकीला आवर्जून हजर होते.

काही वेळाने कौन्सिल हॉलच्या मंचावर एकेक पदाधिकारी यायला लागले. आधी आले दिलीप वळसे पाटील. त्यामागोमाग रोहिदास पाटील. लगेच आले दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेते-मधुकर पिचड आणि छगन भुजबळ. एव्हाना विधानसभेचे उप-सभापती आणि विधान परिषदेचे उपाध्यक्ष आगेमागे येवून स्थानापन्न झाले होते. आता येण्याचा क्रम होता मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि उप-मुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांचा. सर्वांत शेवटी आले विधानसभा अध्यक्ष दत्ताजी नलावडे आणि सह-अध्यक्ष जयंतराव टिळक. त्यांनी आपापली आसनं ग्रहण



केली आणि आजच्या कार्यवाहीला सुरवात झाली. उपस्थितांची ही यादी म्हणजे महाराष्ट्रातील 'हुज हु'ची यादीच! आजच्या या सभेत या सन्माननीयांच्या उपस्थितीत पुरस्कार प्राप्त करणाऱ्या दोघांची नावं जाहीर करण्यात येणार होती. एक पुरस्कार होता ९६-९७ सालच्या सर्वोत्कृष्ट भाषणाबद्दलचा 'सर्वोत्कृष्ट वक्ता' पुरस्कार आणि दुसरा होता सर्वांगीण कामगिरी उत्कृष्टरीत्या बजावणाऱ्या आमदाराला देण्यात येणारा 'सर्वोत्कृष्ट अमदार' पुरस्कार.

ठरल्या वेळी हे पुरस्कार जाहीर करण्यासाठी उभे राहिले उपसभापती वसंतराव डावखरे. ते कुणाचं नाव जाहीर करणार यासाठी सारे आमदार आपापल्या खुर्च्यांवर पुढे झुकून बसले. हाच प्रसंग बॉलीवूड किंवा हॉलीवूडच्या पुरस्कार वितरणाचा असता तर एखादी उदयोन्मुख तारका झगमगत्या; पण तोकड्या कपड्यांत मंचावर अवतरली असती. अंगाला वळणदार हेलकावे देत, साऱ्या प्रेक्षकांचं लक्ष आपल्याकडं खेचून घेण्यासाठी क्षणभराचा पॉज घेत म्हणाली असती, "हां. तो हाजरीन दिल थाम के रखियेगा. इंतेजार की वो घडियां अब खत्म हुई..." वसंतराव खाकरले. हातात कागद घेतला आणि-बहुतेक आमदारांना आपण यांतले नाहीत याची खात्री होती. त्यांच्या समोर त्यांच्या कामगिरीचा चित्रपट होताच, शिवाय या प्रसंगी शिफारशींनी काम होणार नाही हेही साऱ्यांना माहीत होतं. त्यामुळे ते निश्चिंत होते. पण काही अभ्यासू आमदारांना उत्सुकता होती. वसंतरावांनी कागद हातात घेतला आणि शक्य तितक्या गंभीर आवाजात नाव जाहीर करायला सुरवात केली. त्यांनी आधी नाव जाहीर केलं ते उत्कृष्ट भाषणाबद्दल आणि ते नाव होतं अरुण गुजराथी यांचं. ते मंचाकडे गेले आणि मनोहर जोशी यांच्या हस्ते पुरस्काराचा स्वीकार केला. टाळ्यांचा कडकडाट आणि ते परत आपल्या जागेवर येऊन बसले. जवळपासच्या मित्रांनी त्यांचं अभिनंदन केलं. क्षणभर गडबड-गोंधळ. नंतर शांतता. वसंतरावांना दुसरं नाव जाहीर करायचं होतं, ते होतं वर्षभरात केलेल्या संसदीय कामगिरीबद्दल, 'सर्वोत्कृष्ट संसदपटूचं'. वसंतरावांनी वाचायला सुरवात केली, "या वर्षीच्या उत्कृष्ट संसदपटू पदाचे मानकरी ठरले आहेत, स्वतंत्र भारत पक्षाचे आमदार वामनराव चटप! लोकशाहीतील सर्वांत मोठ्या बक्षिसाचे ते मानकरी ठरल्याचे मी समितीच्या वतीने जाहीर करतो." टाळ्यांच्या कडकडाटात आणि मेज थपथपवण्याच्या आवाजात वामनराव जागेवर उठून उभे राहिले. आस्ते कदम चालत मंचाकडे गेले. मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या हस्ते त्यांनी पुरस्कार स्वीकारला. मंचावरील उपस्थितांना आणि संयुक्त सभागृहाला अभिवादन करून ते आपल्या जागेवर टाळ्यांच्या कडकडाटात परतले. त्यांच्या सहकाऱ्यांनी आणि

मित्रांनी त्यांचं अभिनंदन केलं आणि या अभिनंदनाच्या गोंधळात हा कार्यक्रम संपला; पण संपला नाही अभिनंदनाचा वर्षाव. "तो क्षण माझ्या आयुष्यातला सर्वाधिक आनंदाचा क्षण." असं त्यांनी नंतर या क्षणाचं वर्णन केलं आणि त्यांनी असं वर्णन करण हेही साहजिकच आहे. सव्वाशे- दीडशे आमदारांचा ताफा बाळगणाऱ्या पक्षोपक्षांच्या आमदारांपैकी कुणाचीही निवड न होता सर्वोत्कृष्ट संसदपटू म्हणून केवळ दोन आमदार असलेल्या पक्षाच्या वामनरावांची निवड व्हावी आणि तीही लोकशाहीतील सर्वात मानाच्या पुरस्कारासाठी ही निश्चितच अभिमानास्पद गोष्ट आहे. वामनरावांसाठी आणि त्याहीपेक्षा शेतकरी संघटनेच्या लाखो कार्यकर्त्यांसाठी.

या पुरस्कारांसाठी निवड करण्याची प्रक्रियाही मोठी किचकट आहे. त्यात लॉबिंग करण्यासाठी फारसा वाव नाही. या पुरस्काराची निवड करणारी समिती अशी असते, की तिथे एकाच पक्षाच्या माणसांची भरती होऊ शकत नाही. व्यापक पक्षाधार असल्यामुळे वेगवेगळ्या पक्षांच्या प्रतिनिधींची नेमणूक केली जाते. या समितीत असतात विधानसभेचे सभापती, विधान परिषदेचे अध्यक्ष, दोन्ही सभागृहांतील विरोधी पक्षनेते. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, संसदीय कामकाजमंत्री, आमदारातून निवडलेले राष्ट्रकुल संसदीय समिती सदस्य, समितीचे खजिनदार, सचिव आणि एक उपाध्यक्ष. या आमदार सदस्याशिवाय आणखी एक बिगर आमदार सदस्य असतो. तो म्हणजे विधानभवनातील दोनही गृहांच्या कामकाजाचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांपैकी एक. या वर्षीच्या समितीवर महाराष्ट्र टाईम्सचे श्री. प्रकाश अकोलकर यांची नियुक्ती केलेली होती. आमदाराची या पुरस्कारासाठी निवड करताना जे निकष लावले जातात ते असे- आमदाराची गृहातील उपस्थिती, दैनंदिन कामकाजातील सहभाग, निरनिराळ्या विधेयकांवरील चर्चेतील सहभाग, प्रश्नोत्तराच्या तासातील कामकाजातील सहभाग व एकूणच संसदीय कार्यपद्धतीचा वापर करण्यात दाखवलेली चतुराई इत्यादी. एवढ्या साऱ्या दिव्यातून पार पडणाऱ्यालाच हा पुरस्कार दिला जातो. वामनरावांची आमदारकीची तशी ही दुसरी पाळी. १९९०-९५ या काळात शेतकरी संघटनेचे विधानसभेत पाच आमदार होते; मात्र १९९५-९९ या दुसऱ्या काळात स्वभापचे केवळ दोन आमदार होते. एक स्वत: वामनराव आणि दुसरे बागलाणचे दिलीप बोरसे. इतका छोटा पक्ष असलेल्या आमदारांना विधानसभेतील कामकाजात सहभागी होण्याची संधी फार कमी मिळते. इथे उपयोगी पडतं ते संसदीय कामकाजातील तरतुदींचा लाभ घेण्याचं कौशल्य आणि प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न उपस्थित करण्याचं कसब; पण मिळेल



त्या संधीच्या लाभ घेत वामनरावांनी आपल्या अस्तित्वाची दखल घेण्यास विधानसभेला भाग पाडलं आणि पुरस्कारप्राप्त वाटचाल करण्यात यश मिळवलं. यातून स्वतंत्र भारत पक्षाची एक शिस्तबद्ध आणि अभ्यासू पक्ष म्हणून प्रतिमाही तयार झाली.

वामनरावांच्या विधानसभेतील कामाची सुरवात झाली ती फेब्रुवारी ९० पासून. इथे लक्षात घ्यायला पाहिजे, की निवडणुकीचं एक तंत्र असतं. खरं तर तो एव्हाना पूर्णवेळ व्यवसाय झालेला आहे. पैसा तर पाण्यासारखा वाहू द्यावा लागतो . कार्यकर्ते सांभाळावे लागतात. त्यांच्या निवडणूककालीन 'गरजा' पूर्ण कराव्या लागतात. त्याही पेक्षा दोन निवडणुकांच्या दरम्यान गावोगावी 'मित्रमंडळं' स्थापन करून या मित्रांच्या भरण-पोषणाची व्यवस्था करावी लागते. पाठीशी मोठासा पक्ष असला तर इष्टच. पक्षातील मोठमोठ्या नेत्यांच्या सभांचा लाभ होण्याची शक्यता असते. शिवाय गावोगावी या पक्षांची पाळेमुळे रुजलेली असतात. त्यांना मतदानाच्या वेळी 'मतदान' कसे करून घ्यावे याचं ट्रेनिंग मिळालेलं असतं. या सर्वच बाबतीत शेतकरी संघटनेची पाटी अगदी करकरीत. हां, मात्र एका बाबतीत संघटना सुदैवी आहे. संघटनेकडे अननुभवी का असेना, पण नि:स्वार्थी, जिद्दी कार्यकर्त्यांची फौज तयार आहे. या साऱ्या प्रतिकूल परिस्थितीतही जनता दलाच्या तिकिटावर शेतकरी संघटनेचे पाच उमेदवार निवडून आले. व्हि. पी. सिंगांशी झालेल्या समझोत्याप्रमाणे जनता दलाच्या पाठिंब्यावर शेतकरी संघटनेने ५२ जागा लढवल्या होत्या. पैकी पाच जागा निवडून आल्या. यांतील चौघे विदर्भातून तर एक जण मराठवाड्यातून. विदर्भातून सौ. सरोजताई काशीकर, डॉ. वसंत बोंडे, मोरेश्वर टेंमूर्डे आणि वामनराव चटप व मराठवाड्यातील शिवराज तोंडचीरकर. त्यापुढच्या म्हणजे ९५ च्या निवडणूकीत केवळ दोघेच निवडुन आले. वामनराव चटप आणि दिलीप बोरसे. वामनरावांनी अशा प्रकारे ९० ते ९९ असा जवळजवळ पावणे दहा वर्षांचा काळ गाजवला. पैकी पहिल्या पाच वर्षांच्या काळात संघटनेच्या पांच जणांनी-खरं म्हणजे चौघा जणांनी असंच म्हणायला पाहिजे, कारण पांचापैकी एक श्री मोरेश्वर टेंमूर्डे हे विधान सभेचे उपसभापती होते आणि सभापती, उपसभापती हे 'पक्षातीत' समजल्या जातात. तेव्हा संघटनेच्या या चौघांनी संघटनेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. या टीमचे वामनराव हे अनधिकृत नेते. धडाडी वृत्ती, अभ्यासू आणि चिकित्सक स्वभाव या गुणांमुळे संघटनेच्या गटाचं नेतृत्व आपोआप यांच्याकडे आलेलं.

शेतकरी महिला आघाडीने आपल्या प्रचारात दोन मागण्यांवर विशेष भर दिलेला.

एक म्हणजे दारूबंदी आणि दुसरी मागणी लक्ष्मीमुक्तीची. दारूबंदीच्या प्रश्नावर शासनाचा एक असली आणि एक नकली चेहरा आहे. नकली चेहऱ्याच्या शासनानं दारूबंदीच्या धोरण म्हणून स्वीकार केलेला आहे. मात्र असली चेहऱ्याच्या शासनानं मुक्तहस्ते दारूविक्रीचे परवाने वाटले आहेत. यासाठी समर्थन हे, की विकास योजना राबविण्यासाठी पैसा उपलब्ध होणं आवश्यक आहे आणि दारू परवान्यातून प्रचंड प्रमाणावर पैसा उपलब्ध होतो. पैसा हाच निकष लावायचा असेल तर वेश्या व्यवसायावर कर लावावा, मटका वैध करावा. त्या द्वारेही अमाप पैसा मिळू शकेल. नाही तरी महसूल अधिकारी आणि पोलिस या धंदेवाल्यांकडून 'कर' वसूल करतातच की, तोच पैसा सरकारी तिजोरीत जमा होईल. नकली चेहऱ्यानं दारूबंदीचा प्रसार करण्यासाठी यंत्रणा उभी केली आहे तर असली चेहऱ्याकडून परवान्यासाठी खंडणीसारखा पैसा वसूल केला जातो आणि या खंडणीत कोण कोण वाटेकरू आहेत हे तर उपरवालाच जाणे! अशी आहे धोरणात दारूबंदी आणि प्रत्यक्षात दारूमोकळी!

दारूच्या व्यसनाने ग्रामीण महाराष्ट्राची किती धूळधाण उडाली आहे याची जाणीव जेवढी महिलांना तेवढी इतरांना नाही. या व्यसनाचा चटका जेवढा ग्रामीण महिलांना बसतो तेवढा इतरांना नाही. दारूच्या प्रश्नावर कितीतरी कथा, कादंबऱ्या, नाटकांची निर्मिती झाली आहे. या प्रश्नावरचं 'एकच प्याला' हे नाटक तर अजरामर झालेलं आहे. याच प्रश्नावरचा देवदास हा चित्रपट तर गाजलाच आहे; पण त्याच्या तीन आवृत्याही निघाल्या आहेत. या प्रश्नावर केवळ महाराष्ट्रच नव्हे तर सारा भारत ढवळून निघाला आहे आणि नेमकं या प्रश्नावर शासनाची अळीमिळी गुपचिळी! अशा प्रश्नावर साहजिकच ग्रामीण महिलांच्या भावना अधिक तीव्र. शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीने दारूच्या विरोधात तर आंदोलन जाहीर केलेलं. या आंदोलनाद्वारे दारुच्या दुकानांवर मोर्चे नेणे. निदर्शने करणे असे कार्यक्रम हाती घेतले आहेत. एवढंच नव्हे तर प्रसंगी दारूच्या बाटल्यासुद्धा फोडण्याचे कार्यक्रम केलेले आहेत. अशा या ज्वलंत प्रश्नावर संघटनेचे आमदार आवाज उठवणार नाही तर कोण ? या आमदारांनी वेळोवेळी आवाज उठवून विधानसभेत हा प्रश्न लावून धरला आणि शासनाला यासंदर्भात पाच जीआर काढण्यास भाग पाडले. हे एकेक जीआर पाहिले म्हणजे लक्षात येतं, या आमदारांना कशी इंचा इंचासाठी लढाई करावी लागली असेल. प्रत्येक वेळेस काही उणीव ठेवली जाई, ज्यासाठी परत चर्चा, परत कामकाज बंद, परत दुसरा ठराव. ज्या ठरावांसाठी ही इंच इंच लढाई झाली ते जीआर हे असे.



पहिल्या जीआरनं ठरवलं, की ज्या गावातील सर्व महिला मंडळे एकमताने दारूबंदीची मागणी करतील त्या गावच्या दारूदुकानाचे परवाने रद्द केल्या जातील. आता त्या गावातील सर्व महिला मंडळे म्हणजे कोणती? नोंदलेली, न नोंदलेली. शिवाय सर्वांची एकमुखी मागणी कशी व्हावी? म्हणजे एक हाताने जी आर दाखवला, आणि दुसऱ्या हाताने काढून घेतला. परत आमदारांचा लढा. परत मागणी. मग दुसरा जीआर. आता त्यांनी हे अधिकार ग्रामपंचायत आणि ग्रामसभेला दिले. त्यांनी एकमुखी मागणी केल्यास देशी दारूचे परवाने रद्द केले जातील. यातली ग्यानबाची मेख अशी, की ग्रामपंचायत आणि आमसभेत बहुमत पुरुषांचं आणि पुरुष मंडळी दारूच्या प्रश्नावर एकमत झालेच तर सारे मिळून पिण्याचा ठराव पास करतील. त्याही पलीकडे ग्रामसभेनं ठराव केला तर ग्रामपंचायत ठराव करेलच याची शाश्वती काय? किंवा या उलटही घडलं तरीही दारूबंदी कठिण. परत नवीन मागणी, नवीन आंदोलन, नवीन जीआर. याच्यावर तोडगा काढला की ग्रामंसभा आणि ग्रामपंचायत यांच्यात एकमत न झाल्यास केवळ ग्रामसभेच्या ठरावानेही परवाना रद्द करता येईल असा तिसरा जीआर काढण्यात आला; पण हा अधिकार पुरुषांच्या हातून काढून महिलांच्या हाती येणं आवश्यक होतं. या प्रश्नावर खरी आग्रही भूमिका त्यांची होती. शोषणही महिलांचंच होतं ना. शेवटी शासन नमलं आणि चौथा जीआर काढण्यात आला. या जीआर प्रमाणे गावातील महिला मतदारांपैकी ५०% महिलांनी मागणी केल्यास परवाना रद्द करण्यात येईल. असं ठरवण्यात आलं. याच जीआरनं हा अधिकार शहरी महिलांनासुद्धा दिला. यात अशी तरतूद करण्यात आली, की नगरपालिका वा महापालिकेच्या ज्या वॉर्डातील महिला मतदारांपैकी ५०% महिला मतदार मागणी करतील, त्या वॉर्डातील दारू दुकान परवाना रद्द केला जाईल. हा अधिकार तसा शक्तिहीन. एका वॉर्डातील परवाना रद्द झाला म्हणजे दारू पिण्याची सोय संपली असं होतं की काय? बाजूच्या वॉर्डात सोय असतेच ना. तरीही एक हत्यार महिलांच्या हातात आलं, हेही नसे थोडके. याच मालिकेतला पाचवा जीआर निघाला. त्या जीआर ने असं नमूद केलं, की ज्या गावातील ५०% मतदार हजर असलेल्या बैठकीत बहुमताने ठराव पास केला जाईल त्या गावातील दारू दुकान परवाना रद्द केला जाईल. दारुबंदीच्या संदर्भात संघटना आमदारांची कामगिरी ही अशी लखलखीत आहे. हे जीआर काढतांना या आमदारांना किती विरोधाला तोंड द्यावं लागलं असेल याची कल्पनाच केलेली बरी. दारू परवानाधारकांची लॉबी किती मजबूत आहे हे ज्यांना माहीत, त्यांनाच हे कळू शकेल. या लॉबीकडे

आर्थिक बळ आणि माणूसबळ दोन्हीही, शिवाय नोकरशाही आणि राजकीय पाठबळही त्यांचेसोबत. एकानंतर एक काढावे लागलेले जीआर या बाबती खूप काही सांगून जातात; पण या साऱ्या छुप्या विरोधकांना पुरून उरले संघटना आमदार. सुदैवाने या प्रयत्नात त्यांना सत्तारूढ पक्ष आणि विरोधी पक्षांच्या काही आमदारांनी पूर्ण पाठिंबा दिला. दुर्दैवानं या तरतुदी करून घेण्यात यश आलेलं असूनही त्यांचा लाभ घेण्यात लोक कमी पडले. दारूवाल्या लॉबीने नोकरशाही हाताशी धरून लोकांचा ठिकठिकाणी विरोध मोडून काढला, वैध वा अवैध मार्गांनी इतके जीआर निघालेले असूनही ज्या प्रमाणात दारूदुकाने बंद व्हावयास पाहिजे होती, त्या प्रमाणात दुकाने बंद झालेली नाहीत ही वस्तुस्थिती काय दर्शविते?

महाराष्ट्रात येण्यापूर्वी विदर्भ पूर्वीच्या मध्य भारतात होता. या मध्यभारतातील प्रथे प्रमाणे विदर्भातील सुमारे १२७ गावांत जमीन कसवटीबाबत भूमिधारी पद्धत अस्तित्वात होती. या पद्धती प्रमाणे जमिनी कसण्याचा हक्क परंपरेने, वारसा पद्धतीने पिढ्यान् पिढ्या चालत आलेला; पण या भूमिधारकांना मालकी हक्क मात्र मिळत नव्हता. काही कामासाठी शासनाला या जमिनीची संपादणी करावी लागली तर या भूमिधारकाला मालकाप्रमाणे पैसे मागण्याचा हक्क नव्हता. फक्त जमीन धारणेचा हक्क होता.जमिनीची खरेदीविक्री करण्याचा हक्क नव्हता पुढे महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. विदर्भातील ही १२७ गावे महाराष्ट्रात सामील झाली. मात्र भूमिधारी पद्धती या गावात कायम राहिली. महाराष्ट्रात अशा तऱ्हेने मालकीच्या हक्काबाबत तफावत राहिलीच. ही तफावत वामनरावांच्या लक्षात आली आणि या प्रश्नाला त्यांनी हात घातला. त्यांनी या विषयाचा नीट अभ्यास केला आणि विधानसभेच्या पटलावर हा प्रश्न मांडला. यासाठी महाराष्ट्राला जमीन महसूल कायद्यात दुरुस्ती करावी लागली; मात्र या प्रयत्नामुळे १२७ गावचे भूमिधारक हे भूमिस्वामी बनले. या १२७ गावांत आणि उर्वरित महाराष्ट्रातील याबाबतची तफावत संपली. इतक्या संख्येनं असलेल्या गावांचा हा प्रश्न सोडवला याबाबत तर वामनराव अभिनंदनीय आहेतच; पण चंद्रपूरसारख्या मागास भागातील प्रश्नाकडे एवढ्या गांभीर्याने आणि घात अपघाताशिवाय हा प्रश्न सोडवला जावा याबद्दलही त्यांचं अभिनंदन केलं पाहिजे. सामान्यत: होतं काय, की चंद्रपूरसारख्या मागास आणि त्यातही आदिवासी विभागातील प्रश्नाकडे फारसं लक्ष दिलंच जात नाही; मग कधी भूकबळी पडावेत, कधी कुपोषण व्हावं, कधी कुणा सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रसिद्धी माध्यमांकडे धाव घ्यावी; मग कुठे त्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधलं जातं. असला काही प्रकार या वेळी न होताही हा प्रश्न सोडवण्यात वामनरावांनी यश मिळवलं हे विशेष.



आमदारकी भिनली आहे वामनरावांच्या अंगात. लोकांचे प्रश्न सोडवणे, विकासकामे करून घेणे आणि लोकांच्या हक्कासाठी सजग असणे या अर्थाने त्यांच्या अंगात आमदारकी भिनली आहे. भिरभिरत्या नजरेनं ते प्रश्नांचा वेध घेणार आणि एकदा का हा माणूस प्रश्न सोडवण्यात अग्रेसर आहे हे लोकांना कळलं तर लोकही आपापले प्रश्न त्यांच्यापुढे घेऊन येतात आणि मग ही साखळीच बनत जाते. केव्हातरी कामाच्या ओघात त्याचं लक्ष या गोष्टीकडे वेधलं गेलं, की महाराष्ट्रातील सुमारे १७६ तालुक्यांतून प्राथमिक स्वास्थ्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालये ही एकाच ठिकाणी आहेत. एकाच गावात या दोन्ही सुविधा असण्याऐवजी एकाच तालुक्यात दोन ठिकाणी असल्यास दोन गावांना आरोग्य सेवा उपलब्ध होऊ शकते आणि अशा तऱ्हेने योजना राबण्यात काही अडचण नाही हेही त्यांच्या लक्षात आलं. एकदा का एका गोष्टीचा ध्यास घेतला, की झपाटल्यागत काम करून तो प्रश्न हातावेगळा करायचा ही तर त्यांची खासियत. त्यांनी हा प्रस्ताव शासनापुढे मांडला आणि शासनानेही हा प्रस्ताव आनंदाने स्वीकारला. त्यामुळे ज्या तालुक्याच्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालय एके ठिकाणी असेल त्या ठिकाणी फक्त प्राथमिक केंद्र राहील व ग्रामीण रुग्णालय त्याच तालुक्यातील दुसऱ्या गावी हलवले जाईल. आता वाटतं, इतकी सोपी कल्पना याआधी कुणाला सुचली नाही हे कसं? त्याला जोडून त्यांनी आणखी एक प्रस्ताव पारित करून घेतला, की जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे त्या त्या जिल्ह्याच्या मुख्यालयाला डांबरी सडकेनं जोडली जातील.

महिलांना विशेषकरून छळणाऱ्या प्रश्नांची मालिका खूपच मोठी आहे. पैकी किमान कांही प्रश्नांना संघटना आमदारांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे वामनरावांनी हात घातला आणि हे प्रश्न शेवटाला नेले. असाच एक सातत्याने छळणारा प्रश्न म्हणजे पोटगीचा. कुठलाही आधार नसलेल्या महिलांना जेव्हा त्यांचा नवराही सांभाळायला तयार नसतो तेव्हा त्यांनी जायचं कुठ? त्यांचे आईबाप स्वत: परावलंबी असल्यामुळे आईबाप हे ओझं व्यवहारात: सांभाळू शकत नाहीत. नवरा सांभाळीत नाही आणि आईबाप सांभाळू शकत नाहीत. महिनोन् महिने कोर्टात झगडावं तेव्हा कुठे अल्पशी पोटगी मंजूर होते आणि मंजूर झालेली ही रक्कम प्रत्यक्षात पदरात पडण्यासाठी किती हेलपाटे कोर्टात घालावे लागतात हे तर त्या माऊलीलाच माहीत; त्यामुळे वामनरावांनी या प्रश्नाकडे लक्ष द्यायचं ठरवलं. वामनरावांनी स्वत: काही वर्षे वकीली केलेली. यशस्वी वकील म्हणून चांगलं नावही कमावलेलं. राजूरा वकील संघाचे सचिव म्हणून ते बिनविरोध निवडूनही

आलेले. वकिली क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव त्यांना वेळोवेळी कामी येतो, तोही विधानसभेत. तसे विधानसभेत वकिली करणारे अनेक जण आमदार राहिलेले आहेत; पण प्रत्यक्ष वकिलीच्या अनुभवाचा फायदा किती जणांनी उचलला आहे? वामनराव याला अपवाद. प्रत्यक्ष वकीली अनुभवातून क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या कलम १२५ मधील पोटगीच्या तरतुदी त्यांना चांगल्याच माहीत, त्यातील पळवाटा आणि त्यामुळे महिलांची होणारी फरपट हीही त्यांना चांगलीच परिचित. या तरतुदी अपूर्ण आहेत हा विश्वास त्यांना आला. तेव्हा त्यांनी या तरतुदीचा प्रश्न विधानसभेत लावून धरला. सामाजिक कायद्याच्या बाबती महाराष्ट्र नेहमीच उदार राहिला आहे. तेव्हा महाराष्ट्रातील आमदारांच्या पाठिंब्यावर त्यांच्या प्रयत्नामुळे क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या कलम १२५ मध्ये दुरुस्ती करण्यात आली, ज्यांची व्याप्ती महाराष्ट्रापुरतीच होती. ज्या तीन दुरुस्त्या झाल्या, त्यांतील पहिलीमुळे पोटगीची वरची मर्यादा वाढवण्यात आली. दुसऱ्या तरतुदीने एकरकमी पोटगीची सवलत मान्य केली गेली आणि तिसरी महत्त्वाची तरतूद म्हणजे कोर्टात प्रकरण चालू आहे, त्या काळापुरती म्हणजे अंतरिम पोटगीची तरतूदही करण्यात आली.

वामनरावांचं कार्यक्षेत्र केवळ विधानसभाच होतं असं नाही तर त्याबाहेरही मतदारसंघाशी जुळलेलं होतं. शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्षाशी जुळलेलं आहे. विकास कामात तर त्यांनी आघाडीच मिळवली, एवढंच नाही तर विक्रम प्रस्थापित केला. त्यांच्या ९/१० वर्षांच्या आमदारकीच्या काळात त्यांच्या मतदारसंघात थोडीथोडकी नाही तर चक्क १५७ कोटींची कामे करून घेतली. म्हणजे सरासरीने जवळजवळ १५ कोटींच्या वर कामे एक वर्षात ! रस्ते, पूल, इमारती, रस्त्यांचे डांबरीकरण, एक ना दोन. आमदारकीचा लाभ घेऊन, स्वत:चा आर्थिक विकास करून घेणारे आमदार तर पैशाला पासरी आहेत; पण वैयक्तिक लाभाची गणितं न मांडता विकासाची कामं करून घेणारे वामनराव चटप तर आजच्या काळात अपवादच!

वामनरावांच्या वकिली कौशल्याचा आणखी एक किस्सा म्हणजे जमीन एकत्रीकरण/ तुकडेबंदीच्या कायद्यातील तरतुदींचा लाभ त्यांच्या तालुक्याला मिळवून देण्याबाबतचा आहे. वामनरावांचा मतदारासंघ राजुरा हा पूर्वी नांदेड जिल्ह्यात होता. पुढे पुनर्रचनेमध्ये तो चंद्रपूर जिल्ह्याला जोडला गेला. तुकडेबंदी कायद्याखाली 'तुकडा' याची व्याख्या करताना मराठवाडा विभागासाठी ओलिताखालील जमिनीबाबत एक एकर आणि कोरडवाहू जमिनीबाबत तीन एकर असा उल्लेख होता. आणि विदर्भासाठी हेच प्रमाण ओलितासाठी एक एकर



तर कोरडवाहूसाठी दोन एकर. ओलिताखालील जमीनधारकांना चंद्रपूरमधे गेल्यामुळे काही फरक पडणार नव्हता; पण कोरडवाहूमध्ये एक एकरचा फरक होता. जमीन तीच, पण जिल्हाबदलामुळे होणाऱ्या या फटक्यामुळे शेतकऱ्यांचं नुकसान होत होतं. आणि हा फरक जवळ जवळ तीस वर्षांपासून होता. वामनरावांच्या डोक्यात चक्र फिरलं आणि त्यांनी ही बाब शासनाच्या लक्षात आणून दिली. केवळ लक्षात आणून देऊन ते थांबले नाहीत, तर त्यांनी हा दोष दूर करावयास शासनाला भाग पाडले आणि त्याप्रमाणे कायद्यात दुरुस्तीही करून घेतली. वामनराव आमदार होण्याआधी तीस वर्षे कुणी ना कुणी आमदार होतंच ना; पण हा दोष कुणाच्या लक्षात कसा नाही आला याचं आता आश्चर्य वाटतं. वामनराव हे मुळात वकिल तेव्हा वकिलीच्या काळात लक्षात आलेला दोष त्यांनी आमदारकीच्या पाहिल्या टर्ममध्येच काढून टाकला.

आपल्या संघटनेतील आमदारांच्या साहाय्याने त्यांनी बजावलेली कामगिरी लक्षणीय आहे. संघटनेतील कार्यकर्त्यांनी वेळोवेळी केलेल्या आंदोलनांबाबत त्यांच्यावर अनेक फौजदारी खटले भरले गेले. अशा खटल्यांपैकी ११११ खटले परत घेण्यास शासनास भाग पाडण्यात ते यशस्वी झाले आहेत. सध्या २८९ खटले प्रलंबित आहेत. दारूबंदीचे जे जीआर संघटना आमदारांच्या दबावाखाली शासनास करावे लागले त्यामुळे ४१ दुकाने बंद करणे भाग पडले, पैकी २८ दुकाने एकट्या चंद्रपूर जिल्ह्यातच आहेत.

काही माणसांचं मोठेपण त्यांच्या कपाळावर लिहिलेलं असतं. त्यांचं व्यक्तिमत्त्वच एवढं प्रभावी असतं, की त्यांना पाहताच त्यांचं मोठेपण लक्षात येतं. निसर्गत: मिळालेलं मोठेपण टिकवता आलं एवढच कौशल्य त्यांच्याकडे असलं तरी पुष्कळ झालं. काही माणसांचं मोठेपण त्यांच्या 'तोंडात' असतं. आपण किती मोठे आहोत हे ते आवर्जून सांगतात. तसं त्यांनी सांगीतलं तरच त्यांचं मोठेपण सिद्ध होऊ शकतं. यासाठी एक तर ते स्वत:हून आपल्याभोवती आरती ओवाळून घेतील किंवा चेल्याचपाट्यांची गर्दी हमेशा स्वत:भोवती ठेवून त्यांच्यामार्फत वदवतील आणि काही माणसं खरच मोठी असतात पण आपल्या मोठेपणाची पताका ते फडकवीत नाहीत. मोठेपणाची कामं ते करतील आणि दरिया में टाकतील. कधी तरी नंतर ओघाओघात आपल्याला कळते त्यांची मोठेपणाची करतूत, मग आपल्याला वाटतं, अरेच्चा हे कसं काय? आपण तर एवढं जवळ होतो त्यांच्या आणि हे आपल्याला कसं काय कळलं नाही? मानलं बुवा ! वामनराव हे या अशा वर्गात मोडतात. माझा त्यांचा परिचय थेट १९८४

सालापासून. संघटनेच्या अनेक बैठकांतून, मेळाव्यांतून अधिवेशनांतून भेटी झालेल्या. ते दोन टर्म आमदार होते हेही मला माहीत होतं; पण आमदारकीच्या काळात त्यांनी बजावलेल्या त्या महनीय कामाचा त्यांनी चुकूनही कधी उल्लेख केला नाही. माझ्याकडेच केला नाही असं नाही, तर संघटनेच्या बैठकीतसुद्धा भाषणाच्या ओघात कधी उल्लेख नाही केला. या परिचयासाठी त्यांची मुलाखत घेऊ लागलो तेव्हा कुठं हा सारा पट उलगडला. दीर्घ काळ त्यांच्या संपर्कात राहूनही या साऱ्या गोष्टींकडे आपलं लक्ष कसं गेलं नाही याची चुटपूट आजही मला वाटते.

निवडणुकांत त्यांनी मिळवलेलं यश हे काही त्यांनी 'दे रे हरी बाजेवरी' असं मिळवलेलं नाही. त्यासाठी त्यांनी अविरत कष्ट केले आहेत. निवडणुका खेळणाऱ्यांना सतत निवडणुकांत राहावं लागतं. खेळाडूंना जसा सतत सराव करावा लागतो तसं. खरं सांगायचं तर निवडणुका तुमच्या अंगातच असाव्या लागतात. त्यासाठी सतत धडपडत रहावं लागतं. या दृष्टीने वामनराव आणि निवडणुका हे 'मेड फॉर इच अदर' आहेत! स्वतंत्र भारत पक्षाच्या राजकीय निर्णय समितीचे ते प्रमुख आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात आणि विशेषत: त्यांचा मतदारसंघ असलेल्या राजुरा तालुक्यात त्यांनी स्वभापची चांगलीच बांधणी केलेली आहे. गेल्या काही वर्षामध्ये राजुरा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या निवडणुका स्वभापच्या वतीने वामनरावांनी लढवल्या आहेत. ग्रामपंचायतीचा मतदार हा पायाभूत मतदार आहे. तेव्हा हा पाया मजबूत करणे आवश्यक आहे हे ते चांगले ओळखून आहेत. एवढ्यावरच समाधान न मानता, त्यांनी सहकारी सेवा संस्था, आदिवासी विकास संस्था, तालुका देखरेख संघ, कृषी उत्पन्न बाजार समिती, नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती या साऱ्या निवडणुका लढवल्या. या निवडणुकांतून उल्लेखनीय यशही मिळवलं आहे. ग्रामपंचायतींपैकी जवळजवळ अर्ध्या लढवण्यासाठी स्वतंत्र, पक्षरहित आघाडी बनवली. या आघाडीचे अध्यक्ष स्वत: वामनराव झाले. १७ पैकी १६ सदस्य आघाडीचे आले आणि १७ वा सदस्यही आघाडीचाच; पण बंडखोर उमेदवार होता. अशा तऱ्हेने पूर्ण वर्चस्व प्रस्थापित केलं आहे. स्वत: मात्र निवडणुक लढवली नाही आणि सर्व उमेदवार हे कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंध नसलेले उभे केले हे वैशिष्ट्य. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर दोन संचालक व एक मानद सचिव स्वभापचा. राजुरा पंचायत समितीचे सभापती आणि उपसभापती या दोन्ही जागांवर स्वभापचेच उमेदवार! राजुरा मतदारसंघातील जिल्हा परिषदेच्या १३ जागांपैकी सात जागा स्वभापच्या. जिल्हा



परिषदेचे उपाध्यक्षपद आणि एक सभापतीपद स्वभापकडे. चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वांत मोठी ग्रामपंचायत आणि आता होऊ घातलेली औद्योगिक ग्रामपंचायत गटचांदूरचे सरपंचपद स्वभापकडे. आज परिस्थिती अशी आहे, की राजुराचे आजचे आमदार सुदर्शन यांना त्यांच्या मतदारसंघात बसायला जागा नाही. साऱ्या जागा स्वभापकडे. आजचे आमदार श्री. सुदर्शन यांचा जिल्हा परिषद निवडणुकीत स्वभापचे उमेदवार संजय धोटे यांनी पराभव केलेला आहे. निवडणुकीचं राजकारण खेळायचं झालं, तर कसं खेळायचं याचा एक आदर्श पाठ घालून दिला आहे वामनरावांनी स्वभापच्या होऊ घातलेल्या उमेदवारांना.

आमदारकीच्या काळातही वामनरावांनी संघटनेच्या कार्यक्रमांना, आंदोलनांना अग्रक्रम दिलेला होता. त्याही काळात त्यांनी सत्याग्रह केला, रास्ता रोको केलं. १९९३ मध्ये संघटनेनं एक नावीन्यपूर्ण आंदोलन पुकारलं. कापूस एकाधिकाराला संघटनेचा विरोध यासाठी, की संघटना ही खुल्या अर्थव्यवस्थेची पुरस्कर्ती. कमीत कमी शासन हे त्यांचं धोरण आणि व्यापार हे शासनाचं काम नाही ही धारणा. शिवाय कापूस एकाधिकाराच्या नावाखाली सर्वसामान्य शेतकऱ्यांची जी परवड झाली, ती पाहता ही योजना गुंडाळलेलीच बरी या निर्णयाला बहुतेक अर्थशास्त्री आलेले होते. तेव्हा या व्यवस्थेला असलेला आपला विरोध नोंदवण्यासाठी संघटनेनं तिच्या सर्व कार्यकर्त्यांना आवाहन केलं. एकाधिकार मोडून काढा आणि त्यासाठी कापूस खुलेपणाने खरेदी करा. या आवाहनाप्रमाणे वामनरावांनी २१ नोव्हेंबर ९३ रोजी वर्धा जिल्ह्यात सेवाग्राम या ठिकाणी खुले आम कापसाची खरेदी केली, म्हणून त्यांना अटक करण्यात आली. या अक्षम्य गुन्ह्याबद्दल त्यांना अटक करून २१ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या काळासाठी तुरुंगात डांबण्यात आलं. या वेळी त्यांच्या सोबत अटक करण्यात आलेले कार्यकर्ते होते विधानसभेचे उपाध्यक्ष श्री. मोरेश्वर टेंमुर्डे, आमदार बोंडे, आमदार सरोजताई काशीकर, राम नवले, रवी काशीकर, शैलाताई देशपांडे. साऱ्यांची रवानगी अमरावती तुरुंगात करण्यात आली होती आणि २ डिसेंबर पर्यंत एकत्रच ठेवण्यात आलं.

ज्या शेतकरी संघटनेमुळे वामनराव प्रकाशझोतात आले, त्या शेतकरी संघटनेत वामनराव आले कसे? संघटनेत आलेल्या अनेक जणांच्या भेटीगाठी मी घेतल्या आहेत. या साऱ्यांच्या संघटनाप्रवेशाचा एक पॅटर्न तयार झालेला आहे. भाऊ असोत, बापू असोत की नाना असोत. सरोजताई असोत किंवा सुमनताई, शैलाताई. वृत्तपत्रांतून शरद जोशींच्या आंदोलनासंबंधी कुठे तरी केव्हा तरी वाचलेलं, ऐकलेलं असतं. सामाजिक कार्याची एरवीच आवड असते. राजकारणातील घाणीमुळे

थोडीशी दुरी ठेवलेल्या या माणसांना सामाजिक कामाची आवड गप्प बसू देत नाही. कुठे तरी ही आवड उचल खाते, शरद जोशींची भेट होते आणि या लोकांची गाडी स्टार्ट होते. शरद जोशी म्हणजे मखनातीस, लोहचुंबक! त्यांच्याकडे आलेला माणूस त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने, विचार प्रणालीने, कामाच्या पद्धतीने भारावून जातो. आणि सुरवात होते एका लांब पल्ल्याच्या प्रवासाची. या प्रवासात शरद जोशी यांच्या स्पष्ट विचारसरणीमुळे आणि प्रश्न हाताळण्याच्या पद्धतीमुळे या संबंधाची वीण आधिकच घट्ट होत जाते. त्यांच्या प्रभावक्षेत्रात आलेला कार्यकर्ता सहसा संघटनेतून बाहेर जात नाही. क्वचित कुणी बाहेर पडला तरी वैचारिक नाळ तुटत नाही.

वामनरावांच्या बाबतीतही अगदी हेच आणि असंच घडत गेलं. ८० सालात शरद जोशींची आंदोलने, त्यांची वक्तव्ये पेपरातून वामनरावांच्या वाचनात आली. कुठेतरी या विचारांचं आकर्षण निर्माण झालं. वृत्तपत्रांतून कृषी अर्थशास्त्राची मांडणी आगळीवेगळी, प्रभावी वाटली. नोव्हेंबर ८० मध्ये संघटनेनं कापूस आंदोलन पुकारलं. त्याआधीच्या ऊस आणि कांदा आंदोलनाबद्दल बरचंसं वाचण्यात आलं होतं. मुळात खुमखुमी होतीच. तशात कापूस आंदोलन पुकारलं गेलं. मराठवाडा आणि विदर्भातील कापूस हे एक प्रमुख पीक. पश्चिम महाराष्ट्रासाठी जसं ऊस आणि कांदा ! तसा विदर्भ- मराठवाड्यासाठी ज्वारी अन् कापूस. त्यामुळे विदर्भ मराठवाड्याने या आंदोलनाला चांगला प्रतिसाद दिला. राजुऱ्याला झालेल्या रास्ता रोको आंदोलनात वामनराव सहभागी होते. तेव्हापासून ते संघटनेत राहीले ते थेट आतापावेतो. या पहिल्या आंदोलनाआधी मात्र त्यांची शरद जोशींची भेट झालेली नव्हती. विदर्भातील आंदोलनाचं मुख्य ठाणे वर्धा होतं. या वर्ध्याला वारंवार बैठका व्हायला लागल्या. काही बैठकांना शरद जोशी हजर राहायला लागले. या साऱ्या बैठकांना वामनराव हजर राहत. साहजिकच शरद जोशी यांच्याशी त्यांचा वैयक्तिक संबंध येत राहिला. परभणीत ८४ मध्ये झालेल्या महाअधिवेशनात ते सहभागी झालेले होते. त्याच वर्षी मार्चमध्ये पंजाबच्या राजभवनाला झालेल्या घेरावात महाराष्ट्रातील शेकडो कार्यकर्त्यांसह वामनरावही सहभागी झाले होते. त्याच वर्षी ऑक्टोबरात बारडोली ते टेहरे या महाराष्ट्र प्रचारयात्रेत त्यांचा सहभाग होता. ही प्रचारयात्रा १६ ऑक्टोबरला मुक्कामाला चंद्रपूरला होती. तेव्हा मुक्कामाची सारी जबाबदारी वामनरावांनी सांभाळली. दुसरे दिवशी म्हणजे १७ ऑक्टोबरला वरोरा येथे प्रचंड सभा झाली, तिची व्यवस्थाही वामनरावांकडेच होती. १७ च्या रात्री हिंगणघाटला मुक्काम आणि १८ ला किसान कपास संमेलन. या संमेलनासाठी ट्रका भरभरून माणसं वामनरावांच्या नेतृत्वाखाली



या संमेलनासाठी हजर झाली.

१९८६ मध्ये झालेल्या कापूस आंदोलनाला महाराष्ट्रातून अपूर्व प्रतिसाद मिळाला या आंदोलनात साठ हजारांवर सत्याग्रहींना अटक करण्यात आली. महाराष्ट्रातील तुरुंगही एवढ्या सत्याग्रहींना ठेवण्यास अपुरे ठरले, त्यामुळे अनेक ठिकाणी खुल्या जागांनाच तुरुंग समजून सत्याग्रहींना अटकेत ठेवावं लागलं. या रेकॉर्डब्रेक आंदोलनात वामनरावांनाही अटक झाली. ६ ते १२ डिसेंबर १९८६ या काळात नागपूरच्या तुरुंगात त्यांना ठेवण्यात आलं. याच वेळी शरद जोशीही त्याच तुरुंगात अटकेत होते. सोबत मोठ्या प्रमाणावर सत्याग्रही त्या कैदेत होते. या संधीचा लाभ घेऊन शरद जोशींनी तुरुंगात सत्यग्रहींचं प्रशिक्षण शिबिर भरवलं. तुरुंगातील मुक्कामाचा इतका चांगला उपयोग दुसऱ्या कामासाठी कसा होऊ शकेल? या वेळी जीवनलाल चांडक, राम नेवले हेही याच तुरुंगात होते. सत्यग्रहींचं प्रशिक्षणाचं हे सुख शासनाला बघवलं नाही आणि दोनच दिवसांनी शरद जोशींना रासुकाखाली अटक करण्यात आली आणि त्याच तुरुंगात त्यांना एकट्याला वेगळं ठेवण्यात आलं, एकांतवासाची शिक्षा! एकट्याला ठेवणं म्हणजे मानसिक छळ, आणि मानसिक छळ करणं हाही उद्देश होताच. जवळजवळ महिनाभर त्यांना या तुरुंगात असंच एकांतवासात ठेवलेलं. एखाद्याचा छळ करायचा असेल तर किती करावा याला काही सीमा नाहीत. आपल्याच लोकांच्या न्याय्य हक्कासाठी लढणाऱ्या आंदोलकांना शत्रू समजून वागणूक द्यायची ही रीत कधी बदलणार कोण जाणे!

कापसाचा प्रश्न असा सहजासहजी सुटणार नव्हता. तो सुटावा अशी शासनाला इच्छाच नव्हती. पुढच्याच वर्षी १४ फेब्रुवारी १९८७ ला मुंबईला मुख्यमंत्र्याच्या बंगल्याला घेराओ आणि ठिय्या आंदोलनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या आंदोलनासाठी वामनरावांच्या नेतृत्वाखाली प्रचंड ताफा निघाला. १२ तारखेला या साऱ्यांना स्टेशनवर उतरवण्यात आलं. १३ तारखेला बडनेरा स्टेशनवर १७५ महिला आणि ७०० पुरुषांना अटक करण्यात आली. त्यात वामनरावही होतेच. अटकेतून सुटका होताच वामनराव ठिय्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी १७ ला मुंबईला रुजू झाले.

त्यांच्या कामगिरीचा आलेख अशा तऱ्हेने वरवर चढत राहिला. संघटनेत टप्प्याटप्प्यांनी ते प्रगती करीत राहिले. त्यांची लोकप्रियता वाढतच गेली; मात्र या काळात त्यांनी आपल्या तालुका व जिल्ह्याचे दोर कायम ठेवले. त्यांच्या क्षमतेची दखल घेत त्यांना २१ जून १९९८ ते मार्च २००० या काळासाठी शेतकरी संघटनेचं अध्यक्ष करण्यात आलं. या पदासाठी ते लायक तर होते; पण उत्सुक नव्हते.

प्रत्यक्षात त्यांचा विरोध होता आणि तो सकारण होता. अध्यक्षीय काळात महाराष्ट्रभर करावे लागणारे दौरे आणि इतर कामाचा व्याप पाहता त्यांच्या मतदारसंघाकडे त्यांचं दुर्लक्ष होईल, ही भीती त्यांना वाटत होती आणि झालंही तसंच. १९९९ च्या निवडणुकीत त्यांना याची किंमत मोजावी लागली. या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला याला हेच एकमेव कारण नव्हत; पण ते एक कारण होतं. ''गेल्या तीन निवडणुकांत प्रत्येकवेळी वेगवेगळं चिन्ह गेलं. निवडणूक चिन्हाबाबत मतदारांची ओळख झालेली असते. तेव्हा एकच चिन्ह असणं फायदेशीर असतं. दुर्दैवानं शेतकरी संघटना/ स्वभापला पक्ष म्हणून निवडणूक आयोगाची मान्यता नसल्यामुळे एक चिन्ह मिळू शकलं नाही; पण त्याची किंमत स्वभापला मोजावी लागली.'' ही त्यांची प्रतिक्रिया.

त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळात झालेल्या दोन कार्यक्रमचा उल्लेख केल्याशिवाय हा आलेख पूर्ण होणार नाही. त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळातच महाराष्ट्रात गाजलेलं 'Q' आंदोलन किंवा 'भ्रष्टाचार , नोकरशाही चलेजाव' हे आंदोलन व्यापक प्रमाणावर पार पडलं. आजही अनेक ठिकाणी या आंदोलनाच्या घोषणा लिहिलेल्या दिसतात. या घोषणा काळाच्या ओघात पुसट होतील; पण या आंदोलनाच्या आठवणी सतत ताज्या राहतील. या आंदोलनाद्वारे भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीला आणण्यात आली. भ्रष्टाचार हा सहजासहजी उखडला जाऊ शकणार नाही; पण त्यांची सुरवात तर केली पाहिजे ना. त्यांच्याच काळात अमरावतीची जनसंसद पार पडली. जनसंसदेची कल्पनाच मुळी अफाट. लोकशाहीतील खासदारांची संसद शेतकऱ्यांचे प्रश्न सोडण्यात अपयशी झाल्यामुळे स्वातंत्र्याची तहान लागलेल्या सर्वसामान्य माणसांची, पक्षांची, संघटनांची ही जनसंसद होती. लक्षावधी लोकांच्या हजेरीत या संसदेचं सूप वाजलं, एक अजरामर दस्तऐवज तयार करून!

विनम्र स्वभावाच्या वामनरावांना चांगल्या भाषणशैलीची देणगी आहे. भावनेला हात न घालता ते विचारांना आवाहन करतात. एखाद्या विषयाची नीट मांडणी करण्याची हातोटी त्यांच्याकडे आहे. स्मरणशक्ती तर विलक्षण आहे. तारखा, आकडेवारी अगदी जिभेवर. वामनराव बोलायला उभे राहिले म्हणजे काहीतरी चांगलं ऐकायला मिळणार याची खात्री असते. अगदी वरच्या पट्टीत बोलायची त्यांची शैली आहे. दीर्घ भाषण करण्याची त्यांची तयारी पाहून त्यांना लंबी रेस का घोडा म्हणावसं वाटतं. समोर ऐकणाऱ्या माणसांची संख्या थोडी असली तरी निराश न होता, विचार मांडायचा त्यांचा स्वभाव आहे. सभा, बैठका आयोजित



करणाऱ्या लोकांची नेहमी पाठ थोपटण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे ते जातील, तिथे त्यांचं स्वागतच होतं. यशानं हुरळून जायचं नाही आणि अपशानं खचून जायचं नाही हा त्यांचा स्वभाव. म्हणून तर ९९ च्या निवडणुकीतील पराभवानं खचून न जाता, दुप्पट जोराने त्यांनी काम चालवलं आहे. पुढील यशाची भक्कम पायाभरणी करून ठेवली आहे.

■ ■

# बापू

तुम्ही जुने मराठी ग्रामीण चित्रपट पाहिलेत का? म्हणजे चित्रपट रंगीत होण्याआधीच्या काळातले. तसं पाहिलं तर त्याही काळात चित्रपट रंगीत असोत किंवा नसोत; पण चित्रपट कलावंत बरेच रंगीत होते. चित्रपटातही रंगेलपणा होताच; पण चित्रपट आणखी रंगीत व्हायचे होते, त्या काळातलं म्हणतोय मी. तेव्हाचे मराठी ग्रामीण चित्रपटातले कलाकार कसे पहिलवानी थाटाचे मर्द मावळे असायचे, आतासारखे चिकने चोपडे नसायचे. त्यांचा थाट कसा असायचा-डोईवर कोल्हापुरी फेटा, भरदार मिशा, पहिलवानी बांधा अन् चेहऱ्यावर गावरान गोडवा. चंद्रकांत, सूर्यकांत, नंतरच्या पिढीतला अरुण सरनाईक आणि त्याही आधी अव्वल पिढीतले मास्टर विठ्ठल आठवून पहा. या पिढीतल्या लोकांचा डोईवरचा फेटा काढून पांढरी टोपी ठेवा, ओठावरच्या मिशा काढून टाका अन् सिमेंट रोड करा, रंगात थोडाफार हेरफेर करा म्हणजे दिसेल चित्र बापूंचं.

बापूंना भेटणं तसं सोपं नाही. पार सात समुद्र ओलांडावे लागतात, मग एक मोठा डोंगर -म्हणजे असं बघा आधी रेल्वेनं मनमाडला जावं लागलं मला. मग रेल्वे स्टेशन ते गाडीतळ पदयात्रा. तिथे सटाण्याच्या गाडीची चौकशी केली. एव्हाना सायंकाळाचे चार वाजलेले होते. ''आता इथून सटाण्याला गाडी नाही. तुम्ही असं करा, आता बाहेरगावची एक बस येईल, तिने मालेगावला जा. तिथून तुम्हाला सटाण्याची बस मिळेल.'' मग आम्ही तसं केलं. मालेगावला पोचलो तो सायंकाळचे पाच वाजले होते. मालेगावच्या गाडीतळावरच्या सगळ्या फलाटांवरची नावं वाचली पण सटाणा नाव दिसेना. तेव्हा आम्ही एका खाकी ड्रेसकडे चौकशी केली. त्यांनी सांगितलं, ''तुम्हाला जुन्या स्टँडला जावं लागेल.'' हात् तिच्या, आम्हाला काय माहिती, इथे जुनं नवं असा प्रकार आहे म्हणून. ''का हो, हे जुनं गाडीतळ कुठे आहे?'' ''तुम्ही इथून नीट बाहेर पडा. उजव्या बाजूने शिवाजी पुतळ्याकडे जा. तिथून डाव्या हाताला वळा-'' तसं अंतर फार नव्हतंच. आम्ही शिवाजी महाराजांना वळसा घालून डावीकडे जरा चाललो, की गाडीतळाची लक्षणं अवतीभवती पसरलेली दिसली आम्हाला. तिथे सटाणा नावाच्या दोन पाट्या दिसल्या. आता आली का पंचाईत! कुठली पाटी आपली? आम्ही परत जाळीत बसलेल्या एका खाकीला विचारलं. त्यांनी सांगितलं, ''ती काय गाडी फलाटाला लागतीय तीच.'' आम्ही इतर पाचपन्नास माणसांमागे पळत पळत ती बस पकडली. बसायला जागा मिळाली. जागा तर मिळाली पण या बसने पाटी बदलली तर? आम्ही आपले 'खेडे के येडे' सारखं शेजारच्या मिशाळ गृहस्थाला विचारलं, ''ही गाडी सटाण्याला जाते का हो?'' त्यांनी माझ्याकडे कोण हा गावरानपणा अशा नजरेनं पाहिलं, की मला शक्य असतं तर खिडकीतून उडी मारून मी पळून गेलो असतो. पण माझ्या उजव्या हाताच्या खिडकीला होते आडवे गज आणि डाव्या हाताला खुद्द 'मिशा'. तेव्हा तो विचार रद्द केला. तरी बरं, अडाणी आहोत असं दिसू नये म्हणून चांगलं जीन्स आणि टी शर्ट घातला होता. आता बाह्य रूप कितीही बदललं तरी मुळातला 'अडाणी'पणा थोडच झाकणार होता. ते काहीही असो, त्या गाडीनं आम्हाला सटाण्याला सायंकाळी सहाच्या सुमारास पोचवले. चार जणांकडे चौकशी करून हे गाव सटाणाच आहे याची खात्री करून घेतली. बापूंनी स्टँडवरच्या 'उपकार' हॉटेलची खूण सांगितली होती. आम्हाला सारा परिसर पाहूनही 'उपकार' काही सापडेना. शेवटी बापूंनी दिलेल्या नंबरावर फोन केला तेव्हा घरच्यांनी सांगितलं, ''बापू सटाण्याला गेलेत.'' ''अहो, मी सटाण्याहूनच बोलतोय.'' इतक्यात समोरून बापूंना रस्ता ओलांडताना पाहिलं आणि फोन तसाच टाकून मी 'युरेका युरेका' असं ओरडत बाहेर पडलो, तो बापू अन् उपकार हॉटेल एकदाच सापडले. घ्या महाराज, जिसको ढूंढते फिरते थे गली गली वो तो समोरच मिली!

बापू! बापू म्हणजे रामचंद्र नारायण पाटील; पण संघटनेत बापू याच नावानं प्रसिद्ध. बापूंचा स्वभाव मिठास, जमेल तशी लोकांना मदत करणारा. पांढरीशुभ्र टोपी, पांढराच सदरा, शुभ्र धोतर, दुटांगी पद्धतीनं नेसलेलं. रंग गहिरा, चेहऱ्यात जवळीक निर्माण करणारं आकर्षण. मध्यम उंची. घरी असो, दारी असो, सभासंमेलनात असो किंवा सरकारदरबारी असो, बापूंची शुभ्रता कधी ढळली नाही. बापूंचा लोकसंग्रह दांडगा. मला घ्यायला बापू गाडीतळावर आले होते तेव्हा तिथल्या तिथे पाचसहा जणांनी त्यांना घेरलं. मग हे कोण, ते कोण ओळखीपाळखी झाल्या. सर्वांशी थोडंथोडं बोलत बापूंनी मोटरसायकलवर टांग मारली आणि त्यांच्या गावाकडे निघाले ते राम राम घेत, घेतच. म्हणजे बापू सटाण्याला नाही राहत तर, ''हो ना, इथून पाच कि.मी. अंतरावर मुळाणे हे आमचं गाव. तिथेच आमची शेती आहे, आम्ही तिथेच राहातो.'' मुळाणे? म्हणजे खाटका बिटकाच गाव आहे की काय? लहानपणी केंव्हातरी आम्ही ऐकलेलं होतं

की जगातला सर्वात मोठा कत्तलखाना अमेरिकेतल्या शिकागो इथे आहे म्हणून. पुढे आमची भाची नेमकी शिकागोला राहायला गेली तेव्हा आम्ही भाबडेपणानं विचारलं होतं तिला, ''काय गं, तुमच्या शिकागोला सारखा वास येतो का?''

रात्री बाराचे सुमारास मला गाडीतळावर बापू घेऊन आले, त्याही वेळेस मी नको नको म्हणत असताना गाडीत बसेपर्यंत ते थांबले. गाडीसुद्धा रात्री तब्बल पावणेदोन वाजता आली. तोपावेतो ते तळावर थांबले. तेवढ्या रात्रीसुद्धा अनेक लोक बापूंना रामराम घालुन बोलत होते. बापूंना जनसंपर्क नाहीतरी दांडगाच !

दहा एक मिनिटांत आम्ही बापूंच्या घरी पोचलो. अगदी हमरस्त्यालगत बापूंचं घर. जुन्या पद्धतीचं माळवद असलेलं. बापूंच्या व्यक्तिमत्वाप्रमाणे स्वच्छ, नीटनेटकं. आवरूनसावरुन. घरात नव्या-जुन्याचं सुरेख मिश्रण. डायनिंग टेबल आणि मस्त गावरान तूप, गाजर आणि मेथीची भाजी. पाय धुवायला बकिटात गरम पाणी अन् हात धुवायला बेसीन. दृष्टी वर आकाशाकडे असली तरी पाय घट्ट जमिनीत रोवलेले.

बापूंनी साठी केव्हाच ओलांडलीय; पण तारुण्याचा उत्साह आजही कायम आहे. त्यांच्या हालचालीत, बोलण्यात म्हातारपणाचा लवलेशही नाही. जसं काही 'सलामत रहे जवानी बुढापा तो कोसो दूर है !' चालणं-बोलणं-वागणं आजही उत्साहात. सळसळत्या तारुण्याचा उत्साह आजही कायम आहे. भाषण द्यायला उभे राहिले की पुढच्या पंजावर रेलून उभे राहतात, पुरजोश भाषण द्यावंसं वाटतं त्यांना. ते हुंकार वगैरे असतं ना तसं. काय बोलू अन् किती बोलू असं होतं त्यांना. शेतकरी संघटनेत अगदी सुरवातीच्या काळात येऊन आजही अग्रभागी असलेले जे मोजके कार्यकर्ते आहेत त्यात बापूंचा नंबर खूप वर लावावा लागेल.

नाशिक जिल्ह्यातल्या ग्रामीण भागात कुटुंबात जन्मलेले बापू सतत काही ना काही चळवळीत गुंतलेले. बेचाळीसच्या महान क्रांतीकारी पर्वात बापूंचा जन्म झालेला. त्या काळातील भारावून टाकणाऱ्या वातावरणाचा काही परिणाम बापूंवर झालेला असेल का? त्या काळात तर हजारो लोक जन्मले ना. पैकी किती लोकांनी कुठल्या ना कुठल्या चळवळीत झोकून दिलं? कुणास ठाऊक बापूंच्या चळवळ्या स्वभावाकडे पाहिलं, की वाटतं इतरांच काहीही असो; पण निदान बापूंवर तरी त्यांच्या जन्मकाळातील वातावरणाचा परिणाम झाला असावा.

नेतागिरी करणाऱ्यामध्ये आयाराम गयारामी वृत्ती मोठ्या प्रमाणावर आहे. कपडे बदलण्याइतके सहज पक्षांतर करणारेही लोक अनेक आहेत. त्याहीपेक्षा कमी हिंमत असलेले, इच्छा असूनही पक्ष बदलण्याचे धाडस करत नाहीत. पण पक्षांतर्गत



गट बदलण्याचं काम चोख करतात. शेतकरी संघटनेतही अशी काही माणसं निघालीच. ते लोक संघटनेत आले, काही काळ राहिले, पद उपभोगले आणि शेतकरी संघटनेतील जनाधाराची किंमत वसूल करून पक्षोपपक्षात गेले. अशा प्रकारे राजकीय, आर्थिक मतलबासाठी संघटनेचा शिडीसारखा उपयोग करून काम झालं, की ती शिडी फेकून देणारेही अनेक महाभाग निघालेच; पण ऐन तारुण्यात राजकीय पक्षात काही काळ राहून, चळवळी करून जनाधार मिळवून नंतर शेतकरी संघटनेत येऊन त्या जनाधाराचा लाभ संघटनेला मिळवून देणारे, एवढेच नव्हे तर नंतरही राजकीय लाभ खुणावत असतानाही त्याकडे पाठ फिरवून संघटनेतच ठाम उभे राहणारे बापू हे एकमेवाद्वितीय!

सत्ता, पैसा हे चालून येत असतानाही त्या कडेपाठ फिरवून, पदरात विस्तू घेण्याचं माणसाला सुचत कसं असेल? बापूंच्या रूपात या कोड्याचं उत्तर समोर दिसत असूनही हे कोडं कोडंच वाटत राहतं. एवढ्या बाबतीत बापू आणि शरद जोशी यांच्यात विलक्षण साम्य दिसतं. समजूनउमजून दिव्यावर झेपावणारी ही पतंगाची जातकुळी! का? या प्रश्नाला उत्तर नाही. असलंच तर एवढंच ''असं आहे खरं !''

बापूंच्या सार्वजनिक जीवनाची सुरूवात अगदी शालेय जीवनापासूनच झालेली. शाळेत असताना डाव्या चळवळीतील माधवराव गायकवाड, दत्ता देशमुख आदींच्या संपर्कात बापू आले ते एक स्वयंसेवक म्हणून. त्या वयात डावं, उजवं काय कळणारं म्हणा, पण काही तरी करण्याची उर्मी माणाला पुढे पुढे नेत असते. बापूही त्या काळात जमेल त्या चळवळीत स्वंयसेवक म्हणून सहभागी व्हायचे. हे वयही नेमकं संस्कारक्षम, भलं बुरं अजूनही न कळायचं वय, समोर दिसणाऱ्या निरनिराळ्या नेत्यांचं वागणं, बोलणं, रहाणं, त्यांची आपसातील गटबाजी आणि इतर पक्षीयांशी संघर्ष हे सारं बापूंच्या मनावर आपला ठसा उमटवून जात होतं. पुढे चालून राजकीय चळवळीपासून स्वतःला दूर ठेवण्यामागे कदाचित या संस्कारक्षम वयातील कळत नकळत झालेले परिणामही असतील. अठ्ठावन मध्ये बापू मॅट्रीक झाले. ग्रामीण शेतकरी कुटुंबातल्या युवकाला एवढं शिक्षण पुरे झालं की. तेव्हापासून बापूंनी शेतीचा अन् घरचा कारभार हाती घेतला तो आजपावेतो संसाराचा गाडा ओढताहेतच. ते घराचे फार संपन्न नसले तरी खाऊन पिऊन सुखी कुटुंबातले, त्यामुळे राजकीय, सामाजिक चळवळीत भाग घ्यायला वातावरण अनुकूल. एव्हाना बापूंत एक पोक्तपणा येत चालला होता. तशात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचं आव्हान समोर ठाकलं, बापूंच्या चळवळ्या स्वभावाला एक मैदान

सापडलं. आबासाहेब सोनुने यांच्या नेतृत्वाखाली बापूंनी स्वत:ला या चळवळीत झोकून दिलं. याही वेळेस बापू म्हणजे एक स्वयंसेवकच पण जराशी बढती मिळालेले स्वयसेवक.

निवडणुकीचा पहिला अनुभव बापूंनी घेतला तो चौसष्ट मध्ये. त्यावर्षी होणाऱ्या सुपरव्हायझिंग युनियनच्या निवडणुकीसाठी त्यांनी आपली उमेदवारी जाहीर केली. त्या काळी बागलाण, कळवण, सटाणा, साक्री, मालेगाव या भागात आबासाहेब सोनुने, पंडित धर्मा पाटील ही मंडळी वजनदार पुढारी म्हणून गणली जायचे. शाळा सुटल्यापासून आतापावेतो बापूंनी याच लोकांच्या हाताखाली काम केलेलं. तेव्हा या लोकांची साथ या निवडणूकीत आपल्याला राहील या भ्रमात बापू राहिले; पण राजकीय नेतागणांच्या बेभरवशी स्वभावाचा झटका त्यांना आणखी बसायचा होता. ऐन निवडणुकीच्या तोंडावर सोनुने, पंडित पाटील या भरवशाच्या म्हशींनी टोणगे दिले. बापूही डगमगले नाहीत. त्यांनीही जोर लावला. 'हिंमते मर्दा, तो मदद दे खुदा' यावेळेस खुदा धावून आला तो भिकन दयाजी पाटील यांच्या रूपाने. नेमका या वेळी शहरी विरुद्ध ग्रामीण असा वाद उभा ठाकला आणि बापूंनी ग्रामीणांच्या बाजूने हाबूक ठोकून आखाड्यात उडी मारली. एरवीच बापूंचा जनसंपर्क होताच. या निमित्ताने प्रचाराची रणघुमाळी उडवून दिली आणि बापूंनी प्रचंड बहुमताने फड जिंकला, शहरी उमेदवाराला मात दिली. या निवडणुकीत बापूंना खुप काही शिकायला मिळालं. या वेळी ते केवळ निवडून आले एवढंच नाही तर सुपरव्हायझिंग युनियनचे व्हाईस चेअरमनही झाले. या वेळी त्यांनी केलेल्या जनसंपर्काचा आणि कामाचा त्यांना एवढा फायदा झाला की त्यापुढील तीन निवडणूकांत ते ओळीने बिनविरोध निवडून आले. निवडणुकीच्या निमित्ताने त्यांची हळूहळू वाटचाल सुरू झाली; पण शेतकऱ्यांचा दृष्टीने निश्चित दिशा ठरलेली नव्हती.

१९६८-७० या काळात त्यांचं लक्ष रावळ गावच्या सारख कारखान्याकडे गेलं. हा कारखाना सर्वस्वी शेतकऱ्यांच्या मालकीचा व्हावा म्हणून बापुंनी मोठं आंदोलन उभं केलं. यासाठी त्यांनी सटाणा, कळवण, मालेगाव, साक्री हा सारा परिसर खऱ्या अर्थाने पिंजून काढला. त्यांच्या या प्रयत्नाला यश मिळालं नाही अन् कारखाना काही पदरात पडला नाही. पण एक मोठा लाभ झाला. जनसंपर्कातून लोकांचं एक विशाल जाळं तयार झालं. या जाळ्याच्या केंद्रभागी अर्थातच बापू होते. या दरम्यान सुपरव्हायझिंग युनियनचे ते चेअरमन म्हणून निवडले गेले. इतका पुढे पडलेला माणूस काँग्रेसच्या नजरेत पडणार नाही हे कसं. परिणामी बापू लवकरच



'काँग्रेसवासी' झाले. काही काळ त्यांनी काँग्रेसची सोबत केली. या काळात त्यांच्या हे लक्षात आलं, की राजकीय पक्षाच्या अपेक्षा आणि शेती व्यवसायाच्या गरजा मेळ खाऊ शकत नाहीत. राजकीय पक्षाला अस्तित्वासाठी अनेक पातळ्यांवर लढावं लागतं, अनेक प्रश्नांना तोंड द्यावं लागतं. परत या एकेका प्रश्नाला अनेक पदर असतात आणि हे पदर एकमेकांना छेद देतात. या प्रसंगी आमच्या भागातील शेकापची एक आठवण नमूद करण्यासारखी आहे. शेकापने साठीत एक मोर्चा काढून ज्वारीला भाव द्या अशी मागणी केली. नंतर त्यांच्या लक्षात आलं- शेकापमधल्या शेतकऱ्यांसाठी ही मागणी ठीक आहे. पण कामगारांचं काय? त्यांना तर ज्वारी स्वस्त हवी. तेव्हा त्यांनी रुपयाला पायली ज्वारी अशी मागणी केली. आता ज्वारीला भाव द्यावा तर कामगार नाराज आणि ज्वारी स्वस्त करावी तर शेतकरी नाराज. आणि मोर्चा काढलाच नाही तर कार्यकर्ते नाराज. आतापर्यंतच्या मोजक्याच राजकीय वाटचालीत बापूंच्या लक्षात हा विरोधाभास आला. तेव्हा शेतकऱ्यांच्या प्रश्नांना तोंड फोडण्यासाठी बापूंनी ७२-७३ चे सुमारास बागलाण तालुका शेतकरी संघटना स्थापन केली. प्रसंगी पक्षाची नाराजी ओढावून त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न हेरले. या संघटनेचे अध्यक्ष होते भिकन दयाजी पाटील.

काय योगायोग आहे पहा. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढे उभारण्यासाठी, राजकारणाबाहेर राहून असे प्रयत्न करण्यासाठी, एकाच सुमारास मराठवाड्यात श्रीरंगनाना मोरे यांनी, तर नाशिकात रामचंद्रबापू पाटलांनी प्रयत्न केले. शरद जोशी भारतीय पटलावर येण्याआधी हे दोनही प्रयत्न झाले. दोन्ही प्रयत्नांना उदंड प्रतिसाद मिळाला. चुकलं एवढच की या प्रयत्नांना काही तात्कालिक प्रश्नांची पार्श्वभूमी होती; पण निश्चित दिशा नव्हती. ही दिशा पुढे दिली शरद जोशींनी, शेतकरी संघटनेची स्थापना करून आणि शेतीच्या प्रश्नावर नवीन आर्थिक विचार देऊन. बापूंनी, नानांनी सुरू केलेले हे दोन्ही प्रवाह पुढे शरद जोशी यांच्या मुख्य प्रवाहात सामील झाले आणि पुढे याचा महासागर बनला.

तेलाला भलेही ज्वालाग्रही म्हणलेलं असेल; पण तेलानं घेतला नाही एवढा पेट पाण्यानं वेळोवेळी घेतलेला आहे. भविष्यात तर पाण्यामुळे राज्याराज्यांतच काय; पण राष्ट्राराष्ट्रांत रण माजतात की काय ही भीती वाटते. पाण्याच्या प्रश्नावरील शेतकऱ्यांच्या या अशा भावना जाणूनच की काय, बागलाण तालुका शेतकरी संघटनेच्या वतीने बापूंनी पाण्याच्या प्रश्नाला हात घातला. या वेळी केळझर आणि हरणबाळी धरणाचं पाणी बागलाण परिसराला मिळावं या मागणीसाठी ही संघटना पुढे आली. या सभेला प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि यानंतर बापूंनी मागे वळून

पाहिलं नाही. उदंड प्रतिसाद पाहूनतरी किमान राजकीय पक्षीयांच्या लक्षात यायला पाहिजे होतं, की शेतकऱ्यांत प्रचंड खदखद आहे. वातावरणात असंतोष आहे. या असंतोषाला योग्य वळण लावणं आवश्यक आहे. 'पण लक्षात कोण घेतो?'

एकोणीस ऑगस्ट एकोणीसशे ऐंशी या दिवशी एक प्रचंड मोर्चा काढायचा निर्णय सर्वपक्षीय बैठकीतून झाला. त्यासाठी बापूंनी अहोरात्र दौरे काढून, बैठक सभा घेऊन भरपूर प्रचार केला. त्यांच्या या प्रयत्नांना प्रतिसादही खूप मिळत गेला. या साऱ्यांचं फलित म्हणजे ऑगस्ट ऐंशीमध्ये बापू आणि भिकन दयाजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली निघालेला प्रचंड किसान मोर्चा. या काळी बागलाण भागात भुईमुगाचं अमाप पीक होतं, तेव्हा भुईमुगाला पांचशे रुपये हा भाव, धरणाचं पाणी आणि मागेल त्याला विजेची जोडणी या प्रमुख मागण्यांचं निवेदन शासनाला देण्यात आलं. या मोर्चाला प्रसिद्धी भरपूर मिळाली. वृत्तपत्रांतून बातम्या आणि फोटोही झळकले. शेतकऱ्यांचा उत्साह दुणावला.

या सुमारास शरद जोशींचं भारतीय पटलावर आगमन झालेल होतं. त्यांनीही शेतकऱ्यांचा प्रश्नाला आल्या आल्या हात घातला होता. साधारण एकाच वेळी दोघांच्याही आंदोलनाच्या बातम्या याव्यात हा काही निव्वळ योगायोग होता असं म्हणावं का? दोघांनी साधारण एकाच सुमारास शेतकऱ्यांचे प्रश्न लावून धरावेत हाही केवळ योगायोगच असं कसं म्हणता येईल! मला तर अस ठामपणे वाटतं, की दोघांची भेट व्हावी 'ही तो श्रींची इच्छा!' आणि घडलंही तसंच. दोघांच्याही मनात एकमेकांचं आंदोलन जाणून घेण्याची ईच्छा झाली, भेटीची इच्छा झाली. शरद जोशींना भेटण्याची बापूंना तीव्र इच्छा झाली. त्यांनी कुठून तरी साहेबांचा फोन नंबर मिळवला आणि साहेबांना फोन लावला. ''हॅलो ! कोण जोशी साहेब का?'' ''हो मीच !'' ''नमस्कार साहेब, मी सटाण्याहून रामचंद्रबापू पाटील बोलतोय. पेपरातून आपल्यासंबंधी, आपण चालवलेल्या आंदोलनासंबंधी खूप वाचायला मिळालं. आपल्याला भेटण्याची इच्छा आहे. आपण आमच्या गावाला भेट द्यावी, ही विनंती आहे.'' ''हो, मीसुद्धा तुमच्या बद्दल ऐकलंय, वाचलय. मलासुद्धा तुमची भेट घ्यायला आवडेल. तुम्ही असं करा, माधव खंडेराव मोरे यांच्याशी संपर्क करा. म्हणजे आपल्याला पुढचं धोरण ठरवता येईल. मी तुम्हाला त्यांचा फोन नंबर देतो.'' बापूंनी साहेबांशी हा फोनसंपर्क केला आणि पुढे इतिहास घडला.

आता पावेतो बापूंनी साहेबांना पाहिलेलं नव्हतं; पण त्यांच्यासंबंधी ऐकलं, वाचलं होतं. त्यांच्या भेटीसाठी म्हणून बापूंनी सहा नोव्हेंबर ऐशींचा मुहूर्त ठरवला.



त्या दिवशी सटाण्याला सर्वपक्षीय बैठक बोलावली. या बैठकीसाठी साहेबांनाही आमंत्रण दिलं. बोल बोल म्हणता लोक जमा झाले आणि बैठकीची जाहीर सभाच झाली. गुरू शिष्यांच्या भेटीचा मुहूर्त तर ठरला. इंतेजार की वो घडीयाँ खत्म झाली आणि साहेब सभेला आले. त्यांचे सोबत प्रल्हाद पाटील, माधव खंडेराव मोरे आणि बाबूलाल परदेशी हे सारे आलेले. बापूंनी शरद जोशींना पाहिलं नव्हतं तेव्हा बाबुलाल परदेशीलाच शरद जोशी समजून त्यांनी हार घातला... यासंदर्भात माझी एक आठवण सांगण्यासारखी आहे. परभणीला लिंगायत समाजाचे स्वामी डॉ. शिवाचार्य येणार होते. ते ज्या रस्त्याने येणार होते, त्या रस्त्यावर आमच्या संस्थेची भव्य इमारत आहे. समोर मोठं पटांगण आहे. शाळेचं मोठं सभागृह आहे. तेव्हा त्या समाजाचे लोक मला येऊन भेटले आणि स्वामींच्या स्वागतासाठी शाळेची जागा उपलब्ध करून द्यावी अशी विनंती केली. शहरात प्रवेश केल्या केल्या स्वागत, थोडी विश्रांती, भेटीगाठी आणि लगेच प्रयाण असा कार्यक्रम होता. या समाजात माझे अनेक मित्र व काही सहकारीही होते तेव्हा संस्थेच्या वतीनेही स्वामींचं स्वागत करावं असं आम्ही ठरवलं. शाळेच्या आवारात सडा टाकून घेतला, रांगोळ्या काढल्या आणि सकाळी स्वागतासाठी हारतुरे घेऊन मी, आमचे संस्थेतील सहकारी, लिंगायत समाजातील अनेक स्त्रीपुरुष थांबलोत. ठरल्या वेळी महाराज आले. डॉ. शिवचार्यांना मी काही पाहिलेले नव्हतं. महाराज म्हणजे, कुणी वयस्क वगैरे असणार असं मी गृहीत धरलं. त्याप्रमाणे माझ्या कल्पनेतल्या मिळत्याजूळत्या गृहस्थांना मी स्वामी शिवाचार्य समजून हार घातला आणि साष्टांग दंडवत घातलं. ते गृहस्थ मला खुणवायला लागले. बाजूला बघा. बाजूला बघा. बाजूला असलेले खरे शिवाचार्य अगदी तरुण होते, त्यामुळे माझी फजिती झाली. मी दुसरा हार त्यांना घातला आणि साष्टांग दंडवतही.

....साहेब आले आणि बैठक सुरू झाली. बैठक कसली जाहीर सभाच ती. सर्वपक्षीय सभेच्या वतीने बापूंनी साहेबांना मागण्यांचं निवेदन दिलं. निवेदनावर साहेब बोलले, ''मी काही मंत्री नाही, किंवा सरकारी अधिकारीही नाही, तुमचं निवेदन स्वीकारूनआश्वासन द्यायला. तेव्हा तुमच्या मागण्या मी मान्य करु शकत नाही. पण ही अशी परिस्थिती का उद्भवली हे मात्र सांगू शकतो.'' त्या नंतर साहेबांनी त्यांना उमजलेल्या आणि पुढे शेतकरी संघटनेने प्रचारलेल्या शेती अर्थशास्त्राचं जे विवेचन केलं, त्यामुळे सभा भारावून गेली. बापूंना तर साहेबांना कुठं ठेवू अन् कुठे नको असं झालं. ते आले, ते बोलले आणि त्यांनी सभा जिंकली अशी अवस्था झाली. खरं तर अवस्था बिकट झाली ती बापूंची. ही सभा घेऊ नये

यासाठी बापूंवर विलक्षण दडपण आलं होतं. पक्षोपपक्षाच्या नेतागणांनी हर प्रयत्न करून पाहिला. एवढंच नव्हे तर आतापावेतो हमखास यशस्वी ठरलेलं जातीयवादाचं हत्यारही उपसून पाहिलं. ''शरद जोशी बामन आहेत. त्या बामनाचं काय ऐकता.'' हाही प्रयोग झाला; पण नियतीलाच हा सारा विरोध मान्य नव्हता. सर्व दडपणांना झुगारून देऊन बापूंनी ही सभा आयोजित केली आणि प्रचंड उपस्थितीत यशस्वी करून दाखवली.

साहेबांच्या या सभेत युद्धाला तोंड फुटलं. बागलाण, कळवण, सटाणा, मालेगाव हा सारा परिसरच नव्हे तर अख्खा नाशिक जिल्हा काँग्रेसचा गड आणि या गडाला घडका देऊ पाहतेय कुठली तरी शेतकरी संघटना, अशी संघटना जीचा 'अता ना पता'. काँग्रेसच्या गोटात या सभेने आग लावली आणि बापूंच्या सभेला उत्तर म्हणून काँग्रेसचे वतीने एक्केवीस सप्टेंबरच्या सुमारास नामपूरला शालिनीताई पाटलांची सभा आयोजित करण्यात आली. शालिनीताई म्हणजे कुणी ऐरीगैरी नव्हे, तर एक बडंप्रस्थ ! त्यावेळी त्या महाराष्ट्राच्या महसूलमंत्री होत्या. सत्ता, पक्ष, संपत्ती, शक्ती सार सारं काही पाठीशी. समोर होते बापूसारखे 'सामान्यातून' आलेले कार्यकर्ते, पण असामान्य कर्तृत्वाचे, प्रचंड जनाधार असलेले. शालिनीताईच्या सभेआधी आपली भूमिका समजावून सांगावी म्हणून बापूंनी साहेबांच्या सभा आयोजित केल्या. या सभांतून साहेबांनी आपल्या भूमिकेची मांडणी सोप्या शब्दांत केली. लोकांनाही आपल्या प्रश्नांचं उत्तर मिळतंय हा विश्वास आला. शेतकऱ्यांचं मरण हेच शासनाच धोरण याचं सुरेख विवेचन साहेबांनी या सभेतून केलं. शेतकऱ्यांना आपलं मरणं दिसत होतंच. ओली पडो की सुकी, मरणार शेतकरी याचं कारण त्यांना कळू लागलं. तेव्हा साहेबांच्या सभांना प्रचंड प्रतिसाद मिळत गेला आणि हळूहळू वातावरणही बदलत गेलं. बापूंना जाणीव झाली की, वातावरणात दारू ठासून भरलेली आहे, अवकाश फक्त ठिणग्या पडण्याचा होता. साहेबांनी सटाणा, नागपूर, लखमापूर आदी ठिकाणी सभा घेतल्या. त्याआधी बापूंची सारी पुण्याई या कार्यक्रमामागे लागलेली.

एकेवीस सप्टेंबरचा दिवस उगवला. प्रचंड ताफा घेऊन शालिनीताई नामपूरला आल्या. साहेबांनी केलेल्या प्रतिपादनाला त्या काय उत्तर देतात या उत्सुकतेनं त्यांच्या या सभेला गर्दीही खूपच झालेली. स्वागताचा सोहळा आटोपला आणि ताई बोलायला उठल्या. पहिले छूट त्या मुद्दा सोडून गुद्यावर आल्या, त्यांनी साहेबांवर तोंडसुख घेतलं. त्यांच्या या हल्ल्याने संतप्त झालेला एक शेतकरी मध्येच उठला आणि शालिनी ताईंच्या भाषणाला अडवून त्यानं प्रश्न विचारला, ''शेतकऱ्यांच्या



मालाला भाव मिळू नये हे तर शासनाचं धोरण ठरलेलं आहे, असा शासनावर आरोप आहे. याबाबत तुमचं काय म्हणणं आहे?'' झालं. ठासून भरलेल्या दारूवर पडायची ती ठिणगी पडली. या प्रश्नाचं उत्तर ऐकण्यासाठीच सारा जमाव जमलेला. प्रश्न विचारायचं धाडस कोण करतो एवढाच प्रश्न होता आणि ते धाडस केलंच एकानं. साऱ्या सभेनं श्वास रोखून धरला. आता काय होणार? ताईंच्या सभेत एक सामान्य शेतकरी असला प्रश्न विचारायचं धाडस करतो म्हणजे काय? तौब तौबा! ''कोण आहे रे तिकडे? प्रतिहारी, या मुजोराला फासावर चढवा!'' सुदैवानं हा मध्ययुगीन काळ नव्हता आणि समोर मोगलाई तख्त नव्हते. ही होती लोकशाही; पण लोकशाहीचे सारे संकेत झुगारून, त्या प्रश्नकर्त्याचं निमित्त करून शालिनीताई बापूंच्या साऱ्या साथीदारावर उखडल्या. ''आतापावेतो तुम्ही दादांच्या खांद्यावर मान ठेवलीत, पूर्ण विश्वास ठेवला. या बामनाला शेत माहीत नाही, की नांगर आणि त्याचा शब्द खरा मानून तुम्ही दादांचा विश्वासघात करता? तुम्हाला फितवणं हा तर बामनी कावा आहे...'' शरद जोशींची संभावना ताईंनी या शब्दांत केल्यामुळे सारी सभा संतप्त झाली. बोल बोल म्हणता लोकांनी आपला संताप व्यक्त करायला सुरूवात केली. पाहता पाहता सभा उधळली गेली. अनेक लोक मंचाकडे धावले. लाऊड स्पीकर्सवरच्या शांत व्हा, शांत व्हा या आवाहनाला कुणीही दाद देत नाही, हे पाहिल्यावर शालिनीताईंच्या कार्यकर्त्यांची घाबरगुंडी उडाली. त्यांनी ताईंभोवती कडं केलं आणि पोलिसांच्या पहाऱ्यात ताईंना पलायन करावं लागलं. हा खरं तर संघटनेचा सुरूवातीचा काळ. शरद जोशींची आणखी ओळखही लोकांना पुरती व्हायची होती. आणखी त्यांचा विचारही रुजायचा होता; तरीही ताईंनी ज्या प्रकारे शरद जोशींचा उल्लेख केला, त्यामुळे सारी सभाच संतप्त झाली. उद्याच्या शेतकरी उठावाची ही तर केवळ सुरूवात होती. 'आगे, आगे देखिए होता है क्या.'

याच वेळी शेजारी असलेल्या देवळी या गावात साहेबांची सभा चालली होती. त्या सभेला नामपूरला घडलेला वृत्तांत लोकांना कळला आणि घोषणांनी सारं वातावरण दणाणून गेलं. नामपूरच्या सभेत ताईंच्या फटफजितीच्या बातम्या काही वृत्तपत्रांनी हेडलाईन टाकून दिल्या. वृत्तपत्रांनी या वेळी काम चोख केलं आणि बघता बघता कोपऱ्यात जागा मिळवणारी शेतकरी संघटना आपोआपच पहिल्या पानावर आली. संघटनेला भरपूर प्रसिद्धी मिळाली आणि आजच्या भाषेत सांगायचं तर शेतीचा प्रश्न 'ऐरणीवर' आला; पण या सभेमुळे बापूंचे काँग्रेस पक्षातले दोर मात्र कापले गेले. एव्हाना बापूंनी स्वतःला या प्रवाहात झोकून दिलेलं होतं, तेव्हा

परिणामाची चिंता नव्हती. ते तर आव्हानच देऊन उभे होते, 'देखना है जोर कितना बाजु ए कातील में है.'

आता घटनांनी वेग घेतला. बैठकीतलं, सभेतलं आंदोलन आता रस्त्यावर येऊ पाहत होतं. पाहत होतं काय, नामपूरच्या सभेत आलंच. नामपूरच्या सभेनं ठणकावून सांगितलं, की शेवटाची सुरूवात आता झाली आहे. वातावरणात वीज संचारली होती. पिंपळगावाला कार्यकर्त्यांची एक विशाल बैठक बोलाविण्यात आली. एव्हाना कांद्याच्या प्रश्नानं जोर धरला होता. नाशिक जिल्ह्यात आता कांदा हे मुख्य पीक झालेलं होतं. त्या पिकाची वाट लागली तर शेतकऱ्यांचीच वाट लागणार, तेव्हा साऱ्या कार्यकर्त्यांनी या प्रश्नाला हात घालण्यात यावा अशी मागणी केली व ती मान्यही झाली. मागणी कांदा प्रश्नाची. आंदोलन रास्ता रोकोचं. मुहूर्त १० नोव्हेंबर १९८०चा. हे आंदोलन ठिकठिकाणी होणार होतं. मंगरूळ फाटा या ठिकाणी रास्ता रोको तर खेरवाडी स्टेशनवर रेल रोको आंदोलन झालं.

मंगरूळ फाट्यावर बापूंच्या नेतृत्वाखाली तीन दिवस हे आंदोलन चाललं. शेतकरी रस्त्यावर झोपून राहिले. प्रचंड संख्येनं जमलेल्या या लोकांसाठी आजूबाजूच्या गावातील लोकांनी भाकरी, कालवणाची उत्स्फूर्त व्यवस्था केली. आंदोलन शांततेनं चाललं होतं. लोकांचा उत्साह तर दृष्ट लागण्यासारखा होता आणि ती तशी दृष्ट लागलीच. मुंबई आग्रा या महामार्गावर मैलोगणती वाहनांच्या रांगा दोन्ही बाजूंस लागल्या. लोक शांत होते; पण शासनाचाच धीर सुटला. नाही तरी शालिनीताईंच्या फटफजितीमुळे काँग्रेसचं सरकार संघटनेवर खार खाऊनच होतं. शासनानं आता दडपशाही मार्गाचा अवलंब करायला सुरूवात केली. त्यांनी अवलंबलेला एक मार्ग तर अंगावर शहारे आणणारा होता. हायवेवर अडकून पडलेल्या ट्रकवाल्यांकडून बैलांच्या शेपट्या कापण्याचा क्रूरपणा करायला त्यांनी सुरूवात केली. सत्याग्रहींना मारहाण करायला सुरूवात केली. त्यामुळे साहजिकच वातावरण तप्त व्हायला सुरूवात झाली. दहशतीला इतक्या प्रचंड प्रमाणावर जमलेल्या शेतकऱ्यांनी त्यांच्याच भाषेत उत्तर दिलं असतं, तर पोलिस औषधाला सापडले नसते. लोकांनी हिंसाचाराचा अवलंब करावा हीच तर पोलिसांची रणनीती होती. लोकांनी हिंसाचार केला, की पोलिस गोळीबार करायला मोकळे. हे सारं श्रेष्ठींनी लक्षात घेतलं आणि अठ्ठेचाळीस तासांची सुटी जाहीर केली.

आतापर्यंत चाललेल्या आंदोलनाचा आढावा घ्यावा व मगच पुढील आंदोलनाची दिशा ठरवावी असं ठरलं. त्यासाठी चौदा नोव्हेंबरला एक तातडीची बैठक बोलावण्यात आली. जबाबदारी बापूंवर होती. या आंदोलनाचे केंद्र सटाणा



होतं, तेव्हा बापूंनी शक्कल लढवली. त्यांनी शेतकरी सहकारी संघाची सर्वसामान्य सभा बोलावली. त्यासाठी तर शासनाचा काही आक्षेप येऊ शकत नव्हता. ती सभा एका सहकारी संस्थेची होती ना. वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी रीतसर परवानगी मिळवली त्यांनी. गावोगावी निरोप गेले आणि या वार्षिक सभेला प्रचंड सभेचं स्वरूप आल. एवढा मोठा जमाव त्यामुळे ही 'बैठक' मार्केट यार्डात घ्यावी लागली. हा जमाव पाहून बापूंचा कावा शासनाच्या लक्षात आला; पण तो पर्यंत बाण हातातून निघून गेला होता. एवढा मोठा जमाव पाहून साहेबांनाही विश्वास आला. या बैठकीत आंदोलनाचा सांगावा घेऊनच लोक गावोगावी परतले.

शासन बळाचा-दहशतवादाचा अवलंब करीत असलेलं पाहून, या वेळी रास्ता रोको ऐवजी बागलाणच्या तहसील कार्यालयाला घेराओचा कार्यक्रम आखण्यात आला. या घेराओला मिळालेला प्रतिसाद पाहून शासनानं काहीही धडा न घेता, व्यापक प्रमाणावर अटकसत्र सुरू केलं. साहेब आणि इतर नेत्यांना अटक झाली. बागलाण, कळवण, साक्री या ठिकाणीही हजारो लोकांना अटक झाली. नाशिकचे तुरुंग भरभरून वाहू लागले. ब्रिटिशांच्या जोखडाखालून मुक्त झालेला भारत, लोकशाही स्वीकार केलेला भारत आणि सर्वाधिक प्रगत समजलं जाणारं महाराष्ट्र राज्य; पण ३५ वर्षांच्या लोकशाही परंपरांना, संकेतांना झुगारून देऊन याही राज्याच्या शासनाने ब्रिटीशांच्या दमननीतीचा वापर करावा हे केवढे दुर्दैव. लोकांचा उत्साह एवढा दांडगा, की एवढे सारे अटक होऊनही, एवढा बळाचा वापर होऊनही आंदोलन काही संपेना. उलट आंदोलनाचं क्षेत्र व्यापक होत चाललं. तेव्हा काही समजदार नेत्यांनी तेव्हाचे मुख्यमंत्री श्री. अंतुले यांना आंदोलनकर्त्यांशी चर्चा करण्याच आवाहन केलं. सत्तेच्या गुर्मीत हे आवाहन अंतुल्यांनी ठोकरून लावलं, ''कुणा शेतकरी संघटनेच्या शरद जोशीसारख्या बेगडी नेत्याशी चर्चा करायला मी तयार नाही.'' ही त्यांची गुर्मी!

शांततेच्या मार्गानं चाललेल्या आंदोलनाला शासनाचा हा प्रतिसाद, प्रचंड प्रमाणावरील अटकसत्र आणि आंदोलकांविरुद्ध दमन नीतीचा वापर या साऱ्यांमुळे लोकांच्या भावना अधिकच तीव्र झाल्या. आंदोलनाची व्याप्ती, क्षेत्र तर वाढलंच वाढलं, पण काही लोकांचा संयमही सुटला. सर्व नेते तुरुंगात आणि बाहेर मार्गदर्शन करायला कुणीही नाही. अशा वेळी जे व्हायचं तेच झालं. ब्राह्मणगावला काही लोकांनी सरकारी बसमधल्या प्रवाशांना खाली उतरवून बस पेटवून दिली. झालं, आंदोलनाने आता हिंसक वळण घेतलं. आता लोकांनी आंदोलनाचं स्वरूपही बदललं. रस्त्यावर आंदोलन करणाऱ्यांवर होणारी जुलूमजबरदस्ती पाहून लोकांनी

बांधावरचं आंदोलन म्हणून 'ऊस तोड बंद' आंदोलन सुरू केलं. बालपणी ऐकलेल्या गोष्टीतल्या राक्षासाचा जीव कसा साता समुद्रा पलीकडे एक डोंगर, त्या डोंगरात गुहा, गुहेत झाड, झाडावर पिंजरा, पिंजऱ्यात पोपट अन् पोपटात या रक्षसाचा जीव. तसं या काँग्रेसवाल्यांचा सारा जीव सहकारी साखर कारखान्यातल्या मलईल गुंतलेला. तेव्हा ही 'मलई' बंद झाली तर याचं तोंड उघडणार, म्हणून ऊसतोड बंद हे नावीन्यपूर्ण आंदोलन छेडण्यात आलं.

तरीही शासनाला शहाणपण काही सुचेना. या नावीन्यपूर्ण आंदोलनाचा परिणाम कसा होईल हे त्यांच्या काही लक्षात आलं नाही. शेतकऱ्यांनी याच आंदोलनातलं पुढचं पाऊल म्हणून नाशिक जिल्ह्यातल्या गिरणा सहकारी साखर कारखान्यावर मोर्चा काढला. शेतकरी संघटनेचा मोर्चा म्हणजे तो प्रचंड असणारच हे ओघानं आलंच. आंदोलकांनी दिवसही नेमका निवडला होता. या दिवशी गिरणा कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ होणार होता. कुणी तरी मोठा नेता गव्हाणीत मोळी टाकायला येणार होता. त्याच्या स्वागतासाठी मूठभर काँग्रेसचे कार्यकर्ते आणि हाता हातावर रायफलधारी पोलिस. प्रचंड पोलिस ताफा हजर. त्यांच्या डोक्यावर लोखंडी हेल्मेट, समोर लोखंडी जाळ्या, अश्रूधुर ओकणाऱ्या रायफली. ही सारी तयारी पाहून आंदोलनकर्त्यांची पाचावर धारण बसेल ही शासनाची अपेक्षा. आतापावेतो शासनानं शेतकऱ्याचं 'घी' पाहिलं होतं, पण आणखी 'बडगा' पाहिला नव्हता. बागलाण तालुका तर शतप्रतिशत पेटलेला होता. गव्हाणीत मोळी टाकूच द्यायची नाही या निश्चयाने शेतकरी पेटलेले तर 'जो बोले सौ है, रायफल की जय' या कराराने पोलिसी फौज सज्ज झालेली. शेवटी आंदोलनकर्त्यांची प्रचंड संख्या आणि आंदोलनस्थळी येणारे माणसांचे लोंढे पाहून शासनाचा धीर सुटला आणि मोळी टाकण्याचा कार्यक्रम रद्द करावा लागला. साहजिकच पोलिस फौज आपली आयुधं येऊन परतली.

या आंदोलनाची व्याप्ती, माणसांचा प्रचंड सहभाग पाहून शेवटी का होईना; पण शासनाला शहाणपण सुचलं. 'कुठला कोण शरद जोशी? या शेतकऱ्यांच्या बेगडी नेत्या बरोबर आम्ही चर्चा करणार नाही' अशी दर्पोक्ती करणाऱ्या मुख्यमंत्री अंतुल्यांनी अत्यंत मानाने शरद जोशींना चर्चेचं आमंत्रण दिलं. या चर्चेत सहभागी होण्यासाठी स्वत: शरद जोशी, माधवराव बोरस्ते, माधव खंडेराव मोरे, प्रल्हाद पाटील कऱ्हाड, भास्करभाऊ बोरावके आणि बापू असं प्रतिनिधी मंडळ मुंबईस रवाना झालं. शासनातर्फे स्वत: मुख्यमंत्री बॅरीस्टर अंतुले आणि तेव्हाचे अर्थमंत्री रामराव आदिक होते. या बैठकीत कुठल्या ना कुठल्या स्वरुपात उसाला आधिक



भाव देण्याबाबत उभयपक्षी मान्यता मिळत असताना त्याला विरोध कुणी करावा? शेतीशी संबंध नसणाऱ्या मुख्यमंत्री अंतुलेनी नाही तर तथाकथित 'शेतकरी पुत्र' रामराव आदिकांनी. कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ होतो तो हा असा. ज्यांना शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेता येतात असा सार्वत्रिक समज, त्या शेतकरी पुत्रांनीच आंदोलक शेतकऱ्यांचा असा घात केलेला आहे. त्यांच्या निष्ठा या जमिनीशी, इथल्या भूमिपुत्राशी नाहीत तर दिल्लीश्वराच्या पायाशी वाहिलेल्या. त्यांच्या नजरेच्या सूर्याकडे पाहूनच ही 'पक्ष फुले' आपले चेहरे फिरवतात. आपल्याच जातकुळीच्या रामराव आदिकांनी अशी शेतकरीविरोधी घातक भूमिका घेतलेली पाहून भर बैठकीत संतप्त माधव खंडेराव मोरे यांनी रामराव आदिकांची संभावना ज्या भाषेत केली तिचा उल्लेखही इथे करण्याचं धाडस आमच्यात नाही.

आता आंदोलकांना विश्रांती नव्हती. एक आंदोलन संपलं, की दुसरं आंदोलन जाहीर व्हायचं. मग त्या आंदोलनाचं स्वरूप, स्थळ- काळ ठरवण्यासाठी आधी बैठका आणि त्यानंतर प्रचाराच्या जाहीर सभा. दहा नोव्हेंबर १९८१ ला शेतकरी आंदोलनाचा वर्धापन दिवस साजरा करण्याचा निर्णय झाला. आंदोलन ठरलं आणि शासनानं आपल्या नेहमीच्या बिनडोकपणानं संघटनाप्रमुखांना अटक केली. साहेब, माधवराव मोरे आणि प्रल्हाद पाटील कऱ्हाड यांना आंदोलनपूर्व अटक करण्यात आली. आंदोलन निर्नायकी असलं म्हणजे पोलिसांना गोळीबाराची 'प्रॅक्टीस' करता येते. पोलिसही 'अनुभवी' होतात, असा शासनाचा होरा असावा; पण नेत्यांचा अटक झाली की आंदोलन थंड होण्याचा काळ आता संपला होता. आता आंदोलन नेत्यांचं नव्हे तर जनतेचं झालेलं होतं. या वेळी आंदोलनासाठी निवडण्यात आला बळीराम हिरे यांच्या मतदारसंघातील टेहरे फाटा. त्या फाट्यावर १० नोव्हेंबर ८१ ला सकाळी पाचपासूनच आंदोलक जमायला सुरवात झाली. जथ्या जथ्यांनी लोक जमा झाले. बोलबोल म्हणता प्रचंड संख्या जमली. बापूंची 'जादू फिर एक बार चल गयी!' प्रचंड संख्या पाहून, कुठल्याही शहाण्या सरकारने काहीही कृती करण्यापूर्वी शंभर वेळा विचार केला असता; पण या शासनानं तर नेसूचं डोक्यावर घेतलेलं, तेव्हा त्यांच्याकडून संयमाची काय अपेक्षा करावी!

समोर जमलेला प्रचंड जमाव पाहून शासनाचं पित्त खवळलं. बळिराम हिरेंच्या सत्तास्थानाला आव्हान देता म्हणजे काय! शासनानं एकदम दहशतवादाला हात घातला त्यांनी सुरवात केली तीच मुळी थेट वस्तीपासून. घराची दारं मोडून घराघरात घुसून काठ्यांनी बडवायला सुरवात केली. समोर कोण स्त्री, पुरुष का बालक, हे न पाहता कुणाचाही मुलाहिजा न ठेवता, पोलिसांनी आपले हात साफ करून घेतले.

तेवढ्याने समाधान न झाल्याने त्यांनी आपला मोर्चा टेहरे फाट्यावर जमलेल्या जमावाकडे वळवला आणि बेफाम होऊन लाठीहल्ला केला. शेकडोंनी लोक जखमी झाले. हलकल्लोळ माजला. 'हाणा, मारा' एकच गलका झाला. सैतानापुढे प्रसंगी देवाचंही चालत नाही, ही तर जाणून बूजून माणसं, ग्रामीण भारतातील माणसं! पण कुणी मागे हटायला तयार नव्हत. पोलिसही हट्टाला पेटलेले. पोलिसांना आव्हान देणारे हे कोण? पोलिसांच्या आणि त्याहीपेक्षा बळिराम हिऱ्यांच्या प्रतिष्ठेचा हा प्रश्न होता. लाठीचार्जने लोक नमत नाहीत ना? मग करावा गोळीबार. हातातल्या रायफली कशासाठी आहेत? 'कंपनी अटेन्शन. पोझीशन बनाव. फायर!' धाड धाड गोळ्यांचे आवाज आणि या गोळ्यांनी दोन मोहरे टिपले. बागलाणचे भागूजी बागुल तर जागेवरच गत:प्राण झाले. दगा चितांमण यांनी त्यानंतर दोन दिवसांनी प्राण सोडला. दगा चिंतामणी तर तरणाबांड शेतकरी. मुंबईच्या मंत्रालयातील वातानुकूलित कक्षात बसून हा सारा खेळ खेळणाऱ्यांना शेतकऱ्यांच्या जगण्यामरण्याचं काय घेणं देणं? भागूजी बागुलांचा देह पडला आणि एकच आक्रोश झाला. आता तर पोलिस आणि आंदोलकांत तुंबळ युद्ध पेटलं. प्रचंड जमावाला आवर घातला गेला नसता तर आणखी काही शेतकरी बळी असते, मात्र पोलिसही काही परत जाऊ शकले नसते. बापूंनी डोक थंड ठेवलं. लोकांना मोठ्या सयमानं शांत केलं आणि येऊ घातलेल प्राणहानीच संकट कसंबसं टाळलं.

लोक तसे शांत झाले; पण त्यांनी हट्ट धरला बागुलांचा अंत्यविधी बागलाणच्या तहसील कार्यालयातच करायचा. लोक संतप्त होते आणि हट्टाला पेटलेले होते. आता पोलिसही पुरते घाबरून गेलेले. आपण केलेल्या कृतीचे परिणाम काय होऊ शकतात याची कल्पना न करता मस्तीत वागलेल्या पोलिसांना आता दे माय धरणी ठाय असं झालेलं होतं. लोकांना कसं शांत करावं आणि काय तोडगा काढावा यासाठी क्षणभर बापूंनाही कोडं पडलं. बापूंनी सर्व कौशल्य पणाला लावलं आणि बागुलांचा अंत्यविधी त्यांच्या पिंगळवाडे या गावी करावा या निर्णयाला लोकांना आणलं. दुसऱ्या दिवशी अमाप गर्दीत ही अंत्ययात्रा निघाली. अंत्ययात्रा अत्यंत गंभीर वातावरणात पार पडली. लोकाही संयमाने वागले. चिता धडधडली, अन् शांतही झाली; पण लोकांच्या हृदयातला अग्नी पेटलेलाच राहिला. लोक घरोघरी परतले, अख्ख्या बागलाण तालुक्यानं पाच दिवसांचं सुतक पाळल. दोन धडधडत्या चितांनी काँग्रेस सरकारचा तळीराम शांत झाला. आणखी किती बळी हवेत, त्यांचा आत्मा शांत व्हायला? किती?

याच सुमारास पिंपळगावी शेतकरी संघटनेची एक बैठक झाली. या बैठकीत



नाशिक जिल्ह्यातील जैनांचं तीर्थ क्षेत्र असलेल्या मांगीतुंगी टेकडीवर शेतकरी संघटनेचं पहिलं वहिलं अधिवेशन भरवावं असा निर्णय झाला. बापूंच्या समवेत साहेब, माधवराव मोरे, प्रल्हाद पाटील या साऱ्यांनी या ठिकाणाची पाहणी केली. पाहणी अंती अधिवेशनाच्या दृष्टीने काही गैरसोयी लक्षात आल्या, तेव्हा पर्याय शोधण्याचा प्रश्न आला. बापूसमोरच होते, म्हणजे पर्यायही समोरच होता. एव्हाना गर्दी खेचण्याची बापुंची शक्ती सर्वांच्याच लक्षात आलेली होती. शिवाय बागलाण, कळवण, मालेगाव, साक्री, सटाणा हा सारा परिसर खदखदत होता. या परिसरानं खूप सहन केलेलं, खूप आंदोलनं केलेली, तेव्हा हे अधिवेशन सटाणा येथेच व्हावं हा निर्णय झाला. गेल्या काही वर्षांपासून सतत आघाडीवर असलेल्या बापूंच्या गळ्यात स्वागताध्यक्षपदाची माळ घालण्यात आली. तारखाही ठरल्या. १९८२ च्या १, २ व ३ जानेवारी!

बापू कामाला लागले. वेळ थोडा आणि सोंगच नव्हे तर जबाबदाऱ्याही फार. बापूंना आता दिवसाचे चोवीस तासही कामाला पुरेनात. शेतकरी संघटनेचं अधिवेशन ही कल्पनाही नवीन. कसं करावं, काय करावं, काय असावं, समोर काही उदाहरण नाही; पण डगमगतील ते बापू कसले? त्यांनी कंबर कसली, भिडले ते कामाला. 'हिंमते मर्दा तो मदद दे खुदा' कामाला सुरवात करताना कुणी तरी पुढे व्हावं लागतं. लोक आपोआप मागे येतात. 'लोग आते गये, कारवां बनता गया' गोवर्धन पर्वत उचलायला कृष्ण नाही का पुढे सरसावला! गोप-गोपींनी नंतर काठीचा आधार दिलाच ना. बापू प्रचाराला बाहेर पडले तेव्हा त्यांना लोकांत प्रचंड उत्साह जाणवला. लोकांनी त्यांना तन, मनानेच नव्हे तर धनानेही साथ दिली. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात हे तीन दिवसांचे अधिवेशन नुसत्या गर्दीत नव्हे तर प्रचंड गर्दीत, उत्साहात पार पडलं. बापूंच्या टोपीत आणखी एक तुरा. बापू आधीच लोकप्रिय होते, या अधिवेशनानं त्यांच्या कीर्तीत 'चार चाँद' लागले.

या अधिवेशनापासून शेतकरी संघटनेलाही एक निश्चित प्रतिष्ठा प्राप्त झाली. संघटना केवळ आंदोलन न राहता, एक चळवळ बनली, एक शिस्तबद्ध संघटना बनली. संघटनेला बाळसं तर आलेलंच होतं. आता एक आकार आला. या अधिवेशनात माधव खंडेराव मोरे यांची संघटना-अध्यक्ष म्हणून निवड झाली. यानंतर पंढरपुरच्या साकड्याचा कार्यक्रम झाला. महाराष्ट्रभर प्रचार, दौरे, सभा हे उपक्रम चालूच होते. सर्वांत कळस झाला तो परभणीच्या अधिवेशनापासून. ते वर्ष होतं १९८४ चे आणि अख्ख्या वर्षात कार्यक्रमांची अशी भरमार, की

कार्यकर्त्यांना श्वास घ्यायलाही फुरसद नव्हती.

सुरवात झाली ती थेट वर्षारंभापासून. १९८४ च्या शेतकरी संघटनेच्या दुसऱ्या अधिवेशनासाठी स्थळ ठरलं ते परभणी. आधी मराठवाडाच मुळात शेतकरी संघटनेसाठी नवीन. त्यातही परभणीत तर संघटनेचं अस्तित्व नगण्यच; पण शेतकरी संघटनेनं नेहमीच आकाशातील चंद्राचा ध्यास घेतलेला. डोंगराशी टक्कर घ्यायची तयारी. ''पण साहेब परभणी तर संघटनेसाठी फारच नवीन'', ''मग काय झालं!'' साहेब ''नवीन ठिकाणीच तर अधिवेशन घेतलं पाहिजे म्हणजे. अनायसे काम वाढतं. शिवाय तिथे कृषी विद्यापीठ आहे. विद्यापीठातील शेषराव मोहिते आणि त्यांचे विद्यार्थी मित्र आहेत ना.''साहेबांचा आदेश शिरसावंद्य मानून बापूंनी परभणीस भेटी घ्यायला सुरवात केली. परभणीच्या स्वागताध्यक्षपदाची माळ अंबेजोगाईजवळील मोरेवाडीच्या श्रीरंगराव नानांच्या गळ्यात पडली. सटाणा अधिवेशनाच्या आधीपासून नानाही संघटनेच्या रंगात चांगले रंगलेले. तेव्हा बापू आणि नाना या जोडीने कामाला उत्साहात आरंभ केला. १९८४ च्या फेब्रुवारी महिन्यातल्या १२, १३ व १४ या तारखा ठरल्या. साहेब, माधवराव मोरे, प्रल्हाद पाटील कऱ्हाड, श्रीरंगराव मोरे, बापू सारेसारे प्रचाराला लागले. मराठवाडाभर प्रचाराची ही धूम उठली आणि 'न भूतो न भविष्यती' अशा प्रचंड गर्दीत परभणीचं अधिवेशन पार पडलं! त्याही घटनेला आज जवळजवळ वीस वर्षे होताहेत; पण तेव्हाच्या गर्दीच्या, शेतकऱ्याच्या चौदा फुटी कटआऊटच्या आणि एकूणच उत्साहाच्या आठवणी परभणीचे लोक आजही काढतात. या संमेलनात बापूंची महाराष्ट्राचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. बापूंच्या आतापर्यंतच्या कामगिरीचं खरं म्हणजे हे कौतुक होतं.

परभणी अधिवेशन संपलं ते पुढच्या आंदोलनाची नांदी म्हणूनच. मार्चमध्ये गव्हाचं आंदोलन छेडायचं होतं. त्यासाठी चंदीगडच्या राजभवनाला घेराओचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. १२०० ते १५०० माणसं महाराष्ट्रातून जावीत अशी अपेक्षा होती. त्यासाठी रेल्वे तिकिटाचं आरक्षण करायचे होतं. सर्वांना दरडोई तीनशे रुपये संघटनेकडे जमा करायचे होते. लोकांचा उत्साह एवढा दांडगा, की हाही आकडा पार झाला. पण जागा मोजक्याच त्यामुळे अनेकांना निराश व्हावं लागलं. आठ दिवस हा घेराओचा कार्यक्रम चंदीगडला झाला. त्यापाठोपाठ ऑगस्टमध्ये चंदीगडचे जेलभरो आंदोलन, त्यानंतर मोटारसायकल रॅली. ती होते न होते तोच बारडोली ते टेहरे फाटा हा महाराष्ट्र प्रचार यात्रेचा कार्यक्रम जाहीर झाला. या कार्यक्रमाला सुरवातीपासून शेवटपर्यंत स्वत: शरद जोशी राहणार होते.



टेहरेची सारी जबाबदारी बापूंवर टाकण्यात आली होती. ऐन दिवाळीत ही प्रचार यात्रा निघणार होती. नाही तरी दिवाळीचा सण शेतकऱ्यासाठी नाहीच. बलिप्रतिपदेला तर बळिराजाला पाताळात घालवलं होतं. तेव्हा त्या पाताळवासाचा हा दिवस शेतकऱ्यांनी 'साजरा' कशाला करायचा? ११९८४ ची अख्खी दिवाळी प्रचारयात्रेत गेली. दोन ऑक्टोबरला सुरू झालेली ही यात्रा महाराष्ट्रभर फिरून ३१ ऑक्टोबरला टेहरेला पोचली. ही प्रचार यात्रा आणि त्याआधी प्रचार यात्रेचाच प्रचार यात सप्टेंबर आणि ऑक्टोबरचे संपूर्ण महिने संपले. टेहरेला प्रचंड संख्येने शेतकरी जमा झालेले. आंतरराज्य समन्वय समितीचे सदस्यही जमलेले. बापूंनी टेहरे फाट्यावर उंच मंच सज्ज केला होता. प्रचार यात्रेच्या समापन दिनी साहेब काय आदेश देतात याकडे लोकांचे लक्ष लागलेले. टळटळीत दुपारी श्रेष्ठी मंचावर आलेले. आले ते अती गंभीर चेहरे घेऊन; पण त्यांचे कारण लोकांच्या काही लक्षात आले नाही. सभा सुरू होते न होते तोच साहेब स्वत: माईकपुढे आले आणि त्यांनी लोकांना शांत राहण्याचा आदेश दिला. घोषणांचा गजर एकदम थांबला. एकदम शांतता, पूर्ण शांतता पसरली. काय झालं याचा लोकांना काही अंदाज येईना. साहेबांनी तेव्हा ती साऱ्या देशाला हादरवून सोडणारी बातमी सांगितली, ''श्रीमती इंदिरा गांधींवर गोळ्या झाडण्यात आलेल्या आहेत. त्या सध्या अत्यवस्थेत दवाखान्यात आहेत. त्यामुळे आपण त्यांच्या प्रकृतीला आराम पडो अशी प्रार्थना करूया आणि अत्यंत शांततेने घरोघरी परतूया.'' त्यानंतर एवढ्या प्रचंड प्रमाणावर जमलेले सारे लोक अत्यंत शांततेने घरोघरी परतायला लागले. पुढे घडलेला इतिहास सर्वज्ञातच आहे.

टेहरे आंदोलनाच्या आगेमागे साखर कारखान्यांच्या निवडणूका नाशिकात लागल्या आणि या निवडणुकांत संघटनेची काय भूमिका असावी या प्रश्नावर दुहीची बीजे रोवली गेली. सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुकात भाग घ्यावा, आपले उमेदवार उभे करावे असा आग्रह धरणारा एक वर्ग या विरुद्ध कडवी भूमिका घेणारा दुसरा वर्ग. विशेषत: नाशिक जिल्ह्यातील वातावरण या प्रश्नावर पार ढवळून निघालं. शेवटी एक नंबरच्या शत्रूचा म्हणजे कॉंग्रेसचा पराभव करावा व त्यासाठी आवश्यक तर दोन नंबरच्या शत्रूशी सहकार्य करावे अशी तारेवरची कसरती भूमिका घेण्यात आली. 'सर्व राजकीय पक्ष हे चोर. त्यातही कॉंग्रेस महाचोर (शेतकरी हिताच्या दृष्टीने). तेव्हा या महाचोराचा पराभव करण्यासाठी नंबर दोनच्या चोराना पाठिंबा द्यावा घ्यावा लागेल. ''नाशिक जिल्ह्यातील गिरणा व निफाड साखर कारखाना आणि नाशिक सूतगिरणीच्या निवडणुका आल्या.

शेतकरी संघटनेच्या पुढाकाराने पुलोद आघाडी तयार झाली. या आघाडीच्या वतीने नाशिकमधील चौदाही मतदारसंघांतून पुलोदचे उमेदवार उभे करण्यात आले. दाभाडी, कळवण व बागलाण या तीन मतदार संघांची जबाबदारी बापूंवर. बापूंनी प्रचाराची ही धूम केली! नाही तरी या भागात संघटनेनं पक्के पाय रोवलेले होतेच. त्यात ताज्या आंदोलनांची भर पडली आणि या तीनही जागेवर पुलोदचे उमेदवार प्रचंड मताधिक्याने निवडून आले. एवढेच नव्हे तर नाशिकच्या चौदापैकी चौदाही जागी पुलोद उमेदवार निवडून आले. बापूंच्या यशाची कमान ही अशी चढतच गेली.

पुढच्या वर्षी कापसाच्या प्रश्नावर शेतकऱ्यांत विलक्षण असंतोष पसरला. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्रीपदी आरुढ झाले आणि त्यांनी कापसाच्या शेतकऱ्यावर आसूड ओढला. १९८५ तील कापसाच्या भावापेक्षाही १९८६ मध्ये क्विंटलमागे शंभर रुपयांनी भाव कमी केला. इतर सर्वच क्षेत्रांत महागाई वाढली असताना, कापसाचे भाव मागल्या वर्षीच्या भावावर स्थिर ठेवणे तर सोडाच; पण ते भाव इतके कमी करण्याचा नतद्दष्टपणा केवळ शंकरराव करू जाणे. त्या विरोधात मुंबईला ठिय्या आंदोलनासाठी आझाद मैदानावर हजारोंनी शेतकरी जमा झाले. शरद जोशींचं नावही काढलं, की शंकररावांच्या कपाळावर आठ्या चढत. तेव्हा त्यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाला शंकरराव काय दाद देणार? पण मुंबईला जमलेले हजारो शेतकरी मुंबईत संघटनेचा बिल्ला लावून टोळ्याटोळ्यांनी फिरायला लागले तेव्हा तो विषय म्हणजे 'टॉक ऑफ दी टाऊन' झाला.' वृत्तपत्रांतून टीका टिप्पणी झाली आणि शंकररावांच्या पत्थर दिलाला पाझर फुटला. त्या वेळी शंकररावांच्या मंत्रीमंडळातील एक मंत्री श्री. रोहिदास पाटील यांनी मध्यस्थी केली. रोहिदास पाटील हे शंकरावांच्या विश्वासातले, तर दुसरीकडे संघटनेच्या वतीने बापूंनी मध्यस्थी केली. बापूंचे आणि रोहिदास पाटलांचे संबंध फार चांगले होते. तेव्हा बापू आणि रोहिदास पाटील यांच्या मध्यस्थीला यश आले आणि हे ठिय्या आंदोलन पार पडलं.

एव्हाना व्हीपी सिंगांची चलती सुरू झालेली होती. काँग्रेसमधून बाहेर पडून जनता दलाची स्थापना त्यांनी केलेली होती. जनता दलातील अनेकांशी तेव्हाचे संघटना अध्यक्ष अनिल गोटे यांचे संबंध होते. तेव्हा बापू आणि गोटे यांनी व्ही.पी. सिंगांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले. त्यांनाही हा प्रश्न समजून घेण्याची आवश्यकता वाटली आणि यातून बापूंनी व्ही पी आणि शरद जोशी यांची भेट ठरवली. ही भेट झाली दिल्लीला. दोघांची शेतकऱ्यांच्या प्रश्नावर



प्रदीर्घ चर्चा झाली. त्यातून एकत्र प्रचार सभांची कल्पना पुढे आली आणि पहिली अशी सभा मुजफ्फरनगर येथे आयोजित करण्यात आली. या सभेला व्ही.पी. आणि शरद जोशी या दोघांनीही एकत्र उद्देशून भाषण केलं. त्यापुढची सभा सप्टेंबर ८८ ला सटाणा येथे ठरली. आमंत्रक अर्थातच बापू. या सभेतील उपस्थित जनसमुदाय पाहून व्ही.पीं.ना शेतकरी संघटनेच्या ताकदीचा खरा अंदाज आला. त्यांनी बापूंचे प्रकट कौतूक केलं.

१९८९ च्या निवडणुकीत जनता दलानं चांगलंच यश मिळवलं. या यशात शेतकरी संघटनेचाही मोठा वाटा होता. या सहभागाबद्दल व्ही.पी.नी शेतकरी संघटनेच्या एका व्यक्तीला राज्यसभेवर नियुक्त करण्याचा मनोदय जाहीर केला. महाराष्ट्रात विधान परिषदेवर एकाची उमेदवारी जाहीर करावी असंही ठरलं. शरद जोशींनी यासाठी बापूंचं नाव सुचवलं. एवढच नव्हे तर फॉर्म भरण्यासाठी बापूंना मुंबईला बोलावूनही घेतलं; पण त्या बाबतीत संघटनेनं काही निश्चित भूमिका न घेतल्यामुळे बापूंची ही संधी हुकली.

य नंतरच्या काळात मात्र बापूंचे पाय थकले. आतापर्यंतच्या वाटचालीत पूर्ण जोमाने काम करणाऱ्या बापूंची महाराष्ट्राची भ्रमंती थंडावली. आजही बापू छातीवर संघटनेचा बिल्ला लावून फिरतात. आजही सभा, संमेलन, मेळाव्यांना हजर राहतात. अनेक वेळी राजकारणांत शिरण्याची, आमदारपद भूषवण्याची संधी त्यानंतरही त्यांना प्राप्त झाली. पण प्रत्येक वेळी संधीने त्यांना हुलकावणीच दिली. खरं सांगायचं तर बापूंनी बंडखोरी केली असती किंवा धूर्त राजकारण खेळंल असतं, तर बापू लाल दिव्याच्या गाडीत मिरवले असते. पण शेतकरी संघटनेशी राखलेल्या इमानानं त्यांना या विचाराच्या जवळही जाऊ दिलं नाही.

■ ■

# नाना

बऱ्याच दिवसांपासून नानांची भेट नव्हती. तशा अधिवेशनांतून सांगली, रावेरीला भेटी झाल्या होत्या; पण त्या भेटी म्हणजे रामराम पुरत्या. तेव्हा गेल्या सप्टेंबरातल्या एका शनिवारी ठरवलं, उद्याच नानांना भेटायचं. पण त्यांना निरोप द्यायचा तो कसा? त्यांचा फोन नंबर तर माझ्याकडे नव्हता. मग मला आठवलं- गिरवलीली शशांक जेवळीकर असतो. शशांक म्हणजे श्रीकांतचा, माझ्या मुलाचा मित्र. गिरवली म्हणजे अंबाजोगाईचं जणू उपनगरच. तेव्हा त्याला नानांचा फोन नंबर मिळू शकतो.

आंघोळीला जाता जाता मी श्रीला सांगितलं, ''शशांकला फोन करून सांग, की मी उद्या नानांना भेटू इच्छितो''आमचं शंभो हरहर अर्धमुर्धं होतं न होतं तोच श्री म्हणाला, ''बाबा, शशांक विचारतोय, तुम्ही उद्या कसे अन् केव्हा येणार, नाना मोरेवाडीतच आहेत.''

रविवारी सकाळी बंगलोर एक्स्प्रेसनं मी परळीला पावणेनऊच्या सुमारास पोचलो. तिथून शशांकच्या मोटरसायकलवर दहाच्या सुमारास मोरेवाडीला पोचलो, तो नाना आमची वाटच पाहत होते. दगडी बांधणीचं जुन्या पद्धतीचं घर. कमानीचा दरवाजा. दारातून आत पाऊल टाकलं, की डाव्या-उजव्या हाताला ओवऱ्या. डाव्या हाताची ओवरी थोडी मोठी. तिचा वापर शेतीमाल साठवण्यासाठी आणि बैठक म्हणून तर उजव्या हाताची ओवरी छोटी, तिचा वापरही बैठकीसाठी. दारासमोर अंगण. अंगणात डाव्या हाताला ओळीनं खोल्या आणि दारासमोर नव्याने बांधलेलं स्वयंपाकघर. ही समोरची स्वयंपाकघराची खोली फक्त नवीन बाधंकामाची बाकी सारं घर जुन्या शैलीचं.

नानांनी आमचं स्वागत केलं, बैठकीत बसवलं अन् चहा सांगायला आत गेले. नाना, म्हणजे श्रीरंगराव मोरे. त्यांना संघटनेत नाना याच नावाने ओळखतात. उंच सडसडीत बांधा, गालाच्या हाडांना काहीसं टोक आलेलं. रंग शेतकऱ्यांचा असतो तसा. डोळे किंचित बारीक आणि चेहरा गंभीर. वयानं सत्तरी पार केलेली असूनही केसांनी काळेपणा सोडलेला नाही. डोईवर पांढरी टोपी. अंगात पांढरा, क्वचित प्रसंगी फिकट रंगाचा स्टँड कॉलरचा नेहरू शर्ट आणि पांढरं शूभ्र धोतर मराठवाडी



पद्धतीनं नेसलेलं. म्हणजे धोतराचा शेव समोर खोचलेला. नानांचा हा स्टँडर्ड ड्रेस. आपलं मत स्पष्टपणे मांडणं आणि पुढे पुढे न करणं हा त्यांचा स्वभाव. त्यामुळे आपल्याभवती नानांना कडबोळं जमा नाही करता आलं. परत स्वभाव मानी, बराचसा भिडस्त, त्यामुळे आपलं मोठेपण ते लोकापर्यंत नेऊ नाही शकले. आपल्या स्वभावातील हे सारे गुणदोष त्यांना माहीत असल्यामुळेच कदाचित त्यांनी स्वत:ला राजकारणापासून दूर ठेवलं असावं.

उठता बसता शेतकऱ्यांच्या नावाचा उदोउदो करून मतांचा जोगवा मागणाऱ्या एकाही राजकारण्याला राजकारणविरहित शेतकरी संघटना बांधावी वाटली नाही हे आश्चर्य आहे. हा प्रयोग पहिल्यांदा केला तो नानांनी आणि पुढे शरद जोशींची भेट झाल्यावर स्वत:चा सवतासुभा न मांडता स्वत:ला शेतकरी संघटनेशी बांधून घेतले हा नानांचा मोठेपणा.

अंबाजोगाई गावाला टेकूनच असलेल्या मोरेवाडीत नानांचा जन्म १९३१ मध्ये एका शेतकरी कुटुंबात झाला. मॅट्रीकपर्यंतची वाटचाल आंबाजोगाईतच झालेली. त्या काळी मराठवाड्यात आणखी शैक्षणिक वातावरण तयार व्हायचं होतं. शेतकरी कुटुंबात तर शिक्षणाची कल्पनाच आणखी यायची होती. नेमक्या अशा काळात आणि वातावरणात नानांचा जन्म झालेला. पण त्यांच्या घरच्यांना मात्र वाटायचं, आपल्या मुलानं निदान कॉलेजचा उबंरठा तरी ओलांडावा. त्या काळी शिक्षणाची सोय हैदराबादेत उस्मानिया विद्यापीठातच होती आणि हैदराबादी मुलांना ठेवण्याइतपत का होईना पण आर्थिक बळ नानांच्या घरच्यात होतं. नानांनी इंटरची परीक्षा देऊन घरच्यांची इच्छा तर पूर्ण केली. घरच्यांना वाटलं, रग्गड झालं शिक्षण, आता घरी परतावं नानानं आणि छोटीमोठी नोकरी करावी. संसाराच्या गाड्याला जुंपून घ्यावं. नानांनी त्यांच्या इच्छेला मान तुकवली आणि इतर शेकडोसुशिक्षितांप्रमाणेच शिक्षकाची नोकरी धरली. ही नोकरी चारपाच वर्षे इमानेइतबारे केली. या नोकरीतील शेवटच्या काळी त्यांची बदली नेकनूर या गावी झाली. त्या काळी नेकनूर हे गाव बागांसाठी आणि विशेष करून द्राक्षाच्या मळ्यासाठी प्रसिद्ध होतं. बागायती शेतीचं तथाकथित वैभव पाहून नाना मोहित झाले. त्यांच्या मनात चलबिचल सुरू झाली. आपल्याही घरी शेती आहे, आपल्या शेतीलाही पाण्याची सोय आहे, मग लोकांची ही अशी गुलामगिरी कशासाठी करायची? त्यापेक्षा घरच्या घरी राहून शेती करू अन् सन्मानाचं जिणं जगू, या कल्पनेने हळूहळू नानांच्या मनात घर केलं. शेकडो लोकांना नेमकं विचारानं फसवलं आणि शेती नावाच्या मायाजालात अडकवलं. ती एक गोष्ट आहे ना, मारुतीची.

त्यांच्या बेंबीत करंगळी घातली की गार वाटतं म्हणे...बेंबीत बसलेल्या विंचवानं चावल्यावर कळायचं, की हे 'गार' वाटणं किती विषारी आहे ते; पण बेंबीत बोट घातल्याशिवाय विंचू चावत नाही अन् विंचू चावल्याशिवाय 'गार'पण कळत नाही. शेतीचं असंच झालंय. सगळं सोडून शेतीत शिरावं आणि सगळं गमावल्यावर कळावा शेतीतला 'गारवा'! पण हा 'गारवा' कळेतो इतका उशीर झालेला असतो, की या दलदलीत माणूस पार बुडालेला असतो. या घालमेलीत असणाऱ्या नानांचा जीवनप्रवास परंपरेनेच चालत आलेला. पण आतामात्र एका टप्प्यावर येऊन थांबला. प्रगतीची नविन क्षेत्रे त्यांना खुणावू लागली. हातची नोकरी सोडवेना आणि हिरव्या शेतीचं स्वप्न काही बसू देईना. अशा घालमेलीत असतानाच निर्णायक क्षण अचानक समोर आला. आला म्हणजे काय अगदी धडकलाच.

झालं ते असं. त्या वेळी ज्ञानोबा पाटील हे तेव्हाच्या जिल्हा परिषदेचे (ज्याला तेव्हा डीएलबी म्हणजे डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड म्हणायचे) अध्यक्ष होते. नानांची आणि त्यांची जुनी ओळख. नाना शाळेचं काम आटोपून गाडीतळावर गाडीची वाट पाहत उभे होते. त्याच वेळी समोरून पाटलांची गाडी चालली होती. नानांना पाहून पाटलांनी गाडी थांबवली आणि घरापर्यंत लिफ्ट दिली. गाडीत बसल्या बसल्या इकडच्या तिकडच्या गोष्टी निघाल्या. काय करता, काय नाही ही चौकशी झाली. नाना सरकारी शाळेत शिक्षक आहेत आणि जाणंयेणं करतात हे पाटलांना कळलं. त्यावर पाटलांनी नानांसमोर एक प्रस्ताव ठेवला. ''शाळेतच नोकरी करायची तर गावोगावी बदलीची खटखट कशाला? आपण स्वतंत्र शाळाच काढूया ना. तुम्ही संस्था चालावायची जबाबदारी घ्या बाकी सारं मी पाहतो.''पाटलांचा हा प्रस्ताव नानांना पटला आणि त्यांच्या वाटचालीनं आणखी एक वळण घेतलं.

मागे वळून पाहतांना आता असं वाटतं, की ही सारी वाटचाल एका निश्चित दिशेकडे नानांना नेत होती. त्यांच्या पूर्वतयारीचे हे सारे टप्पे होते. पाटलांनी लिफ्ट दिली आणि नानांपुढे प्रस्ताव ठेवला. या प्रस्तावावर नानांनी विचार केला आणि निर्णय पक्का केला. नाही तरी नेकनूरला बदलून गेल्यापासून शेती करण्याचे विचार, नोकरी सोडण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात आलेली होतीच. पाटलांच्या प्रस्तावाने त्या कल्पनेला बळकटी आली. नानांनी राजीनामा दिला आणि ते मोरेवाडीला परत आले. त्यांनी पाटलांच्या मदतीने संस्था स्थापन केली. शाळाही सुरू झाली. पण अजून शेतीचा विंचू त्यांना चावायचा होता. आणि चावल्या शिवाय संघटनेची कल्पना मिळणारही नव्हती. हे सारं पुढे व्हायचं होतं, म्हणून तर याही टप्प्यात पुढचा टप्पा लपलेला होता. संस्था ठीक चालली होती. शाळेच्या बरोबर प्रारंभिक



उत्साहात शेतीही सुरू झाली. 'इब्तेदा ए इष्क है, पण आगे आगे होता है क्या' हे देखायचं होतं.

शिक्षण संस्थेत काम करतांना साहजिकच शिक्षक संघटनेशी फार जवळून संबंध आला. आपल्या हक्कासाठी, आर्थिक प्रश्नासाठी या संघटना किती जागरूक असतात हे नानांनी अनुभवलं. आपले प्रश्न सोडवून घेण्यासाठी संघटित शक्तीचा या संघटना किती आणि कसा प्रभावी उपयोग करून घेतात हेही त्यांना अनायासे पहायला, अभ्यासायला मिळालं. शिक्षकांची, कर्मचाऱ्यांची जशी संघटना असते तशी आपल्या शेतकऱ्यांची का असू नये असा विचार मूळ धरु लागला.

एव्हाना पंच्याहत्तर साल उजाडलं होतं. चारसहा वर्षांचा नोकरीचा अनुभव गाठी होता. दोन तीन वर्षांचा शेतीचा अनुभवही जमेस होता, तोही फारसा सुखद नव्हता; पण जो होता तो या व्यवसायातल्या खाचखळगे दाखवायला पुरेसा होता. एक प्रयोग म्हणून शेतकऱ्यांची एक बैठक नानांनी मोरेवाडीला बोलावली. संघटना स्थापण्याच्या दृष्टीने ही चाचपणी होती. या बैठकीला अपेक्षेबाहेर प्रतिसाद मिळाला. नानांचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा उत्साह दुणावला. या बैठकीत शेतकऱ्यांच्या संघटनेची कल्पना सर्वांनीच उचलून धरली आणि श्रीगणेशा झाला शेतकरी संघटनेचा. मोरेवाडीला रितसर कार्यालयही सुरू झालं. 'शेतकरी संघटना, मोरेवाडी' या नावानं.

यापूर्वीही शेतकऱ्यांच्या संघटना होत्याच ना; पण मग नानांच्या संघटनेचं वैशिष्ट्य काय? इतर संघटना होत्या, त्या राजकीय हेतूने प्रेरित झालेल्या होत्या. म्हणजे राजकीय पक्षाच्या अस्तित्वाला पूरक म्हणून या संघटना काम करणार. त्यांच्यापुढे कदाचित शेतकऱ्यांचे प्रश्न असतीलही, प्रसंगी या प्रश्नासाठी त्यांनी लढेही दिले असतील पण हे सारे प्रयत्न दुय्यम होते. मुळात या संघटना त्या त्या राजकीय पक्षाच्या कृषिशाखा म्हणून काम करीत होत्या. राजकीय नेतृत्वाच्या तोंडाकडे पाहून आणि पक्षाच्या मतलबाकडे डोळे लावूनच हे लढे झाले.

शेतकरी कामगार पक्षानं तर पक्षाची स्थापना ही मुळातच शेतकऱ्यांचं नाव घेऊनच केली. काळाच्या ओघात या पक्षातून हळूहळू शेतकरी वगळल्या गेले आणि प्रामुख्याने 'कामगारांचा' हा पक्ष राहिला. इतरही पक्षांची अवस्था यापेक्षा वेगळी नव्हती; पण नानांच्या शेतकरी संघटनेनं राजकीय उद्दिष्टापासून पुरती फारकत घेतली होती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावरच लक्ष केंद्रित केलेलं होतं. त्यांचा प्रयत्न प्रामाणिक होता, हेतूही शुद्ध होता पण त्यांना उत्पादनखर्चावर आधारित भाव हे मूळ सूत्र आणखी गवसलं नव्हतं. शेतकऱ्यांच्या दुखण्याचे निदान करण्याच्या

दृष्टिने आणखी चाचपडणच चाललेलं होतं.

या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा होते. या काळात महाराष्ट्रातील शासकीय कर्मचाऱ्यांनी चौसष्ट दिवस संप चालवला होता. इतका दीर्घकाळ संप चाललेला होता आणि त्या संपापुढे राजकीय पक्षच काय पण शासनही हतबल झालेलं होत. या काळात नानांनी या संपाच्या विरोधात शेतकऱ्यांचा एक प्रचंड रुमणे मोर्चा काढला. कर्मचाऱ्यांच्या संपापुढे जिथे शासनही दाती तृण धरूनशरण जाण्याच्या मन:स्थितीत होतं तिथे नानांनी शेतकऱ्यांचा आवाज या संपाविरोधात बुलंद केला. पुढे चालून नव्वदीत शेतकरी संघटनेनं 'भ्रष्टाचार चले जाव'ची घोषणा देऊन'Q'आंदोलन पुकारलं त्याची मुळं या नानांच्या आंदोलनात आहेत. या आंदोलनातील नानांची घोषणाच मुळी, 'भ्रष्टाचारी नोकरशाहीचा धि:कार असो' अशी होती. या मोर्चाची तयारीही नानांनी भरपूर केली होती. त्यामुळे प्रतिसादही प्रचंडच मिळाला. या तयारीच्या काळात शेती फायदेशीर का होत नाही? शेतकरी वर्षानुवर्षे गरिबीत का पिचत राहतो? कर्जात का राहतो? हे सारे प्रश्न पुढे येत गेले. संपाच्या निमित्ताने कर्मचाऱ्यांचे राहणीमान, सुबत्ता, सुबत्तेतून निर्माण झालेली शैक्षणिक संपन्नता आणि या सर्वांच्या विरोधात शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचं चित्र बटबटीतपणे उभं राहिलं. याची चर्चाही शेतकऱ्यांत व्हायला लागली.

हे सारे प्रश्न अशा तऱ्हेचे हळूहळू; पण निश्चितपणे पुढे येत असताना, शरद जोशींचं आगमन भारतात झालं, याच सुमारास भारतीय शेतकऱ्यांच्या गरिबीचा शोध घेणारी त्यांची 'प्रयोग शाळा' आंबेठाणला तयार होत होती. शेती व्यवसायाच्या विरोधकांची घटका भरत येण्याची प्रक्रिया सुरू झाली म्हणता येईल का? नानांनी हा हल्ला बोल पुकारायला आणि शरद जोशींचं भारतीय पटलावर आगमन व्हायला एकच वेळ आली. आंबेठाण आणि आंबेजोगाई या दोन नावात केवळ 'अंबा' च नाही तर आणखीही काही तरी समान होत.

खरं तर नानांनी शिक्षण संपवून गावी परतण्याचा काळ हा मराठा समाजातील शिकलेल्या युवकासाठी राजकारणात प्रवेश करून स्वत:चं आणि जमलंच तर आपल्या अवतीभवतीच्या सोयऱ्याधायऱ्यांचं भलं करून घ्यायचा आणि या साऱ्या झमेल्यातुन आणखीही काही जमलं तर गावाचंही भलं करून घ्यायचा विचार करायचा काळ. महाराष्ट्रात आणखी विशेषकरून मराठवाड्यात शेतकरी कामगार पक्षानं आपले पाय सक्षमपणे रोवले होते. त्यांचा मुकाबला करण्यासाठी कै. यशवंतराव चव्हाणांनी दंड थोपटले होते. त्यांच्या योजनेप्रमाणे काँग्रेसमध्ये बहुजन समाजाला विशेष स्थान नव्हते. ते मिळवून देणं या मुकाबल्यासाठी आवश्यक



होतं. म्हणून त्यांनी मराठा समाजातील, संपन्न कुटुंबांतील सुशिक्षित युवकांना काँग्रेस पक्षाकडे आकृष्ट करण्याचे आवर्जून प्रयत्न केले. तेही साधारणत: याच सुमारास किंवा त्याच्याही काहीसं आधी. त्यामुळे निदान मराठवाड्यात तरी जिल्हा परिषदेत राजकारणात मोठ्या प्रमाणावर मराठा समाजाची भरती झाली ती या काळातच. यशवंतरावांच्या या प्रयत्नांना मराठवाड्यात यशही भरपूर मिळाले. इतिहासाची पुनरावृत्ती होते म्हणतात. त्याप्रमाणे अशात या इतिहासाची पुनरावृत्ती झाली. मुळ काँग्रेसमधून बाहेर पडून श्री. शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली, तेव्हा मराठवाड्यातील नव्हे तर महाराष्ट्रातील मराठा समाजामधून मोठा पाठिंबा मिळवण्यात ते यशस्वी झाले. नानांचं मोठेपण ठळकपणे जाणवतं ते यासाठी की राजकारणात प्रवेश करण्याचा राजमार्ग खुणावत असतानाही त्यांनी त्या मोहाकडे पूर्ण दुर्लक्ष केले आणि सारं लक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नावर केंद्रित केलं. नानासारखे कार्यकर्ते आजही संघटनेत मोठ्या प्रमाणावर आहेत, यामुळेच शेतीचा प्रश्न सुटण्याची आशा अजूनही जिवंत आहे.

नाना शेतकरी संघटनेकडे आले कसे? या प्रश्नाचं उत्तर डायरेक्ट फ्रॉम हॉर्सेज माऊथ: ''याच सुमारास मी शरद जोशींचं नाव अधूनमधून पेपरात वाचत होतो. त्यांनी चालवलेल्या आंदोलनाबाबत साहजिकच उत्सुकता होती. याच सुमारास केव्हा तरी एक बातमी वाचण्यात आली. तीत असं नमूद केलेलं होतं, की नाशिक जिल्ह्यात श्री. माधव खंडेराव मोरे यांच्या गावी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी शेतकऱ्यांची एक व्यापक बैठक बोलावण्यात आलेली आहे आणि या बैठकीला मार्गदर्शन करण्यासाठी स्वत: शरद जोशी येणार आहेत. आतापावेतो वर्तमानपत्रातून वेळोवेळी आलेल्या बातम्यांमुळे शरद जोशी, माधव खंडेराव मोरे यांची नावे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना चांगलीच परिचित झालेली होती. तेव्हा या बैठकीला आपणही हजर राहावं असं मी ठरावलं. यापूर्वी माझी आणि शरद जोशी, माधवराव मोरे यांची ओळखही नव्हती किंवा पत्रव्यवहारही नव्हता. या बैठकीचं आमंत्रणही नव्हतं. पण पेपरातल्या बातमी मुळे मला उत्सुकता वाटली आणि मी या बैठकीत सहभागी होण्यासाठी माधवरावांच्या गावी रवाना झालो. एव्हाना मीही शेतकऱ्यांची संघटना बांधलेली होती. पत्रके काढलेली होती. काही आंदोलनेही छेडलेली होती. वृत्तपत्रातून काही बातम्याही या संदर्भात आलेल्या होत्या, त्यांची कात्रणेही मी सोबत घेतली आणि या साऱ्या पसाऱ्यासह बैठकीत हजर झालो. चर्चेत सहभागी झालो. माझी भूमिका मांडली आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांचं प्रतिनिधित्वही केलं.'' या बैठकीला साहेब, माधवराव मोरे यांच्याशिवाय प्रल्हाद

पाटील कऱ्हाडही होते.

नानांची आणि साहेबांची भेट ही होणार होतीच. एकाच मार्गाने वाटचाल करणाऱ्यांची भेट होणं अपेक्षितच होतं. 'प्यार तो होना ही था!' या बैठकीत सर्वांच्या भेटीगाठी झाल्या. विचारांची देवाणघेवाण झाली आणि नानांना एक दिशा मिळाली. त्यांच्या जीवनाला या भेटीत एक नवीन वळण लागलं. शेतकरी संघटनेचं काम मराठवाड्यात पसरवण्याचा जिम्मा नानांनी आनंदानं उचलला. पहिलं पाऊल म्हणून नानांनी मोरेवाडीला कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणासाठी तीन दिवसांचं एक शिबिरही आयोजित केलं. एकदा कामाला जुंपून घेतलं, की टंगळमंगळ करणं नानांच्या स्वभावात नाही. त्यांनी पूर्णत्वाने या कामाला जुंपून घेतलं. 'हमे शबनम की तऱ्हा रोना नही आता, हम रोने पे आये तो दरिया बहा देते है।' या शिबिराला स्वत: शरद जोशी पूर्ण तीन दिवस जातीनं हजर होते. हे शिबिर अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरलं. एक तर मराठवाड्यातलं हे पहिल शिबिर. दुसरं, यापूर्वी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर झालेलंच नव्हतं. तिसरं, या प्रशिक्षण शिबिरात शरद जोशींनी जे मार्गदर्शन केलं आणि जी मांडणी केली, तीच पुढे पुस्तकरूपानं प्रसिद्ध करण्यात आली. त्या पुस्तकाचं नाव 'शेतकरी संघटना: विचार आणि कार्यपद्धती'. हे पुस्तक म्हणजे शेतकरी संघटनेसाठी तर जणू भगवद्‌गीताच? पण त्याही पलीकडे शेतकरी अर्थशास्त्राची नव्याने अन् आगळीवेगळी सैद्धांतीक मांडणी होती. दुर्दैवाने या आर्थिक सिद्धांताचा महाविद्यालयीन स्तरावर अभ्यास होणे आवश्यक असूनही तसा विचार झाला नाही. भारतीय अर्थशास्त्राची मांडणी करताना आपण आजही पाश्चिमात्य तत्त्वज्ञांच्या प्रतिपादनाची भेंडोळी अभ्यासतो; पण आपल्या मातीतलं, आपलं प्रतिपादन आपण दुर्लक्षितो ही दुर्भाग्याची गोष्ट आहे. इथून नाना जे कामाला लागले ते त्यांनी परत वळून पाहिलं नाही.

मोरेवाडीचं शिबिर कार्यकर्त्यांसाठी महत्त्वाचा टप्पा, तर सर्व सामान्य शेतकऱ्यांसाठी सटाण्याला संपन्न झालेलं शेतकरी संघटनेचं पहिलं अधिवेशन हा महत्वाचा टप्पा. या अधिवेशनात नाना सहभागी झाले होते. त्यांनी सारं अधिवेशन आपल्या बारीक डोळ्यांनी टिपलं. अधिवेशनात सहभागी होताना, चर्चेत भाग घेताना त्यांना कधी कल्पनाही आली नाही, की पुढच्या अधिवेशनाची माळ त्यांच्या गळ्यात पडेल. पण सटाणा अधिवेशनाचं सूप वाजलं ते पुढच्या अधिवेशनाची घोषणा करून, "आता पुन्हा भेटूया ८४ च्या फेब्रुवारी परभणीला, स्वागताध्यक्ष राहतील श्रीरंगराव मोरे"

सटाणा अधिवेशन सर्वच दृष्टीने अपूर्व, उर दडपून टाकणारं, उपस्थिती



व्यवस्था, सारं सारं भव्य. तसं राजकीय पक्षांच्या अधिवेशनाच्या मानानं मांडव वगैरे 'किस गली में गलबला'; पण लोकांचा उत्साह आणि अती प्रचंड उपस्थितीनं राजकीय पक्षाची अधिवेशनं पार धुऊन टाकली. आता नानांना प्रश्न पडला, आपल्याला एवढं अधिवेशन पेलवेल का? आधीच मराठवाड्यात काम कमी. हाती पैसा नाही, पाठीशी पैसेवाले नाहीत. राजकीय पक्षांनी, विशेषत: सत्तारूढ काँग्रेसने उभा दावा धरलेला; पण सटाणा अधिवेशना आधीच सरकारनं नानांना एक छानसं बक्षीस दिलं. या बक्षिसामुळे तर नाना शेतकरी संघटनेशी पक्केच बांधले गेले. दहा नोव्हेंबर १९८१ ला शेतकरी संघटनेनं रास्ता रोको आंदोलन पुकारलं. या आंदोलनाला लोकांनी ठिकठिकाणी उत्स्फूर्त आणि व्यापक पाठिंबा दिला. हे आंदोलन चिरडून टाकण्याचा शासनानं निश्चय केला असावा आणि हे म्हणे शेतकऱ्यांचं सरकार.

तेव्हाच्या मुंबईत बसलेल्या कंसाला देववाणी झालेली कळली असावी. तुमच्या सरकारचा नायनाट करण्यासाठी शेतकरी संघटनेच्या रूपानं एका कृष्णानं जन्म घेतलाय. तेव्हा या कृष्णाच्या जन्माचा धाक घेऊन मुंबईतल्या कंसानं तेव्हा जिथे जमेल तिथे शेतकरी संघटनेचा घात केला. पहिल्यावहिल्या आंदोलनात पहिले दहाबारा दिवस आंदोलन शांततेनं चाललं होत. त्यानंतर मात्र असं काय घडल, की सरकारला गोळीबार करावा लागला! दहाबारा जणांचा बळी घ्यावा लागला. ८१ च्या आंदोलनात पानगावी रमेश मुगेचा बळी घ्यावा असा गुन्हा तरी काय केला होता शेतकऱ्यांनी? ८६ च्या कापूस आंदोलनात महाराष्ट्रातून साठसत्तर हजारांवर लोकांना अटक, तुरुंगवास आणि सुरेगावला गोळीबारात तीन शेतकऱ्यांचा बळी, हे सारं कशासाठी? कुणासाठी? मथुरेच्या कंसाचा बळी गोकुळातल्या कृष्णानं शेवटी घेतलाच. त्या वेळी कंसाला आपलं भविष्य कळलं पण दिसलं नाही, तसं याही कंसाला.

नानांनी शेतकऱ्यांसाठी बाधलेल्या संघटनेच्या कामगिरीचं छानसं बक्षीस शासनानं त्यांना अटक करून दिलं. नोव्हेंबर ८१ च्या आंदोलनाआधी दोन दिवस नाना व त्यांच्या सहकाऱ्यांना आंदोलनपूर्व अटक करण्यात आली अन् त्यांची रवानगी बीडच्या तुरुंगात करण्यात आली.

कोंबडं झाकलं म्हणून दिवस उगवायचा थोडी राहतो. आंदोलन तर झालंच सुरू. गोऱ्या इंग्रज सरकारने केलेल्या चुकांपासून काळ्या इंग्रजांनी कांहीच बोध घेतला नाही. जुलूम जबरदस्तीनं न जमणाऱ्या गोष्टी गोडीगुलाबीत जमू शकतात हे ते विसरूनगेले. लोकशाहीत आपला आवाज बुलंद करण्याचा हक्क नागरिकांना

आहे, या हक्काला घटनात्मक सरंक्षण आहे आणि हा लोकशाहीचा गाभा आहे. हे सारं सारं सरकार विसरून गेलं. झालं एवढंच, की लोकांनी अधिक जोशात अधिक व्यापक आंदोलन रास्ता आणि रेल रोकोच्या रूपानं केलं. परळी-बीदर या रेल्वे रस्त्यावर पानगावी तर फार मोठ्या संख्येनं लोक जमा झाले. दुर्दैवान सर्व प्रमुख नेत्यांना आंदोलनपूर्व अटक करण्याचा अती शहाणपणाचा निर्णय तेव्हाच्या अधिकाऱ्यांनी घेतला आणि त्यामुळे झालं असं की या ठिकाणी आंदोलनाचं नेतृत्व करायला कुणीही जबाबदार नेता हजर राहू शकला नाही.

ही दुर्दैवी घटना घडली ते पानगाव हे परळी-बीदर दरम्यानचं रेल्वे स्टेशन. लोकांनी आपणहून हे ठिकाण निवडलं होतं. रेल रोको आंदोलनासाठी सकाळपासून हळूहळू लोक जमायला सुरवात झाली. जमाव वाढला तसं पोलिसांच्या पोटात दुखायला लागलं. जमाव कसंही करून पांगवणं त्यांना आवश्यक वाटलं. जमावाचं एक मानसशास्त्र असतं. जमाव हाताळण्याचंही एक तंत्र असतं. या तंत्राशी पूर्ण अनभिज्ञ असलेल्या एका पोलिसच्या माणसानं आपल नेहमीचं हडेलहप्पी तंत्र वापरलं. त्याचा परिणाम नेमका उलटा झाला. मूठभर पोलिस आणि प्रचंड जमाव. साहजिकच पोलिसांच्या आवाक्याबाहेरची गोष्ट होती आणि हे समजण्याचं शिक्षणपण एकतर पोलिसांकडे नसावं किंवा काहीही करून लोकांत दहशत निर्माण करण्याचा निर्णय झालेला असावा. ते कांहीही असो. त्यामुळे झालं काय, की जमाव संतप्त झाला. त्यांनी पोलिस अधिकाऱ्याला हाताळलं. त्या मुळे पोलिस अधिक संतप्त झाले. पहिली आगळीक कोणी केली याला आता काही महत्त्वच उरलं नव्हतं. परिणामी पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी गोळीबाराचा अवलंब केला. या गोळीबारात रमेश मुगे या तरुणाचा बळी गेला. शेतकरी आंदोलनाची ही एक शोकांतिकाच ठरली आहे. प्रत्येक मोठ्या आंदोलनात गोळीबार आणि गोळीबारात बळी हेही ठरलेलं. पहिल्यावहिल्या नाशिक-आग्रा रोड आंदोलनात तर बळीच बळी. पानगावच्या आंदोलनात रमेश मुगेचा बळी. चिकोडीच्या तंबाखू आंदोलनात, ८६ च्या कापूस आंदोलनात... ही यादी अशी किती लांबवणार? राजकीय पक्षांच्या आंदोलनापुढे गुढघे टेकणाऱ्या पोलिसांना शेतकरी संघटनेच्या आंदोलनात हत्तीचं बळ चढतं आणि बळी घेऊनच त्यांचा आत्मा शांत होतो. नाही तरी या देशानं आतापावेतो शेतकरी हिताचा बळी देतच वाटचाल केलेली आहे. रमेश मुगेंच्या शहिदीनं वातावरण आणखीनच चिघळलं. पानगावच्या या आंदोलनाच्या प्रतिक्रिया साऱ्या मराठवाड्यात उमटल्या. पानगावचा जमाव तर काही केल्या शांत होईना. आतापावेतो आक्रमक असलेल्या पोलिसांना पळता



भुई थोडी झाली. लोकांना शांत करण्यासाठी आणि आंदोलन आवरतं घेण्यासाठी शेवटी शासन नानांना तुरुंगात शरण गेलं. नानांनी विचार केला, अधिक नरसंहार नको. आंदोलन अधिक काळपर्यंत चालू राहणं शेवटी उभयपक्षी त्रासदायकच. तेव्हा नाना पोलिसांच्या गाडीत पानगावी गेले. त्यांनी लोकांना शांत केलं आणि भडकत जाणारं आंदोलन संपवून लोक घरोघरी परतले. संघटनेच्या नेत्यांना आंदोलनपूर्व अटकेचा निर्णय शासनाने घेतला नसता तर रमेश मुगेचा बळी गेला नसता.

पुढच्या एका आंदोलनाचा अनुभव इथे सांगण्यासारखा आहे. पुढे असंच महाराष्ट्रभर रास्ता रोको आंदोलन पुकारलेलं होतं. त्याआधी परभणीतील तेव्हाच्या जिल्हा पोलिस अधीक्षकांनी या आंदोलनाबाबत चर्चा करण्यासाठी मला बोलावून घेतलं. परभणीत ८६ मध्ये आंदोलनात झालेल्या गोळीबारात तीन जण मरण पावले होते. त्यामुळे परभणीतील वातावरण हिंसक झालं होतं. इतकं, की झीरो फाटा ते हिंगोली या रस्त्यावर सातआठ दिवस संपूर्ण वाहतूक ठप्प होती. पोलिसांना तर तोंड लपवूनच राहावं लागलं. हा इतिहास शासनाच्या लक्षात होता. तेव्हा आंदोलन शांततेत पार पडावं यासाठी काय करता येईल हा चर्चेचा विषय होता. त्यावर मी सुचवलं की आंदोलनाआधी प्रमुख कार्यकर्त्यांना उचलून नेण्याची पद्धत बंद करा. आंदोलनाची अनेक ठिकाणे ठरलेली आहेत. त्या त्या ठिकाणी नेतृत्व करण्यासाठी जबाबदार कार्यकर्त्यांची नेमणूक केलेली आहे. त्यामुळे सारं आंदोलन शांततेत पार पडेल. आंदोलकांना अटक करणं आवश्यक वाटत असेल तर सर्वांना एकदम अटक न करता तुकड्या तुकड्यांनी अटक करा आणि सर्वात शेवटी प्रमुखांना अटक करा. त्यामुळे जमाव शिस्तीत राहील. त्याप्रमाणे शासनानं धोरण आखलं आणि ते आंदोलन मात्र कुठेही काहीही हिंसक प्रकार न होता शांततेत पार पडलं. व्यक्तिश: मला त्या दिवशी सकाळीच अटक करून पोलिस अधीक्षकांच्या कार्यालयात बसवून ठेवलं होतं. मधेच वसमत तालुक्यातील आरळ फाट्यावर गडबड होण्याची शंका आल्यावरून पोलिसांच्या गाडीत मला त्या स्थळी नेण्यात आलं. तिथेल बहुतेक कार्यकर्ते परिचयाचे असल्यामुळे शंकासमाधान करून होऊ घातलेला अनुचित प्रसंग टाळता आला. त्यानंतर मानवतरोड मार्गे सेलूपर्यंतच्या स्थळांची पोलिसांच्या गाडीत आम्ही पाहणी केली. झालं असं, की कार्यकर्त्यांना दिवसभर स्थळावरच अटक करून बाजूला बसवण्यात आलं, सायंकाळी सोडून देण्यात आलं. आंदोलन शांततेनं पार पडलं. हाच कित्ता आधी गिरवला असता तर?

शेतकऱ्यांची संघटना बांधताना नानांनी प्रचाराचाही विचार केला आणि १९८० ते ८४ अशी चार वर्षे 'भूमिसेवक' या नावाचं साप्ताहिकही चालवलं होत. अर्थातच धस सोसून. त्यातील बहुतांश लिखाण स्वतः नानांनीच केलेलं असायचं. या अंकाचं एक वैशिष्ट्य म्हणजे बहुतेक अंकातून प्रसिद्ध कवी श्री. विठ्ठल वाघ यांची एखादी नवी कविता प्रसिद्ध होत असे. त्यांनी सतत चार वर्षे आपलं योगदान या साप्ताहिकाला दिलं. ८४ च्या परभणी अधिवेशनात तर 'भूमिसेवक' चे अंक हातोहात विकले गेले. नानांच्या व्यक्तिमत्त्वाचा हा पत्रकारितेचा पैलू आजच्या किती कार्यकर्त्यांना माहीत असेल. 'भूमिसेवक'चा शेवटचा अंक निघाल्यालाही आता अठरावीस वर्षे झाली.

१९८२ मध्ये सटाणा अधिवेशनात पुढील अधिवेशन ८४ साली परभणीत करण्याची घोषणा झालेली. तेव्हा वर्षाआड अधिवेशन ही कल्पनाही रुजली. परभणी अधिवेशनाची माळ नानांच्या गळ्यात पडलेली. तेव्हा नाना आता त्या तयारीला लागले. त्यांच्या मार्गात अडचणी अनेक होत्या. मराठवाड्यात आणखी संघटनेनं पाय रोवलेला नव्हता. संघटनेचा फारसा प्रचारही नव्हता, कार्यकर्त्यांची फौजही नव्हती. पैशाची तर बातच नाही करायची; पण या अडचणी सांगायच्या कुणी अन् कुणाला?

या अडचणींचा डोंगर चढून जायला एक घोरपड मात्र नानांना सापडली होती. परभणीला असलेलं कृषी विद्यापीठ आणि त्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांची युवा फौज आणि या फौजेचा नेता आजचा आघाडीचा, एक युवा साहित्यिक शेषराव मोहिते. आज हेच शेषराव मोहिते लातुरात एका महाविद्यालयात कृषिशास्त्राचं अध्यापन करताहेत. त्यांनी कवी व कादंबरीकार म्हणून नाव कमावलेलं आहे. साहित्याच्या माध्यमातून आजही ते संघटनेचा विचार मांडताहेत. ग्रामीण मराठी लेखकांच्या पुढे त्यांनी खरंखुरं ग्रामीण जीवन उभे करण्याचं आव्हान उभं केलेलं आहे. परभणी अधिवेशन काळात मात्र हेच शेषराव कृषी विद्यापीठात शिकत होते. त्यांच्या सोबत सुयश डाके, रमेश चिल्ले, लक्ष्मीकांत देशमुख ऊर्फ एलप्पा हे आणि इतर विद्यार्थ्यांचा ताफा होता. साऱ्यांनी १० नोव्हेंबर ८१ चा रेलरोको-रास्तारोको यशस्वी केला होता. तोपावेतो शेतकरी संघटनेचं केवळ नावच ऐकलेलं होतं या युवा सेनेनं, आता प्रत्यक्ष कामात गुंतले हे सारे.

पण याहीपेक्षा मोठं हत्यार नानांना उपलब्ध झालेलं होतं. सटाणाच्या प्रचंड प्रतिसादामुळे उत्साहित झालेले श्री. शरद जोशी हे स्वतः या अधिवेशनासाठी महाराष्ट्रभर प्रचार दौऱ्यात जातीनं हजर राहणार होते. महाराष्ट्रात शरद जोशी, तर



परभणी जिल्ह्यात आणि अवतीभवतीच्या परिसरात प्रचाराची आघाडी सांभाळणार होते माधव खंडेराव मोरे आणि प्रल्हाद पाटील कऱ्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रताप बांगर, नारायण जाधव, प्रा. सुरेश सोनी, बिरबीलसिंग ठाकूर, गोपाळ व्यास आणि शेषराव मोहितेंच्या नेतृत्वाखालील विद्यार्थ्यांची फौज. या लोकांनी कामाची विभागणी करून घेतली आणि स्वतः नाना स्वागताध्यक्ष म्हणून या अधिवेशनाचं आवतन द्यायला साहेबांबरोबर महाराष्ट्र दौऱ्यात हजर राहिले. प्रचाराच्या या साऱ्या रणधूमाळीनं अधिवेशनासाठी योग्य ते वातावरण तयार झालं. परभणी अधिवेशनाला या प्रचार मोहिमेचा लाभ झाला आणि न भूतो न भविष्यती अशा उत्साही वातावरणात, उपस्थितीत हे अधिवेशन पार पडलं. तेव्हापासून नाना आणि शेषराव मोहिते यांची नावे महाराष्ट्रात सर्वदूर पोचली. त्यावेळी प्रचारासाठी म्हणून, एरवी वाया जाणाऱ्या एंजीन ऑईलचा वापर ठिकठिकाणी संघटनेच्या घोषणा आणि अधिवेशनाच्या जाहिराती लिहिण्यासाठी करण्यात आला. आजही अनेक खेड्यापाड्यांतून, महारस्त्यावर तेव्हाच्या या जाहिराती दिसतात. अठरा वीस वर्षांचा काळ लोटून गेल्या त्या अधिवेशनाला; पण आजही लोक त्या अधिवेशनाच्या आठवणी काढताहेत.

मात्र याच अधिवेशनात काही कटू घटना घडल्या, त्याचे दूरगामी परिणामही झाले. पुढे चालून अनिल गोटे यांनी संघटनेत फूट पाडायचे प्रयत्न केले. त्याची बीजं याच अधिवेशनात पेरली गेली. अनिलच्या अथक प्रयत्नामुळे नानांना व शेषराव मोहित्यांना अनेक कटू प्रसंगांना तोंड द्यावं लागलं. या अग्नीदिव्यातून नाना व मोहिते पार तर पडलेच पण त्याच्या कटू आठवणी आजही रेंगाळताहेत. अनिल गोटे बऱ्याच नंतर संघटनेबाहेर तर पडले; पण नाना मात्र आजही संघटनेशी इमान राखून आहेत. शरीरप्रकृती आता साथ देत नाही, पण अधिवेशन आणि महत्त्वाच्या बैठकांना ते आवर्जून उपस्थित राहतात. प्रकाशझोतात तर नाना पूर्वीही नव्हते, आजही नाहीत. त्यांनी झिलकरी आपल्याभोवती जमा केले नाहीत आणि कधी गटबंधनही केले नाही. त्यांच्या मनात कटुता अजिबात नाही पण काही एक खंत जरूर असावी. मी त्यांना खोदून खोदून बरेच प्रश्न विचारले; पण त्यांनी ती खंत व्यक्त केली नाही. मात्र त्याच्या अस्तित्वाची जाण येते. ढगांच्या झिरझिरत्या पडद्याआडून अधूनमधून चंद्र नाही पण त्याचा प्रकाश दिसावा तशी.

परभणी अधिवेशनापासून नाना दुःखी तर झाले; पण त्यांनी काम सोडलं नाही. शेतकरी संघटनेचं उपाध्यक्षपद त्यांनी यानंतर भूषवलं. पुढे जयसिंगपूरला, अजित नरदेच्या गावी झालेल्या संघटना बैठकीत नानांनी ज्वारी परिषदेची कल्पना मांडली

आणि आग्रहाने सर्वांना पटवून दिली. ज्वारी हे मराठवाड्याचं प्रमुख पीक. तेव्हा ही परिषद मराठवाड्यात व्हावी हा आग्रह धरला. तेव्हा अंबाजोगाई येथे (दोनदिवसीय) ज्वारी परिषद महामेळावा आणि विस्तारित कार्यकारिणी बैठक असा कार्यक्रम ठरला. मोरेवाडीला ही परिषद पार पडली. कार्यकर्ता बैठकीच्या एका सत्रात शरद जोशी यांनी याच परिषदेत पाणी अडवा, पाणी जिरवा ही कल्पना मांडली. त्यावर एक अख्खं सत्र चाललं. पाणी जिरवण्यासाठी काय काय करता येईल याची तपशीलवार चर्चा या सत्रात झाली. पाण्यानं आज जे भयाण रूप धारण केलंय त्याबद्दल त्या वेळी शरद जोशी यांनी केलेलं भाष्य आणि विचारमंथन किती दूरदर्शी होतं हे आज जास्त प्रकर्षानं जाणवतं. दूर्दैवाने या अनेक सूचना शासनाने तर सोडाच सोडा; पण स्वत: कार्यकर्त्यांनीही अंमलात आणल्या नाही हा भाग वेगळा. परभणी अधिवेशनानंतरचा महाराष्ट्र दौरा, मोटारसायकल रॅली, नांदेड, धुळे, अमरावती, नागपूरची अधिवेशने आणि महामेळावे, कापूस आणि पानफुलाची आंदोलने यात नानांचा सक्रिय सहभाग होता.

वीसपंचेवीस वर्षांच्या या अथक परिश्रमानं नानांच्या आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम झाला. एरवीच नाना काही धनवान शेतकरी नव्हतेच. तशात नोकरी सोडून शेती आणि संघटना यांना त्यांनी वाहून घेतलं. शेतीची तर सर्वत्रच वाट लागलेली पण संघटनेत निदान कामाचं तरी समाधान होत. आतामात्र प्रकृतीही ढासळली. दौऱ्यांची दगदग सहन होईना. तेव्हा 'न धरी शस्त्र करी, युक्तीच्या गोष्टी सांगेन चार मी'ही भूमिका नानांची स्वीकारली. मोरेवाडीतल्या आपल्या घरी ओसरीतल्या तक्क्याला टेकून नाना उद्याची स्वप्नं तर नाहीच नाही, पण कालचा संघटनेतील मान मरातबाचा काळ आठवत असतील का?

■■



# भाऊ

राजकीय पक्षांच्या लोकांचा एक छाप असतो. छापाचा गणपती असतो ना, तसा, निदान पूर्वी तरी होता, आजकाल असं नाही. हल्ली सर्व राजकीय पक्षांच्या लोकांचा एकच छाप असतो. कडक इस्त्रीचे, तलम, टेरी खादीचे शुभ्र पांढरे कपडे. हाताच्या बोटात कुठल्या ना कुठल्या महाराजांच्या अंगठ्या. कानाशी सतत मोबाईल, कपडे काढून बाहेर येऊ पाहणारी शरीरयष्टी, चेहऱ्यावर संपन्नतेची तकाकी, वागण्यात उद्दामपणा, प्रसंगी लाचारी. या वर्णनाचा कुणी माणूस दिसला, की नक्की समजावं हे महाशय कुठल्या न कुठल्या पक्षाचे नेते आहेत. मी वेगवेगळ्या छापाचे कार्यकर्ते म्हणतोय ते आजचे नाही तर जुन्या काळचे. म्हणजे गोविंदभाई श्रॉफ, अनंत भालेराव, एस.एस. जोशी, नानासाहेब गोरे यांच्या काळाचे. त्या काळच्या समाजवादी लोकांचा एक छाप होता. खादीचे जाडेभरडे धुवत कपडे. त्यावर कोट किंवा जाकीट, तेही धुवट. खांद्याला शबनम, डोईवर बीन कुंपणाचे केस. पायात अंगठा तुटलेली चप्पल, किमान टाचा घासलेली तरी. या वर्णनाचा माणूस दिसला, की समजावं हा नक्की समाजवादी! हे लोक शक्य तो आपापला कळप करून राहणार, छोटे छोटे कळप! चेहरा सदा गंभीर. बोलले तर भाषण देताहेत असं वाटणार पण या वर्णनात बिलकूल फिट न बसणारा माणुस म्हणजे भाऊ. भास्कर भाऊ बोरावके. खादीचे, स्वच्छ धुतलेले, पांढरे शुभ्र कपडे. म्हणजे विजार अन् सदरा तेही नीट नीट इस्त्री केलेले. केस नीटनेटके, भांग काढलेला, चेहऱ्यावर ओळखीची दाद आणि पांढरे शुभ्र दात दाखवणारे हास्य! समोरचा माणूस अगदी अनोळखी असला तरी भाऊंशी बोलताना त्याला काही अवघडल्यासारखं वाटणार नाही. भाऊंचं मोठेपण त्यांच्या बोलण्यात ते जाणवू देत नाहीत. नंतर केव्हा तरी समोरच्या माणसाला आपण कुणाशी बोलत होतो हे कळत तेव्हा तोही उद्गारतो, ''म्हणजे ते प्रसिद्ध भास्करराव बोरावके हेच तर!'' घोडा घोडा म्हणतात तो हाच! समोरच्या माणसाशी भाऊ ओळखीच्या गप्पा मारणार. गप्पा म्हणजे शुद्ध गप्पा, भाषणबाजी नाही. असे असमाजवादी भाऊ समाजवादी राहिले कसे हे मला पडलेलं पहिलं कोडं आणि या मेळाव्यातून बाहेर पडून शेतकरी संघटनेत आले कसे हे दुसरं कोडं. या दोनही कोड्यांचं नाव भाऊ,

भास्कर भाऊ बोरावके!

शेतकरी संघटनेचे अनेक अध्यक्ष झाले; पण नेमके अध्यक्ष होते तेव्हा आणि नव्हते तेव्हाही सामान्य कार्यकर्त्यांना भाऊ नेहमी जवळचे वाटायचे. भाऊंच्या वागण्यातही कधी हा नेता, तो कुणी मोठा कार्यकर्ता, हा तर सामान्य कार्यकर्ता अशी वर्गवारी नव्हती. सर्वसामान्य कार्यकर्तेसुद्धा भाऊंशी अगदी सहजतेने बोलत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातली शालीनता; वागण्यातला, राहण्यातला साधेपणा, हा माझ्यासाठी एक उत्सुकतेचा विषय राहिला आहे. मला वाटतं, त्यांच्या स्वभावातला हा सारा भाग आलाय तो स्थलांतरितांच्या मानसिकतेतून.

तसे भाऊंचं कुटुंब स्थलांतरितच. त्यांचं मूळचं गाव सासवड, पुण्याजवळचं, मावळातलं. सासवडचं हे झाड कलम करून कोपरगावच्या परिसरात लावलं, तिथेच ते वाढलं, मोठ झालं. अगदी विशाल वटवृक्षासारखं. हे घडलं भाऊंचा जन्म झाल्यानंतर. एकतीस मध्ये जन्मलेले भाऊ अशा तऱ्हेने दुहेरी नागरिक झाले. जन्माने मावळातले आणि कर्मानं कोपरगावचे. असं स्थलांतर करणारं कुटूंब एकट्या भाऊंचं नव्हतं. सासवड आणि त्या परिसरातील अनेक कुटुंबांनी स्वातंत्र्यपूर्व काळात हे स्थलांतर केलं. सासवडच्या परिसरात या साऱ्यांची थोडी थोडी शेती होती. तीवर जेमतेम गुजराण होत असे. प्रगतीला फारसा वाव नव्हता. अशा परिस्थितीमुळे या कुटुंबात एक अवस्वस्थता होती.

अशा अवस्थेत असताना या लोकांच्या कानावर असं आलं, की कोपरगाव आणि अवतीभोवतीच्या परिसरात इंग्रजांनी गोदावरी कालवा काढलाय आणि त्याचं पाणी बऱ्याच ठिकाणी खेळवलंय. दुर्दैवाने या कालव्याचा लाभ त्या भागातील शेतकरी घ्यायला तयार नव्हते, का ते तेच जाणो. त्यामुळे कालवे काढण्यासाठी केलेला खर्च तर सोडाच सोडा, त्यावरील व्याजही सुटत नव्हतं; पण काहीही झालं तरी इंग्रज हे व्यापारी बच्चे. त्यांनी दूरगामी विचार केला आणि कालव्याच्या पाण्याचा वापर करून आपण गुंतवलेल्या पैशावरील किमान व्याज तरी सुटावं यासाठी लोकांना आकर्षित करावं म्हणून काही सवलतींचं गाजर त्यांच्यापुढे धरलं, तरीही त्या परिसरातले लोक पुढे येईनात. तेव्हा इंग्रजांनी आणखी सवलती देऊ केल्या. अत्यंत कमी दराने पाणी उपलब्ध करून देण्याचं जाहीर केलं. शेतीसाठी आवश्यक ते कर्ज माफक दरात उपलब्ध करून देण्याचं आश्वासन दिलं. सर्वदूर या सवलतींची माहिती पोचवण्याची व्यवस्थाही केली. या सवलतीमुळे सासवड आणि त्या परिसरातील अनेक कुटुंबे स्थलांतरित झाली. ह्यात बोरावके कुटुंबीयांचाही समावेश होता. भाऊंचे वडील आणि दोन चुलतेही स्थलांतरित



झाले. त्या काळी गोदावरी कॅनाल परिसरातील अनेक जमिनी खंडाने कसावटीसाठी मिळत होत्या. तेव्हा अशा जमिनी बोरावके कुटूंबियांनी खंडाने घेतल्या. सरकारतर्फे कर्जेही मिळवली. उसाची शेती केली आणि गुऱ्हाळाचा व्यवसाय जोरात चालवला. मुळात बोरावके कुटुंबीय उद्योगी. शेती हा त्यांचा आवडीचा विषय आणि दृष्टी व्यावसायिक. आधी जमिनी खंडात घ्यायच्या आणि पुढे शक्य झाल्यास थोड्या थोड्या करून विकत घ्यायच्या. अशा तऱ्हेने जमिनी विकत घ्यायचा सपाटा चालवला आणि बोलबोल म्हणता जमिनीचा पसारा वाढला.

अशा स्थलांतरितांची एक मानसिकता बनते. ओळखीच्या ठिकाणचे पाश तोडून नवीन, अनोळखी ठिकाणी जम बसवायचा. त्या ठिकाणचं हवा पाणी, माणसांचे स्वभाव, प्रदेशाचे गुणावगुण काही माहीत नसतं. साहजिकच काही काळ जाऊ द्यावा लागतो. काळाच्या ओघात मनावरचं दडपण कमी कमी व्हायला लागतं. लोकांच्या नजरेत खुपणारं नवेपणही जून होत जातं आणि स्थानिकात हे स्थलांतरित मिसळून जातात; पण या दरम्यान स्थानिक लोकांशी भांडण टाळून, जुळवून घ्यायची, बचावाची भावना खोल कुठे तरी असते. त्यामुळे शक्य तो भांडण, कटकटी नको. साहजिकचं स्वभावात एक सहनशीलता, शांतिप्रियता येते. आपल्या डामडौलाने लोकांची नजर आकृष्ट होऊ नये या प्रवृत्तीमुळे साधेपणाकडे कल होत राहतो. हे सारे स्वाभाविकपणाने येणारे गुण बोरावके कुटुंबात आणि विशेष करून भाऊंमध्ये आलेले.

भाऊ शाळेत असताना त्यांचा संबंध सेवादलाशी आला. एव्हाना भाऊंचं घर पंचक्रोशीत लौकिक कमावून प्रसिद्धीस आलेलं. त्यांच्याकडे अच्युतराव पटवर्धन, रावसाहेब पटवर्धन यांसारख्या लोकांचं येण जाणं सुरू झालेलं. त्या काळी ही पटवर्धन मंडळी नावाजलेली. त्यांच्या संपर्कात आल्यामुळे भाऊ सेवादलात जायला लागले. शाळकरी वयात, या लोकांच्या संपर्कात आल्यामुळे कळत न कळत त्यांच्यावर काही संस्कार होत गेले. या महनीय माणसांचे आदर्श समोर होते. स्वातंत्र्यपूर्व काळात अच्यूतराव पटवर्धन म्हणजे खऱ्या अर्थाने तरुणांच्या दिलाची धडकन. त्या काळात दूर निझामी राजवटीत माणसांना, विशेष करून आम्हा पोरा सोरांना अच्युतराव पटवर्धन, जयप्रकाश नारायण, सुभाष बाबू, कॅप्टन लक्ष्मी, वीर सावरकर या नावांबद्दल विशेष आकर्षण होतं. ''त्या वयात या लोकांना एवढं जवळून पाहण्याचं भाग्य मला लाभलं.'' या शब्दांत भाऊ त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात. वयाच्या पंधराव्या, सोळाव्या वर्षी भाऊंनी कॉंग्रेसच्या सेवादलात प्रवेश केला. त्यानिमित्ताने ते साने गुरुजी, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, बॅरिस्टर

नाथ पै अशा लोकांच्या संपर्कात आले. साहजिकच या लोकांचा एक जबरदस्त प्रभाव भाऊंच्या मनावर पडलेला. ही सारी मंडळी स्वातंत्र्याच्या लढ्यात अग्रणी राहिलेली; पण स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेच्या राजकारणापासून दूर, काही विशिष्ट तत्वांना चिकटून राहिलेली. हाही गुणविशेष भाऊत उतरलेला. सत्तेच्या परिघात इतकं जवळ जाऊनही भाऊंना राजकीय पक्षाचं आकर्षण वाटलं नाही. मला नेमकी या प्रश्नाची उत्सुकता होती. ''मग तुम्ही सत्तेच्या राजकारणाकडे आकृष्ट झाला नाहीत, हे कसे? तुम्हाला कुणी आपल्या रिंगणात ओढण्याचे प्रयत्न केले नसतील यावर विश्वास बसत नाही''यावर भाऊ हसले. एवढंच म्हणाले, ''तसे प्रयत्न झाले; पण मला त्याचं आकर्षण वाटलं नाही.'' आणि वाटणार तरी कसं, पूर्वायुष्यातला बराच काळ थोरामोठ्यांच्या सहवासात घालवल्यावर खुज्या माणसांचं आकर्षण राहणार तरी कसं? 'उम्र तमाम बिताई बुत परस्ती मे, अब आखरी वक्त क्या खाक मुसलमां होंगे।'

भारताला स्वातंत्र्य तर मिळालं. एक टप्पा पूर्ण झाला. या टप्प्यात किशोर वयातील स्वयंसेवक म्हणून भाऊंनी कामगिरी बजावली. नाही तरी ते किशोरवय. त्या वयात स्वातंत्र्य समरात भाग घ्यावा ही अपेक्षा नव्हती. पुढे जेव्हा आणि जी गरज पडली ती भाऊंनी पार पाडली. पुढच्या टप्प्यात भाऊंनी संघटनेच्या झेंड्याखाली जो लढा दिला तो काही कमी महत्वाचा नव्हता. त्या टप्प्याला नाही तरी शेतकरी संघटना 'स्वातंत्र्याची दुसरी लढाई'असं संबोधतेच ना. या टप्प्यात राजकारणविरहित जे करता येईल ते सारं भाऊंनी केलंच. कुठल्याही पक्षाशी बांधिलकी न ठेवता ते व्यक्तित्ववादी राहिले. भाऊ समाजवादी आहेत असा एक सार्वत्रिक समज. ''सेवादलाच्या विश्वस्तापैकी मी एक; पण माझी बांधिलकी समाजवादी पक्षाशी नव्हती, आजही नाही. आज मी समाजवादी पक्षापासून तितकाच जवळ, जितका काँग्रेसच्या. दोनही पक्षांतल्या अनेक कार्यकर्त्यांशी माझी वैयक्तिक मैत्री आहे. मी सेवादलाच्या विश्वस्तांपैकी एक, तसा शिरडीच्या साईबाबा संस्थानच्या विश्वस्तापैकीही एक. अनेक सामाजिक संस्थांशी माझा संबंध आजही आहे तरीही लोक मला समाजवादी म्हणतात याला माझा नाइलाज आहे,'' तरी मला नेहमी प्रश्न पडायचा, वागण्याबोलण्यात भाऊ इतके असमाजवादी कसे? उलगडा या वेळी झाला. एक कोडं या उत्तरानं सुटलं. शेतकरी संघटना मुक्त अर्थव्यवस्थेची पुरस्कर्ती. कमीत कमी प्रशासन आणि मुक्तव्यापार ही तिची आग्रही मागणी. 'सूट- सबसिडीचे नाही काम, हवे घामाचे दाम' ही तर फार पूर्वीपासूनची तिची घोषणा आणि समाजवाद्यांची धोरणं नेमकी या साऱ्या विरुद्ध! मला नेहमी



वाटायचं, ही दोनही टोकं भाऊ धरून ठेवतात तरी कशी! वाघ आणि शेळी एकाच टोपल्यात मेळवण खाणार तरी कसे? पण भाऊंनी हा खुलासा केला आणि त्यांच्यावर लोकांनी जबरी टाकलेली समाजवादी झूल झटकून टाकली. तरी आजही साहेब भाऊंच्या 'माजी' समाजवादी रंगावरून थट्टा करतात. भाऊ हे सारं थट्टेवारी नेतात. समाजवाद्याचा उल्लेख करताना साहेब भाऊंना थट्टेत म्हणतात, ''भाऊ, तुमच्या त्या अमक्यातमक्याचं स्टेटमेंट वाचल कां?'' भाऊ यातील 'तुमच्या'ला विसरून बोलतात. 'वन्स ए डावा' नेहमीच डावा हे निदान भाऊंच्या बाबतीत खरं नाही हे माहीत असूनही साहेब भाऊंची अशी थट्टा करतातच.

तसं खऱ्या अर्थानं भाऊ क्रियाशील आंदोलनात सहभागी झाले ते शेतकरी संघटनेच्या माध्यमातून. त्याआधी त्यांनी शेतीचे भलेबुरे अनुभव घेतले होते; पण चटके काही बसले नाहीत. शेतीचा विस्तार खूप मोठा आणि शेती पाण्याखालील. उसाचा आणि फळबागांचा मोठा आधार. त्यामुळे एकीकडे ओहोटी तर तर दुसरीकडं भरती हा प्रकार चालायचाच. तेव्हा आर्थिक संतुलन फारस बिघडत नसे; पण शेतीच्या अर्थकारणाकडे त्यांचं लक्ष होतं जरूर. १९७८-८० च्या सुमारास शरद जोशींचं आगमन कृषिक्षेत्रात झालं. त्यांनी 'वारकरी' या नावानं नियतकालिक सुरू केलं. या 'वारकरी'चे भाऊ नियमित वाचक. त्यातील शरद जोशींचा लेख भाऊ आवर्जून वाचीत. त्याच सुमारास इतर नियतकालिकांतूनही साहेबांचे लेख येत. तेही भाऊ आवर्जून वाचित . या लेखांचा एक निश्चित परिणाम भाऊंवर होत गेला. आतापावेतो सर्व आंदोलनांपासून काहीसे दूर राहिलेले भाऊ कळत न कळत साहेबांच्या लेखामुळे शेतकरी आंदोलनाकडे हळूहळू ओढले गेले. शेतीतले भलेबुरे अनुभव घेतलेल्या भाऊंना दुखण्यावर नक्की बोट ठेवता येत नव्हते; पण काही तरी चुकते आहे ही जाणीव होत होती. शेतीचा एवढा पसारा असूनही म्हणावं तशी प्राप्ती नाही आणि नेहमी उद्याची चिंता असायची. मोठ्यांच्या चिंताही मोठ्या. नुकसान झालं म्हणजे लाखांनी व्हायचं. जमाखर्चाची मिळवणी व्हायची; पण नुकसानीचा बॅकलॉग राहायचाच. हे असं का होतं? हा प्रश्न त्यांना नेहमी पडायचा.साहेबांचे लेख वाचले. डोक्यात लख्ख प्रकाश पडायला अगदी कांही वडाच्या सावलीतच बसायला नको. 'वारकरी' किंवा इतरत्र येणाऱ्या साहेबांच्या लेखांच्या सावलीत बसूनही असा प्रकाश पडतोच की.

आणखी शेतकरी संघटनेची रीतसर स्थापना व्हायची राहिली होती. त्यामुळे भाऊ साहेबांना नावानेच ओळखून होते. याच सुमारास शेतकरी संघटनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन पुकारण्यात आलं. हे आंदोलनमात्र भाऊंसाठी वळण देणारं

ठरलं. इथून भाऊ शेतकरी आंदोलनात उतरले ते कायमचे. या वीस बावीस वर्षांच्या काळात संघटनेने अनेक चढउतार पाहिले. अनेक लोक आले आणि संघटना पटलावरून अस्तंगतही झाले; पण भाऊ मात्र ध्रुवताऱ्याप्रमाणे संघटनेत अढळ राहिले.

शेतकरी संघटनेनं हे आंदोलन पुकारलं ज्यात भाऊही पहिल्यांदाच सहभागी झाले. त्यांनी कोपरगावी या आंदोलनात सहभाग दिला. त्यांच्या या सहभागाचा विलक्षण चांगला परिणाम झाला. भाऊंसारखा एवढा मोठा माणूस या आंदोलनात सहभागी होतो आहे हे पाहून या भागातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर, वकील आणि फार मोठ्या प्रमाणावर शेतकरी सहभागी झाले. जवळजवळ सात हजार लोकांनी अटक दिली. भाऊंची रवानगी इसापूरच्या तुरुंगात झाली आठ दिवसासाठी. त्यांच्यासोबत बावीस वकील लोकही इसापूरला अटकेत होते. कोपरगावच्या या साऱ्या आंदोलकांनी नेता म्हणून भाऊंची एकमताने निवड केली. तुरुंगात एवढ्या मोठ्या प्रमाणावर इतक्या लोकांना एकत्र ठेवलं याचा एक चांगला परिणाम झाला. दिवसभर एकमेकांशी विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळाली आणि भाऊनांच नव्हे तर इतरही सत्याग्रहींना आपापले विचार घासूनपुसून घेता आले. परिणामी संघटनेचा विचार फैलावण्याचं काम आपोआपच साधलं गेलं.

या वेळी तुरुंगात भरती केलेल्यांमध्ये स्वत: शरद जोशी यांचाही समावेश होता. या तुरुंगातच भाऊंची आणि साहेबांची ओळख-भेट झाली. या वेळी झालेल्या भेटीचं मैत्रीत अन् मैत्रीचं दाट मैत्रीत रूपांतर झालं आणि आयुष्यभर टिकलं. साहेबांसाठी भाऊ म्हणजे मित्र, सल्लागार आणि कुटुंबीयसुद्धा. हे नातं इतकं जवळचं झालेलं की साहेबांच्या मुलीचा साखरपुडा झाला तेव्हा विधी केला भाऊ आणि माईंनी. साहेबांपेक्षा भाऊ वयाने पाचेक वर्षांनी मोठे म्हणून साहेब भाऊंना मोठा भाऊ मानतात. दोघांच्या संबंधात एवढी जवळीक, की प्रसंगी साहेब भाऊंची थट्टाही करतात, त्यांचा 'इंग्रजीत पायही ओढतात'. आतापावेतो हे नातेसंबंध निष्कलंक राहिले आहेत.

तुरुंगात साहेबांना भेटण्यासाठी त्यांच्या पत्नी लीलाताई वारंवार येत राहिल्या त्यांची आणि भाऊंची ओळख, भेट याच तुरुंगात झाली. पुढे चालून साहेबांच्या एकूणच कुटुंबाशी घरगुती संबंध जुळून आले. त्यांची सुरवात ही अशी तुरुंगात झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात तुरुंगात घडलेल्या मोठमोठ्या माणसांच्या कथा आम्ही ऐकल्यात; पण स्वातंत्र्याच्या या दुसऱ्या लढ्यानं ही माणसं घडवण्याचं महत्त्वपूर्ण



काम केलेलं आहे. बारहाल, तुरुंग ही मोठी माणसं घडवण्याची शाळा आहे हेच खरं. कालही आणि आजही.

या वेळेपासून साहेबांच्या मागे अटकेचं जे सत्र सुरू झालं ते कित्येक महिने चालू राहीलं. तेव्हाचे काँग्रेस सरकार शरद जोशी यांच्यामागे बेड्या घेऊन लागलेलं. एका खटल्यात अटक करायची, न्यायालयीन कस्टडी घ्यायची. त्याची मुदत संपण्याच्या आत दुसऱ्या खटल्यात न्यायालयीन कस्टडी, मग तिसऱ्या, चौथ्या... त्याला अंतच नव्हता. पोलिसच्या लोकांनी एकदा सूड घ्यायचा ठरवलं तर ते कुठल्या टोकाला जाऊ शकतात याचा धडाच या वेळी त्यांनी घालून दिला. 'क्या खूब निभाई दुष्मनी अंतुलेने' की महाराष्ट्रातील न्यायालयेही कस्टडी घेण्यासाठी अपुरी पडली!

आठ दिवसांच्या तुरुंगवासातून भाऊंची सुटका तर झाली. भाऊ तर सुटले; पण साहेब तुरुंगाच्या दलदलीत फसलेले, त्यांना बाहेर कसे काढायचं? रमण शिसोदे या नावाचे एक व्यापारी भाऊंचे मित्र व संघटनेचे चाहते होते. त्यांच्या घरी लीलाताई व भाऊंची बैठक झाली. या तिघांनी ख्यातकीर्त वकील श्री. राम जेठमलानी यांची भेट घेण्याचा निर्णय घेतला. आतापर्यंत ज्या अनेक ठिकाणी अंतुलेंनी साहेबांवर खटले दाखल केले होते. त्या त्या ठिकाणी जाऊन जमानतीची व्यवस्था करणे हेच एकमेव काम भाऊ व लीलाताईंना त्या वेळी राहिलेले होते. या कामी त्यांना गावोगावी भटकावं लागलं. तुरुंग साहेबांनी भोगला; पण शिक्षा मात्र भाऊ व लीलाताईंनी ! त्या सर्व खटपटीत बबन शेलार हेही या दोघांबरोबर होते. भाऊंची गाडी आणि गाडीत हे त्रिकूट गावोगावी जाणार हा दिनक्रम ठरलेला. खटल्याच्या प्रत्येक गावी जायचं, तिथल्या वकील संघाला भेट द्यायची, वकील संघातील सदस्यांना सर्व आंदोलनाची कल्पना देऊन त्यांच्या साहाय्याने जमानतीची व्यवस्था करायची. जमानत करायची ती एकट्या साहेबांची नाही. त्यांच्यासोबत माधव खंडेराव मोरे अन् प्रल्हाद पाटील कऱ्हाड हेही होतेच. दु:खात सुख एवढंच की साहेबांना या वनवासातही चांगली कंपनी होती. जळगावच्या कोर्टात त्रिकुटाला हजर केल तेव्हा तर न्यायालयाच्या आवारात प्रचंड गर्दी जमा झालेली होती. याची दखल पोलिसांनी न घेण्याचंच ठरवलं. संघटनेला मिळणारा प्रचंड पाठिंबा पायदळी तुडवून या त्रिकुटाचे हाल हाल करण्याचे एकेक उपाय पोलिस शोधून काढीत होते. रिमांडसाठी कोर्टात हजर करतांना तुरुंगातून दूर गावी नेण्यासाठी अत्यंत खराब व्हॅन निवडली जाई, ज्यामुळे नेण्याआणण्यात कैद्यांची हाडे खिळखिळी व्हावीत. शेवटी एका न्यायालयात माधवराव मोऱ्यांनी न्यायाधीशाकडे

ही तक्रार मांडली, तेव्हा न्यायाधीशांनी पोलिसांना चांगलच झापलं! परिणामी प्रवाशांची ही 'आदळ' थांबली.

साहेबाविरुद्ध शेवटचा खटला! (शेवटचा म्हणजे त्या मलिकेतला शेवटचा, कारण त्याहीनंतर परवापर्यंत साहेबांविरुद्ध खटले दाखल होत गेलेले आहेतच. गिनीज बुक वाल्यांनी सर्वाधिक खटल्यांचा जागतिक विक्रम केल्याबद्दल साहेबांच्या नावाची नोंद घ्यायला काही हरकत नसावी!) हां, तर शेवटचा खटला नेवासा इथे दाखल केला. या दरम्यान लीलाताई आणि भाऊ यांनी राम जेठमलानी यांच्याशी सल्लामसलत करून मुंबईच्या उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आणि या तिघांची खटल्याच्या कटकटीतून, तर लीलाताई, भाऊ आणि बबन या तिघांची जमानतीची सोय करण्याच्या व गावोगावी चक्कर मारण्याच्या कटकटीतून मुक्तता केली. मुक्तता यासाठी, की तुरुंगाबाहेर राहूनही या तिघांना वेगळ्या अर्थाने तुरुंगवास भोगावा लागतच होता. ती मराठी म्हण आहे न, 'घोडं मेलं ओझ्यानं अन् शिंगरु.....'

या तुरुंग प्रकरणातून साहेबांचे आणि भाऊंचे संबंध आधिकच घट्ट झाले. साहेब तेव्हा पुण्यातल्या सिंध कॉलनीत राहत होते. भाऊंचं तिथे नेहमी जाणंयेणं होतं. भाऊंच स्वत:चं घरही पुण्याला जंगली महाराज रोडवर होतंच; पण अनेक भाडेकरूंच्या ताब्यात! भाऊंना सिनेमा नाटकाचा षौक. वेळ मिळेल तेव्हा भाऊ तिकिटांचं आरक्षण करून साहेब व लीलाताई यांना घेऊन जात. या दोघांनाही तशी नाटक, सिनेमाची आवड होतीच. संघटनेच्या बांधणीचा तो काळ, तेव्हा कलात्मक हौसेला वेळ मिळत असे.

राजकारणात रमलेले लोक रुक्षाच असतात असं काही नाही. होतं काय की कलोपासनेसाठी द्यायला पुरेसा वेळ त्यांच्याकडे नसतो. भाऊ तसे रसिक. जमेल तेव्हा नाटक पहायचे. त्यांच्या रसिकतेचं उत्तम उदाहरण म्हणजे त्याचं राहतं घर. कोपरगावजवळील येसगाव वस्तीवरील त्यांचं घर बघण्या सारखं आहे. मोटारसायकल रॅलीच्या शेवटी आम्ही मुक्कामाला भाऊंच्या घरी येसगाव वस्तीवर गेलो होतो. घरापुढे छोटंसं अंगण. बाडाच्या कुंपणानं वेढलेल. त्यात गोलाकार लॉन, मऊमऊ गवत असलेलं. फाटकासमोर गाडीचं एक चाक रंगवून उभं ठेवलेलं. घर म्हणजे इंग्रजकालीन विश्रामगृहाची प्रतिकृती. मी त्याबद्दल भाऊंना विचारलं, ''येसगाव वस्तीवर राहायचा विचार डोक्यात होताच. त्या सुमारास इंग्रजकालीन एक विश्रामगृह होतं. ते दूर कुठे तरी. ते मी शासनाकडून विकत घेतल आणि जसंच्या तसं एकेक दगड, एकेक लाकडी बीम नंबर टाकून उतरून घेतला आणि



जुनं डिझाईन जशाचं तसं कायम ठेवून सारा माल वस्तीवर आणला. एकेक करून नंबर प्रमाणे दगड, बीम रचले.'' आज ते घर उन्हाळ्यात थंड अन् हिवाळ्यात गरम असतं. नैसर्गिकरीत्या एयरकुल्ड!

त्या काळात 'शेतकरी संघटक'चं मोठ भावंडं 'वारकरी'ची चलती होती. शेतकरी संघटनेच्या विचाराला वाहिलेल्या या नियतकालिकाचं कार्यालय साहेबांच्या या सिंध कॉलनीतल्या बंगल्यातच होतं. साहेब एकहाती लिखाण करायचे. भाऊ अधूनमधून मदतीला असायचे. फक्त 'पोस्टमन' असा पुकारा करीत अंकाचं घरोघरी वाटप करायचं काम साहेबांना नाही करावं लागलं हे भाग्यच!

'वारकरी' नियतकालिक चालवण्याची हौस सोडता दुसरं काही चालवण्याचा साहेबांना षौकअसेल तर तो त्यांच्याकडील 'बुलेट' मोटारसायकल चालवण्याचा. आधीच बुलेट ही गाडी दणकटपणासाठी आणि त्याहीपेक्षा वेगासाठी प्रसिद्ध! या काळी ही बुलेट गाडी घ्यायची अन् आंबेठाणला भन्नाट वेगान जायचं हा साहेबांना षौक! त्यांच्याबरोबर जायचा प्रसंग आला तर भाऊ आवर्जून सांगायचे, ''साहेब, जरा हळू'' ''भाऊ, तुम्ही सायकलवर बसा. मोटरसायकलवर नाही. बुलेटवर बसायचं ते वेगासाठी!'' भाऊ सांगतात, ''मी साहेबांबरोबर असलो म्हणजे डोळे बंद करून देवाचं नामस्मरण करीत मागे बसायचो. मुक्कामावर पोचलो की मी म्हणायचो, '' ''मैं कौन हूं? मैं कहां हूं? धरतीपर या स्वर्ग में?'' यावर साहेब म्हणायचे, ''भाऊ, उघडा डोळे आता. आपण मुक्कामावर सुखरूप पोचलोत, वन पीस!'' यातला थट्टेचा भाग जाऊ देत, पण साहेबांना वेगाचा भलता षौक. ''सुरवातीच्या काळात आंबेठाण चाकणच्या परिसरात साहेब प्रसिद्ध होते ते त्यांची बुलेट, वेगाची हौस आणि सुटाबुटासाठी'' बाबूलाल परदेशी एकदा बोलताना म्हणाले होते, ''सुटाबुटातले साहेब आमच्याबरोबर खेड्यापाड्यातून सायकलवर फिरायचे तेव्हा खेडूतांना तोसुद्धा आकर्षणाचा विषय होता.'' बाबूलालनं साहेबांची सांगितलेली ही आठवण.

लीलाताईंची आठवण सांगतांना भाऊ आजही भावुक होतात. नेहमीच्या जाण्यायेण्याने साहेबांशी एक कौटुंबिक जिव्हाळा झालेला होता. साहेबांशी आणि लीलाताईंशी केवळ मैत्रीच्याच नव्हे तर वडिलकीच्या नात्यानंही बोलण्याचा अधिकार एकट्या भाऊंनाच होता. भाऊंच्या शांत, निरलस स्वभावामुळे आपोआपच त्यांच्याकडे वडीलकीचा मान आलेला असायचा. ही वडिलकी भाऊंनी टिकवून ठेवली हा एक विशेष!

लीलाताईंची ऐन उमेदीची वर्षं परदेशात गेलेली. तिथेले व्यवसाय, त्यांतील

प्रामाणिकपणा, लोकांची राहणी, त्यांचं जीवनमान या साऱ्यांचा एक पगडा त्यांच्या मनावर असणारच. त्यांनी आंबेठाणला कुक्कुटपालनाचा प्रयोग करून पाहिला. त्यासाठी बँकेचं भलमोठ कर्ज काढलं. हा व्यवसाय आदर्श पातळीवर चालवावा असा त्यांचा अट्टहास. ताईंनी आणखी भारतीय व्यवस्थेचा बडगा पाहिलेला नव्हता. या खाचाखळगे त्यांना माहीत नव्हते. व्यवसायातील लांड्यालबाड्यांपासून तर त्या कोसो दूर होत्या. त्यांना हे कुठे माहीत होतं की कुक्कुटपालनाचा व्यवसाय करायचा असतो तो त्यातील मिळणाऱ्या सबसिडीसाठी. सर्व आकडे फुगवून सांगायचे. हजार कोंबड्या कागदावर दाखवून प्रत्यक्षात शंभरच घ्यायच्या. जमाखार्चात आकड्यांची जादूगिरी करायची अन् एक दिवस व्यवसायाची गुंडाळपट्टी करून काखा बगला वर करायच्या. जमेल तेवढं कर्ज माफ करून घ्यायचं. नवीन प्रस्ताव बँकेसमोर ठेवायचा. नवीन विटी नवीन राज्य. परत दुसऱ्या धंद्यात सबसिडी मिळवायची. ताईंना पहिल्याच फटक्यात या कोंबड्यांनी कु कूऽच कूऽ करायला लावलं. या व्यवसायात त्या फसत गेल्या, त्या वरच नाही आल्या. कसंतरी करून वाढलेल्या कर्जाची बुजवाबुजव करून या झमेल्यातून त्या मुक्त तर झाल्या; पण या अनुभवानं त्यांच्या मनावर एक खोल जखम झाली. याही काळात ताईंना भाऊंचा मानसिक आधार होताच. पण या धक्क्यानं त्यांच मानसिक संतुलन बिघडलं, ते शेवटपर्यंत त्यांना त्रासच देत राहिलं. त्यांचा शेवटही या असंतुलनात झाला. याही वेळी साहेबांना खंबीर आधार दिला तो भाऊंनीच. लीलाताईंच्या मृत्यूची बातमी साहेबांना विलक्षण धक्का देऊन गेली. साहेब धाय मोकलून रडले ते भाऊंच्या खांद्यावर मान ठेवूनच. मोठ्या माणसांची दुःखं तशी मोठीच. दूःख पचवायचं तेही एकट्यानं, अपयश पचवायचं तेही एकट्यानंच. चेहरा हसरा ठेवत!

शेतकरी संघटनेच्या सर्व सभा, मेळावे, अधिवेशन आणि आंदोलनात भाऊ हजर राहिले यात विशेष काहीच नाही. तसे हजारो कार्यकर्ते आहेत. भाऊ काही काळ शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राहिले यातही काही विशेष नाही. हे पद भूषवणारेही अनेक आहेत. काही राहिले. काही परपक्षवासी झाले. त्यांचं वैशिष्ट्य हे, की अध्यक्षपदावर राहूनही ते सामान्य कार्यकर्ते म्हणूनच वावरले. सामान्य कार्यकर्त्यांत समन्वयक म्हणूनच त्यांनी काम केलं. अध्यक्ष म्हणून त्यांचा महाराष्ट्रभर दौरा अपेक्षित होता आणि तो त्यांनी केलाही; पण अध्यक्ष नसतानाही महाराष्ट्रभर फिरत राहिले, हे विशेष. १९८६ च्या प्रभावशाली कापूस आंदोलनात ते शेतकरी संघटनेचे अध्यक्ष होते. या काळात भाऊंच्या पायाला अक्षरशः भिंगरी बांधलेली



होती. महाराष्ट्रात ठिकठिकाणी कार्यकर्त्यांना तुरुंगातून हजारोंच्या संख्येने डांबून ठेवलेलं. सुरेगावच्या गोळीबारात तर तिघांचा बळी पडलेला. त्या परिसरात विलक्षण दहशत पसरलेली. या तप्त वातावरणात डोकं विलक्षण शांत ठेवायचं अन् कार्यकर्त्यांचं सांत्वन करायचं, त्यांच्या पाठीवरून मायेचा हात फिरवायचा. ठिकठिकाणच्या तुरुंगांना भेटी देऊन सत्याग्रहींना, त्यांच्या निकटवर्तीयांना दिलासा द्यायचा हे अवघड काम चेहऱ्यावरची स्मितरेषा ढळू न देता भाऊंनी पार पाडलं. भाऊंचं मोठेपण आहे, ते त्यांच्या या कसबात.

सामान्य कार्यकर्त्यांना तर भाऊ म्हणजे आपली गाऱ्हाणी ऐकवण्याचं हक्काचं ठिकाण वाटायचं. अध्यक्षपदी ते होते तेव्हाही आणि नव्हते तेव्हाही. परभणीच्या त्यांच्या दौऱ्याप्रसंगी मला स्वतःला एक प्रसंग अनुभवायला मिळाला. माझ्याविरुद्ध काही कार्यकर्त्यांनी भाऊंकडे प्रत्यक्ष भेटीत, फोनवर पत्राद्वारे तक्रारी केल्या होत्या. माझी कामाची पद्धत त्यांना आवडली नसेल किंवा वैयक्तिक रागलोभापायी असेल, कारण काहीही असो पण लोकांनी तक्रारी तर केलेल्या होत्या. भाऊंनी त्यांच्या पद्धतीने मला थांगपत्ता न लागू देता त्या तक्रारींची चौकशी केली. त्यांचा स्वतःचाही याबाबत काही अनुभव होताच. पुढे परभणीच्या दौऱ्यात त्याच कार्यकर्त्यांनी भाऊंची भेट घेऊन तक्रार केली, तेव्हा माझ्यासमोर भाऊंनी त्यांना चांगलच झापलं. भाऊंचंच झापणं ते. "तुम्ही नेहमी तक्रारी करता, तुमच्या साऱ्या तक्रारी खोट्या आहेत. तुम्ही ढीगभर तक्रारी करूनसुद्धा वकील साहेबांनी तुमच्या विरुद्ध एक पण तक्रार केली नाही हे कसं? संघटनेत अशा कुजकट तक्रारींना अजिबात स्थान नाही. जमल्यास संघटनेत रहा, नाही तर बाहेरचे दरवाजे खुले आहेत." भाऊंना एवढ्या चढ्या आवाजात बोलताना मी ऐकलं, ते पहिलं आणि शेवटचं. त्यांच्या आणि माझ्या भेटी आधी आणि नंतरही होत राहिल्या. पण माझ्या वाट्याला त्यांचं स्मितहास्यच येत राहिलं. माझ्याकडे भाऊ अनेक वेळा आले; पण या भेटीत त्यांनी कधीही कुणाविरुद्धही तक्रारी केल्या नाहीत किंवा गाऱ्हाणीही.

भाऊ थोडं लांबच्या प्रवासाला निघाले म्हणजे एक छोटी व्हीआयपी बॅग आणि खांद्याला एक शबनम-त्यांच्या अघोषित समाजवादीपणाची एक जुनी आठवण हे ठरलेलं. मुक्काम छोटा असला तर फक्त बॅगच, शबनमला सुटी. त्यांच्या स्वभावातच एक हिशेबीपणा आणि शिस्त. प्रवासाला बाहेर पडतील तेव्हा रोज लागणाऱ्या साऱ्या वस्तु बरोबर घेऊनच. कुणाला पेस्ट माग, कुणाला साबण हा प्रकार नाही. डोक्याला लावायचं तेल, कंगवासुद्धा सोबतच. याही वयात डोक्यावर घनदाट जंगल आहेच भाऊंच्या. स्नान झालं, की स्वच्छ कपडे घालून कार्यक्रमासाठी

तयार होऊन बसणार. रेल्वे, बसचं आरक्षण करायचं काम पडलं असेल तर आल्या आल्या भाऊ पैशाचा चुकारा करणार. समोरचा माणूस पैसेवाला असो की नसो. गेल्या वर्षीच्या सुरेगावला झालेल्या हुतात्मादिनासाठी भाऊ आवर्जुन डिग्रस कऱ्हाळे (हिंगोली जिल्हा) या गावी हजर झाले होते. खूप मोठ्या प्रमाणावरील उपस्थितीत कार्यक्रम पार पडला आणि भाऊ परत जायला निघाले तेव्हा बल तामसकरांनी येण्याजाण्याचा खर्च म्हणून भाऊंना पाचशेची नोट देऊ केली. तेव्हा भाऊ बलंवर भडकले. भाऊंनी पैशाकडे पाहून कधी काम केलेलं नाही. तसं असतं तर भाऊ कधीच पक्षवासी झाले असते; पण बलं ऐकेनात अन् भाऊही. शेवटी डॉ. पातूरकर अन् गुणवंत पाटील मला म्हणाले, तुम्हीच बलंची समजूत घाला. बलंच्या जागी दुसरा कुणी असता तर पैसे देऊन माझा अपमान करता काय असं म्हणून भाऊ विलक्षण भडकले असते. पण बल पुढे प्रत्यक्ष देवानंही हात टेकले असते तिथे भाऊंच काय! त्यामुळे भाऊ फार रागावले नाहीत. यावर मी तोडगा काढला, ‘‘बल ही रक्कम भाऊंकडून आजच्या कार्यक्रमाला देणगी म्हणून स्वीकारा झालं.’’ तो सन्माननीय तोडगा बलंनी विजयी मुद्रेने मान्य केला आणि हा गोड तिढा एकदाचा सुटला. भाऊंनी अध्यक्षपदातले दौरे संघटनेच्या पैशावर नाही तर पदरमोड करून केले. नाही तरी साहेब म्हणायचेच, ‘‘काम करील तो कार्यकर्ता अन् पदरमोड करील तो संघटनेचा कोषाध्यक्ष!’’

ऐंशी मधल्या संघटनेच्या आंदोलनानंतर तेव्हाचे मुख्यमंत्री श्री. अ. र. अंतुले यांनी दिल्लीला वाटाघाटीसाठी संघटनेच्या प्रतिनिधी मंडळाला आमंत्रण दिलं होतं. या वाटाघाटीसाठी शासनाच्या वतीने स्वत: मुख्यमंत्री अंतुले, अर्थमंत्री रामराव आदिक आणि मजूरमंत्री नरेंद्र तिडके हे होते. संघटनेच्या वतीने स्वत: साहेब, माधव खंडेराव मोरे, प्रल्हाद पाटील, रामचंद्र बापू पाटील आणि भास्करभाऊ बोरावके यांचे प्रतिनिधी मंडळ होते. वाटाघाटीत काही प्रमाणावर मागण्या मान्य करण्यास अंतुले तयार झाले होते; पण शेतकरी पुत्र रामराव आदिकांनी कोलदांडा घातला.

नरेंद्र तिडकेंनी, ‘‘यांच्या मागण्या मान्य केल्या तर हेसुद्धा कामगारांप्रमाणे उलटतील.’’ असं म्हणून विरोध केला. शेतकरीपुत्रांच्या या जहरी विरोधाने माधव खंडेराव मोरे यांनी संतापाच्या भरात जी भाषा वापरली ती इथे लिहिणे कठिण. त्याचा उल्लेख बापूंच्या परिचयात आलेला आहे. या वेळी मोरे यांनी संतप्त होऊन धमकी दिली, ‘‘तुम्ही या वाटाघाटी फिसकटवल्या तर महाराष्ट्रातले शेतकरी तुमचं अख्खं मंत्रीमंडळ जाळून टाकतील!’’ हा प्रसंग सांगतांना भाऊ आजही गंभीर होतात. हाच प्रसंग बापू सांगतात ते रामरावांच्या चेहऱ्यावरील भीतीचे भाव



आठवून हसून आणि भाऊ सांगतात ते माधव खंडेराव मोरे यांच्या डोळ्यातील अंगार पाहून.

माईंचा उल्लेख केल्याशिवाय भाऊंचा हा परिचय पूर्ण होणार नाही. माई, म्हणजे भाऊंच्या पत्नी. सदाफुलीसारखा प्रसन्न हसरा चेहरा. चेहऱ्यावर समोरच्या माणसांची ओळख. संघटनेच्या कार्यकारिणीच्या सर्व बैठकांना, अधिवेशनात माई भाऊंसोबत निश्चित हजेरी लावायच्या. स्वभाव तर असा जसं काही भाऊ आणि माई मेड फॉर इच अदर! माई जवळच्यांना प्रसंगी टोमणे मारायच्या, हक्काच्या भावनेनं. कार्यक्रमात भेट झाली, की बहाने सांगायचो यावर त्या टोमणा मारायच्या, ‘‘तुम्ही पुरुष असेच. आपल्या घरच्यांना घरीच ठेवणार अन् म्हणणार महिला आघाडी वाढली पाहिजे.’’ ही टोमणेगिरी अर्थातच आमच्या सारख्याकार्यकर्त्यांसाठी राखीव असायची.

भाऊ शेतकरी संघटनेचे अध्यक्ष झाले तेव्हा त्यांचा परिचय करून देणारा एक लेख नाशिकच्या ‘देशदूत’नं छापला होता. त्याचा मथळा ‘कार्यकर्त्यांचे भाऊ-भास्करभाऊ’ असा होता. त्या लेखानंतर माईंची भेट झाली तेव्हा त्या थट्टेत मला म्हणाल्या. ‘‘म्हणे सर्वांचे भाऊ-भास्करभाऊ. विचारा त्यांना आमच्या वाट्याला दिवस दिवस तरी येतात का.’’

बऱ्याच वर्षांपूर्वी दौलताबाद (औरंगाबाद जिल्हा) विस्तृत कार्यकारिणीची बैठक झाली. या बैठकीला सर्व सदस्यांना सपत्नीक आमंत्रण होतं. त्याप्रमाणे आम्ही सारे उभयता हजर राहिलो. त्या वेळी बैठकीत कार्यकर्त्यांनी कृत्रिम धाग्याच्या वस्त्रांवर बहिष्कार टाकावा व सुती वस्त्र वापरावं, कापसाच्या आंदोलनाचा एक भाग म्हणून असा प्रस्ताव मांडण्यात आला. त्याला कडाडून विरोध केला तो माईंनी. ‘‘तुम्हा पुरुषांना काय लागतं असला ठराव मांडायला. कपडे धुवावे लागतात आम्हा बायकांना. सुती कपडे धुवायचे म्हणजे किती कटकटी, तुम्हाला काय कल्पना. बाहेरगावी गेला म्हणजे सोबत एक जरी टेरिकॉटची साडी असली, की आमची किती सोय होते. भिजवायची, धुवायची, झटकायची अन् थोड्याच वेळात वाळली की नेसायची.’’ माईंच्या या फणकाऱ्यात दौलताबादच्या बैठकीत हास्याचा एकच लोळ उठला. पन्नासावर वर्षं भाऊंची साथ करणाऱ्या माई काही वर्षांपूर्वी गेल्या तेव्हापासून भाऊ फारच गंभीर झाले. त्यांचा एकाकीपणा खूपच वाढला. पुरुषाविना बाईचं भागू शकतं, पण बाईविना पुरुष फारच एकाकी, करुण वाटतो. एकटं असलं, की भाऊ माईंची आठवण काढत आढ्याकडे नजर लावून बसतात.

■ ■

# वैजनाथराव

या माणसाकडे पाहिलं, नाही. एरव्ही त्याचं बोलणं ऐकलं, तरी तो असं बोलू शकेल, अशी शंकाही येत नाही. नाही तरी सर्वांच्याच चेहऱ्यावर त्यांचा स्वभाव थोडी लिहिलेला असतो? एक उंची सोडली, तर चारचौघांत मिसळून जाणारं व्यक्तिमत्त्व. डोईवर दाट, काळ्या केसांचा तुरा. देवानंदच्या डोक्यावर ऐन तारुण्यात असायचा तसा. अंगावर खादीचा पांढरा स्टँड कॉलरचा नेहरू शर्ट आणि अरुंद पायजमा. अंगाचा किडकिडीतपणा स्पष्ट करणारे हे असे कपडे, घट्ट घट्ट. अगदी हळू आवाजात, खालच्या स्वरात बोलण्याची सवय. स्वभाव अत्यंत भिडस्त. नेतृत्वाचे अनेक गुण असूनही, या भिडस्तपणामुळे शक्यतो समोर येण्याचं टाळण्याची वृत्ती; पण संघटनेच्या सर्व बैठकांना, सभा संमेलन, अधिवेशनात आवर्जून हजर राहणार. मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेला. अंगी अनेक गुण असूनही भिडस्त स्वभावामुळे या गुणांना उजेड दिसला नाही. दुर्दैवाने शिक्षणही मध्येच सोडावं लागलेलं. नवसा-सायासानं दीर्घ आजारातून वाचलेलं लेकरू, म्हणून बालपणापासूनच या लेकरानं कधी बाळसं धरलंच नाही. बालपणीच्या या दीर्घ आजारामुळे कदाचित स्वभावातला हा भिडस्तपणा, हा शांतपणा आलेला असावा.

पण हा सारा इतिहास झाला. शेतकरी संघटनेनं या माणसात एक विलक्षण आत्मविश्वास निर्माण केला. एरव्ही शांत असलेल्या या माणसाला किती कठोर होता येतं, हे मी अनुभवलंय. त्याचं असं झालं, ८६ च्या कापूस आंदोलनात मराठवाड्यात मुखेड आणि सुरेगाव येथे पोलिसांनी गोळीबार केला. सुरेगावच्या गोळीबारात तीन शेतकरी मारले गेले. या गोळीबाराची चौकशी करण्यासाठी न्यायमूर्ती मालवणकरांची एकसदस्यीय समिती शासनानं नेमली. या आयोगाच्या वतीनं मुखेड गोळीबाराची चौकशी नांदेडमध्ये होणार होती. या चौकशीच्या कामी मी आणि हा माणूस असे आम्ही दोघे रात्रीच्या गाडीने नांदेडला चाललो होतो. आम्ही ज्या डब्यात बसलो, त्याच डब्यात आमचे एक फौजदार मित्रही बसले होते. बहुधा हा त्यांचा खासगी दौरा असावा. नसता तर दुसऱ्या वर्गात त्यांनी प्रवास केलाच नसता. आमच्या समोरच्याच बाकावर बसलेले. तेव्हा



आमचा रामराम झाला. 'तुम्ही कुठे, तुम्ही कुठे,' अशी चौकशी झाली. गोळीबाराच्या चौकशीसंबंधात आम्ही चाललो आणि फौजदार महाशय घसरले शेतकरी संघटनेवर.

''कोण म्हणतो शेती फायद्याची नाही? आपला शेतकरी मुळातच आळशी आहे, व्यसनी आहे. त्याला कष्ट नको. आधुनिक पद्धतीने शेती नको. मग शेती तोट्याची होईल नाही तर काय? कष्ट करा, शेती पिकवा अन् मजेत राहा. कशाला पाहिजेत ही आंदोलनं. आंदोलन करता आणि आम्ही गोळीबार केला, की कशाला ओरडता? आम्ही आमचं काम करतो. तुम्ही तुमचं करा,'' असं बरंच काही बोलत राहिले. अधून-मधून आम्ही - म्हणजे मी - अर्धविराम, स्वल्पविराम काय तो देत राहिलो. पूर्णविराम आणखी द्यायचा होता. आतापर्यंतच्या अनेक अनुभवांवरून अशा 'शहाण्या' माणसाशी वाद घालण्यात काही अर्थ नसतो, हे एव्हाना माझ्या लक्षात आलेलं होतं. सुरवातीच्या काळात मी जोशात उत्तर देत असे; पण पुढे पुढे हे लक्षात यायला लागलं, की अशा माणसांना काही समजून घेण्याची इच्छाच नसते. त्यांचा विरोध आपलं अस्तित्व दाखविण्यापुरता, वाद घालण्यासाठी असतो. प्रस्थापित समाजाविरुद्ध दंड ठोकण्याची जिद्द असावी लागते. ती नसते, म्हणून ही अशी 'जमेना कुठं आणि बडविले भटं' अशी वृत्ती होते; पण आतापर्यंत शांतपणे ऐकत बसलेल्या माझ्या साथीदाराला राहवले नाही. त्यानं पहिल्यांदाच तोंड उघडलं.

''आपण कुठले?''

''नाशिक-नगरकडचा.''

''किती शेती आहे घरी?''

''सत्तर एकरपैकी ५० एकर पाण्याखालची.''

''तुम्ही किती भाऊ?''

''दोघे.'' त्यानं चालवलेली ही चौकशी, की उलट तपास, मी शांतपणे ऐकत होतो. माझ्या मित्राचा रोख कुणीकडे हे माझ्या काही लक्षात येईना आणि ज्याला प्रश्न विचारणे चालले होते, तो तर जाणूनबुजून फौजदार.

''उत्पन्न किती होतं शेतीपासून?''

''२०-२५ लाख.''

''तुम्ही शेती पाहता की वडील?''

''वडील.''

''तुम्ही दोघे भाऊ काय करता?''

"नोकरी. दोघंही पोलिस खात्यात."

"पगार किती मिळतो?"

"तीन-चार हजार."

"वर्षाला २०-२५ लाख रुपये मिळतात, तर नोकरीची ही झकमारी करता कशासाठी? उत्पन्नाच्या गप्पा कशाला मारता? तुमच्या उसाला काय डायरेक्ट साखरच येती अन् आमच्या शेतात ढेकळंच पिकतात का? तीन-चार हजार रुपयांचे मुनीमच ठेवत असाल, मग ही नोकरी कशाला करता? कशाला थापा मारता राव? तुमची शेती नंबर दोनचा पैसा पांढरा करण्यासाठी आहे." इतकं तडकून तर त्या फौजदाराला कधी त्याचा 'डीआयजी'सुद्धा बोलला नसेल. माझ्या मित्राचा संताप अनावर झाला आणि तो बाजूच्या कंपार्टमेंटमध्ये निघून गेला. फौजदारानं चेहऱ्यावरचा घाम पुसला अन् मला विचारलं,

"वकीलसाहेब, कोण हो हे?"

"वैजनाथराव रसाळ, नांदापूरचे!"

हा काही पहिला प्रसंग नव्हे. शरद जोशी आणि शेतकरी संघटना म्हणजे त्यांची श्रद्धास्थानं. त्या श्रद्धास्थानांना कुणी प्रत्यक्ष जराही धक्का लावला, की ते असेच उसळणार. ते मला नेहमी म्हणायचे,

"वकीलसाब, आमची जात लई कडू. शेतकरी जैसा दाता नही अन् ठोके बिगर देता नही." शेतकऱ्यांच्या गळ्याला नेमका शेतकरी नेतेच का फास लावतात, हा त्यांना पडलेला नेहमीचा प्रश्न.

"आमचे माणसं लई हलकट. खुर्चीसाठी भाऊ भावाचा, बाप लेकाचा गळा धरतात."

आपला एक अनुभव वैजनाथराव सांगतात. त्यांचे एक नातेवाईक वकिली करतात. ते एकदा वैजनाथरावांना म्हणाले, "या शरद जोशीचं काय खरं. तो बामन माणूस, तो शेतकऱ्यांचं काय भलं करणार? तुम्ही कशाला त्याच्या नादी लागता?" वैजनाथराव सांगतात, "आमच्या जातीमध्ये शरद जोशींवर बामन म्हणून खूप राग. मी त्या वकीलसाहेबांना म्हणालो, 'यशवंतराव, वसंतराव, शरदराव सारे मराठ्याचे. त्यांनी सिलिंगचा कायदा, लेव्हीचा कायदा उचलून धरला. लेव्हीच्या कायद्यानं अन् सिलिंगच्या कायद्यानं सर्वात जास्त नुकसान कुणाचं झालं असेल, तर ते आपल्याच जातभाईंचं. लेव्ही वसुलीसाठी अधिकारी गावात आले, की तुमचे माझे बाप, शेतात-घरात लपून बसायचे. तेव्हा या लीडर लोकांनी विरोध नाही केला, तर बैलगाड्या सजवून, बँड लावून लेव्ही



घातली मिरवणुकीनं. सिलिंगनं, लेव्हीनं शेतकऱ्यांचं कंबरडं मोडलं. सिलिंगमध्ये तर किती तरी शेतकऱ्यांची सगळी जमीन गेली आणि एकेकाळचा जमीनमालक मजूर झाला. देशोधडीला लागला. त्या वेळी शेतकऱ्यांच्या मदतीला आपला एक माईचा लाल पुढे नाही आला. पुढे लेव्हीला कडवा विरोध कोणी केला? आपल्या लोकांनी नाही. नांदापूर, आपलं गाव, काँग्रेसचं गाव. निजामाविरुद्ध लढ्यात आपल्या गावानं भाग घेतलेला. काँग्रेसच्या फैजपूर अधिवेशनात आपल्या गावचे काही लोक गेलेले. हजारो पोती ज्वारी लेव्हीत तुमच्या माझ्या बापाचा गळा धरून वसूल केलेली. तुमचे माझे बाप कोलमडून पडलेले. त्या वेळी माझ्या बापाची बीजोत्पादनाची सहाशे रुपये क्विंटल भावाची ज्वारी लेव्ही भावात ४६ रुपयांनी खरेदी केली शासनानं. माझा बाप घसा खरवडून ओरडू लागला, ही बियाची ज्वारी आहे; मी दुसरी ज्वारी विकत घेऊन देतो. पण एक कोणी ऐकलं नाही. त्या वेळी लेव्हीची अशी कहरी सक्ती करू नका असं सांगायला आपल्या लीडर लोकांकडे तुमचे माझे बाप गेले होते, तेव्हा ते आपले नेते काय म्हणाले होते? 'आमच्याकडे येऊ नका. तुमच्यासाठी आम्ही भांडलो, तर आम्हाला अटक होईल.' कशाला मराठ्याच्या बाता करता? शेतकऱ्यांचा खरा तारणहार तर शरद जोशीच. मग ते बामन असोत की आणखी कोणी!" ज्वारी पिकवणार शेतकरी. त्याच्या स्वतःच्या शेतात. ती ज्वारी त्याच्या घरी राहणार. तो त्या ज्वारीचा मालक. ज्वारी तो विकेपर्यंत घरातच ठेवणार. त्याला तुम्ही साठेबाजी म्हणायला लागले, तुमच्या-माझ्या बापानं लेव्हीत ज्वारी घातली आणि आपलेच लीडर लोक गावोगावी भाषणं देत सांगू लागले, 'आम्ही इंदिरामायच्या वीस कलमी कार्यक्रमाप्रमाणे नांदापूर, झरी, संबर या गावच्या साठेबाजांकडून हजारो पोती ज्वारी वसूल केली! तुमचे-माझे बाप साठेबाज होते का? त्या वेळी माझ्या बापानं हाय खाल्ली. तेव्हापासून अंथरूण धरलं, ते दोन वर्षं औषधपाण्यावर जगले. जीव गेला तेव्हाच या धक्क्यातून सावरले. मेले ते हाय खाऊनच. आपल्या जातीची ही खरी कहाणी आहे. तुम्ही काय शरद जोशींची जात काढता?

वैजनाथराव बोलले फक्त; पण एकूणच शेतकऱ्यांच्या मनातली ही खरी खदखद आहे. प्रसंगी ती अशीही बाहेर पडते, एवढंच. शेतकरी संघटनेच्या आंदोलनांना प्रचंड पाठिंबा मिळतो, तो यामुळेच, हे लक्षात घ्यावे लागेल. वैजनाथराव एवढे बोलले, पण अजिबात भावनाविवश न होता. अत्यंत शांतपणे. पण जे बोलले, ते मात्र मनापासून. गावातील एका तेरशाला पुढे-मागे आमदार,

मंत्री झालेले कॉंग्रेसचे एक नेते गणेशराव दुधगावकर आले होते. वैजनाथरावांच्या छातीवरील बिल्ला पाहून ते म्हणाले, ''शरद जोशी तुमची दिशाभूल करताहेत. ते तुम्हाला भाव देऊ शकत नाहीत. तुम्ही कशाला त्यांच्या नादी लागता?'' यावर वैजनाथरावांनी त्यांना विचारलं, ''शरद जोशींनी काय, कशी आणि कुणाची दिशाभूल केली, ते तुम्ही तरी सांगा. तुम्ही तर सत्तेतली माणसं. भाव देणं तर तुमच्या हाती आहे. मग तुम्ही भाव का देत नाही? भाव देण्याचं सोडा. कापसाचा भाव तुमचा. कापसाची एकाधिकार खरेदी तुमची. सत्ता तुमची; मग कापसाचा चुकारा का नाही करत? त्याच्यात नाना कपाती, बाकी चुकारा तीन तीन हप्त्यांत आणि तेही हप्ते वर्षावर्षानी, हे असं का? आमच्या संघटनेनं ही प्रश्नावली दिली आहे. याची काही उत्तरं आहेत का पाहा तुमच्याकडं.'' गणेशराव यावर काय बोलणार? शेतकऱ्यांत जातीच्या नावावर बुद्धिभेद करण्याच्या त्यांच्या प्रयत्नाला त्यांच्याच जातवाल्यानं अशी बगल दिल्यावर त्यांनी तरी काय करावं? वैजनाथरावांचे भाऊ दिनाजी तर त्यांच्याही पुढं दोन पावलं. या दोघांची बहीण दोडगावच्या मगरांना दिली आहे. ते मगर म्हणजे गणेशरावांचे चाहते. या प्रसंगानंतर आपला राग व्यक्त करण्यासाठी ते मुद्दाम नागपूरला आलेले. मेहुणे आले, म्हणून त्यांचं आगतस्वागत बंधूंनी केले आणि जेवणखाण झाल्यावर त्यांना म्हणाले,

''दाजी तुम्ही माळवदावर झोपा. अंथरूण टाकून ठेवलंय.'' यावर मगर म्हणाले, ''हे बघा, तुम्ही आमच्या साहेबांचा, गणेशराव दुधगावकरांचा अपमान केलात. मी इथे झोपणार नाही. वाण्याकडे जाईन.'' यावर दिनाजी म्हणाले,

''हे बघा दाजी, तुम्ही गैर मानू नका. आमचं काही गणेशरावाशी भांडण नाही. आमची वैचारिक लढाई आहे. गणेशरावांनी शरद जोशींवर टीका केली म्हणून आम्ही उत्तर दिलं एवढंच.'' तरीही दाजीचा राग कमी होईना.

''नाही. तुम्ही जाणून-बुजून साहेबांचा अपमान केलात. मी इथे थांबणार नाही.'' आता दिनाजीचाही धीर संपला. तडकून ते म्हणाले,

''तुम्ही वाण्याकडे जा नाही तर आणखी कुठे जा. तुमचा सासरा, आमचा बाप हाय खाऊन मेला, तो या शासनाच्या धोरणामुळे. तुमची सासू, आमची माय शरपंजरी पडली आहे, तीही बापानं हाय खाल्ली म्हणून. तुम्हाला आमची बहीण दिलेली, म्हणून तुमचा मान. अहो दाजी, एक तर त्राता भेटला शेतकऱ्याला. त्यालाबी तुमचे साहेब नावं ठू लागले, तर आम्ही काय काकणं भरलेत, गप बसून ऐकायला?''



लेव्हीच्या प्रकारामुळे वैजनाथरावांचे वडील धोंडजी रसाळ यांनी हाय खाल्ली अन् अंथरूण धरलं, तेव्हा वैजनाथराव लॉच्या पहिल्या वर्षाला होते. वडिलांनी त्यांना परत बोलावलं. भावाभावांना जमिनी वाटून दिल्या आणि आपल्या आपल्या जमिनी सांभाळायला सांगितल्या. वडिलांची जगण्याची इच्छाच संपली होती. ज्या गावात एवढ्या मानानं दिवस काढले, तिथे हा असा अपमान त्यांना सहन झाला नाही. शेवटी ७४ मध्ये त्यांनी देह ठेवला. एव्हाना वैजनाथरावांना शिक्षण अर्धवट सोडावं लागलेलं होतंच. अचानक पडलेल्या जबाबदारीनं ते बावरून गेलेले. शिक्षण अशा तऱ्हेनं संपलेलं. लग्नही झालेलं होतं आणि आता साऱ्या संसाराची जबाबदारी अंगावर पडलेली.

आता शेती सुरू झाली. जमीन चांगली होती. शेती आधीच मार्गी लागलेली. तेव्हा शेतीचं खरं 'मोल' कळायला उशीर लागला; पण वडिलांच्या अनुभवावरून शासनाबद्दल एक रोष निर्माण झालेला. आतापर्यंतच्या व त्यानंतरच्या स्वतःच्या अनुभवावरूनही त्या रोषाला खतपाणीच मिळत गेलं आणि बोल बोल म्हणता ८४ साल उजाडलं.

त्याही आधी दोन-तीन वर्षांपासून शरद जोशी आणि शेतकरी संघटनेचं नाव चर्चेत होतंच; पण त्याचा परिणाम आणखी या भागातील शेतकऱ्यांवर व्हायचा होता. आत्ता आत्ता कुठे परभणीच्या कृषी विद्यापीठातील विद्यार्थी शेषराव मोहिते आणि त्यांचे सहकारी मित्र संघटनेकडे वळले होते. पिंपळगाव बसवंतच्या आणि चाकणच्या आंदोलनामुळे शेतकऱ्यांमध्ये थोड्याफार प्रमाणात उत्सुकता निर्माण झाली होती. अशात झालं परभणीचं शेतकरी संघटनेचं अधिवेशन. हे अधिवेशन झालं आणि मराठवाड्याचं चित्रच बदललं. म्हणजे तसा कायिक बदल नाही झाला, पण शेतकरीवर्गात एक चैतन्य निर्माण झालं. एक विश्वास निर्माण झाला, की कुणी तरी एक हकीम आपल्या चिरंतन दुखण्यावर एक अक्सीर औषध देणारा आलाय. याच विश्वासानं महाराष्ट्रातून वैजनाथराव, दिनाजीसारखी शेतकऱ्यांची तरणी पोरं, म्हातारे-कोतारे, बायाबापडे लाखालाखाच्या संख्येनं परभणीला आले. तीन दिवसांचं मंथन ऐकलं. शरद जोशी, माधवराव मोरे, प्रल्हाद पाटील कराड आणि इतर अनेकांना ऐकलं. शेवटच्या दिवशीच्या खुल्या अधिवेशनाचं विराट रूप पाहिलं आणि नवीन उमेद घेऊन ही मंडळी गावोगावी परतली. तेव्हापासून वैजनाथ, दिनाजी यांनी संघटनेच्या कामी वाहून घेतलं आणि पुन्हा वळून पाहिलं नाही. त्यानंतर जातीची अनेक आमिषं आली, पण सारे मोह झुगारून 'शरद पंथा'वरील वाटचाल त्यांनी चालूच ठेवली, ती

आजतागायत. आणि इतकी वर्षं संघटनेत राहिल्यावर आता वाट सोडण्याचा मोह होतोच कुणाला?

*उमर तमाम बिताई बुत परस्तीमें*

*आखरी वक्त क्या खाक मुसलमाँ होंगे!*

या काळात संघटनेतील काही बुरूज ढासळले, काही टेकड्या उद्ध्वस्त झाल्या; पण संघटनेनं आपले गड-किल्ले राखले, ते या वैजनाथ, दिनाजीसारख्या शिलेदारांच्या बळावर.

परभणी अधिवेशनात संघटनेनं मंत्र्यासाठी गावबंदीचा आदेश दिला. त्यानंतर लगेच रामराव आदिक आणि इतर तेरा मंत्र्यांचा ताफा आला होता परभणीत. त्यात परभणीचे मंत्री गणेशराव दुधगावकरही होते. त्या सर्वांची जाहीर सभा शनिवार बाजारच्या मैदानावर आयोजित करण्यात आली होती. ही सभा उधळून लावायची, असं शेतकरी संघटनेनं ठरवलं, याची कुणकुण पोलिसांना लागली. त्यामुळे कडेकोट बंदोबस्तात ही सभा शनिवार बाजारात सुरू झाली. वैजनाथराव रसाळ, दिनाजी, ब. ल. तामसकर, नारायण जाधव, सोपान औचार, रंगनाथ चोपडे आणि अनेक कार्यकर्ते सभेत ठिकठिकाणी विखरून बसले. सर्वांनी छातीवरील बिल्ले काढून ठेवलेले. बिल्लेवाल्यांना सभेत मज्जाव केलेला, म्हणून ही काळजी घेतलेली. सभेत पुढे रंगनाथ चोपडे बसलेला. सभा सुरू झाली आणि रंगनाथनं उभे राहून प्रश्न विचारायला सुरवात केली. त्याच्या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी 'खाली बसवा, खाली बसवा', असा आदेश देण्यात आला. तो आवाज ऐकताच सभेत ठिकठिकाणी विखरून बसलेल्या शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी संघटनेच्या घोषणा द्यायला सुरुवात केली. त्यामुळे एकच गोंधळ उडला. इतका बंदोबस्त असताना हे लोक शिरले कसे, याचं पोलिसांना आश्चर्य वाटायला लागलं. घोषणाबाजी करणाऱ्यांना हुसकून लावण्यासाठी हातात लाठ्या घेतलेले पोलिस लोकांत शिरले. त्यांना लाठ्या घेऊन शिरलेले पाहून लोकांत धावपळ सुरू झाली. इकडे घोषणांचा गदारोळ सुरूच होता. या साऱ्या प्रकारामुळे एकदा जी सभा उधळली ती उधळलीच. पोलिसांच्या बंदोबस्तात मंत्र्यांना डाक बंगल्यावर परतावं लागलं. तीस-चाळीस लोकांना पोलिसांनी अटक करून ठाण्यात बसवलं; पण या अटकेचा आता काय फायदा, बैल गेला नि झोपा केला! अटक केलेल्यांना नंतर सोडून देण्यात आलं.

सभा उधळून लावली, अटकही झालेली. आता तर काय संघटनेचा शिक्का अधिकच पक्का झालेला. ''संघटना सरदार आम्हाला, काय कुणाची भीती?' अशी अवस्था आता झालेली.



आता आलं चांदवड अधिवेशन. वैजनाथरावांना त्याआधी जिंतूर तालुकाप्रमुख केलेलं. चांदवडच्या महिला अधिवेशनासाठीच्या प्रचाराकरिता वैजनाथरावांनी मारवाडी ते करडगाव अशी सायकल रॅली आयोजित केली. या रॅलीत चाळीस सायकलस्वार होते. ज्यात वैजनाथरावांबरोबर होते टाकळीचे गणेश सामाले, कान्हडचे विठ्ठल डोंबे, बोरीचे राजा गोरे. सारा रस्ता अवघड. काही भाग तर चक्क डोंगराळ. पैकी चारठाण ते बामनी हा रस्ता तर अगदी कमरतोड. या भागातून जाताना रॅलीला नाना अडचणींना तोंड द्यावं लागलं. पॅडल तुटणे, पंक्चर होणे, चेन पडणे असे अनंत प्रकार घडले. याच भागात रॅली गेली तेव्हा एका गावात काही तरी धार्मिक सप्ताह होता. गाव छोटं. सारी माणसं त्या सप्ताहात बसलेली. तेव्हा तिथे सभा न घेता रॅली पुढे निघाली. थोडं पुढे जाते न जाते तोच वादळ अन् हलक्या पावसानं गाठलं. धूळ तर प्रचंड. समोरचं काही दिसेना. सायकली चालवणं कठीण झालं. वर पाऊसही होताच. तेव्हा रॅली त्याच गावाकडे परतली आणि शाळेत येऊन थांबली. त्या वादळात सप्ताह चालला होता, त्या ठिकाणचा शामियाना कोसळून पडला. वर पावसाने बऱ्यापैकी जोर धरलेला. तेव्हा सप्ताहातील मंडळी जवळच शाळा म्हणून शाळेत आश्रयाला आली. काही वेळानं वारा, पाऊस थांबला आणि वैजनाथरावांनी तिथेच सभा सुरू केली. सभा संपली आणि त्या गावातील लोकांनी सप्ताहात जेवायचं आमंत्रण दिलं. पण एक अडचण होती. आणखी कुणी महाराज यायचे होते आणि महाराज आल्याशिवाय नैवेद्य दाखवता येत नव्हता आणि नैवेद्याशिवाय जेवण नाही. पण रॅलीला परत आणखी बराच पल्ला गाठायचा होता, तेव्हा जेवणाला बाय बाय करून रॅलीनं गावकऱ्यांचा निरोप घेतला. संघटनेच्या घोषणा दिल्या आणि रॅली चले चली!

आता रॅलीला भुका लागलेल्या. सोबत खायला काही नाही. तेव्हा जेवणाची भूक रॅलीनं रानच्या मेव्यावर भागवायचं ठरवलं. डोंगरभागात जंगली बोरी, बिब्याची झाडं होती. कुठे कुठे शेतांनी वाळकं होती. तेव्हा रॅलीनं या कच्च्यामच्च्या बोरांवर आणि बिब्यांच्या फुलांवर ताव मारला. झोपेला धोंडा अन् भुकेला कोंडा म्हणतात तो असा. रानमेवा खात रॅली चले चली.

याच प्रचार यात्रेत रॅली एका गावातील वाण्याच्या दुकानासमोर थांबली. तिथे एक म्हातारी बाई खरेदीसाठी आलेली होती. तेलासाठी एक छोटी शिशी होती तिच्या हातात. वाणी वैजनाथरावांना बोलता बोलता सहज म्हणाला,

"मी तर एक छोटा दुकानदार. माझा तर धंदा शेतीचा नाही. मग मला तुमच्या शेतकरी संघटनेशी काय घेणंदेणं?" वैजनाथराव काही उत्तर द्यायच्या आधी ती म्हातारी म्हणाली,

"अप्पा, तुझ्या दुकानी माल घ्यायला येणारे कोन हायेत? आमीच तर येतू की! आम्ही तुझ्या दुकानी येणारे समदे शेतकरी हायेत. आमाला माल पिकला तर आमी येणार तुझ्या दुकानात अन् आमालाच माल न्हाई झाला तर आमी काय तुझ्या दुकानी येनार अन् तू काय माल इकनार. ऱ्हाऊ दे, छटाक तेल दे." त्या म्हाताऱ्या बाईनं किती सोप्या शब्दांत 'ग्यानबा'चं अर्थशास्त्र सांगितलं! या रॅलीचा शेवट करडगावी झाला. तिथे ब. ल. तामसकरांच्या हातांनी वैजनाथराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

वैजनाथरावांचं घर तसं नांदापूरमधील प्रतिष्ठिताचं घर. वडिलांच्या काळापासून लोक त्या घराविषयी चांगलं बोलणार. त्यामुळे अवतीभोवतीच्या परिसरात कुणी नेता, कुणी मंत्री आला की वैजनाथरावांना बैठकीचं आमंत्रण हमखास येणार, 'गणेशराव' पुराण नुकतंच होऊन गेलेलं. त्याची चर्चा अद्याप संपलीही नाही, तोच शरद काँग्रेसचे दोन नेते डॉ. पद्मसिंह पाटील आणि दिगंबरराव वडीकर नांदापूरला आलेले. त्या काळी शरद पवार गटाची काँग्रेसशी फारकत झालेली. नांदापूरच्या भेटीत पद्मसिंह पाटील शेतकरी संघटनेसंदर्भात काही विधान करते झाले. त्यावर वैजनाथरावांना राहवलं नाही. ते म्हणाले, "तुमच्या शेतात काही जादू आहे की काय? तुमच्या कापसाला भरपूर बोंडं अन् आमच्या कापसाला अळ्या लागतात की काय? तुमच्या ज्वारीची कणस गच्च अन् आमची ज्वारीच पातळ, असं होतं की काय? मग तुमच्या कापसाला, ज्वारीला एवढा उतारा कसा ते तरी सांगा." त्यांनी पाहुण्यांसमोर शेतकरी संघटनेची प्रश्नावली टाकली आणि "याची उत्तरं तरी द्या आम्हाला." यावर पाटलांनी कबूल केलं, "मला शरद जोशींचे विचार मान्य आहेत. मी विधानसभेवर गेलो तर तुमची बाजू अवश्य मांडीन." पाटील पुढे विधानसभेत गेले आणि जातच राहिले. पण शेतकऱ्यांचा प्रश्न होता तिथेच विसरून गेले. प्रभू रामचंद्रांच्या काळात शरद पवारांच्या हनुमानासारखे हनुमान असते तर लंकेच्या वैभवाला भुलून तिथेच घरोबा करून राहिले असते, आणि बिचाऱ्या सीतेला आणखी किती युगे वाट पाहावी लागली असती कुणास ठाऊक?

८६ सालच्या कापूस आंदोलनात वैजनाथरावांना विशेष कामगिरी बजावावी लागली होती. त्या वर्षी शेतकरी संघटनेनं कापसाच्या प्रश्नावर 'महाराष्ट्र बंद'चं



आंदोलन पुकारलं. महाराष्ट्रातील सर्व महामार्ग आणि जिल्हा रस्ते रोखायचे. गटागटानं अटक द्यायची. आंदोलन जास्तीत जास्त काळ चालेल यासाठी ही काळजी घ्यायची. आंदोलन सुरू होण्यापूर्वीच आम्हा सर्व प्रमुख कार्यकर्त्यांना सटीच्या 'सुमूहर्तावर' अटक करण्यात आली आणि आमची रवानगी परभणीच्या तुरुंगात करण्यात आली. प्रमुखांनाच अटक केली, की मग आंदोलन कोण चालवणार आणि कसं चालवणार, असा शासनानं विचार केला असावा. शेतकरी संघटनेची मूळशक्ती आम्हासारख्या छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांत नाही तर ती आहे संघटनेच्या विचारांत, शरद जोशींच्या आदेशात आणि सर्वसामान्य शेतकऱ्यात. आम्ही तर केवळ निरोपे. शासनाला हे आणखी कळायचं होतं. म्हणून तर शेतकरी संघटनेचा घात तिच्या जन्मापासूनच करण्याचे शासनाचे आणि इतरही महाभागांचे सारे प्रयत्न शेतकऱ्यांनी कसे फेटाळून लावले, हे त्यांना कळलंही नाही. परभणीलाही तेच झालं. आम्हाला अटक झाल्याचे कळताच आम्हाला भेटायला पोलिस ठाण्यावर काही कार्यकर्ते आले. वैजनाथराव काही आले नव्हते. त्यांनाही पकडण्याचा आदेश सुटला होता. आलेल्या कार्यकर्त्यामार्फत आम्ही वैजनाथरावांना अटक न होऊ देता, भूमिगत राहण्याची सूचना केली. आंदोलन चालू ठेवण्यासाठी काही माणसं बाहेर राहणं आवश्यक होतं. एक वेळ अटक देऊन जेलात राहणं सोपं; पण बाहेर राहून आंदोलन चालू ठेवणं महाकठीण. एक तर बाहेर दहशतीचं वातावरण, दुसरं केव्हाही अटक होण्याची भीती. त्यामुळे बाहेर राहायचं तेही लपत-छपत. आमचा निरोप वैजनाथरावांना मिळाला आणि ते भूमिगत झाले आणि त्यांच्यासोबत दिनाजीसुद्धा. त्यांनी आता आंदोलनाची जबाबदारी स्वीकारली. पहिल्या दिवशी टाकळीला आंदोलन झालं. दिवसभर ते आंदोलन चाललं. सायंकाळी दहा-बारा जणांना अटक झाली. ती अटक टाळून रसाळ बंधू पलायन करण्यात यशस्वी झाले. घरी अपरात्री परतले. दाराला कडी लावून दारामागची आगळही लावली. आलेच पोलिस तेवढ्या रात्री तर मागच्या मागे पळून जायला तेवढाच वेळ मिळावा. ऐन मध्यरात्री दारावर थाप पडली. आले वाटतं पोलिस. पत्नी म्हणाली, "मी पाहते कोण आहे ते." तिनं दार किलकिलं केलं. "कोण आहे?" तीन दार किलकिलं केलं. दारात तोंड उपरण्यानं झाकून कुणी तरी उभं होतं. पोलिस तर नक्कीच नसावा. पोलिस आले तर चांगले वाजत-गाजत येतील. पाहा, काय योग आहे! ज्यांनी तोंड लपवावं ते वाजत-गाजत येणार आणि ज्यांनी वाजत-गाजत यावं त्यांना असं रात्री-अपरात्री तोंड लपवत यावं लागलं. "मी आहे.

विश्वनाथराव मारवाडीचा. वैजनाथराव आहेत का?'' त्यांना आत बसवलं. तो आवाज ऐकून वैजनाथराव आले. विश्वनाथरावांसोबतच मारवाडीचे बाबूरावही होते. तिघांनी खलबतं केली आणि जिंतूर नाका अडवायचं ठरवलं. तो एक नाका अडवला, की राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य महामार्ग असे दोनही मार्ग अडवले जातात. त्या तयारीसाठी भल्या पहाटे वैजनाथराव, दिनाजी, विश्वनाथराव आणि बाबूराव शेताशेतांनी, आडमार्गाने पायी पायी निघाले. मारवाडीला आल्यावर बैलगाडीनं परिसरातील कोक, करवल, कसर, रेप, आसेगाव, वसा, पाचेगाव, मानधन करून रात्री पुंगळ्याला मुक्काम केला. तिथल्या शेतात. तिथून राहिलेली गावं करून मारवाडीला परत आले आणि नंतरच्या रात्री तिथेच मुक्काम करून दिवसा छाती ताठ करून सारी मंडळी जिंतूर नाक्यावर आली. आता करू दे काय अटक करायची ते. इकडे प्रयत्न करूनही वैजनाथरावांना पोलिस अटक नाही करू शकले. उलट ते जिंतूर नाक्यावर एवढा मोठा आंदोलकांचा जमाव जमा करू शकले. याच्यामुळे अधीक्षकांनी फौजदाराला बरंच झापलं म्हणे. एवढ्या जमावाला सांभाळणं जरा कठीणच. काही निमित्त करून लाठीचार्ज करण्याची पोलिसांची तयारी होती. त्यामुळे आंदोलनानं हिंसक वळण घेऊ नये, यासाठी एका एका वाहनाला अडवायचं आणि पाच पाच जणांनी अटक द्यायचं ठरवलं; मात्र अडवलेलं वाहन परत हललं नाही पाहिजे याचीही काळजी घेण्यात आली. दिवसभर शांततेत आंदोलन चाललं. दोन्ही, तिन्ही दिशांना वाहनांच्या रांगा लागलेल्या. या आंदोलनात ८० वर्षांचे वृद्ध मुंजाजी लांडगे हेही होते. वैजनाथराव त्यांना म्हणाले,

''काका, तुम्ही परत जा. तुम्ही अटक देऊ नका. जेलात तुम्हाला त्रास होईल,'' पण म्हातारा काही ऐकना. शेलारमामांचे वारस ते : ''आरं पोरा, जात सोडावी मानसानं पन साथ सोडू नै. आरं तुजा बाप मह्या संगतीचा. धोंडजीची तुमी पोरं मलाबी पोरावानी. तवा होऊद्या जे व्हायचं ते.'' संध्याकाळपर्यंत हे आंदोलन चाललं. शेवटी वैजनाथराव, बाबूराव, विश्वनाथराव, दिनाजी व इतर पन्नास-साठ जणांना अटक झाली. सायंकाळी एव्हाना परभणीतील नव्हे, तर अवतीभोवतीच्या जिल्ह्यांतील तुरुंगही सत्याग्रहींनी ओसंडून वाहू लागले. त्यामुळे या मंडळीला दूर ठाण्याला जेलात पाठविण्यात आलं. पुढे पुढे तर जेलाची क्षमताही संपल्यामुळे आंदोलनकर्त्यांना केवळ अटक दाखवून जागेवरच सोडण्यात येई.

शेतकरी संघटनेनं निवडणुकीसंदर्भात वेळोवेळी त्या त्या प्रसंगाला अनुसरून; पण शेतकरीहित समोर ठेवूनच भूमिका घेतली आणि या भूमिकेला शेतकऱ्यांनी



मनापासून पाठिंबाही दिला. कुठलीही भूमिका घेण्यापूर्वी संघटनेच्या विशेष बैठकीत अनुकूल-प्रतिकूल चर्चा होई आणि त्यानंतरच भूमिका घेतली जाई. या सर्व प्रक्रियेतून इतर हजारो कार्यकर्त्यांप्रमाणे वैजनाथरावही गेलेले. तेव्हा त्यांना ही पार्श्वभूमी ठाऊक. पण संघटनेचे हितशत्रू संघटनेवर जाणून-बुजून टीका करायचे. खरं तर अशा टीका करणाऱ्यांनी 'जरा अपनी गरेबाँ मे झाँक के देखायला' पाहिजे होतं; पण राजकीय पक्षाचे लोक म्हणजे 'आपलं टाकते झाकून अन् दुसऱ्याचं पाहते वाकून' अशा वृत्तीचे. अशीच टीका एकदा एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यानं वैजनाथसमोर केली. तेव्हा वैजनाथनं त्यांना चांगलंच सुनावलं. ''का हो, तुमचे यशवंतराव, प्रतिशिवाजी म्हणवले जातात. त्यांनी काँग्रेस, रेड्डी काँग्रेस, इंदिरा काँग्रेस असा प्रवास केला. इंदिराचरणी लोटांगण घातलं. तुम्ही कधी खंत नाही व्यक्त केली. शरद पवारांनी तर किती उड्या मारल्या, तुम्ही कधी ब्र नाही काढलंत. सुरेगावच्या गोळीबारात तीन शेतकरी ठार झाले. आंदोलनात हजारो लोक अटक झाले. पवारांना तेव्हा सुरेगावला भेट द्यावी नाही वाटली. त्यापरता राजीव गांधींशी मनोमिलन गोड वाटलं. तुम्ही कधी खेद नाही व्यक्त केलात. शेतकरी संघटना म्हणजे 'गरीब की जोरू, सबकी भाभी' वाटते काय? पवारांनी आता तर परदेशी मुद्द्यावर पक्षच वेगळा काढला आणि निवडणुकीच्या निमित्ताने परत मूळ काँग्रेसशीच हातमिळवणी केली. तुम्ही कधी जाब नाही विचारला. तुमची टीका ही मतलबी आहे. तुम्ही मान्य करा वा न करा, इतिहास साक्ष आहे, मराठ्यांचा घात मराठ्यांनीच केला. मराठेतर मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना न्यायच दिला. वसंतराव नाईकांनी सीलिंग कायद्याची अंमलबजावणी होईल तेवढी लांबवली. अंतुल्यांनी कापसाला भाव वाढवून दिला, मनोहर जोशींनी उसावरील झोनबंदी उठवली. उलट शरद पवारांनी उसाला वाढीव भाव देण्यापासून साखर कारखान्यांना रोखणारा फतवा काढायला लावला. हातात सत्ता आल्यावरही कापसाला २७०० चा भाव देण्याचं जाहीरनाम्यात आश्वासन दिलेलं असूनही त्याला हरताळ फासला. तुम्ही त्यांना भरभरून मतं दिली आणि निवडून आल्यावर वरील जाब विचारायचं सफाईनं विसरून गेलात. काय म्हणावं तुम्हाला?''

वैजनाथराव हे नुसतेच बोलके ढलपे नाहीत, तर ते कृतिशीलही आहेत. नांदापूरजवळून वाहणाऱ्या नदीच्या पात्रात काही शेतकऱ्यांनी विहीर खोदून एक-दोन किलोमीटर पाईपलाईन टाकून पाणीपुरठ्याची सोय केली. यासाठी सक्षम अधिकाऱ्यांची रीतसर परवानगीही घेण्यात आली. या कामासाठी भलामोठा

खर्चही करावा लागला. नंतर केव्हा तरी प्यायला पाणी राहत नाही, असं निमित्त करून एका तहसीलदारानं त्या मोटारीला सील ठोकलं. वैजनाथरावांना जेव्हा हे समजलं तेव्हा ते सोबत शेतकऱ्यांना घेऊन तिथे गेले. सील तोडलं आणि वायरमनला आणून परत कनेक्शनही द्यायला लावलं. ''आमच्या गावच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आम्ही सोडवू. तशी कुणाची तक्रार आली तर आम्हाला नोटीस देऊन, आमचं म्हणणं ऐकून घेणं या तहसीलदाराला जमत नव्हतं की काय?'' त्यांचं म्हणणं हे असं आहे.

वैजनाथरावचा हा जीवनपट पाहिला, त्यांची वाणी ऐकली म्हणजे लक्षात येतं, ग्रामीण भागातल्या सर्वसामान्य तरुणाला संघटनेनं केवढा आत्मविश्वास दिला आहे. एके काळी म्हणजे फार पूर्वी नव्हे, केवळ तीस-पस्तीस वर्षापूर्वी तहसीलचा शिपाई जरी वसुलीसाठी गावात आला तर बिचारे शेतकरी रानोमाळ पळायचे. त्यांचीच आजची मुले ताठ मानेने, निधड्या छातीने अन्यायाविरुद्धच्या लढ्यासाठी सज्ज आहेत. भाव मिळेल तेव्हा मिळो, हेही नसे थोडकं!

■■



# माधवराव मोरे

मध्यम उंची अन् बांधा समोरच्या माणसाला आदरयुक्त धाक वाटावा असं एकूणच व्यक्तिमत्त्व. आतापावेतोच्या संघर्षयुक्त प्रवासात आपली किंमत वसूल केलेली; पण मान आणखी ताठ आणि बाणा करारी! चालणंही कसं टाईट. या साऱ्याचं पोलादी मिश्रण म्हणजे नाना! पिंपळगाव बसवंतचे नाना! माधव खंडेराव मोरे! शेतकरी संघटनेच्या सुरुवातीच्या काळातील ख्यातनाम चौकडी म्हणजे शरद जोशी, माधवराव मोरे, माधवराव बोरसे आणि प्रल्हाद पाटील कराड. आपल्या तुफानी वक्तृत्वाने लाखा-लाखांच्या सभा हलवून सोडणारे. 'मुलूखमैदानी तोफ' म्हणून ओळखले जाणारे नाना! एखादं काम अंगावर घेतलं, की त्या कामासाठी स्वतःला झोकून देणारे आणि प्रसंगी पूर्ण अलिप्त होणारे नाना! कुणावर राग केला तर जीवघेणा आणि प्रेम केलं तर तेही जिवापाड करणारे, मनस्वी स्वभावाचे नाना!

*उन्हे शबनम की तरह रोना नहीं आता,*
*वो रोने पे आए तो दरिया बहा देते हैं!*

खूप दिवसांपासून नानांची जवळून ओळख करून घेण्याची इच्छा होती. त्यांच्यासंबंधी संघटनेतील अनेकांकडून इतकं काही ऐकलं होतं, त्यामुळे या 'लिव्हिंग लेजंड'ला जवळून पाहावं, भेटावं अशी इच्छा होती. तसं फार पूर्वी म्हणजे विसेक वर्षांपूर्वी परभणी अधिवेशनात मी त्यांना पाहिलं होतं. त्याच अधिवेशन काळात शरद जोशी, माधव खंडेराव मोरे, प्रल्हाद पाटील कराड, भास्करभाऊ बोरावके आदींना घरी जेवायलाही बोलावलं होतं; पण तेवढ्या धूसर ओळखीच्या धाग्यावर भेटणं बरं वाटेना. तेव्हा परत एकदा श्रीकांतचा, माझ्या मुलाचा वशिला लावावा असं ठरवलं. दोन-तीन वर्षांपूर्वी अशाच एका 'नाना'ची - अंबाजोगाईचे श्रीरंग 'नाना' मोरे यांची - भेट घेण्यासाठी श्रीकांतचा मित्र शशांक जेवळीकरचा 'जॅक' लावला होता.

योगायोगानं याही वेळेस ज्यांची भेट घ्यायची, तेही नाना मोरेच; पण पिंपळगावचे आणि जॅक लावायचा होता तोही श्रीकांतच्या मित्राचा-मिलिंद सेवलीकरचा. मिलिंदनं बोलता बोलता त्याच्या व्यवसायासंबंधात नानाला

भेटल्याचा उल्लेख केला होता. माझी आणि नानांची ओळख नव्हती. म्हणजे मी त्यांना ओळखत होतो; पण ते मला ओळखत नव्हते. एवढ्या मोठ्या माणसाला पूर्ण ओळखीशिवाय कसं भेटावं म्हणून हा ओळखीचा आडमार्ग स्वीकारला होता. मिलिंदमार्फत त्याचे कन्सल्टंट कुलकर्णी, त्यांच्यामार्फत वितरक/विक्रेते पिंपळगावचे देविदास घोडके, घोडके ॲग्रो सेंटरचे मालक व चालक! अशी लाईन लावून नानांची भेट घ्यायची योजना पक्की केली.

तसं त्याही आधी नानांचे एक फॅन पुरुषोत्तम लाहोटी माझ्या पिच्छावर पडले होते. 'वकीलसाहब, आप एक बार नाना से मिल तो लो' आणि मी 'हो' म्हणालो होतो. त्यावर त्याने माधवराव मोरे यांना फोनही लावला होता, तेव्हा ते 'हो'ही म्हणाले होते. दोन दिवसांनी भेटवेळ पक्की करण्यासाठी त्याने पुन्हा फोन लावला तेव्हा मात्र, 'नको, मला जुन्या आठवणी काढल्या, की विलक्षण यातना होतात. तेव्हा जखमेवरच्या खपल्या काढणं नको,' असं ते म्हणाले. त्यामुळे मला तर उत्सुकता जास्तच वाटायला लागली. म्हणून मी हा मिलिंद – कुलकर्णी – घोडके असा महामार्ग पसंत केला. त्याच क्रमाने फोनाफोनी करून भेटीसाठी डिसेंबरातील एक रविवार पक्का केला. आपल्या आवडत्या नेत्याला भेटायचं म्हटल्यावर लाहोटीनं मला पक्कं धरून ठेवलं. त्याच्या पहाऱ्यात आम्ही परभणीहून औरंगाबादला आणि तिथून मिलिंदच्या गाडीत कुलकर्णी व मिलिंदच्या सोबत पिंपळगावला पोहोचलो.

पिंपळगावला ऐन शेतात नानांचा टुमदार बंगला आहे. द्राक्षाच्या बागेनं घेरलेला. पिंपळगावलगत मुंबई-आग्रा हा राष्ट्रीय महामार्ग आहे. तो महामार्ग ओलांडून पलीकडे गेलं, की लागतात द्राक्षांच्या बागा. काही अंतर चालून गेल्यावर लागतो द्राक्षांच्या बागेनं घेरलेला नानांचा बंगला, दोनमजली. भेटीअगोदर देविदाससेठनी फोन केलेला, तेव्हा स्वागतासाठी खाली नानांचा मोठा मुलगा विश्वास हजर होता. त्यानं त्याच मजल्यावर असलेली वाईनरी दाखवली; पण मला आणि लाहोटीला भेटायचं होतं ते लाखा-लाखांच्या सभेला प्रेरित करणाऱ्या जिवंत 'वाईनरीला'! काही वेळातच माधवराव स्वतः खाली आले. स्वागत करायला. 'मी, माधव! या वर या. आपण वरच बोलत बसू.' त्यांचं एवढं नम्र स्वागत पाहून मी तर चाटच पडलो. त्यांच्यासंबंधी आतापर्यंत वर्णन ऐकून मला एक 'आग का शोला' पाहायला मिळेल, असं वाटलं होतं; पण त्यांची 'सादगी' पाहून हाच का तो 'आग का शोला' असंही क्षणभर वाटलं अन् नंतर त्यांच्याशी मॅरेथॉन बैठक झाली अन् त्यांना पेटती मशाल का म्हणतात हे लक्षात आलं.



आम्ही वर गेलो. त्यांच्या बैठकीत त्यांनी मला शेजारी बसवलं आणि सुरू झाली एक लंबी बैठक. तब्बल पाच तास चाललेल्या या बैठकीत मी नानाप्रकारे चेंडू टाकून पाहिले, की त्यांनी स्वतःविषयी, संघटनेसंदर्भातील त्यांच्या संबंधांविषयी बोलावं; पण सर्व चेंडू त्यांनी तटवून काढले; मात्र या संपूर्ण काळात, द्राक्ष बागायत, द्राक्ष व्यवसाय, वाईनरी या संदर्भात ते भरभरून बोलले. या चर्चेच्या घुसळण्यातून काही लोणी मात्र जरूर निघालं. ''शरद जोशींचं काय चाललंय हल्ली?'' असं त्यांनी विचारल्यावर आम्ही जे बोललो ते ऐकून ते म्हणाले, ''अरे, किती छळणार तुम्ही त्या माणसाला? त्यानं तन-मन-धन तर दिलंच शेतकऱ्यांसाठी आता त्याचा जीव घ्यायचा आहे की काय? कशाला नर्मदा परिक्रमा करू दिली. या वयात अशी परिक्रमा म्हणजे सरळ सरळ आत्महत्या!'' दोघांतील खोल दडलेला ओलावा हा असा आहे. जालन्याच्या अधिवेशनाला त्यांनी यावं अशी विनंती केली तेव्हा, ''आता विस्मरण व्हायला लागलंय. पुढचं काय बोलायचं त्यासाठी शब्द आठवत नाहीत. नावं लक्षात राहत नाहीत. जिथं सोनं वेचलं तिथं आता गोवऱ्या वेचू काय?'' लाखा-लाखांच्या सभांचे फड जिंकणाऱ्या या भीष्माला विस्मरणाच्या शरपंजरी पडावं लागल्याचं विलक्षण दुःख आहे. एकटं पडल्यावर जुन्या आठवणी वर येत असतील का?

*दीवार दरसे उतरी परछाईयाँ बोलती है*
*कोई नहीं बोलता, तब तनहाईयाँ बोलती है!*

त्यांनी आणखी एक खंत यावेळी बोलून दाखविली. मी आणि लाहोटी यांच्या छातीवरील बिल्ले पाहून, ''हल्ली कुणी बिल्लेवाले येत नाहीत भेटायला.'' ''तसं नाही, माधवरावजी संघटनेत आता सगळी नवीन माणसं आहेत. तुम्ही ८४ पासून सभा, संमेलन, अधिवेशनाला आलेला नाहीत. तेव्हा नवीन पिढी तुमचं नाव ऐकून आहे. प्रत्यक्ष भेट झालेली नाही. साहजिकच आजच्या पिढीला तुमची तशी ऐकूनच ओळख आहे. म्हणून तर तुम्ही जालन्याला यावं, अशी आमची आग्रही विनंती आहे,'' मी. त्यांच्या भोजनाचा पाहुणचार संपला, तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. माझ्याबरोबर आलेले लाहोटी, कुलकर्णी, सेवलीकर आणि देविदाससेठ आमचा हा एकतर्फी चाललेला सामना विलक्षण भक्तिभावाने ऐकत-पाहत होते. ही मुलाखत संपली. त्यांनी टाळलेले प्रश्न आठवले आणि आठवलं एक गाणं –

*वो बात इतनी क्यूँ कर रहे थें।*
*क्या बात मुझसे छुपा रहे थें।*

लाहोटीशी फोनवर बोलताना ते म्हणाले होते, ''नकाच येऊ. जुन्या आठवणी निघाल्या, की मला वेदना होतात.'' त्यांच्या या वेदना त्यांनी कळू दिल्या नाहीत. येता-जाता त्यांनी पिंपळगावात घडवून आणलेला आमूलाग्र बदल मी डोळ्यांनी पाहत होतो, ऐकत होतो. ऊस आणि कांद्यासाठी रस्त्यावर येऊन आंदोलन करणारा, शेतीमालाला भाव मिळावा म्हणून हात पसरणारा हा भाग आता खोऱ्यानं पैसा ओढतोय. हा सारा चमत्कार नानांमुळे असंच नंतर मला भेटलेल्या लोकांनी सांगितलं. नाना बोलले, खूप बोलले. द्राक्ष बागायतींबद्दल, वाईनरीबद्दल; पण 'नानां'विषयी नाही. नेमकं त्याच दिवशी इंडियन एक्स्प्रेसच्या पुरवणीत नानांच्या द्राक्षाबागेबद्दल, वाईनरीबद्दल एक सचित्र लेख आला होता. तो लेख देविदाससेठनी मला दाखवला. नानांचं मी अभिनंदन केलं. नाना मंद हसले एवढंच. पुढे त्याचा उल्लेखही केला नाही. नानांचे एक चाहते देविदाससेठ यांनी त्या लेखाची झेरॉक्स प्रत आपल्या दुकानी लावली. नानांना हे समजलं आणि नानांनी त्यांना फोन करून तो लेख काढून टाकायला लावला. प्रसिद्धीच्या आजच्या युगात प्रसिद्धीपासून दूर राहण्याचा एवढा अट्टहास? मला जी माहिती पाहिजे होती, ती मिळालीच नाही.

त्यानंतर पुढच्याच शनिवारी मी परत पिंपळगावला गेलो. या वेळी एकटाच होतो. देविदाससेठच्या मदतीने पिंपळगावात फिरून अनेकांच्या भेटीगाठी घेतल्या. त्यात विविध विचारसरणीचे लोक होते. विविध राजकीय प्रवाहातले लोक होते. साऱ्यांच्या बोलण्यात नानांबद्दल नितांत आदर होता, कृतज्ञ भाव होता. सारे भरभरून बोलले नानांबद्दल. नानांच्या संघर्षाबद्दल. दोनही संघर्षाबद्दल. शेतकरी संघटनेसाठी केलेल्या आणि द्राक्ष निर्यातीसाठी, वाईनरीसाठी केलेल्या. पहिल्या संघर्षाची सुरुवात झाली १९७९-८० च्या सुमारास.

ते वर्ष महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत त्रासाचं ठरलं. त्यावर्षी कांद्याचे भाव पडले नाहीत, चक्क कोसळले. एवढे कोसळले, की कांदा बाजारात पाठवण्यापेक्षा रस्त्यावर ओतलेला बरा अशी परिस्थिती निर्माण झाली. वातावरणात विलक्षण अस्वस्थता पसरली. स्फोटक बनलेल्या या वातावरणात ठिणगी पडली ती चाकणला. शरद जोशींच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी तिथे पुकारलं रास्ता रोको आंदोलन. शेतकरी मालाच्या भावासाठी रस्त्यावर येतो हा प्रकारच लोकांसाठी नवा! कामगारांचे संप-मोर्चे, कर्मचाऱ्यांचे पगारवाढीसाठीची संप, आंदोलने यासाठी आता लोक आणि शासनही सरावलेले. इतकं की, तू मारल्यासारखं कर, मी रडल्यासारखं करतो असं वळण घेतलं होतं या आंदोलनांनी;



पण शेतीमालाच्या भावासाठी शेतकरी रस्त्यावर येतोय, रास्ता रोको करतो, हे नवल पहिल्यांदाच घडलं. ठिणगी पडली चाकणला; पण स्फोट झाला पिंपळगावला.

नाशिक जिल्ह्यातल्या पिंपळगाव बसवंतवरून राष्ट्रीय महामार्ग जातो. माधव खंडेराव मोरे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकरी या महामार्गावर बसले. शरद जोशींनी चाकणला महामार्ग रोखून रस्ता दाखवलाच होता. तोच कित्ता गिरवला नानांनी. जमलेल्या शेकडो शेतकऱ्यांपुढे नानांनी आंदोलनाची पार्श्वभूमी सांगितली. शांततापूर्ण आंदोलनाचे आवाहन केले. रस्त्यावर दोन्ही दिशांना वाहनांची ही रांग लागलेली. जाणून-बुजून राष्ट्रीय महामार्ग, प्रचंड वाहतुकीचा तरीही वातावरणात शांतता. तणावपूर्ण शांतता. योगायोगानं या रांगेत एसआरपीच्या दोन ट्रकही अडकलेल्या. मालेगावच्या कुठल्या तरी बंदोबस्तासाठी चाललेल्या. नानांचं भाषण संपलं आणि बॉनेटवर उभे राहिले त्या भागातील एक काँग्रेसी खासदार झेड. एम. कहांडोळ. ''माधवरावांच्या बोलण्यावर तुम्ही जाऊ नका. आंदोलन परत घ्या. मी इंदिरा गांधींना भेटून आलो आहे. त्यांनी कांद्याचा भाव १५० देण्याचं मान्य केलंय,'' ते म्हणाले. जिथे शेतकरी १०० चा भाव मागताहेत तिथे हे महाशय १५० ची बात करताहेत तेव्हा त्यांच्या बोलण्यातील लबाडी लोकांच्या तेव्हाच लक्षात आली. कहांडोळ खाली उतरले आणि नाना परत बॉनेटवर चढले. त्यांनी कहांडोळांना चांगलंच छेडलं. त्यांचं भाषण संपलं आणि सर्वासमक्ष दोघांत वादावादी झाली. शब्दांनी शब्द वाढला आणि नानांनी त्यांच्या मुस्काडात एक ठेवून दिली आणि आपल्या 'अस्सल' भाषेत सुनावलं. या अनपेक्षित हल्ल्यानं कहांडोळ वरमले आणि जमलेले शेकडो शेतकरी आनंदले. कहांडोळांची आणि माधवरावांची तशी जुनी ओळख; पण कहांडोळांनी नानांना खऱ्या अर्थाने आणखी ओळखलेलं नव्हतं. नानांचं काम तर हे असं. अंगात रग आणि डोक्यात राग. त्यात कहांडोळांचं हे तसलं गुर्मीत बोलणं! तेव्हा यापेक्षा वेगळं काय होणार होतं! असाच पराक्रम पुढे एकदा विक्रमनं, नानाच्या मोठ्या मुलानंही केला. त्यानंतरच्या काळात, शेतकरी आंदोलन नाशिक, नगर भागात जोर पकडीत असताना काँग्रेसवाल्यांच्या उरात धडकी भरली होती. तेव्हा अनेक सभांतून विखे पाटलांनी शरद जोशींची जात काढून अवमानास्पद उद्गार काढलेले होते. त्याविरुद्ध शेतकऱ्यांच्या आणि विक्रमच्या मनात विलक्षण राग आलेला होता. तेव्हा विखे पाटील एका कार्यक्रमासाठी आल्याचं कळताच विक्रम सोबत अशोक मोरे या तरुणाला आणि अनेक शेतकऱ्यांना घेऊन विखे पाटलांकडे

गेला. घोषणा देत येणारा जमाव पाहून त्यांना वाटलं हे आपल्या स्वागतासाठी येत आहेत; पण विक्रमनं त्यांचं चांगलंच स्वागत केलं. ते आपल्या वडिलांच्या 'कुहांडोळी' स्टाईलनं. घडला प्रकार इतका अचानक आणि अनपेक्षित की काय होत आहे, हे कुणाला कळायच्या आत स्वागतकार मंडळी परतलीसुद्धा. त्यामुळे कुणाला प्रतिक्रिया व्यक्त करायचं सुचलंसुद्धा नाही. विखे पाटील म्हणजे कुणी साधासुधा माणूस नव्हे. सहकार क्षेत्रातलं एक बडं प्रस्थ. आमदारकी, खासदारकी भूषवलेले. काँग्रेसचे एक नामवंत नेते. त्यांचा असा अवमान झालेला पाहून त्यांच्या काही कार्यकर्त्यांनी ट्रकभर माणसे नेऊन बदला घेण्याचा कार्यक्रम आखला. त्यांच्याच पक्षातील काही समजदार कार्यकर्त्यांना हे कळताच त्यांनी बजावले, ''तुम्ही माधवराव काय चीज आहे हे आणखी ओळखलंच नाही. तुम्ही त्यांना नुसता हात लावलात तर अख्खं पिंपळगाव आणि अवती-भवतीचा परिसर पेटून उठेल. तुमची राखरांगोळी होईल.'' परिणामी सारे प्रकरण तिथेच शमले. आंदोलन चालू राहिलं. वाहनांच्या रांगा लागलेल्या. आता जोर आला.

तिथे जमलेल्या एसआरपीला त्यांनी आणखी काही काळ दम धरला असता तर रस्ते मोकळेही झाले असते. काही मार्ग निघाला असता; पण एसआरपी म्हणजे जाणूनबुजून 'बेमूर्वतपणे' मारहाण करणाऱ्यांची टोळी म्हणजे 'बेमाटो.' गाड्या अडवल्याचा राग धरून ती मंडळी खाली उतरली आणि रस्त्यावर बसलेल्या लोकांना मारहाण करायला सुरुवात केली. अशा प्रकारे लाठीचार्ज करण्यापूर्वी दंडाधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते, हेही ते विसरले. तसं सोईस्कर विसरण्याचंच तर त्यांना प्रशिक्षण दिलं जात असावं. जाणून-बुजून 'बेमाटो'च ते. त्यांच्याकडून दुसरी काय अपेक्षा करावी? लाठीचार्ज सुरू होताच लोकांची पांगापांग सुरू झाली; पण 'बेमाटो'चा राग काही शमला नाही. लोक महामार्गावरून गावात पळत पळत शिरले. ते पाहून बेमाटोंना तर आणखी चेव आला. ते लोकांच्या मागे गावात शिरले. त्यांना पाहिजे होते शेतकरी नेते माधवराव; पण बेमाटोंना माधवरावांची ओळख नव्हती.

त्या वेळी मकबूलसेठ नावाचे एक गुत्तेदार ही पळापळ पाहत रस्त्याच्या कडेला उभे होते. त्यांनाच 'माधवराव नाना' समजून पोलिसांनी मारायला सुरवात केली; पण लवकरच चूक लक्षात आली आणि त्यांनी आपला मोर्चा वळविला खऱ्या माधवरावांकडे. बेमाटोंनी माधवराव नानांना बंदुकीच्या दस्त्यानं एवढं मारलं, की त्यांची सारी पाठ सोलून निघाली. एकट्यानं नव्हे, तर पाच-सहा



जणांनी त्यांना बेदम मारहाण केली. मानेवर, कानामागे दिसेल तिथे मारीत सुटले. कानामागील माराने त्यांच्या ऐकण्यावर परिणाम झालाय. तो आजही आहेच. पाठीचा मणकाही कायमचा दुखावलेला आहे. त्यावेळी बाजूला उभे असलेले डॉ. डे व डॉ. सौ. डे हे दोघेही माधवरावांच्या अंगावर आडवे पडले. तेव्हा त्यांनाही मार सहन करावा लागला. नंतरच पोलिसांचा माधवरावांवरील राग शांत झाला. आजही ते दृश्य आठवलं, की अंग थरारतं,'' त्या आंदोलनातील सहभागी एक कार्यकर्ते सूर्यकांत घोडके सांगत होते. ''इतका मार खाऊन इजा पोहोचलेली असून, वेदना सहन करीत नाना नंतरही आंदोलनात राहिलेच कसे, याचं आम्हाला आजही आश्चर्य वाटतं.'' त्यात आश्चर्य कसलं. म्हणून तर नाना वेगळे-

*मेरा चलन जमाने से निराला है,*
*मैंने हर गम खुशी मे ढाला है।*
*लोग जिन हादसों से मरते हैं,*
*मुझको उन हादसों ने पाला है।*

माधवरावांना आधी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये न्यावं लागलं आणि त्यानंतर पुढील उपचारासाठी डॉ. पवारांच्या नाशिकमधील दवाखान्यात काही दिवस राहावं लागलं.

एवढ्या मारहाणीतही बेमाटोंचा राग शमला नाही. आता तर त्यांनी गोळीबारास सुरुवात केली. शेतकरी पळताहेत हे पाहून त्यांना स्फुरण चढलं. आता त्यांनी बंदुका उगारल्या आणि गोळ्या झाडायला सुरुवात केली. या गोळीबारात दोन शेतकरी विनाकारण मारले गेले. एक जण रस्त्याच्या कडेला होता तर दुसरा ट्रॅक्टरमध्ये बसलेला होता. त्यानं सहज मान वर केली आणि त्याच क्षणी एका गोळीने त्याचा वेध घेतला. गोळीबारात व पळापळीत, मारहाणीत अनेक जण जखमी झाले. त्या प्रसंगी हजर असलेला अशोक मोरे सांगत होता,

''मी जिवाच्या भीतीने गावाकडे पळत होतो. गावाकडे पळता पळता मध्येच मागे पाहत होतो. एका पोलिसानं नेम धरलेला पाहताच जवळच्याच एका भिंतीला चिटकून उभा राहिलो. गोळी सणसणत माझ्या एवढ्या जवळून गेली, की गोळीच्या वाऱ्यानं माझा सदराही हलला. मी तर डोळे गच्च मिटून घेतले!'' खरं तर गोळीबाराची, लाठीचार्जची आवश्यकताच नव्हती. लोकांनी जीवित हानी किंवा वित्तहानी केलेली नव्हती किंवा महामार्गावर तशी काही शक्यताही नव्हती; पण हे कुणी अन् कुणाला सांगायचं? शास्तेही शेतकरी,

त्यांचे हस्तकही शेतकरी आणि शासितही शेतकरीच. 'गंगा गेली सिंधूपाशी, तिने अव्हेरिले तिशी' आता कुणाकडे जावं? या आंदोलनाचा वृत्तांत शरद जोशींच्या कानावर गेला. त्यांनी माधवरावांना भेटायचं ठरवलं. अनायासे नगर-नाशिकचा दौरा त्यांनी आखला होता. दोघेही एका रस्त्यावरचे प्रवासी. मागे-पुढे भेट होणारच होती.

*मुसाफिर है हम भी, मुसाफिर हो तुम भी*
*किसी मोडपर मुलाकात होगी...*

एका रात्री माधवराव नानांच्या घरी ही भेट झाली. एकमेकांबद्दल एकमेकांना ऐकून असल्यामुळे आदर होताच. या पहिल्या भेटीने मैत्री झाली. दोघांनी एकमेकांना जाणून घेतलं. एकमेकांचे विचार ऐकले. तसं पाहिलं तर या दोघांचा पिंड वेगवेगळा. माधवराव संपन्न शेतकरी कुटुंबातले, तर साहेबांचा शेतीशी संबंध नाही. त्यांच्या सात पिढ्यांत कुणी शेती केली नाही. ते सरळ नोकरपेशा कुटुंबातले. माधवराव भावनाप्रधान. भावनांच्या लाटांवर स्वार होणारे तर शरद जोशींजवळ भावनांना थारा नाही. ते बुद्धिवादी, नास्तिक. माधवराव तुफानी वक्ते, तर साहेबांचं वाचन, आकलन प्रचंड. माधवराव लोकांच्या हृदयाला, भावनांना हात घालणारे, तर साहेब बुद्धीला आवाहन करणारे. हां दोघांत दोन-एक बाबतीत साम्य. दोघेही विलक्षण धाडसी. एकदा निर्णय झाली, की त्याच्या पूर्ततेसाठी वाटेल तो धोका घेण्याची तयारी. परिणामांची भीती न बाळगणारे. दोघेही आपल्या कामावर विलक्षण निष्ठा ठेवणारे. अनेक परस्परविरोधी गुणविशेष असूनही दोघेही एकमेकांकडे आकृष्ट झाले. विज्ञानाचा एक सिद्धांत आहे ना, 'परस्परविरोधी ध्रुव एकमेकांना आकृष्ट करतात' कदाचित तसंही असेल. या भेटीनं माधवराव भारावले. त्यांनी आपल्या गाडीची चावी साहेबांना देऊ केली,

''मी आणि माझी गाडी या शेतकरी आंदोलनात तुमच्यासोबत. खांद्याला खांदा लावून आपण काम करूया.''

माधवराव कामाला तर या भेटीआधीच लागले होते. त्या कामाला आता एक निश्चित दिशा मिळाली. चाकण-पिंपळगावपुरतं मर्यादित राहिलेलं शेतकरी आंदोलन आता अख्ख्या महाराष्ट्रात नेण्यासाठी जोडी सज्ज झाली. माधवराव बोरस्ते, प्रल्हाद पाटील कराड हे दोघेही आधी आलेले होते. या चौकडीने महाराष्ट्र पालथा घातला.

यानंतर पिंपळगाव बसवंत, टेहेरे फाटा इत्यादी ठिकाणी ऊस आंदोलन झालं. त्या आंदोलनानं तर इतिहास घडवला. त्या आंदोलनाचा तपशीलवार वृत्तांत



परुळेकरांच्या 'योद्धा शेतकरी' या पुस्तकात आलेला आहे. या आंदोलनात माधवरावांना अटक झाली. त्यानंतर अटक हा प्रकार नानांच्या अंगवळणी पडला. 'रोज मरे त्याला कोण रडे' असा प्रकार होता.

पिंपळगावचं पहिलं आंदोलन होऊन गेलेलं. साहेबांची आणि नानांची भेट झालेली. या भेटीत अनेक गोष्टींबाबत चर्चा झाल्या आणि नवीन आंदोलनाची घोषणा झाली. पुढे चालून गाजलेलं ते पिंपळगाव बसवंतचं आंदोलन. त्या आंदोलनाच्या तयारीसाठी म्हणून साहेब आणि नाना यांनी एक संयुक्त दौरा आखला. नगर-नाशिकचा परिसर यासाठी निवडला गेला. विशेषकरून पिंपळगाव बसवंत आणि त्याभोवतीचा परिसर. त्या दौऱ्यात अनेक गावांना भेटी दिल्या. अशा एका भेटीप्रसंगी रात्रीचा मुक्काम एका रेस्ट हाऊसवर झाला. त्यावेळी रेस्ट हाऊसच्या व्यवस्थापकानं साहेबांना वेगळी खोली देऊ केली. तेव्हा माधवरावांनी साहेबांचा हात धरला. ''तुम्ही आम्हासोबत झोपाल. लोक तुमच्या जिवावर उठले आहेत. केव्हा घात करतील, नेम नाही. तुमचा जीव महाराष्ट्राला प्यारा आहे. आमच्यासोबत राहिलात म्हणजे ठीक होईल.'' चौकडीपैकी एक नेते श्री. माधवराव बोरस्ते यांचा मृत्यू अत्यंत संशयास्पद अवस्थेत झालेला होता, हे माधवरावांच्या लक्षात होतं. साहेबांना मध्यभागी घेऊन त्यांच्या आजूबाजूला इतरांना नानांनी झोपवलं.

पिंपळगावचं पुढे झालेलं ऊस आंदोलन बरेच दिवस चाललं. ते आंदोलन दडपून टाकण्याचे अनेक प्रयत्नही झाले. शेवटी शासनानं निर्घृण गोळीबार केला. या गोळीबारात काही शेतकरी मृत्युमुखी पडले, तर अनेक जखमी झाले. अनेक ठिकाणी आणि अनेक वेळा प्रचंड लाठीमारही झाला. शेवटी जीवित हानी टाळण्यासाठी आंदोलन संपविण्यात आले. या आंदोलन काळातल्या धैर्याच्या आणि त्याहीपेक्षा पोलिसांच्या क्रौर्याच्या, शास्त्यांच्या निर्दयीपणाच्या अनेक आठवणी शिल्लक आहेत. आंदोलनाला इतका काळ लोटलेला असूनही.

आंदोलन काळात ज्या ज्या ठिकाणी लाठीहल्ला झाला, त्या त्या ठिकाणांना भेटी देण्याचा कार्यक्रम नाना आणि शरद जोशी यांनी आखला. दोघांवरही शासनाची नजर होतीच. आंदोलन ऐन भरात असताना लाठीमार इ. प्रकार चालू होते; पण आंदोलक हिंमत धरून होते. त्यांची हिंमत टिकून राहावी म्हणून नाना आणि साहेब ठिकठिकाणी भेटी देत होते. अशा एका प्रसंगी नाना कार चालवत होते. सोबत साहेबही होतेच. आरशात नानांनी पाहिलं तेव्हा एसआरपीची गाडी त्यांच्या पाठलागावर आहे, हे त्यांच्या लक्षात आलं. एसआरपीचा हेतू काहीही

असू शकतो, ही शंका नानांच्या मनात आली आणि त्यांनी एकाक्षणी वळण पाहून गाडी उसाच्या फडात घुसवली. शेतीमधील आडव्या-उभ्या रस्त्यांनी कशीही गाडी दामटली. गाडी मध्ये सोडली आणि दोघेही जण उसातून धावत निघाले. लपत लपत पिंपळगावी पोहोचले आणि मगच निःश्वास टाकला त्यांनी.

आंदोलन संपलं. आंदोलनाआधीची आणि नंतरचीही धावाधाव संपली; पण आंदोलनानं एक किंमत वसूल केली. माधवरावांना शारीरिक इजा पोहोचली, ती त्रास द्यायला लागली. आंदोलन काळातील पोलिसी निर्दयीपणानंसुद्धा आपली किंमत वसूल केली. बळाचा वापर करणाऱ्या पोलिसांना भाषणातून नाना म्हणायचे,

''बंदुकीच्या जोरावर आम्हाला दाबून ठेवता का? बंदुका हातात आल्या तर आम्हीही चार-पाच जणांना पाडल्याशिवाय राहणार नाही.'' कुठे तरी हेही लक्षात येत होतं, की हिंसाचाराला हिंसाचारानं उत्तर देऊन प्रश्न सुटणार नाही. शासनकर्त्यांजवळ पाशवी बळ असतं. हळूहळू आंदोलन मार्गाचा फोलपणाही लक्षात यायला लागला. तशातच भावाचाही मृत्यू झालेला. त्यामुळे घराची जबाबदारी स्वीकारणं भाग होतं. परिणामी हळूहळू संघटनेतील लक्ष कमी झालं. नंतरही नाना परभणी अधिवेशनास (फेब्रुवारी ८४) हजर राहिले. तिथे त्यांनी जबरदस्त भाषण दिलं. अधिवशेनातील ते बहुधा शेवटचं भाषण असावं. त्यानंतर पुढे टेहरे फाट्यावर व चांदवडच्या महिला अधिवेशनात नानांनी केवळ हजेरी लावली आणि मग मात्र ते संघटनेतून निवृत्त झाले; पण कुठल्याही राजकीय पक्षात वा संघटनेतही भाग घेतला नाही. शेतकरी संघटनेशी इमान शेवटपर्यंत कायम राखलं. स्वतः संघटनेत होते, त्या काळात राजकारण प्रवेश करण्यासाठी त्यांनी कडाडून विरोध केला. साखर कारखान्यांच्या निवडणुका लढवायलाही त्यांचा विरोध होता. ''आपापल्या राजकीय विचारसरणीचे जोडे बाहेर ठेवा नि मगच आत या,'' असा त्यांचा आग्रह होता. त्यांची लोकप्रियता, त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे तुफानी वक्तृत्व या साऱ्यांमुळे त्यांना निवडणुकीसाठी विविध पक्षांकडून ऑफर्स आल्या होत्या; पण त्या सर्वांना नानांनी नम्र नकार दिला.

एक लढाई संपली; पण म्हणून नाना थोडी गप्प बसणार! मूळचा लढाऊ स्वभाव. त्यांनी दुसरी लढाई सुरू केली. द्राक्षासाठी लढाई. इथेही त्यांना संघर्ष करावा लागला. ''इम्तेहां से गुजर कर क्या देखा, इक और इम्तिहा बाकी है'' इथेही त्यांना प्रचंड फटका बसला; पण हिंमत हारतील ते नाना कसले? आज



जवळजवळ २० वर्षांच्या लढाईनंतर यशाची फळं चाखण्याची वेळ आलेली आहे. आज मागे वळून पाहताना नाना तृप्त जरूर आहेत; पण आणखी विचार चालू आहे, शेतकऱ्यांची गरिबीच्या चक्रातून सुटका कशी होईल याचा. आज संघटनेपासून निवृत्ती घेतलेली असली तरी. ऊस आणि कांदा या पिकांनी आणलेली संपन्नता किती फसवी, किती तकलादू आहे, हे त्यांनी लक्षात घेतलं आणि जे व्यापारीदृष्ट्या विकेल तेच पिकवावं हा विचार त्यांच्या डोक्यात पक्का बसला. खूप विचारांती त्यांचं लक्ष द्राक्ष पिकाकडे वळलं. त्यांच्या स्वभावाप्रमाणे एखाद्या गोष्टीकडे त्यांचं लक्ष गेलं, की मग त्या गोष्टीची ते तड लावतात.

पिंपळगाव आणि परिसर द्राक्षाच्या लागवडीसाठी अत्यंत अनुकूल. वर्षातील जवळजवळ १२ महिने सूर्यप्रकाश उपलब्ध आणि हवामानही अनुकूल. या बाबी लक्षात घेऊन त्यांनी द्राक्ष बागायतीचा प्रचार केला. द्राक्षाच्या पिकापेक्षाही प्रक्रिया केलेल्या मालाला बाजारपेठ चांगली मिळते, हे लक्षात घेऊन त्यांनी वाईनकडे वळण्याचं तर ठरवलंच; पण सरळसरळ द्राक्ष निर्यात करण्याच्या दृष्टीने 'महाग्रेप' या संघटनेची स्थापना केली; पण त्यांचं लक्ष होत युरोपीय बाजाराकडे आणि ही बाजारपेठ काबीज करण्यासाठी द्राक्षापासून वाईन तयार करणे अधिक लाभदायक ठरू शकतं इकडं त्यांचं लक्ष गेलं.

१९८५ च्या सुमारास युरोपमधील काहीं द्राक्ष खरेदीदार त्यांच्या मद्याच्या कारखान्यासाठी भारतीय द्राक्ष खरेदी करणं उपयुक्त ठरेल का, याची चाचपणी करण्यासाठी भारतात आले. त्यावेळी नानांनी त्यांना भारतातील द्राक्ष उत्पादक मद्यनिर्मितीकडे वळू शकतात का, अशी चौकशी केली. त्यावेळी त्या प्रतिनिधींनी भारतीय शेतकऱ्यांची हेटाळणी केली. ती हेटाळणी नानांना जिव्हारी लागली. त्यांनी वाईन निर्मितीच्या क्षेत्रात उडी घ्यायचा निश्चय तिथेच जाहीर केला. आता सुरू झाली नानांची दुसरी लढाई. या लढाईत एकाच वेळी राजकीय, शासकीय आणि परकीय उत्पादकांचे असे तिहेरी अडथळे लक्षात घेऊनही नानांनी वाईनरी सुरू केली. या वाईनरीला देशांतर्गत बाजारपेठ नाही आणि निर्यातीचा पर्याय नाही. निर्यातीला एक तर राजकारणामुळे परवानगी मिळणार नाही, हा अनेक तज्ज्ञांचा अंदाज होता. हा राजकीय अडथळा नाना ओलांडू शकत नाहीत आणि त्यामुळे त्यात आर्थिक फटका बसेल. शिवाय आपण 'युरोपीय मार्केटशी स्पर्धा कशी करणार' हा न्यूनगंडात्मक अडथळाही अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केला; पण हे सर्व विरोध मोडीत काढून, सर्वांचे सल्ले धुडकावून देत नानांनी वाईनरीचा अभ्यास केला. द्राक्षांची निर्यातही करून पाहिली. काही

माल परत आला. तेही नुकसान सहन केलं. युरोपियन बाजारपेठ काबीज करण्यासाठी ज्या जातीच्या द्राक्षांची बागायत आवश्यक, त्या जातीच्या द्राक्षकाड्या आणून त्यांची लागवड केली. फ्रेंच शँपेनच्या तोडीची शँपेन भारतात निर्माण करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प नानांनी समोर मांडला. या भारतीय शँपेनला नाव दिले 'पिंपेन'. पिंपळगावची शँपेन. त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले,

''फक्त २५००/- रुपयांचा एक एक शेअर घ्या. हे पैसे फुकट गेले असं समजा आणि मला द्या.'' नानांचा प्रभाव एवढा जबरदस्त, की अगदी दोन-चार दिवसांत एक करोडच्या वर भागभांडवल जमा झाले आणि भारतातील पहिला वाईनचा सहकारी कारखाना पिंपेन सहकारी कारखाना या नावाने ८४ मध्ये स्थापन झाला. ८९-९० च्या सुमारास कारखान्यातून शँपेन निर्यातीसाठी तयार झाली; पण भारत सरकारचं धोरण शुक्राचार्य बनून झारीत बसलं आणि मोठ्या कष्टानं, उमेदीनं उभा केलेला हा कारखाना आजही वाट पाहत आहे सूर्योदयाची. तेव्हा तयार झालेल्या लाखो बाटल्या आजही गोदामात पडून आहेत वाट पाहत, सरकारी लालफितीचा अडसर दूर होण्याची. या वाइटाची चांगली बाजू अशी की वाईन जेवढी जुनी तेवढी तिची किंमत अधिक. त्यामुळे लाथ लागली अन् सिंहासनावर जाऊन पडली अशी अवस्था झालेली आहे. आज याच लाखो बाटल्यांची किंमत जागेवरच वाढली आहे. ''आता तर अत्यंत अनुकूल परिस्थिती आहे. जागतिक खुलीकरणामुळे जानेवारी २००५ पासून निर्यातीवरील बंधने दूर होताहेत. शिवाय, पिंपळगावच्या द्राक्षांनी एव्हाना आंतरराष्ट्रीय दर्जा प्रात केलेला आहे. आमच्या मालाला आता प्रचंड मागणी आहे. नानांनी स्वतःच्या घरीच खासगी वाईनरी सुरू केलेली आहे.'' मी कदाचित भारतातील एकमेव असा निर्माता असेन, जो मद्यपान करीत नाही. तरीही सांगतो, आमच्या 'सायलो' कंपनीचं मद्य युरोपमधल्या कुठल्याही मद्याशी मुकाबला करू शकतं, असं मुरब्बी मद्यपींचं मत आहे. मी तर म्हणतो, शेतकऱ्यांनी आता मोठ्या प्रमाणावर द्राक्षाच्या बागा कराव्यात आणि त्यातून खासगी वाईनरीज सुरू कराव्यात. आज काळ अनुकूल आहे. ऊस आणि कांद्यानं आजपर्यंत अश्रू आणि धोक्याशिवाय काय दिलंय. द्राक्ष बागायतीमध्ये काही धोका जरूर आहे; पण तो कुठल्या पिकात नाही? शिवाय एकवेळचं नुकसान भरून काढण्याची संधी दुसऱ्या वेळी मिळते, हेही लक्षात घ्यायला पाहिजे. मी तर म्हणतो, दोन एकर द्राक्ष बागायतदार स्वतःची वायनरी टाकू शकतो. आज आंतरराष्ट्रीय संस्था द्राक्षांची पाहणी करून



प्रमाणपत्र देतात. त्याआधारे आंतरराष्ट्रीय पातळीवर या द्राक्षांना स्वीकारार्हता प्राप्त होऊ शकते. मग तुम्ही द्राक्षे निर्यात करा किंवा वाईन.'' नानांचा तर सल्ला आहे की निमकर सीडस्वाल्यांनी ज्वारीपासून बायोडिझेल तयार करण्याचा एक प्रकल्प सादर केला होता काही वर्षापूर्वी; पण शासकीय धोरणामुळे आणि तेल माफियांच्या दबावाखाली तो प्रकल्प दडपून टाकण्यात आला. त्याचे पुनरुज्जीवन करायला ही वेळ अनुकूल आहे. तेलाचे भारतातील साठे येत्या २५-३० वर्षांत आणि जगातील साठे आणखी १०० एक वर्षांत संपतील, असे अंदाज आहेत. त्यामुळे पर्यायी ऊर्जा स्रोत आतापासून शोधण्याची निकड आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत ज्वारीपासून बायोडिझेल तयार करण्याची शक्यता अजमावून पाहणे जरूरी आहे. त्यात यश येत असेल तर विदर्भ आणि मराठवाड्याचा कायापालट होऊन जाईल. तेव्हा याबाबतचं संशोधन ज्वारीच्या पिकाच्या प्रदेशानं लवकर करून घ्यायला पाहिजे.

नाना आज सत्तरीत घोटाळताहेत; पण त्यांचा उत्साह तरुणाला लाजवणारा आहे. भाषा तर विचारूच नका. द्राक्ष बागायतीसंदर्भात नाना जुने अनुभव सांगतात. ''कालपावेतो युरोपियन खरेदीदार आम्हाला दाराशी उभे राहू देत नव्हते. आज खरेदीसाठी ते भारतात येतात, तेव्हा आमच्यासाठी मुंबई, दिल्लीतील पंचतारांकित हॉटेलांत खोल्या राखून ठेवतात, आम्हाला आवर्जून आमंत्रण देतात. धंद्याचे करार करण्यासाठी काल-परवापर्यंत आम्हाला हिणवणारे युरोपियन आता आमची मनधरणी करताहेत. भारतीय शेतकऱ्यांचा कस पणाला उतरल्याचं यापेक्षा वेगळं प्रमाण काय असू शकेल?'' जागतिक खुलीकरणाबाबत नाना म्हणतात, ''डाव्यांचं काही ऐकू नका हो, त्यांना कळतंच काय शेतीचं. तुम्हाला सांगतो, स्पर्धेच्या या युगात आम्ही युरोप, अमेरिकेच्या तोंडात मारतो. भारतीय शेतकरी स्पर्धेला भीत नाहीत. भितात मूठभर; पण वृत्तपत्रीय प्रभाव असलेली मंडळी; मात्र त्यांना अमाप प्रसिद्धी मिळते. मी तर म्हणतो ही स्पर्धा आव्हान म्हणून आपण स्वीकारू आणि शेतकऱ्यांच्या कपाळीचा गरिबीचा लेख कायमचा पुसून टाकू.''

८० च्या दशकात 'मद्य' या शब्दालासुद्धा लोक नाक मुरडायचे. त्यावेळी मद्यनिर्यातीसाठी केंद्र सरकारची दाढी धरण्याचं, नोकरशाहीची मनधरणी करण्याचं अपमानास्पद काम करावं लागायचं. निर्यात धोरण केंद्र सरकारच्या हातात असायचं; पण आज ही परिस्थिती पुरती बदलत आहे. शेतकऱ्यांनी कुटीरोद्योगाच्या स्वरूपात वाईनचे कारखाने काढले तर दिल्लीला परवानगीसाठी धावायची गरज

नाही. जिल्हाधिकाऱ्यांकडे गेलं तरी जमण्यासारखं आहे. आज तर शासनाचीच नव्हे, तर लोकांचीही दृष्टी बदलली आहे. नानांनी ८० च्या दशकात सुरू केलेल्या 'पिंपेन' या वाईनच्या कारखान्याची लालफितीने आणि राजकारण्यांनी वाताहत लावली असली तरी नाना नाउमेद झालेले नाहीत.

दिल नाउमीद नहीं, नाकामही तो है
लंबी है गम की शाम, मगर शाम ही तो है।

नानांनी स्वतःच्या घरी वाईनरी सुरू केली. त्यांचा मुलगा विश्वास आणि सूनबाई सारी कामे पाहतात. कुटीरोद्योग म्हणून त्यांनी हा व्यवसाय चालवला आहे. नानांपासून स्फूर्ती घेऊन नाशिकच्या परिसरात दहा-वीस वाईनरीज निघाल्या आहेत. आजही अनेक लोक नानांकडे सल्ला-मसलत करण्यासाठी येतात. नानांनी इंग्लंड-फ्रान्सच्या वाऱ्या केल्या आहेत. तिथल्या वाईनरीजचा अभ्यास केला आहे. युरोपमध्ये द्राक्ष आयात करणाऱ्यांशी संपर्क केला आणि महाराष्ट्रातून युरोपात द्राक्ष निर्यात करणारी 'महाग्रेप्स' ही संस्था स्थापन केली आहे. आता द्राक्षे आणि वाईनही नियमित स्वरूपात निर्यात केली जातात.

१९८० ते ८६ हा शेतकरी संघटनेच्या आंदोलनांचा वैभवाचा काळ. पैकी किमान ८४ पर्यंत नानांनी महाराष्ट्राचा तुफानी दौरा केलेला. त्यांचं वक्तृत्व म्हणजे एकाच वेळी उपहास, नाट्य, कारुण्य, हंशा, टाळ्या आणि सबकुछ. नाना बोलायला उभे राहिले म्हणजे लाख-लाखांच्या सभा हेलावून जातात. अशा वेळी बोलताना नाना काही हातचं राखून ठेवत नाहीत. कितीही अन्याय झाला तरी ढिम्म बसणाऱ्या शेतकऱ्यांबाबत बोलताना नाना म्हणतात, "साहेब, तुम्ही कुणाचं नेतृत्व करीत आहात? या हिजड्यांच्या फौजेचे सेनापती आहात?" शेतकऱ्यांना टोचून टोचून जागं करण्यासाठी हे असलं, तर त्यांची हिंमत वाढवण्यासाठी, "राजेहो, तुमची संख्या एवढी प्रचंड आहे, की तुम्ही एकत्र मुतलात तर हे शासन त्यात वाहून जाईल." शालिनीताई, वसंतदादा आणि शरद पवार तर त्यांच्या उपहासाचं खास गिऱ्हाईक. "ताई, शेतकरी संघटना आणि शरद जोशींवर टीका करण्यापूर्वी आपल्या पायाखाली काय जळतं ते पाहा. तुमच्या कपाळीचं कुंकू एवढं मोठं कसं होत गेलं हे आम्हाला विचारा!" शरद पवारांचा उल्लेख करताना फुल्या-फुल्यांच्या विशेषणाचा ते वापर करतात. "तुम्हाला सांगतो राजेहो, या xxx शरद पवारानं शेतकऱ्यांचं जेवढं नुकसान केलंय तेवढं कुणीही केलं नसेल!" कोपरगावच्या एका सभेत त्यांनी वसंतदादा आणि शालिनीताई यांना तर टार्गेट केलंच आहे; पण त्यांचे चेले-चपाटे



कोल्हे-काळे यांनाही ओढलं. "राजेहो, या चेल्यांना काय घाबरता, ते तर दादांचे चमचे आहेत. गुऱ्हाळासाठी आपण नाही का भाड्याने गुळवे आणत? तसे हे साखर कारखान्याचे भाड्याचे गुळवे आहेत." त्यांचं एकेक वाक्य म्हणजे हे असं बंदुकीच्या गोळीसारखं; पण हे सारं ते बोलायचे ते पोटतिडकीनं, शेतकऱ्यांबद्दल असलेल्या प्रेमापोटी. शासनाच्या मठ्ठपणामुळे त्यांच्या अंगाची आग व्हायची आणि अशा आगीतून या अशा लाह्या फुटायच्या.

८४ च्या परभणी अधिवेशनातलं नानांचं भाषण हे त्यांचे शेतकरी संघटनेच्या मंचावरील बहुधा शेवटचं भाषण. ते भाषण त्यांच्या शैलीचं उत्तम उदाहरण आहे. त्या भाषणाची टिपणं त्यांचा एक फॅन पुरुषोत्तम लाहोटी याने उपलब्ध करून दिले. त्या भाषणाचा संकलित भाग इथे देण्याचा मोह आवरत नाही. नाना बोलायला उभे राहण्याआधी मंचामागून ढोल-ताशांचा कडकडाट झाला. टाळ्यांच्या आणि त्या गजरात नाना बोलायला उभे राहिले.

"पूर्वीच्या काळी लढाईवर जाताना ढोल-ताशांचा कडकडाट व्हायचा, तसा आता होतो आहे. राजेहो, आता आपल्या लढाईला सुरवात होते आहे. धर्म, अधर्माच्या या लढाईत शेवट होणार आहे तो अन्याय करणाऱ्यांचा, असं इतिहास सांगतो. महाभारताची लढाई होण्याआधी श्रीकृष्णानं शिष्टाई केली. त्यानं कौरवांना सांगितलं, पांडवांना राज्य नको, ऐश्वर्य नको; फक्त पाच गावं द्या. ही साधी मागणी आहे. दुर्योधन उद्दामपणे म्हणाला, ५ गावे तर काय; पण सुईच्या अग्रावर मावेल एवढी मातीही देण्यास मी तयार नाही आणि यातून महाभारत घडलं. त्यात दुर्योधन आणि साऱ्या कौरवांचा नाश झाला तसं आम्ही राज्यकर्त्यांना विनंती केली, बाबा रे, शेतकऱ्यांना गाडी नको, बंगला नको, ऐश्वर्य नको, आराम नको. फक्त या कर्जबाजारीपणाच्या जिण्यातून आम्हाला सोडवा रे. आम्ही जो घाम गाळतो, त्या घामाचा दाम आम्हाला मिळू नये यासाठी तुम्ही जे कारस्थान करता तेवढं थांबवा. एवढी साधी व रास्त मागणी मान्य करायला ते तयार नाहीत. आता राजेहो, महाभारताच्या युद्धाची पुनरावृत्ती होणार. युद्ध अटळ आहे. जसा कौरवांचा नाश झाला, तसा शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्यांचा नाश होणार आहे.

राजेहो, तुम्ही आमदाराला धरा, खासदाराला धरा, शेतीमालाच्या भावाचं काय झालं विचारा. दुसरं काही बोलून तो हुलकावण्या देऊ लागला तर त्याच्या थोबाडात मारा. मी हेच केलं. माझ्या मुलाने हेच केलं. मला नातू असता तर त्यानेही हेच केलं असतं. नेहरू घराण्याचे, इंदिरा गांधींचे भूत राज्यकर्त्यांच्या

अंगात संचारलेत. त्या भुताने त्यांना मस्ताडलंय. त्यांना जागेवर आणण्याचं काम आपल्याला करायचं आहे.

काँग्रेसच्या सत्ता हस्तगत करण्याच्या खेळ्या कशा आहेत, तुम्हाला सांगू. आपल्या महाराष्ट्रात मुसलमानांची संख्या किती? याचा हिशेब लावायचा अन् त्यांची गठ्ठामते मिळविण्यासाठी ''ठीक है, तुम्हारे आसिफ साबको लेंगे, अंतुले मामूको लेंगे'' झालं ! मुसलमानांची मतं पॅक. मग दलितांच्या मतांसाठी कांबळे साहेबांना महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्षपद...! घरच तुमच्या ताब्यात... झालं. दलितांची मत पॅक. कोण राहिलं? मराठा. बसवा वसंतदादाला. चालले काठी टेकीत टेकीत. तुम्ही बावळे, तुम्हाला वाटलं– आपला बापच मुख्यमंत्री झाला. बापसे म्हणायला लागले. (चालण्याची नक्कल करीत) 'दादा आले, दादा आले... ' दादा, तुमच्याविषयी महाराष्ट्राला आदर आहे. स्वातंत्र्याकरिता दंडाबेडी भोगलेले तुम्ही, महाराष्ट्राने अपार प्रेम दिलं तुम्हाला. काय मिळवायचं राहिलंय तुम्हाला ? म्हातारपणी तुमची बुद्धी भ्रष्ट झाली. या शालिनीताईच्या नादी लागून. शालिनीताईबद्दल काय बोलावं! कर्नाटकचे सरकार पाडण्यासाठी, पंजाबी ड्रेस घालून, कुंकू पुसून बहादरणी कामाला लागली. आठ बॅगा घेऊन बंगलोरला गेली. मी नाही बोलत.

पेपरात फोटो छापून आलेत. तिथं एका एका आमदारांचा भाव फुटला म्हणे १० लाख रुपये. अरे, आमच्या महाराष्ट्रातल्या आमदारांना एवढ्या नोटा दिल्या असत्या तर ते धोतर सोडून उभे राहिले असते. माझ्या आया–बहिणींनो, ज्या ज्या वेळी तुम्ही हातात डबडं घेऊन पांदीला बसता, त्या त्यावेळी तुमच्या अंतःकरणात रक्ताची चिळकांडी उडू दे. असं उघड्यावर पांदीला बसण्याची परिस्थिती कुणी आणली असेल, तर या नेहरू घराण्यानं, इंदिरा गांधीनं.

या अन्यायाविरुद्ध बंद पुकारलंय शेतकरी संघटनेनं अन् शरद जोशीनं. गेल्या चार–पाच वर्षात रात्रंदिवस तुमच्यासाठी तो गडी राब राब राबला. काय राहिलंय त्या शरद जोशींचं आता. बायको कशा मौतीनं मेली, पोरी उघड्यावर पडल्या. दौऱ्यावरून थकूनभागून घरी आलं तर कुणी पाण्याचा तांब्या घेऊन, चहा–पिता का कॉफी घेता, हे विचारायला घरी कुणी उरलं नाही. राजेहो, त्यांच्या संसाराची होळी झाली. कुणासाठी? कुणासाठी? आणि या दीड–दमडीच्या आमदार–खासदारांच्या इशाऱ्यावर हे पोलिसवाले शरद जोशीला अटक करतात, खटले भरतात, जेलात टाकतात. एक खटला संपायच्या आत दुसरा. दुसऱ्याच्या आत तिसरा, तिसऱ्याच्या आत.... इथून पुढे शरद जोशीला अटक झाली तर



उभा महाराष्ट्र पेटवा. तर आम्ही खऱ्या अवलादीचे. नाही तर आम्ही xxx आहोत.

राजेहो, आता विचार संपला. शब्द संपले. इथून पुढे कृती करायची आहे. मी आता

पिंपळगावी जाणार आहे पहिल्या धारेची बनवण्याकरिता. पहिल्या धारेची तुम्हाला ठाऊक आहे, कशी कडक असते. तसे शेतकरी संघटनेचा विचार पहिल्या धारेसारखा कडक झाला आहे. त्याचा भपका उठू द्या, भपका उठू द्या.''

तास सव्वातास चाललेल्या या भाषणाची नशा काही औरच. दीड–दोन लाखांची ती सभा. कधी रडायची, कधी हसायची, कधी गंभीर, तर कधी टाळ्यांचा कडकडाट, घोषणांचा दणदणाट करायची. लोक परतले ती नशा घेऊनच! 'मुलूखमैदानी तोफ' म्हणतात ते उगाच नाही. हल्ली हल्लीसुद्धा काही मुलूखमैदानी तोफा आहेत; पण नानांच्या पुढे त्या तोफा म्हणजे दिवाळीतले फटाके!

■■

# गोविंदभाऊ

अनेक कार्यकर्ते शेतकरी संघटनेकडे कसे आले हे सांगणं तसं सोपं आहे; पण ते का आले हे आजही मला कोडं वाटतं. मी गेली विसेक वर्षं संघटनेची वाटचाल केलेली असूनही, संघटनेच्या अनेक आंदोलनांत भाग घेतलेला असूनही! सेलूच्या गोविंदभाऊंचंच उदाहरण घेऊया. संघटनेतील त्यांच्या धडपडीकडे पाहिलं की वाटतं, काय कमी होती त्यांना की 'खाता उपटली अन् ही पंढरी आठवली' ! अत्यंत रुबाबदार व्यक्तिमत्त्व, सणसणीत उंची, बारीक अंगकाठी, तब्बल सात मीटर कापडाचं माप ! वाऱ्या पाण्यानं निमगोरा झालेला; पण मूळचा गोरा रंग अन् मुख्य म्हणजे अगत्यशील, मिलनसार स्वभाव.

त्यांच्या या छापपाडू व्यक्तिमत्त्वाबाबत एक किस्सा सांगण्यासारखा आहे. शेतकरी संघटनेने दिल्लीत शेतकरी संघटनांचा एक मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला पंजाब, हरियाना, गुजरात, महाराष्ट्र या राज्यांतील शेतकरी मोठ्या संख्येने अपेक्षित होते. त्यासाठी सेलूच्या कार्यकर्त्यांबरोबर पुरुषोत्तम लाहोटी, गोविंदभाऊ असे आम्ही नऊजण जीपने निघालो. सेलू ते दिल्ली हा तसा बराच लांबचा पल्ला, तेव्हा आम्ही सारा प्रवास दिवसाउजेडी करायचं ठरवलं. रस्ता बिनमाहितीचा आणि मध्य प्रदेशच्या डाकूगिरीची ख्याती कानी पडलेली, तेव्हा दिवेलागण झाली, की रस्त्यालगत एखादं रेस्टहाऊस पाहून तिथे रात्रीचा मुक्काम करायचा अन् पहाटे पुढच्या प्रवासाला निघायचं. वाटेत जिथे नदी, नाले, ओढे लागतील तिथे प्रातर्विधी आटोपायचे, आंघोळी करून घ्यायच्या आणि पुढे चालू लागायचं. वाटेत जिथे ढाबा दिसेल तिथे नाश्ता, चहा घेतला, की पुढे. दुपारच्या सुमारास रस्त्यालगतच विहीर असलेले शेत पाहून जेवणं करायची, थोडा आराम आणि चारच्या सुमारास पुढचा प्रवास, अशा तऱ्हेने मजल दरमजल करीत मेळाव्याच्या आधीच्या रात्री दिल्लीपासून सुमारे ६० कि.मी. अंतरावर असलेल्या पलवल या हरियानातल्या एका गावी आम्ही पोहोचलो. त्यावेळी भाऊच्या अंगावर शुभ्र खादीचे कपडे होते, डोळ्यावर सोनेरी काड्यांचा चष्मा, सोबत आम्हा साऱ्यांचा ताफा आणि साऱ्यांची भाऊपासून काही अंतर ठेवण्याची पद्धत पाहून तिथल्या माणसाला वाटलं, हे कुणी मंत्रीगिंत्री असावेत. नेमकं त्या



दिवशी कुणी मंत्री येणार होते त्या डाक बंगल्यात आणि त्यांच्यासाठी डाक बंगला राखून ठेवला होता. भाऊ म्हणजे तेच मंत्री असावेत आणि आम्ही सारे त्यांचे कार्यकर्ते, असे समजून त्यानं आम्हाला व्ही.आय.पी. सूट उघडून दिला. फ्रिझचं पाणी, चहा आणून दिला. आम्ही पैसे द्यायला लागलो तरी तो घेईना. त्याच्या बोलण्यावरून तो भाऊंच्या व्यक्तिमत्त्वाला फसला हे आमच्या लक्षात आलं आणि नंतर खरोखरच मंत्री आले तर त्या बिचाऱ्याची फजिती होऊ नये म्हणून आम्ही खरी परिस्थिती त्याला सांगितली. नेमकं त्या दिवशी दुसरे सूटस रिकामे नव्हते; पण त्या बिचाऱ्याला आमची सोय केल्याशिवाय राहवेना. तेव्हा त्याने बंद असलेली काहीशी अडगळीची खोली साफसूफ करून आम्हाला दिली. आमची सोय तर झाली. रात्री मंत्रि महोदय काही आलेच नाहीत. आले असते तर कदाचित आम्हाला तीही खोली रिकामी करावी लागली असती. याच प्रवासात एके दिवशी भली रात्र होऊनही आम्हाला वाटेत रेस्टहाऊस काही लागेना; मात्र एका ठिकाणी रेल्वेलाईन ओलांडावी लागली तेव्हा एखादं स्टेशन जवळ असेल तर तिथली रिटायरिंग रूम आम्हाला मिळेल, या आशेनं आम्ही अंदाजे अंदाजे जाऊन स्टेशन गाठलं. ते फार छोटं स्टेशन होतं अन् रिटायरिंग रूम नव्हती. पण भाऊंना पाहून त्या स्टेशन मास्तरनं त्याच्या ऑफिसचीच खोली आम्हाला दिली ! पलवलच्या घटनेपासून आम्ही भाऊंना 'मंत्रीजी' म्हणू लागलो. आम्ही म्हणजे मी. बाकी सारे कार्यकर्ते भाऊंना दबूनच राहायचे. भाऊंचं व्यक्तिमत्त्व आणि घराण्याचा रुबाबच तसा!

त्यांनी आधीपासूनच कृषी महाविद्यालयात जायचं ठरवल होतं आणि त्याप्रमाणे परभणीच्या कृषी महाविद्यालयातून ७० मध्ये पहिल्या वर्गात पदवी प्राप्त केली. त्यावेळी नोकऱ्या चटकन उपलब्धही होत्या. त्यामुळे नोकरीची काही अडचण नव्हती. त्यावेळी सरकारी नोकरी स्वीकारली असती तर आज शेतकी खात्यातले सर्वोच्च पद मिळवून ते निवृत्त होऊ शकले असते, तशी त्यांची पात्रताही होतीच. तस होते तर निवृत्त होऊन आज जी शेतीसंबंधी मांडणी ते करतात, त्याच्या बरोबर उलट भूमिका बजावून सरकार दरबारी राबता ठेवता आला असता अन् भरपेट पैसाही मिळवता आला असता. 'आम के आम और गुठलीयों के दाम!''

बरं तेही जाऊ द्या. ७४ मध्ये भाऊंनी मिरग कृषी सेवा केंद्र या नावाने व्यापारी व्यवसाय सुरू केला. त्यानिमित्त भाऊंच्याभोवती व्यापार करणाऱ्या समवयस्कांचं कोंडाळं जमा झालं. तेव्हा त्यांच्याप्रमाणेच सिल्कचा झब्बा, पांढरी विजार घालून गळ्यातील जाडसर, घनसर सोन्याची साखळी समोरच्याला दिसेल अशा

बेताने वरचं बटन उघडं ठेवून अर्धी साखळी बाहेर राहील अशा बेताने बाकी बटनं लावण्याच्या व्यापारी स्टाईलनं. पेढीवरील गादीवर लोळत फोनवर 'भाव टाव कई है!'ची चौकशी करायची, बाकी वेळ मित्राच्या कोंडाळ्यात गाद्या गिरद्यांवर लोळत पडायचं अन् रात्री रोकड मोजत आयुष्य सुखात काढायचं असं व्यापाऱ्यांचं शाही जीवन जगायला काय हरकत होती.

आता तेही जाऊ द्या. भरपूर शेती घरी. आरामात बसून खाल्लं असतं तरी ख्यालीखुशालीत जगता आलं असतं. घराणं पंचक्रोशीतच नाही तर अवतीभोवतीच्या पंच जिल्ह्यांत नावाजलेलं. दूरपर्यंत सोयऱ्याधायऱ्यांचं अन् ओळखीपाळखीच्या माणसांचं जाळं पसरलेलं. तेव्हा कुठल्यातरी राजकीय पक्षाच कुंकू लावलं असतं तर आमदारकी तर नसूदेत; पण मंत्रालयाच्या परिसरात, नेतेमंडळीच्या सहवासात राहून सत्तेची उबही भोगता आली असती अन् पैशाची गरमीही. इतर काही म्हणजे आमदारकी/खासदारकी नाही मिळाली तरी गेलाबाजार एखादं महामंडळ पदरात पडायला काहीच हरकत नव्हती. भाऊंच्या घराची आबच तशी होती; पण उत्कर्षाच्या या साऱ्या शक्यता असताही भाऊंना काय अवदसा आठवली अन् ते संघटनेत आले याचं आजही आश्चर्य वाटतं. वर म्हणल्याप्रमाणे संघटनेतील विसावर वर्षांची वाटचाल झालेली असूनसुद्धा आजही!

बरं हा सारा आर्थिक, राजकीय खेळ जाऊ दे... आणखी एक क्षेत्र भाऊसाठी खुलं होत. भाऊला स्वतःला आणि वडिलांसकट घरातील सर्वांना संगीताची आवड. भल्या भल्या संगीतकारांच्या चांगल्या ओळखी, अनेक मैफली ऐकलेल्या, संगीताच्या धुंदीत रात्र रात्र जागवलेली. त्यांचा स्वतःचा आवाज चांगला, गाण्याचा ढंगही चांगलाच. नुसत्या मैफली ऐकायच्या म्हटल्या तरी गावोगावी मैफली ऐकूनही आरामात आयुष्य कंठता आलं असतं. वसंतराव देशपांडे भाऊंचे आवडते गायक. त्यांच्या गायकीच्या अन् संबंधातल्या अनेक आठवणी भाऊंनी जपल्यात. असंच केव्हातरी एकदा वसंतराव 'संशय कल्लोळ' या नाटकाच्या प्रयोगासाठी औरंगाबादी आलेले. वसंतराव औरंगाबादच्या एंपायर हॉटेलमध्ये उतरले होते. दुपारी त्यांना भेटण्यासाठी भाऊ हॉटेलवर गेले. थोड्या वेळात तिथे संगीत क्षेत्रातील बाळासाहेब बहिरट आणि उत्तमराव अग्निहोत्री आले. गप्पांची मैफल जमली. गाण्याचे तुकडे येऊ लागले. वसंतरावांना लहर आली. सोबत पेटी, तबला, तानपुरे ही आयुधं होती. त्यांनी गाण्याची मैफल जमवली. भाऊ ऐकण्यात दंग झाले. मैफल संपली. भाऊ भारावून गेले.



वसंतरावांना काय भेट द्यावी? पैसे देणं उचित नव्हतं. त्यांनी बोटातली सोन्याची अंगठी काढली आणि वसंतरावांना दिली. वसंतराव पाहतच राहिले. कदरदान असावा तर असा. पुण्याला एकदा लक्ष्मी क्रीडा मंदिरात वसंतरावांच्या मैफलीत भाऊ उशिरा पोहोचले. त्यांना उशिरा आलेलं वसंतरावांनी पाहिलं आणि मध्यंतरात मंचावरून भाऊंना उद्देशून म्हणाले, "परभणीची एसटी उशिरा आली वाटतं. या असे समोर या." कलावंत आणि रसिकाची जोडी जमते ती ही अशी.

हे सारे मोह खुणावत असतानाही भाऊंनी शेतीचा अवघड मार्गच स्वीकारला. त्यांचा कुटुंबकबिला खूप मोठा. विठूकाका, म्हणजे भाऊंचे वडील, त्यांना सहा मुली आणि दोन मुले. भाऊ सर्वांत वडील. विठूकाकांची प्रकृती जरा नाजूकच आणि शेतीचा पसारा तर खूपच मोठा. घरात आश्रितही अनेक. वेळीअवेळी सल्लामसलतीसाठी आणि प्रसंगी आर्थिक मदत मागण्यासाठी नातेवाईक आणि अवतीभोवतीचे शेतकरीही यायचे. भाऊ पदवीधर झाले आणि त्यांना घराची जबाबदारी स्वीकारावी लागली. सारे मोह सारून भाऊंनी जबाबदारी स्वीकारली अन् ते पोचले थेट पिंपळगावी शेतीवर!

तरुण वयात एवढ्या मोठ्या पसाऱ्याची, घराची जबाबदारी अंगावर पडल्यामुळे कळत न कळत भाऊंच्या वागण्यात एक प्रौढपणा आलेला आहे. घरातल्या कर्त्या माणसाला असं व्हावंच लागतं. परिस्थिती त्यांना तसं वागायला मजबूर करते. तस पाहिलं तर घरात कर्ते वडील होतेच; पण त्यांची प्रकृती अशात आणखी नाजूक झालेली. त्याशिवाय भाऊंच्या स्वभावातच अंगावर जबाबदाऱ्या घेण्याची वृत्ती आहेच. संघटनेतही त्यांच्या स्वभावाच्या या पैलूचं वेळोवेळी दर्शन घडतंच. झालं काय, घरची जबाबदारी अंगावर पडली आणि त्यामुळे वागण्यातला प्रौढपणा आलेला, परिणामी घरातील सारी भावंडं, प्रत्यक्ष आई आणि नात्यागोत्यातील इतर माणसंही दबून वागायला लागली. साऱ्यांना त्यांचा धाक वाटायला लागला. घरातली सारी माणसं त्यांना दादा म्हणायला लागली. त्यांची वागणूक तरुण वयातही वडीलधाऱ्यासारखी व्हायला लागली. घरातील माणसं, नातेवाईकांचं असं वागणं पाहून मित्रमंडळी आणि इतर गावकरीही तसेच आदबीत वागायला लागले. त्यामुळे ओळखीपाळखीच्या वर्तुळाचा विस्तार होत गेला, तरी जवळीक करणारे मित्र कमीच झाले. काही मोजकेच मित्र आणि त्यांचे मेव्हणे डॉ. देशमुख, सुहास बीडकर आणि रत्नाकर सराफ फक्त यांचेच त्यांच्याशी अरेतुरेचे संबंध राहिले. त्यांच्या वागण्यातील प्रौढपणाचा पर्दा बाजूला झाला म्हणजे त्यांचा मिश्किल स्वभाव पाहायला मिळतो.

तसा लहानपणी भाऊंचा स्वभाव खूपच मिश्किल होता. शाळेत असतानाची एक आठवण ऐकण्यासारखी आहे. त्या काळी सेलूत 'प्रयोजना'ची म्हणजे जेवणावळीची एक प्रथा होती. अशा जेवणावळीत जेवणं संपत आली असताना श्लोक म्हणण्याची चढाओढ लागायची आणि श्लोकांच्या शेवटी 'जय जय रघुवीर समर्थ' किंवा कुठल्या तरी 'महाराज की जय'चा घोष व्हायचा. एका पार्टीनं एका महाराजांचं नाव घेतलं, की दुसरी पार्टी तेवढ्याच जोशात दुसऱ्या महाराजांचा जयजयकार करायची. या दोन घोषणांच्या गदारोळात श्लोकाकडे कुणाचंही लक्ष नसायचं. फक्त श्लोकाच्या ढंगात म्हटलं की झालं. हे फार आधी भाऊंच्या लक्षात आलेलं, तेव्हा ते आणि त्यांचे समवयस्क आंदुमामा प्रयोजनात ही कविता श्लोकाच्या चालीत म्हणायचे.

*'रे त्या पक्ष्यावर मी दगड फेकिता फेकिला का*
*झाले हातातून निसटताच चर्र या काळजात*
*धोंडा पक्ष्यावरच बसला श्वास कोंडूनी जाता*
*खाली होता पडला पंख जयाचा'*

आणि शेवटी उच्च रवानं 'जय जय रघुवीर समर्थ' म्हटलं, की लोकांना वाटायचं हाही श्लोकच असावा. वाढपी त्या श्लोकावर खूष होऊन मुद्दाम गरम गरम पोळी भाऊला वाढायचे.

संधी मिळेल, तेव्हा मात्र त्यांच्या वागण्यात चांगलाच सैलपणा यायचा. पुढे शेतकरी संघटनेच्या कामात भाऊंबरोबर मी आणि लाहोटी असे तिघे आणि कधी भाऊंची पत्नी सुयशावहिनी बरोबर असायच्या. अशावेळी त्यांच्या गाडीत प्रवासात गाण्याची मैफल जमायची. जुन्या आठवणीत भाऊ रंगून जायचे. गाण्याची तर लडच लागायची. भाऊंचा आवाज मुळात चांगला. शिवाय गाण्याचा ढंगही छान. जुनी, नवीन गाणी, नाट्यपदे-प्रवास केव्हा संपला कळायचं मुक्कामी आल्यावर. तो पावेतो रात्र उलटून गेलेली असायची. गाण्याच्या बाबतीत त्यांचं पाठांतर लक्षणीय. त्यांच्यापेक्षा जास्त पाठांतर सुयशावहिनींचे. त्यानंतर सिनेमाचं नाव, संगीतकाराचं नाव, गायकांची नावं अन् गाण्याचे बोलही पाठ असायचे. फिल्मी संगीताचा चालता बोलता कोश !

कॉलेज शिक्षण संपलं, घराची जबाबदारी अंगावर पडली आणि सुरू झाली शेती व्यवसायाशी कुस्ती. वाटलं होतं, सुरुवातीला हाही फड आपण सहजच मारू; पण म्हणतात ना 'इब्तेदाए इष्क है रोता है क्या, आगे आगे देखिये होता है क्या' हळूहळू या व्यवसायातली गोची कळू लागली. लोकांना सांगता येईना



आणि दुःख सोसवेना अशी अवस्था झालेली होती. बरं शेतीचा पसारा खूप मोठा असल्यामुळे प्रत्यक्ष फटक्याची झळ पोहोचेपर्यंत बराच काळ लोटून गेलेला असतो. शेती सोडू म्हणलं तरी सोडताही येत नव्हती. पिढ्यान्‌पिढ्या चाललेला धंदा सोडायचा तरी कसा? म्हणून एकामागे एक प्रयोग करीत राहिले. पाण्याखालची शेती अधिक भक्कम करावी म्हणून चार नवीन विहिरी केल्या, काही बोअरही घेतले. हे सारे करण्यासाठी कर्जही काढलं. चारही विहिरी एकत्र जोडल्या. नवीन ट्रॅक्टर घेतला. ज्वारीची मळणी करण्यासाठी ट्रॅक्टरवर चढवलेले मळणीयंत्रही घेतलं. अवतीभोवतीचे उसाचे फड पाडून गूळ तयार करणारं गुळाचं युनिटही घेतलं. या युनिटचा खर्च, व्याज आणि हप्ते सुटावेत म्हणून लोकांचा ऊस गाळून गूळ तयार करण्याची सेवा द्यायला सुरवात केली आणि हे सारं केलं ते शासनाच्या एका योजनेखाली. योजनेवर विश्वास ठेवला आणि तिथेच घात झाला. ते झालं असं :

१९७४ च्या सुमारास केंद्र सरकारने कृषी सेवा केंद्राची योजना जाहीर केली. कृषी पदवीधरांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा यासाठी आणि त्याद्वारे अशा केंद्रांमार्फत शेतकऱ्यांना विविध सेवा, खते, बी-बियाणे उपलब्ध व्हावे अशी ती योजना होती. या योजनेअंतर्गत भाऊंनी सेलू या गावी 'मिरग कृषी सेवा केंद्र' या नावाने व्यवसाय चालू केला. या केंद्रामार्फत शेतकरी सेवा उपलब्ध व्हावी यासाठी मळणी यंत्र, ट्रॅक्टर, गूळ बनवणारी यंत्रणा, पॉवर स्प्रेअर अशी आयुधं खरेदी केली. या साऱ्यांसाठी देना बँकेतर्फे कर्जही मिळवलं होतं. बघता बघता या योजनेचा बोऱ्या वाजला, आणि तोही शासनाच्याच धोरणाने ! त्याची चित्तरकथा ही अशी घडली.

या योजनेखालील गुळाच्या यंत्रासाठी देना बँकेतर्फे कर्ज उपलब्ध करून घेतलेलं होतं. शिवाय पदरचीही बरीच रक्कम गुंतवावी लागली होती. पहिली दोन तीन वर्षे कारभार ठीक चालला. तीन वर्षांनी पाथरी या गावी गोदावरी-दुधना सहकारी साखर कारखाना निघाला. या कारखान्याचे चेअरमन आमदार सखारामजी नखाते हे होते. या कारखान्याला संरक्षण मिळावे म्हणून कारखान्यापासून विशिष्ट किलोमीटरच्या परिघात उसावर प्रक्रिया करण्यास बंदी घालण्यात आली. तरीही ती बंदी झुगारून देऊन भाऊंनी आपलं युनिट चालूच ठेवलं. तेव्हा कारखान्याचे चेअरमन व काँग्रेसचे आमदार नखाते यांनी पोलिसांचे साह्य घेऊन युनिट बंद पाडायला लावले. एवढंच नाही तर वीज बोर्डावर दबाव आणून विजेची जोडणीही तोडावयास लावली. म्हणजे युनिट घेण्यासाठी साह्य करणारेही

शासन आणि चालू युनिट बंद पाडणारेही शासनच. शासनाचा एक हात काय करतो याचा दुसऱ्या हातालाही पत्ता नसतो हेच खरं. आता या युनिटसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करायची? "या युनिटसाठी मी पदरून जे भांडवल गुंतवलं तेच बँकेत मुदतठेव म्हणून ठेवलं असतं तर त्यावरील व्याजावर आरामात राहता आलं असतं," भाऊ म्हणतात, "त्या काळात ज्या कृषी केंद्रांनी सेवांसाठी आवश्यक ती गुंतवणूक न करता केवळ खते, औषधी, बी-बियाण्यांचा व्यापारच केला, ती केंद्रे मजेत राहिली, लबाडी करूनही या केंद्रासाठी अशा सेवा उपलब्ध करून देणं आवश्यक होतं हे लक्षात घ्यायला पाहिजे. आमच्यासारखी केंद्रं मात्र पार बुडाली!"

भाऊला ही व्यापाराची बुद्धी झाली कशी? त्यांच्या घराण्यात तर कुणी व्यापार केलेला नव्हता, "शेतीचा चारपाच वर्षांचा अनुभव गाठीला होता. त्यातून हे स्पष्ट झालं, की श्री शिल्लक फारशी राहत नाही. मात्र त्याच वेळी शेतीमालाची खरेदी-विक्री करताना अनेक लहानमोठ्या व्यापाऱ्यांशी संबंध येत होता आणि त्यातून व्यापारातील संपन्नता स्पष्ट दिसत होती. शिवाय हेही लक्षात आलं होतं, की व्यापारात फारशी चतुराईही आवश्यक नव्हती. त्याच सुमारास कृषी पदवीधरासाठी केंद्र सरकारनं कृषी सेवा केंद्राची योजना जाहीर केली. त्या योजनेचा लाभ घेऊन मी व्यापारी धंद्यात उडी घेतली; मात्र आतापर्यंतच्या अनुभवावरून हेही लक्षात आलं होतं, की शेतीप्रमाणेच शेतीसंबंधित व्यापारातही धोका होताच, फक्त या धोक्याचं प्रमाण कमी होतं एवढंच, शिवाय पुढेमागे नुकसान भरून निघण्याची शक्यताही होतीच," भाऊंनी सांगितलं.

कळत न कळत भाऊंची वाटचाल ही टप्प्या टप्प्याने शेतकरी संघटनेकडे चालू होती. आधी तयारी झाली मनाची. नोकरी का नको, याला भाऊंनी 'आपली प्राथमिकता शेतीला,' असं सांगितलं. "काकांची (भाऊंच्या वडिलांची) प्रकृती जरा नाजूकच. तशात माझ्यानंतर पाच बहिणी अन् एक भाऊ आणि सर्वांत धाकटी परत बहीण. मी नुकतच शिक्षण पूर्ण केलेलं आणि मोठ्या बहिणीचं लग्न नुकतंच झालेलं. तेव्हा सारा आवा तसा कच्चाच, शेतीचा अन् घराचा कारभार हाती घेणं आवश्यकच. शिवाय नोकरी म्हणजे ताबेदारी अन् माझ्या वृत्तीला कुणाची अशी ताबेदारी सहनही झाली नसती. तेव्हा नोकरीचा विचारही मनात आला नाही." शेतीचा अनुभव तर घेतलेला. एकूणच शेतकऱ्यांच्या अवस्थेबद्दल भाऊ म्हणतात, "माझी बात तर सोडा. मोठ्या पसाऱ्यात 'जोरका धक्का धीरेसे लगे' पण अवतीभोवतीच्या शेतकऱ्यांचं काय? मी शेती हातात



घेतली तेव्हापासून सातआठ वर्षे लेव्हीनं ज्वारी घातली. त्यावेळी बाजारात ज्वारीचा भाव होता १२७ ते १७५ आणि सरकार आम्हास लेव्हीचा भाव देत होतं ३६ ते ५६ रु. पर्यंत. अनेक वेळा ही लेव्ही इतकी जाचक होती, की ज्वारीचं पीक कमी झालं, की बाजारातून चढ्या भावाने ज्वारी खरेदी करून लेव्हीत घालावी लागायची. एवढंच नव्हे तर शेतावर काम करणाऱ्या मजुराला सालचंदी देण्यासाठी बाजारातून ज्वारी विकत घ्यावी लागायची. शेतीची ही पद्धती चीड आणणारी असूनही शेतकरी कधी बंड करून कसे नाही उठले याचं मला आजही आश्चर्य वाटतं. शेतकरी तर बिचारे हतबल; पण सत्तेत बसलेल्या त्यांच्या पोरासोरांना आपल्या बापाची ही हतबलता दिसत नव्हती का? एवढा षंढपणा कुठून आला असेल?" नाही म्हणायला ज्वारीच्या लेव्हीच्या विरोधात एक उद्रेक जरूर झाला. परभणी जिल्ह्यातील सोनपेठ या गावी लेव्ही वसुलीसाठी उपजिल्हाधिकारी गेले होते तेव्हा गावातील लोकांनी त्यांना कडवा विरोध केला. नग्न करून गाढवावरून त्यांची मिरवणूक काढली. त्याशिवायही काही अपप्रकार केले. ज्याचा उल्लेखही करावा वाटत नाही. हा अपवाद वगळता सारं शांत शांत होतं. या घटनेवरून शासनानं काही धडा घेतला आणि लोकांनी लेव्ही घालावीच यासाठी ज्वारीला जिल्हाबंदी, झोनबंदी, खुल्या विक्रीस बंदी अशा अनेक योजना राबविल्या आणि शेतकऱ्यांना जेरीस आणलं. जे ज्वारीचं तेच उसाचं. झोनबंदी, भावबंदी, भारी पाणीपट्टी अशा अनेक बंधनांत शेतकरी अडकलेला. तरीही ऊस थोड्याशा होईना, निश्चित भावाच्या 'साखरे'मुळे शेतकऱ्यांना गोड वाटत होता; मात्र साखरेतील 'कटुता' कुणी त्यांच्या लक्षात आणून देईपर्यंतच ही गोडी पुढे टिकली.

हे सारं पाहत, अनुभवत भाऊ शिकत-समजत गेले. "एक प्रश्न मला नेहमी पडलेला असायचा. त्याही काळात अन्नधान्य तुटवडा, भूकबळी, कुपोषण या गोष्टी आम्ही ऐकून होतो. जेव्हा वस्तूचा तुटवडा असतो तेव्हा भाव चढे असतात हा सिद्धांत आम्ही अर्थशास्त्रात शिकलो आणि शेतमाल वगळता इतर वस्तूमध्ये अनुभवलेसुद्धा, मात्र शेतीमालाचा तुटवडा असूनही भाव एवढे खाली कशासाठी हा प्रश्न मला न उलगडलेला. फार पुढे याचं उत्तर सापडलं, परभणीच्या शेतकरी संघटनेच्या अधिवेशनात शरद जोशींना ऐकलं तेव्हा !" पण त्यावेळी मात्र असं वाटायचं, की शेतकरी असंघटित आहे हेच त्याच्या गरिबीचं एक प्रमुख कारण. म्हणून भाऊंनी त्या काळात 'शेतकरी संघटना' याच नावानं पिंपळगावात संघटना स्थापन केली; मात्र ती संघटना फारशी वाढू

शकली नाही. कुठलीही संघटना वाढीसाठी विचाराचं एक भक्कम पाठबळ असावं लागतं. बहुधा ते या संघटनेत नसावं, त्यामुळे संघटना जिथल्या तिथेच राहिली. शिवाय रोग आहे एवढंच कळत होतं, त्याचं निदान होत नव्हतं. त्यामुळे औषधयोजना करता येत नव्हती. तेव्हा रोगावरचा इलाज काही होत नव्हता; पण झालं एवढं, भाऊंची मासिकता तयार झालेली होती. रान नांगरून, डोंगरून, काशा वेचून पेरणीसाठी तयार होतं. ती पेरणी व्हायला वाट पाहावी लागली परभणी अधिवेशनातील ८४ सालच्या विचारमंथनाच्या पावसाची.

८४ मध्ये फेब्रुवारी महिन्यात परभणीला संपन्न झालं. शेतकरी संघटनेचं अधिवेशन. त्या अधिवेशनाला भाऊ त्यांच्या सहकाऱ्यासंह हजर राहिले. तीन दिवसांचं विचारमंथन ऐकलं. खुल्या अधिवेशनाला जमलेला विराट जनसमुदाय पाहिला आणि आपल्या प्रश्नाला उत्तर सापडलंय हा विश्वास आला; पण तरीही त्यांनी प्रवाहात स्वतःला झोकून दिलं नाही. आणखी काठा-काठावरूनच पाहणं चाललेलं होतं. त्याच वर्षी परभणी जिल्ह्याचं अध्यक्षपद माझ्याकडे आलं आणि संघटनेने परभणीत हातपाय पसरायला सुरुवात केली. अधिवेशन, त्याआधी गावागावातून पार पडलेल्या प्रचारसभा, अधिवेशनानंतरची महाराष्ट्र प्रचार यात्रा, मोटारसायकल फेरी यामुळे संघटना खूप चर्चेत होती. या पार्श्वभूमीवर माझं काम खूपच सोपं झालेलं होतं. आता गरज होती घट्ट पाय रोवायची. त्यासाठी आवश्यकता होती गोविंदभाऊंसारख्या पंचक्रोशीत नाव असलेल्या शेतकरी युवकाची. त्यासाठी हा 'मासा' गळाला लावायचाच या दृष्टीने मी पाऊल टाकायला सुरुवात केली. तोपावेतो त्यांची आणि माझी विशेष घसट नव्हती. आमच्यात एक सोयरसंबंधातलं नातंमात्र होतं. भाऊची धाकटी बहीण सुहास बीडकरला दिलेली आणि बीडकराची बहीण मला दिलेली असं ते नातं होतं. त्या नात्याची घोरपड किल्ल्यावर चढवून हा गड काबीज करायचा असं ठरवलेलं. त्यासाठी मी आधी सुहासला म्हणालो, ''काय राव, आम्ही एवढं पोटतिडिकीनं काम करतो, भाषणं देतो. लोकं कौतुक करतात. नावाजतात. तुम्ही आमचे सालारजंग; पण तुम्हाला काही आमचे कौतुक नाही,'' यावर सुहास म्हणाला, ''तसं नाही भाऊजी, तुम्ही सांगा तुमचा मेळावा कधी नि कुठे आहे ते, म्हणजे मी येईन.''

''मग येत्या रविवारी पाथरी तालुक्यातील तिडी पिंपळगावला दुपारी दोन वाजता मेळावा आहे, तिथे तुम्ही या'', 'मी बिलकूल येतो अन् सोबत गोविंदलाही आणतो.'' आम्हाला तरी काय कुणी गोविंद घ्या, कुणी गोपाळ



नकोच होतं. फक्त गोविंदच पाहिजे होता. आंधळा मागतो एक असं झालं. रविवारी सुहास आला तो भाऊला घेऊनच. त्या दिवशी मी जे बोललो ते गोविंदभाऊला समोर ठेवून. त्यांच्यासाठीच अन् हा मासा गळाला लागला. इतका पक्का, की माशाने गळच गिळून टाकला आणि आता आम्ही जातो गावोगावी भाऊंना ऐकायला!

आता भाऊंची वाटचाल सुरू झाली. ते लागले कामाला; ते एकदम दणकून. प्रवेशालाच झाली बारडोली ते टेहरे ही महाराष्ट्र प्रचार यात्रा. यात्रेचा शेवट टेहरेला होणार होता. तेव्हा पाथरी भागातील शेकडो शेतकऱ्यांना रेल्वेने घेऊन भाऊ टेहरेला पोहोचले. दुर्दैवानं त्याच दिवशी इंदिरा गांधींची हत्या झाली आणि टेहरेची सभा इंदिराजींना श्रद्धांजली अर्पून आटोपावी लागली. सभेवरून परतणाऱ्या लोकांवर मनमाडला दगडफेकीच्या काही घटना घडल्या. पण या अनुभवाने कुणी निराश झाले नाही.

एखादं काम अंगावर घेतलं, की ते तडीला न्यायचं हा भाऊंचा स्वभाव. तेव्हा त्यांनी शेतकरी संघटनेचं प्रचाराचं काम अंगावर घेतलं आणि जोशात चालवलं. कुठल्यातरी आंदोलनाच्या प्रचारासाठी त्यांनी पंधरा दिवसांची प्रचार यात्रा काढली. ही प्रचार यात्रा एका ट्रॅक्टर - ट्रॉलीमध्ये होती. सोबत पीठ, मीठ, सारं सामान घेतलेलं. पाथरी तालुक्यातील सारंगापूर या गावी जाताना या यात्रेला एक मजेशीर अनुभव आला. हा रस्ता अत्यंत खराब. उंच खोल चकाऱ्या असलेला. भर रात्रीची वेळ. भाऊ आणि सहकारी ट्रॉलीत झोपलेले. ट्रॅक्टरच्या प्रवासातील धक्क्यांनी सुद्धा त्यांची झोप घालवली नाही. मध्येच केव्हातरी रस्त्यावरील चकाऱ्यामुळे हादरा बसून ट्रॉलीचं हुक ट्रॅक्टरमधून निघालं आणि ट्रॅक्टर पुढे निघून गेला. ट्रॉली तिथेच थांबलेली! काही वेळाने मंडळी जागी झाली, तो त्यांना ट्रॅक्टर दिसेना. ट्रॅक्टर ड्रायव्हरलाही लवकर कळलं नाही, काय झालं ते. भर रात्र, गाव दूर, अन् हे जंगलातलं अडकून पडणं. थोड्या वेळाने ट्रॅक्टरचा लाईट दूरून येताना दिसला आणि आणि मग कळलं काय झालं होतं ते. भाऊंनी झपाटल्यासारखा प्रचार केला. त्या काळी काँग्रेसचे आमदार सखारामजी नखाते यांचा विलक्षण धाक होता. संघटनेचं आंदोलन हे काँग्रेसच्या विरोधातलं म्हणून नसलं, तरी तो पावेतो शासन काँग्रेसचंच असल्याने त्यांच्या शेतकरी विरोधी धोरणाचीच परिणती या अवस्थेत झाली असल्याने टीकेचा सारा रोख काँग्रेसवरच राही. त्यामुळे कार्यकर्त्यांना भाऊंची काळजी वाटे. जिजा मुकादम नावाचा एक कार्यकर्ता भाऊंचा चाहता. तो म्हणायचा, ''भाऊ

संभाळून रहा, ह्यो नखात्या तुमच्या अंगावर कवा गाडी घालंल, काई नेम नाही'' पण असल्या भीतीला घाबरणं हा भाऊंचा पिंड नव्हता.

भाऊंच्या एकूणच कामामुळे भाऊंचा आणि साहेबांचा – शरद जोशींचा – चांगला परिचय झालेला. बबन एकदा साहेबांना म्हणाला, ''हे मध्यमवर्गातून आलेले आहेत. फार काळ हा डबा आपल्या गाडीबरोबरच राहील असं वाटत नाही. मध्येच एखाद्या जंक्शनवर हा डबा आपल्या गाडीपासून सुटून जाईल.'' या डब्याने गाडी तर सोडलीच नाही, तर साहेबांची खास कार्यकर्त्यांची जी 'पॅलेस ऑन व्हील्स' आहे, त्या गाडीचा हाही एक डबा झालेला आहे.

लवकरच संघटनेनं लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम जाहीर केला. प्रत्येक शेतकऱ्यानं आपल्या मालकीच्या शेतापैकी किमान दोन एकर शेती आपल्या लक्ष्मीच्या नावे करून द्यायची. तिने आपल्या नवऱ्याच्या घरासाठी केलेल्या कष्टाबद्दल कृतज्ञता अशा मार्गाने व्यक्त करावी इतका सोपा हा कार्यकम. ज्या गावातील किमान शंभर शेतकरी या कार्यक्रमात सहभागी होतील त्या गावाला साहेब स्वतः भेट देणार आणि स्वतःच्या हातांनी लक्ष्मीमुक्तीची प्रमाणपत्रे प्रदान करणार असंही ठरलं होतं. या योजनेच्या प्रचारासाठी भाऊंनी विशेष परिश्रम केले. लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम साहेबांचा विशेष आवडीचा उपक्रम. चांदवड अधिवेशनाआधी महिलांचा एक मेळावा सेलू येथे आयोजित करण्यासाठी भाऊंनी विशेष परिश्रम घेतले. या मेळाव्यासाठी स्वतः साहेब दिवसभर हजर होते.

साहेबांचा स्वभाव कधी गरम, कधी नरम. कुणीही नेहमीकरिता जवळ नाही आणि कुणी दूरही नाही. साहेब खासदार झाल्यावर परभणीला आले होते. परभणीच्या डाकबंगल्यावर नांदेडच्या काही कार्यकर्त्यांनी भाऊंच्याविरुद्ध काही तक्रारी साहेबांपुढे केल्या. तेव्हा साहेबांनी त्यांना चांगलंच फटकारलं. ''भाऊ काय आहेत, हे तुम्ही मला सांगू नका. मी त्यांना चांगलं ओळखतो. तुम्ही अशा चहाड्या करू नका,'' असं ते यावेळी रागानं बोलले. तेच साहेब अंबाजोगाई ज्वारी परिषदेआधी भाऊवर चांगलेच बरसले होते. झालं असं होतं, त्या परिषदेसाठी ज्वारीसंदर्भात काम करणाऱ्या संस्थांकडून ज्वारी पिकाचे उत्पादन, पिकाचा उत्पादनखर्च, लागणारी खते, औषधी, ज्वारीचे अन्य उपयोग, एकूणच माहिती गोळा करून पेपर तयार करायचा होता आणि हे काम साहेबांनी भाऊवर सोपवलं. त्यावेळी महाराष्ट्र कृषी सेवा केंद्र संघटनेचे भाऊ सचिव होते आणि परिषदेआधी पाचेक दिवस या संघटनेची एक कार्यशाळा मुंबईला आयोजित केलेली होती. तिच्या तयारीसाठी आणि स्मरणिकेच्या कामासाठी परिषदेआधी



काही दिवस ते मुंबईला मुक्कामाला गेले होते. मुंबईहून संघटना कार्यालयाशी संपर्क ठेवण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता; पण का कोण जाणे, फोनवर संपर्क होत नव्हता. इकडे ज्वारी परिषद अंगावर आलेली आणि पेपरचा पत्ता नाही, यासाठी साहेब चिंतित होते. त्यांनी सेलूला भाऊंच्या घरी संपर्क केला, तेव्हा भाऊ मुंबईला गेल्याचे समजले. एकूण वातावरण तापलेलं. कार्यशाळा आटोपून भाऊ सरळ पुण्याला गेले. त्याकाळी संघटनेचे कार्यालय पुण्याच्या जंगली महाराज रोडवरील भास्करभाऊ बोरावके यांच्या घरी होतं. गोविंदभाऊंना पाहिलं अन् साहेब त्यांच्यावर बरसले. ''ज्वारी परिषद सॅबोटेज करायची की काय?'' असाही आरोप केला. साहेबांचा राग शांत झाल्यावर भाऊंनी गोळा केलेली माहिती साहेबांसमोर ठेवली, तेव्हा कुठे साहेबांची कळी खुलली. त्यांनी भाऊला विचारलं, ''आता तुम्ही कुठे जाणार?''

''अंबाजोगाईला.''

''मग आमच्या गाडीत एका माणसाची जागा आहे. तुम्ही आमच्याबरोबर येऊ शकता.'''

वारंवार आंदोलन करूनही शासन कापसावरील बंधने दूर करीत नाही. राज्याबाहेर कापसाला चांगली किंमत मिळत असूनही कापसावरील राज्यबंदी हटत नाही, हे पाहून संघटनेनं सीमापार कापूस आंदोलन सुरू केलं. एकाधिकार कापूस खरेदी योजनेखाली कापूस उत्पादकांना आपला कापूस फेडरेशनलाच घालावा लागायचा. तोही ते देतील त्या भावात आणि ते देतील तशा हप्त्यात, तेवढ्याच किमतीला. कापसाच्या खाजगी व्यापाराला बंद होती. या जुलमाविरुद्ध सीमापार कापूस हे आंदोलन होतं. याही आंदोलनात भाऊंनी बाजी मारली. त्यांच्या स्वभावाप्रमाणे त्यांनी योजनाबद्ध कार्यक्रम तयार केला. आठवड्यातून किमान शंभर वाहनांची एक रॅली म्हैसा–आदिलाबाद या आंध्रातील नांदेडलगतच्या सीमेवर असलेल्या गावी न्यायची. रॅलीसोबत चार जीप भरून कार्यकर्ते, शिवाय प्रत्येक वाहनावर उत्पादक शेतकरी आणि त्यांच्यासोबत काही माणसं, एवढी माणसांची संख्या सोबत. एवढी संख्या आणि वाहनं पाहिली, की कुणाच्याही उरात धडकीच भरावी. सीमापार कापसाला भावही चढा मिळे आणि किंमतही एकरकमी. रॅलीआधी भावाची चौकशी करून फोनवर संबंधित व्यापाऱ्यांशी संपर्क केला जाई. पहिली रॅली गेली, तेव्हा भोकर फाट्याजवळ पोलिसांनी रॅली अडवली. पोलिसांची मोठी फौजच फाट्यावर होती. पोलिसांची फौज आणि रॅलीतील शेतकरी समोरासमोर ठाकलेले. शेसव्वाशे वाहनांची रांग आणि त्यामागे

–पुढे इतर वाहने. सारी वाहने ठप्प झालेली. शेतकरी मागे जाण्यास तयार नव्हते आणि पोलिस पुढे जाऊ देत नव्हते. वेळ पडली तर कापूस रस्त्यावर जाळू; पण माघारी जाणे नाही हा शेतकऱ्यांचा निश्चय तर 'एन्ट्री' घेतल्याशिवाय कापूस जाऊ देणार नाही हा पोलिसांचा निश्चय. रात्र झाली. लोकांत अस्वस्थता. दोन्ही बाजूंला वाहनांच्या रांगा लागलेल्या. शेवटी एका फौजदाराने सन्माननीय तोडगा सुचवला. रॅलीने चार किलोमीटर मागे जावे. रात्री दोननंतर कापूस सीमापार न्यावा. दरम्यान पोलिस आपला ताफा परत नेणार. त्याप्रमाणे रॅली मागे गेली. वाहतूक परत सुरू झाली. दोन नंतर संघटनेच्या चार जीप फाट्यापर्यंत जाऊन पाहणी करून आल्या. हिरवा झेंडा दाखविला आणि रॅली घोषणांच्या गजरात सीमापार गेली आणि दोन महिने जातच राहिली.

याचा फायदा काही व्यापाऱ्यांनी घेण्याचा प्रयत्न केला. छातीवर बिल्ले लावलेली माणसं बसवून छोट्या रॅल्या काढायच्या अन् कापूस सीमापार न्यायचा, 'एन्ट्री' न देता. तेव्हा पोलिसांनी भाऊंना सुचवलं, की संघटनेच्या अधिकृत रॅलीजवळ संघटनेनं प्रमाणपत्र द्यावं आणि मगच ती रॅली एन्ट्री न देता सीमापार जाऊ देण्यात येईल. त्याप्रमाणे व्यवस्था करण्यात आली. आता या व्यवस्थेचा गैरफायदा घेण्याचा काही व्यापाऱ्यांनी प्रयत्न केला. पाच-सहा वाहनांचा ताफा घेऊन ते निघाले. वाहनावरील माणसांच्या छातीवर संघटनेचा बिल्ला लावायचा आणि फाटा जवळ आला, की संघटनेच्या घोषणा द्यायच्या पण या व्यापाऱ्यापेक्षा पोलिस अधिक हुशार. त्यांनी या रॅलीचा खरेपणा जाणण्यासाठी एका वाहनावरील बिल्लेधारकाला विचारलं, ''तू संघटनेचा का रे?''

''हो.''

''मग शरद जोशी ठाऊक आहेत का?''

''हो.''

''त्यांचं राहतं गाव कोणतं?'' ते काही त्याला सांगता येईना. तेव्हा त्या व्यापाऱ्याला 'एन्ट्री' तर द्यावी लागलीच शिवाय 'फाईन'ही द्यावा लागला.

आंदोलनाचा जोर वाढतच होता. शेतकऱ्यांचा प्रतिकारही वाढत होता; पण यापासून पोलिस काही शिकत होते, ना शासन. दोन-तीन वर्षांपूर्वीच्या कापूस आंदोलनातील पोलिसांच्या आडमुठेपणामुळे लोक चिडले. या चिडाचिडीचा फायदा घेऊन जमावात शिरलेल्या काही असामाजिक तत्त्वांनी सेलू परिसरात दोन एस. टी. बसेस जाळल्या. या घटनेशी संघटनेचा काहीही संबंध नव्हता; पण शासनाने या प्रकरणी संघटनेच्या कार्यकर्त्यांना विनाकारण गोवले आणि



तिडी पिंपळगाव, धामनगावच्या शेतकऱ्यांना अटकेत टाकलं. हे सत्र इतर गावांतही चालू करण्यात आलं; मात्र संघटनेच्या कार्यकर्त्यांनी संघटितपणे प्रतिकार केला आणि अटक होऊ दिली नाही. भाऊंच्या पिंपळगावी अटक करायला आलेल्या पोलिस पार्टीला शेतकऱ्यांनी पिटाळून लावलं. तेव्हा मध्यरात्री मोठा फोर्स घेऊन पोलिस पार्टी आली आणि त्यांनी घराघरात घुसून मारहाण सुरू केली. या मारहाणीतून महिलाही सुटू शकल्या नाहीत. त्यांना पोलिसांनी फरफटत झोपडीबाहेर काढलं. त्यावेळी पुरूष मंडळी राखणीसाठी शेतात गेलेली होती. पोलिसांनी दहशत बसविण्याचा प्रयत्न केला; पण मारझोडीला न घाबरता स्त्रियांनी तोंड दिलं आणि अटकेपासून वंचित ठेवलं. रात्रभर पोलिसांनी गावातच तळ ठोकला; मात्र दुसऱ्या दिवशी त्यांना हात हलवत परतावं लागलं. हाच कार्यक्रम देऊळगाव औचार या गावीही पार पडला. तिथेही महिलांना मारहाण करण्यात आली, झोपडीबाहेर फरफटत आणण्यात आलं. दोन दिवसांनंतर भाऊंच्या नेतृत्वाखाली दीड हजारावर महिलांसह पाच हजारांचा प्रचंड मोर्चा पिंपळगाव ते परभणी असा काढण्यात आला. रात्री मोर्चेकऱ्यांचा मुक्काम परभणीच्या पार्वती मंगल कार्यालयात झाला. सुमारे ४५ किलोमीटर्स चालून आलेला हा मोर्चा परभणी शहरातून गर्जत गेला आणि पोलिसांच्या जुलुमाचं निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देऊन परत गेला.

भाऊंचं घर म्हणजे कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण शिबिरच. सेलूला येणारा कार्यकर्ता हा भाऊंकडे चक्कर टाकणारच. दर आठवड्याला बाजार दिवशी सेलूत भाऊंच्या दुकानी संघटनेची बैठकही ठरलेली आणि आता तर पाथरी आणि मानवत याही ठिकाणी आठवडी बाजारादिवशी बैठका नियमित होतात. कार्यकर्ते तयार होण्यासाठी अशा बैठका आवश्यकच आहेत. यातून तयार झालेले रावसाहेब मामा खुल्या अर्थव्यवस्थेचं प्रतिपादन खुबीनं करतात. त्यांच्याच गावातील एक शेतकरी नेहमी गावातील आपल्या भावाच्या दुकानातूनच पेंड खरेदी करायचे. एकदा त्यानं सेलूहून पेंड घेतली. तेव्हा भावातील फरक जाणवला. तेव्हापासून तो सेलूहूनच पेंड आणायला लागला. मामानं त्याला विचारलं, ''कारे बाबा, सेलूहून कामून पेंड आणायलास?''

''तिथं सस्ती हाय.''

''अरं, चार पैसे जास्ती गेले तर भावालाच मिळायलेत नं.''

''...पण सेलूत पेंड ताजी अन् चांगली हाय.''

''हंग तर अस्सं, हेलाच तर म्हंतेत खुली येवस्था. जिथं सस्त, मस्त माल

मिळंल तिथं घेवा अन् तेच्यासाठी गावात एकापरता जास्त दुकानं असावेत.''
मध्ये एकदा कापसाच्या रकमेतून मुदती ठेवीच्या नावाखाली परस्पर रकमा काढून घेण्यात येऊ लागल्या. सेलूमधील 'टिकैत' म्हणून ओळखले जाणारे उत्तम दादा चेक घ्यायला गेले असता त्यांना हे समजलं. दादानं विचारलं, ''कामून बाबा पैसे कापायलेत? आमाला न इचारता?''

''तेच काय आहे, आम्हाला वरतून हुकूम आहे तसा.'' दादानं हातात जोडा घेतला, हात उगारला अन् म्हणाले, ''लिही आता चेक. आमालाबी वरचा संघटनेचा आदेश है, की पैसे कापू लागले की खेटरानं हाणा म्हणून.'' त्या कारकुनानं मुकाट्यानं पूर्ण रकमेचा चेक लिहिला. शेतकऱ्यात हा बदल कसा आला?

■■



# शैलाताई

'साप्ताहिक झंझावात'च्या कार्यालयात बसलेले शं. ना. संपादकीय लिहिण्यात इतके गढून गेले होते, की समोर कोण उभं आहे त्यांच्या लक्षातही आलं नाही. लिखाण संपवून पेन खाली ठेवल्यावर त्यांनी मान वर करून पाहिलं तो समोर त्यांची लाडकी लेक उभी. तिला पाहून शं. ना. म्हणाले, ''अरे हो! केव्हा आलीस?''

''केव्हाची आलीय मी; पण तुमचं लक्ष असेल तर ना.''

''बैस, खाली तर बैस. हं, आता बोल काय काम काढलंस?''

''हे हो काय बाबा, ऑफिसात बसलात की नेहमी असंच होतं तुमचं. तुम्हीच नाही का आईला सांगितलंत, कॉलेजातून आली, की पाठव म्हणून. आता मी आलीय, तर विचारता काय काम काढलंस म्हणून. विचारायला तर मी हवं, काय काम काढलंत म्हणून.''

''अगं हो; पण हे सारं बसून नाही का बोलता येणार? ठिकाय, मी तर मी बोलावलं.'' शं. ना. वखरेंना आपल्या पोरीचं भारी कौतुक. होतीच तशी गुणाची ती. स्मार्ट, तरतरीत. दाट केस, झुपकेदार वेणी. अभ्यासातही हुशार. वर्गात अव्वल. साहित्याची आवड. भरपूर वाचन केलेले.

''हं, ही मी बसली. आता बोला.''

''हे बघ, तुझी फायनलची परीक्षा जवळ आलीय. तू लवकरच ग्रॅज्युएट होणार, पुढची सोय पहायला नको? आत्तापासूनच लग्नाचं पाहायला नको?''

''इतकी घाई झाली बाबा मला घालवून देण्याची?'' बाप-लेकींत तसे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध. त्यामुळे अनेक विषयांवर दोघात मोकळी चर्चा व्हायची. लेकसुद्धा आपली मतं मोकळेपणानं मांडायची. आताही तसंच झालं. बाबा गंभीरपणे या विषयाकडे बघताहेत हे तिच्या लक्षात आणखी आलं नाही, तेव्हा शं.ना. म्हणाले, ''नाही बेटा, तसं नाही; पण पोरीचा बाप झाली असतीस म्हणजे कळलं असतं घाई काय ते. मी तुला विचारतो बेटा, तुला नवरा कसा पाहिजे?''

''मी काय सांगू बाबा? तुम्हीच ठरवायचं काय ते! मला काय कळतं? मी

त्या दृष्टीने कधी विचारसुद्धा नाही केला. तुमची कमाल आहे बाबा. ऑफिसात बोलावता अन् असं विचारता. मी काय सांगणार. माझ्या डोक्यात लग्नाचा विचारपण आलेला नाही.''

''तरी पण काही एक कल्पना असतेच ना.''

''हा निर्णयपण तुम्हीच घ्यायचा बाबा. तुम्ही विचारताच आहात तर एक सांगते. तुम्ही पहाल ते ठिकाण मला चालेल. फक्त शेतकरी नवरा मला नको !'' शं. नां.नी जरा चमकूनच आपल्या मुलीकडे पाहिलं.

''का बुवा? शेतकऱ्यावर एवढा राग का?''

''माझ्या मैत्रिणी म्हणतात, शेतकऱ्याच्या घरची अवस्था फार वाईट असते. त्यापेक्षा चपराशी परवडला असंही त्या म्हणतात.''

शं. ना. वखऱ्यांचं घराणं साऱ्या हिंगणघाटात प्रसिद्ध. काही काळ ते नगर परिषदेचे उपाध्यक्ष राहिलेले. स्वतःच्या मालकीचा छापखाना आणि हौशी पत्रकार. मालकीचं 'झंझावात' हे त्यांच्याच संपादकत्वाखाली निघणारं साप्ताहिक. आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी. पत्नी, दोन मुली, दोन मुलं असा एकूण परिवार. शैला ही सर्वांत मोठी आणि चांगली. चांगली-चांगली म्हणजे काय, आई-वडिलांना वाटायचं, अशी लेक हवाई – की मिळेल कुठेही जावई!' आपल्या मुलीला चांगलंच ठिकाण मिळणार हा पूर्ण विश्वास.

योग कसा असतो बघा, 'शेतकरी नवरा नको गं बाई,' म्हणणाऱ्या या मुलीला नवरा मिळाला तो शेतकरीच आणि नेतृत्व करावं लागलं तेही शेतकरी महिला आघाडीचं! म्हणजे जहाँ डर वहीं शाम! शेतकरी बायांचं दुःख, शेतकरी कुटुंबाचं दुःख समजून घ्यायला या परता दुसरी काय पार्श्वभूमी असू शकते?

हा योगायोग इथे नाही थांबला. त्यांचं लग्न जमलं तेही योगायोगानंच. परीक्षा संपल्या आणि सुट्या घालवण्यासाठी त्या गेल्या वर्ध्याजवळ असलेल्या आर्वी या गावी त्यांच्या काकांकडे. त्यांच्या घराशेजारी देशपांडे कुटुंबं राहायचं. आर्वीचा परिसर शेतीचा. गावाभोवती शेती फुललेली. काही लोकांच्या मळ्यात खळाळ पाणी असलेल्या विहिरी आणि त्यावर मोटारी. रानातून धो धो वाहणारं पाणी. हिंगणघाटातल्या या पोरीला सारंच मोहक वाटलं. एरवीच कवितेची, साहित्याची आवड. त्यातील वर्णनं वाचलेली. कधी पडद्यावर पाहिलेली. ते 'इस देश की धरती', 'ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी' या गाण्यांतून समोर येणारं खेडं. पोरगी पार हरखून गेली. शेजारी राहणाऱ्या मिलिंद देशपांडेच्या घरच्यांनी पोरीला चक्क मागणीच घातली. साहित्यानं दिलेल्या गुंगाऱ्यात शैलाचा



विरोधही पार मावळला. बाबांनी मागणी आली तसं तिला विचारलं. एव्हाना जेमतेम विशी पार केलेल्या शैलाचा विरोध मावळलेला होता. लगेच मुहूर्त पाहून बाबांनी पोरीचे हात पिवळे केले. नगर परिषदेच्या उपाध्यक्षाच्या मुलीचे लग्न. मग काय पाहता, भल्या गर्दीत पार पडलं आणि वखऱ्यांची शैला झाली सौ. शैला मिलिंद देशपांडे!

शेतीचा गंध नसलेल्या कुटुंबातील शैलाताई एका शेतकरी कुटुंबात आल्या आणि शेतकऱ्याच्या घरच्या आटा-डाळीचा भाव समजून घ्यायला लागल्या. हिंगणघाटला भरपूर वाचन केलेल्या साहित्याचा आस्वाद घेतलेल्या शैलाचं आकाशात भिरभिरणारं विमान हळूहळू जमिनीवर उतरलं आणि हळूहळू लक्षात यायला लागलं, मैत्रिणी शेतकरी नवरा नको का म्हणत होत्या ते! हिंगणघाटची शैला आर्वीला आली आणि कविता, लिखाण, वाचन सारं सारं मागं पडलं. आर्वीतल्या अवतीभोवतीच्या शेतीची आणि शेतकऱ्यांची परिस्थिती पाहून तिला आता भान यायला लागलं. कळलं तिला, की पाऊस आला तरी काळजी आणि न आला तरीही काळजीच.

*काळे ढग पाहून नाचत नाही माझ्या मनाचा मोर आता*
*काय सोय करावी पेरणीची, वाटते मनाला चिंता आता।*

शेतकरी संघटनेकडे वळलेल्या एका एका कार्यकर्त्यांकडे पाहिले, की वाटतं ते संघटनेकडे अपघाताने वळले नाहीत. नियतीच त्यांना हळूहळू तिकडे नेत होती. शेतकरी नवरा नको म्हणणाऱ्या शैलाला पुढे शेतकरी महिला आघाडीचं नेतृत्व करावं लागलं. अध्यक्षपद भूषवावं लागलं. यामागे नियतीचा काहीतरी संकेत निश्चितच होता.

शैलाच्या वडिलांना मात्र शेवटपर्यंत खंत होती. आपला निर्णय चुकला की काय? आपल्या मुलीची कुचंबणा तर होत नसेल? त्यांचं एक मन सांगत होतं, मुलीला शेतकरी नवरा नको होता, तरीही शेवटी घडलं तेच! दुसरं मन म्हणायचं, शेवटी तिच्या देकारानंतरच तर आपण सारं पक्कं केलं. तरीही शेवटपर्यंत खंत होतीच. लग्नात शैलाच्या आईनं सासरच्यांना विनंती केली होती,

''आमच्या मुलीला शेतीचा काही अनुभव नाही हो, तिला शेतीकामावर पाठवू नका.'' जरा बऱ्यापैकी शेती असलेल्या कुटुंबातील बाई माणसांना हातात खुरपं घ्यावं लागत नाही, दार धरावं लागत नाही, हे त्या माऊलीला कुठे माहीत होतं. शेतीबद्दल शहरी लोकांचे भलेबुरे अनेक गैरसमज. पैकी हा एक. नाटक, सिनेमातून कथा कादंबऱ्यांतून दाखवलेलं चित्र असतं ना. शेणगोठा करून घरची

लक्ष्मी डोईवर टोपलं, टोपल्यात भाकर, कांदा घेऊन चालली शेतावर धन्याकडे. तिथे काटक्या कुटक्या सरपण गोळा कर, दुभत्या गायीसाठी हिरवा चारा घे, शैलाच्या आईला वाटलं असेल, आपल्या लेकीच्या नशिबात हेच सारं आहे, की काय!

शं. नां.च्या अंतिम काळात शैलाताई माहेरी आलेल्या. तिला पाहून शं.ना.च्या खंतेनं परत उचल खाल्ली. आपली काही चूक तर झाली नाही? एका पहाटे त्यांनी पत्नीला हाक दिली आणि चहा करायला सांगितलं. लगेच हाक दिली माहेरपणाला आलेल्या शैलाला. तिला जवळ बसवून घेतलं आपल्या पलंगावर. पलंगावर पडलेल्या शं.नां.नी तिचा हात हातात घेतला. डोळेभरून लेकीकडे पाहिलं. चिंता झाकोळल्या डोळ्यांनी आणि डोळे मिटले ते कायमचे. शेवटपर्यंत चिंतेचं ओझं घेऊनच वावरले ते. त्या क्षणाच्या आठवणीनं आजही शैलाताईंचे डोळे पाणावतात.

संघटनेच्या एका दौऱ्यात शरद जोशींबरोबर सरोजताई काशीकर, सुमनताई आगरवाल, शैलाताई याही आलेल्या होत्या आमच्या घरी. बाकी कार्यकर्तेही होते. सारे बोलत बसले होते शरद जोशींबरोबर. मात्र एकट्या शैलाताई पिशवीतल कुठलंतरी पुस्तक काढून वाचत बसल्या होत्या. कार्यकर्त्यांच्या तेवढ्या गर्दीत अन् कोलाहलातही मन लावून पुस्तक वाचताना त्यांना पाहून मला उत्सुकता वाटली, त्या काय वाचत असतील या गर्दीच्या ठिकाणी? वेळात वेळ काढून पुस्तक वाचणारा कार्यकर्ता म्हणजे दर्यामें खसखस. कुठलं पुस्तक असेल? मी हळूच डोकावून पाहिलं. कुठल तरी कवितेचे पुस्तक होते ते. कवितेचं पुस्तक आणि ते इतकं समरसून वाचणारी कार्यकर्ती! मी त्यांना तेव्हा नाही विचारलं; पण पुढे या पुस्तकासाठी त्यांची मुलाखत घेतली, तेव्हा कळली त्यांची फार वर्षांपासूनची आवड. थेट कॉलेजात असल्यापासून केवळ वाचण्याची नाही तर कविता लिहिण्याचीही आवड होती त्यांची. लग्नानंतर काही वर्ष या आवडीकडे लक्ष नाही देता आलं; पण आता या घाईगर्दीत संघटना कार्याच्या काळात वेळ मिळेल तेव्हा ही राहिली हौस भागवून घेतात त्या.

पण हे सारं लिहिणंवाचणं लग्नाआधी. आर्वीला सासरी आल्यावर संसारात गुरफटून गेलेल्या शैलाताईला कुठे फुरसत हे सारं करायला? सासरी शेतीचा व्यवसाय. सारी शेती आर्वीजवळील पाचेगावला. घरी शेतीचा मालटाल सारा पसारा शेतीचा. कुलधर्म, कुलाचार, सोवळं-ओवळं, सणवार यात दिवस कसे सरले कळलंच नाही. तसा माहेरी काही नास्तिकपणा नव्हताच; पण सासरी मात्र



धार्मिक उपचार व्यापक प्रमाणात आणि आवर्जून. त्यामुळे सारं सारं समजून घेण्यात जीवनपद्धतीच बदलून गेलेली. १९८२ पर्यंत शेतकरी कुटुंबात असतो तसा जीवनक्रम चालू राहिला. ८२ मध्ये मात्र हे चित्र बदलाची सुरवात झाली. आतापर्यंतचा शेतकरी जीवनक्रमाचा अनुभव काही सुखद नव्हता. शेतकऱ्यांचं जीवन असं अधांतरी. कधी सुकाळ आणि कधी दुकाळ असं नाहीच. नेहमीच दुकाळ. क्वचित केव्हा तरी सुकाळ आणि तोही दुकाळाच्या होरपळीत चटकन सुकून जाणारा. कधी पीकपाणी येऊनही भावामुळे पैशाचा दुकाळ, तर कधी पाऊसच न पडल्यामुळे दुकाळ. सुखसमाधानाची शाश्वती नाहीच. सदान्कदा उद्याची काळजी. इतर कुठल्याही धंद्यात नफा-तोट्याचं चक्र चालू राहतं. या वर्षीचा तोटा पुढच्या वर्षी किंवा त्याही पुढच्या वर्षी भरून काढण्याची आशा असते; मात्र शेती व्यवसायात एकदा का नुकसानीच्या दलदलीत शेतकरी फसला, की पुन्हा त्यातून बाहेर येणं अशक्यच. तरीही कुणी शेती फायद्याची म्हणत असतील तर-

*जाने वो कैसे लोग है जिनकी*
*खेती में लाभ मिला !*

शैलाताईंच्या बाबतीत शेतीच्या या काळ्या ढगाला रुपेरी कडा एवढीच, की त्यांची सासरची माणसं आणि त्यांचे 'हे' फार समजूतदार; त्यामुळे शेतीच्या नुकसानीची झळ त्यांच्यापर्यंत पोहोचलीच नाही. सासरची माणसं अडीअडचणीच्या प्रसंगी ठामपणे उभी राहिली. शिवाय काव्यात रमणाऱ्या शैलाताईला हा विश्वास होताच की,

*इन्ही गम की घटाओं मे खुशी का चाँद चमकेगा,*
*अंधेरी रात की पर्दों मे, दिन की रोशनी भी है !*

आणि तशी ती रोशनी ८२ मध्ये दिसली.

त्या वर्षी वर्ध्याला शरद जोशी, माधव खंडेराव मोरे आणि प्रल्हाद पाटील कराड ही त्रिमूर्ती आली. त्यांची भाषणं शैलाताईनं ऐकली. त्यांच्या भाषणांच्या कॅसेटसही ऐकल्या. आत खोल कुठेतरी तरंग उमटले, एवढंच. पण ही फक्त सुरवात होती. आग तर आणखी भडकायची होती. पुढे ८४ मध्ये हिंगणघाटाला कापूस मेळावा झाला. त्यावेळेस जमलेला प्रचंड जनसमुदाय पाहिला. शरद जोशींना अस्सं समोर बसून ऐकलं. लख्खकन वीज चमकावी तसं झालं. आपण काही तरी करू शकतो, नव्हे आपण काही करायलाच पाहिजे, या प्रवाहात शामील व्हायलाच पाहिजे, असं वाटलं. असंही वाटलं,

*मै इक उम्र के बाद आज खुद को समझा हूँ,*
*अगर रुकूं तो किनारा हूं, चलू तो दर्या हूँ !*

संघटनेत येऊन टिकणाऱ्या माणसांचा हा आता एक पॅटर्नच झालाय. कुणीतरी, कुठेतरी, केव्हातरी शरद जोशींना ऐकतात. मग लोहचुंबकाकडे ओढलं जावं तसं शरद जोशींकडे ओढले जातात. एकदा का या चुंबकीय परिघात, शरद जोशींच्या सहवासात माणूस आला की मग 'गया कामसे !' माघारी वळणे नाही. संघटनेच्या प्रवाहात हा तिनकाही शामील होतो. साहेबांच्या मोहमयी व्यक्तिमत्त्वात गुरफटणारा कार्यकर्ता सहसा बाहेर पडत नाही. नाही तशी काही माणसं असतात, निकरंट, संघटनेत खूप नाव कमावतात आणि संघटनेवरच पलटवार करतात; पण अशी माणसं अपवादच! विनय हार्डीकर म्हणतात, ''उच्च कोटीची आणि चमकदार बुद्धी असलेलं उदाहरण एकच- शरद जोशी!''

आता एक हुरूप आला. नवी दिशा मिळाली. शैलाताईंनी स्वतःला संघटनेच्या कामाला जुंपून घेतलं. लगेच आलं चांदवडचं अधिवेशन - महिलांचं. त्याच्या तयारीला सरोजताई, सुमनताई यांच्याबरोबरीनं त्याही लागल्या. रात्रंदिवस प्रचार केला. ऐकणाऱ्या माणसाला जेवढं समजतं, त्यापेक्षा कितीतरी अधिक सांगणाऱ्याला समजून घ्यावं लागतं. एव्हाना अनेक छोट्यामोठ्या सभांतून, गटांतून, बैठकांतून त्यांना भाषणं द्यावी लागली. रोज अनेक ग्रामीण महिला त्यांना भेटणार. त्यांच्या या भेटीगाठीतून त्यांच्या संसाराच्या पाहणीतून बरचसं शिकायला मिळालं. त्यामुळे मांडणीत एक धार आलेली. त्यात शैलाताईंची भाषण पद्धती, संथ शैलीत स्वच्छ विचारांची मांडणी ऐकणाऱ्याला भावायची. प्रचार संपला आणि चांदवड अधिवेशनाचा दिवस उगवला. तो अनुभव म्हणजे एक सळसळता जिवंत अनुभव. तिथे जमा झालेल्या शेतकरी महिला आणि पुरुषांचा जमाव पाहिला आणि धन्य झाल्यासारखं वाटलं. आपण योग्य मार्ग निवडला हा विश्वास दुणावला. दिवसभर लोक येत राहिले. शेकडो महिला डोईवर पिठा-मिठाची बोचकी घेऊन, काही जणी डोईवर लाकूडफाटा घेऊन आल्या. मैलोन्‌मैल चालून आल्या. चांदवडच्या मैदानावर तीन दगडांच्या चुली मांडून, काटक्या-कुटक्याच्या जाळावर भाकरी भाजताना पाहिल्या. दिवसभर चाललेल्या चर्चासत्रातून, प्रत्यक्ष भेटीतून त्यांची दुखणी ऐकायला बघायला मिळाली. मैलमैल चालून यावंसं वाटलं. आपलं दुःख सांगावं-ऐकावं वाटलं, असं काय असेल शेतकरी संघटनेच्या आवाहनात? ती लाखोंची संख्या पाहिली आणि संघटनेचं नातं खूप घट्ट झालं.



चांदवडचं अधिवेशन संपलं आणि सुरू झाला संघटनेचा एक न संपणारा प्रवास. जितकं पुढे जावं, क्षितिज तितकंच पुढे जातं तसं. मात्र सोबत शरद जोशींसारखा वाटाड्या असल्यामुळे ही वाटचाल त्रासाची असली तरी कंटाळवाणी नाही वाटली. एका एका टप्प्याच्या शेवटी विश्राम देणारं, दिलासा देणारं कुणी आहे म्हटलं की हा प्रवास सुखद होतो.

चांदवडहून परतेतो तो आलं ८६ सालचं कापूस आंदोलन. एक प्रवास संपला. दुसऱ्या प्रवासाची तयारी. या आंदोलनासाठी काय मागणं होतं शेतकऱ्याचं. आकाशीचा चांद मागितला नव्हता की काही देणगी, अनुदान. मागणं एवढंच होतं, की गेल्या हंगामी कापसाला जो भाव दिला ते किमान तेवढा तरी भाव द्यावा. एकाधिकार खरेदी योजना होती, त्यामुळे भाव देणं सर्वस्वी शासनाच्या हाती. ''जादा की नही लालच हमको, थोडे में गुजारा करते हैं'' असंच मागणं होतं. पण हे थोडेही द्यायला सरकार तयार नव्हतं. सरकार तर सोडा, पण सत्तेत बसलेले शेतकरीपुत्र आणि सत्तेबाहेर त्यांना उचलून धरणारे चेले-चमचेही ही मागणी मान्य करायला तयार नव्हते. परवा माजलगावच्या साहित्य संमेलनात एका परिसंवादातील एका महान बहुसमाजी वक्त्याने तर *'ज्याला शेतीचा शेंडी कळते ना बूड तो निघाला शेतकऱ्यांचं नेतृत्व करायला'* असा टोमणा मारला. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे शेतकरी पुत्रांची पाहण्याची ही दृष्टी, तिथे त्यांच्याच प्रतिनिधी म्हणवले जाणाऱ्यांचं काय विचारावं! संघटनेनं आंदोलनाचं शिंग फुंकलं. देशाचं केवढं हे दुर्दैव, की शेतकऱ्यांच्या विरोधात शेतकऱ्याच्याच पोरांच्या सरकारनं धोरणं आखावीत! म्हणतात ना *'कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ!'*

शैलाताईंनी या आंदोलनात आपल्या तीन वर्षांच्या बाळाला घेऊन सत्याग्रह केला. अनेक महिलांसोबत आठ दिवस तुरुंग भोगला. त्या दिवसांबद्दल त्या फक्त एवढंच म्हणतात, ''बाई म्हणून बाईचा कुणी विचार नाही केला. तुरुंगातील हालअपेष्टांचं काहीही असो, चांदवडचा पाणवठा माझ्यासाठीच नव्हे तर अनेक महिलांसाठी टर्निंग पॉईंट ठरला!'' आठ दिवसांच्या या तुरुंगवासात संघटनेवरच्या श्रद्धा आणखी घट्ट झाल्या. आठ दिवसांच्या ग्रामीण महिलांच्या संगतीमुळे त्यांचे प्रश्न अधिक खोलात जाऊन समजून घेता आले. या तुरुंगवासाच्या भट्टीतून हे सोनं अधिकच झळाळी घेऊन बाहेर पडलं.

बाहेर आल्या आणि शेतकरी महिलांच्या जीवनात प्रत्यक्ष अनुभव घ्यावा म्हणून घरी दोन गायी ठेवून घेतल्या. पंच-पंच उषःकाली उठायचं, 'घनःश्याम

सुंदरा' म्हणत शेणगोठा करायचा, दूधं काढायची. अंगण सारवायचं, सडा टाकायचा, या साऱ्या कामांचा अनुभव त्यांनी घ्यायला सुरुवात केली. नेमकं त्या दिवसांत त्यांची आई आर्वीला आली. आपल्या शिकल्यासवरल्या लाडक्या लेकीला शेणगोठा करताना पाहून माउली गहिवरली. वाटलं, एवढ्या लाडात वाढलेल्या लेकीच्या नशिबात हे काय वाढणं आलं! आईच्या चेहऱ्यावरील भाव पाहून शैलाताईंनी हसून त्यांना सांगितलं, ''आई, मी हे सारं हौसेनं करते आहे. कुणाच्या सांगण्यावरून नाही. अगं, मला ग्रामीण महिलांचं जीवन समजून घ्यायचं आहे, त्यासाठी हा सारा खटाटोप. माझ्यामागे माझं सासर खंबीरपणे उभं आहे.'' शैलाताईंनी खूप समजावून सांगितलं; पण माउलीला काय समजलं देवच जाणे! हे सांगताना आपल्या तेव्हाच्या अवताराच्या आठवणीनं आजही त्यांना हसू येतं. शेणात माखलेले हात, केसांच्या बटा, तोंडावर क्वचित उडालेले शेणाचे थेंब. त्यांचं हे रूप एक सांगत होतं आणि तोंडाने त्या काही वेगळंच बोलत होत्या.

आता प्रत्यक्ष प्रचारासाठी त्या बाहेर पडल्या, सोबत ज्योती कुंडे या कार्यकर्तीला आणि तीन साडेतीन वर्षांच्या आपल्या मुलाला घेऊन. या काळात त्यांना अनेक गावी राहावं लागलं. त्यांच्या घरातली ज्वारीची, हायब्रीडची भाकर अन् तिखटजाळ कालवण खावं लागलं. त्यांना कराव्या लागणाऱ्या कष्टाचा आणि राहण्याचा फार जवळून अनुभव घेता आला. या साऱ्याचा खोल कुठे तरी एक ठसा उमटत गेला.

यापाठोपाठ आलं ठिय्या आंदोलन. या आंदोलनात भाग घेण्यासाठी अनेक महिलांना सोबत घेऊन त्या रेल्वेने मुंबईकडे निघाल्या. सोबत शेतकरी संघटनेने काढलेलं (की न काढलेलं) तिकीट होतंच. गाडीत ही गर्दी. पाय ठेवायला जागा नाही. तेवढ्या गर्दीत एक जुनी मैत्रीण भेटली. साहजिकच जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. तू काय करतेस - तू काय करतेस, ही विचारपूसही झाली आणि शैला काय करते हे दाखविण्यासाठी मनमाडच्या स्टेशनावर पोलिसांची पार्टी आली आणि त्या पार्टीनं शैलाताई आणि संघटना महिला पार्टीला अटक केली, विनातिकीट प्रवासाबद्दल. त्यांच्याबरोबरच गाडीतील शेकडो महिला-पुरुषांना अटक करून नाशिकला सबजेलमध्ये ठेवण्यात आले. जेलमध्ये टाकताना गळ्यातलं सोन्याचं मंगळसूत्र काढून ठेवण्याबद्दल सांगण्यात आलं. जेलच्या नियमाप्रमाणे तुरुंगातील 'मंडळींना' अंगावर दागिने ठेवता येत नाहीत. शैलाताईंना तो क्षण मात्र फार अवघड वाटला. वर्षानुवर्षांच्या संस्कारी मनाला काही



दिवसांसाठी का असेना, जेलच्या नियमाप्रमाणे का असेना; पण मंगळसूत्र काढून ठेवणं फार अवघड वाटलं. एक अशुभ संकेत वाटला. त्या दिव्याला सामोर जाताना गाडीत भेटलेल्या जुन्या मैत्रिणींचे शब्द त्यांना आठवले, ''बाई माणसांनी जेलबील भानगडीत पडू नये. तू असं काही करू नकोस बाई,'' हा प्रसंग सांगताना शैलाताई म्हणाल्या, ''आज त्या प्रसंगाचं हसू येतं; पण त्यावेळी प्रत्यक्षात मंगळसूत्र काढताना अशुभ वाटत होतं. खूप वाईट वाटत होतं. सारखा यांचा चेहरा समोर येत होता.'' या अशा छोट्या मोठ्या घटनांनी किती मानसिक क्लेश होत असतील हे दुरून पाहणाऱ्या माणसांना काय कळणार.

*धूप के उंचे नीचे रास्तों को*
*एक कमरे का बल्ब क्या जाने !*

आतापर्यंतच्या आंदोलनांतून, जेल यात्रेतून मन पक्कं होत गेलं. ''अब तो क्या डर पिछे छूट गया'' आणि आता सुरू झाले संघटनेच्या प्रचार-प्रसारासाठी भ्रमण. कधी बैठका, कधी सभा, कधी अधिवेशन नी मेळावे. या काळात संघटनेतील श्रेष्ठींचा परिचय आणि चांद्यापासून बांद्यापर्यंतच्या महाराष्ट्राची ओळख झाली. 'कुठेही जा, पळसाला पानं तीन' ऐवजी 'कुठेही जा शेतकऱ्यांचे हाल तेच' याची जाणीव झाली.

साल दोन हजाराच्या मध्यानंतर रामटेकला धान परिषद झाली आणि शैलाताईंच्या कर्तृत्वानं आणखी एक शिखर काबीज केलं. शरद जोशींच्या शोधक नजरेनं शैलाताईंचं कसब हेरलं होतं. त्यांची स्वच्छ वाणी, वाहत्या पाण्यासारखं झुळझुळ वाहणारं संथ वक्तव्य, त्यांचं शालीन व्यक्तिमत्त्व, त्यांची आतापावेतोची संघटनेतील वाटचाल, आंदोलनातील सहभाग साहेबांनी पाहिला आणि रामटेकच्या धान परिषदेत त्यांच्यावर शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी टाकली. ती जबाबदारी टाकताना त्यांचं मंचावर बोलावून स्वागत करण्यात आलं तेव्हा त्यांचा बावरलेला चेहरा मला आणखी आठवतो. काय योगायोग बघा. यक्षाला कालिदासनं ज्या रामटेकवरून आवाहन केलं आणि मेघदूत सारखं अप्रतीम काव्य निर्माण केलं, त्या रामटेकलाच शैलांसारख्या साहित्यप्रेमी काव्यवेड्या महिलेकडे महिला आघाडीचं अध्यक्षपद सोपवावं आणि रावेरीच्या अधिवेशनाची धुरा खांद्यावर द्यावी. एवढंच नाही, तर 'शेतकरी नवरा नको' म्हणणाऱ्या शैलांवरच ही जबाबदारी यावी! शेतकरी नवरा तर करावाच लागला आणि शेतकऱ्यांचंच नेतृत्वही करावं लागलं. यालाच

म्हणतात काव्यात्म न्याय.

एरवीच शैलाताई म्हणजे खळाळणारा उत्साह, त्यात रावेरी अधिवेशनाची जबाबदारी खांद्यावर पडलेली. जोडीला अध्यक्षपद. अधिवेशन तर अगदीच तोंडावर आलेलं. जेमतेम तीन महिने. तेव्हा सामानाच 'गठुडं' बांधून त्या जे बाहेर पडल्या ते तीन महिने घराचं तोंडचं नाही पाहिलं. रावेरी अधिवेशनाआधी तयारीसाठी यवतमाळला कार्यकारिणीची एक विस्तारित बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत रावेरीच्या जीर्ण, पडायला झालेल्या सीता मंदिराच्या जीर्णोद्धाराची कल्पना मांडण्यात आली. रामाची मंदिरं तर गावोगाव आहेत; पण सीतेचं मंदिर एकट्या रावेरीला. रामानं सीतेला वनवासात काढून दिल्यावर बाळंतपणासाठी ती रावेरी गावी आली. त्या गावच्या लोकांनी बाळंतीण सीतेला गहूसुद्धा खायला दिला नाही. तेव्हा तुमच्या गावात गहू पिकणार नाही, असा शाप दिल्याची एक दंतकथा आहे. ज्या ठिकाणी ती बाळंत झाली तिथेच तिचे मंदिर आहे. आज मात्र त्याचे भग्नावशेष शिल्लक आहेत. तेही अंगावर कोसळतात की काय याची भीती वाटते. त्या मंदिराचा उद्धार करावा अशी कल्पना संघटनेनं मांडली. या संबंधात रावेरी अधिवेशनात भरपूर प्रचारही करण्यात आला. यानिमित्त दौऱ्यातील मराठवाडा विभागीय परिषदेत आयोजित पत्रकार परिषदेत एका पत्रकारानं प्रश्न विचारला,

''सीतेचंच मंदिर का? सावित्रीबाई फुलेंचं का नाही?'' पत्रकारच ते. काहीही विचारू शकतात. सावित्रीबाईंच्या मंदिराची कल्पना असती तर ज्योतीराव आणि सावित्रीबाई असं एकत्र मंदिर का नाही, असाही प्रश्न विचारला असता; पण शैलाताईनं फार मार्मिक उत्तर दिलं. ''सीता ही शोषित स्त्री. एका सम्राटाची पत्नी. तरीही शोषित. तिला तिच्या नवऱ्यानेही न्याय दिला नाही, साथ दिली नाही. या उलट सावित्रीबाई. त्यांना समाजानं, झिडकारलं; पण माणूस म्हणून त्या जगू शकल्या. समाजान ठोकरलं तरी नवऱ्यानं साथ दिली. ते ठामपणे सावित्रीबाईंच्या मागे उभे राहिले. म्हणून सीतेचं मंदिर!''

रावेरी अधिवेशनाचा दिवस उजाडला. रावेरी गाव तसं अडचणीचं. अत्यंत आडवळणाचं. यवतमाळ-वर्धा रस्त्यावर कळंब फाट्यावर उतरायचं. तिथून राळेगावला यायचं. तिथून वेगळ्या रस्त्यानं रावेरीला यायचं. रावेरीहून जवळचं स्टेशन साठेक कि.मी. दूर. तेथून बसने कळंब फाट्यावर उतरायचं. कळंबहून राळेगावला जाणारी बस पकडायची. दुर्दैवाने या गाड्यांची संख्या आणि फेऱ्याही खूपच कमी. राळेगावला उतरून पुढे रावेरीची बस पकडायची. राळेगाव



ते रावेरी या फेऱ्या तर अत्यंत कमी. तेव्हा ही सारी सर्कस सांभाळीत किती लोक रावेरीला येऊ शकणार आणि तेही कसे येणार, हे कुणाला कळेना. आम्ही अधिवेशन दिवशी सकाळी पोहचलो, तर सारा शुकशुकाट. अधिवेशनाचं स्थळ होतं गावालगतचं एक शेत. गाव तसं फारच छोटं. शेत नांगरून सपाट केलेलं. सारं मैदान नांगरलेल्या ढेकळांनी भरलेलं. मैदानात मोठा मांडव घातलेला. मैदानावरील मांडवात शैलाताई आणि म्हात्रे सर हजर. दोघांचे चेहरे हे एवढेसे झालेले. माणसं येणार की नाही, ही काळजी दोघांना. शैलाताईंना तर काही बोलवेना. अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर साजरं होणारं पहिलंच अधिवेशन ओम्फस् होतंय, की काय, ही काळजी होती त्यांना. नव्यानं मुसलमान झाला अन् रोजाचा महिना आला. इतकी मेहनत केली. एवढा प्रचार केला अन् आता हेचि फल काय मम तपाला,' असं म्हणायची वेळ येते की काय, असं झालं त्यांना. तास-दोन तास असेच काळजीत गेले त्यांचे आणि दुरून ढोल ताशांचे, संघटना घोषणांचे आवाज यायला लागले अन् हे आवाज येतच राहिले. कार्यक्रम सुरू होईतो सारा मांडव भरून ओसंडून वाहायला लागला. शैलाताईचं मन आभाळाएवढं झालं.

हा दिवस पाहण्यासाठी खूप कष्ट उपसले होते त्यांनी. तीन महिने घराचं तोंड पाहिलं नव्हतं. सतत प्रचारात होत्या. सिंदखेडराजा ते रावेरी अशी महिला प्रचार यात्रा काढली होती त्यांनी. संमेलन माणसांनी ओसंडून वाहू लागलं तेव्हा त्यांना वाटलं असेल, ''याचसाठी होता केला अट्टाहास, हा दिस गोड व्हावा!'' आनंदाच्या या अत्युच्च क्षणी त्यांना आठवण आली ती ९४ सालच्या कापसाच्या खुल्या खरेदी-विक्री आंदोलनाची. या आंदोलनातील सहभागाबद्दल आठ दिवस त्यांना जेलची हवा खावी लागली होती. तेव्हा सोबत सरोजताईही होत्या. तुरुंगातील वॉर्डनबाई त्यांची जुनी ओळखीची निघाली. शैलाताईला पाहून ती सरोजताईंना म्हणाली, ''ए बाई पिछली बार भी जेल मे आयी थी!'' तेव्हा सरोजताई उत्तरल्या, ''हाव ना! इसकी यही आदत है, आंदोलन करती जेल में आती. आंदोलन करती जेल मे आती!'' त्या वॉर्डनला कळेना सरोजताई थट्टा करतात का खरं बोलतात!

■■

# बबन शेलार

शेतकरी संघटनेत सर्वाधिक आणि सर्वदूर परिचित अशी संघटनेतील तीन माणसं कोण? माझ्या नातवानं केव्हातरी मला विचारलं. लहान मुलांना आकड्यांचे खेळ आणि असले प्रश्न विचारायला बरंच आवडतं. त्यानं अगदी सहज विचारलं. मलाच काय संघटनेतील सर्वांनाच याचं उत्तर माहीत आहे. पहिल्या नंबरबाबत तर बोलायचं कामच नाही. सर्वच बैठकांतून, सभांतून, संमेलनांतून आपण त्यांचा जयघोष करतो. 'तुम आगे बढो' म्हणतो. कुणी त्यांना 'चंद्राची कोर' म्हणतं, कुणी 'शेतकऱ्यांचे पंचप्राण', कुणी 'दुसऱ्या स्वातंत्र्यलढ्याचे जनक' म्हणून त्यांचा उल्लेख करतं. दुसऱ्या नंबरवर आहेत; ज्यांच्या शिस्तीच्या बडग्याची आपण त्यांच्या अपरोक्ष आदरयुक्त थट्टा करतो ते 'सर'. सर म्हणजे काय? एक तर 'सर' आहेत अख्ख्या संघटनेत. तिसऱ्या नंबरचा हकदार कोण हा तर प्रश्नच होऊ शकत नाही. त्याचे उत्तर तर तयशुदा आहे. हो तेच. तेच ते. साहेबांचे चक्रधर, खासगी सचिव, मित्रसखा आणि त्याहीपेक्षा अधिक म्हणजे त्यांचे भक्त. आता इतक्या वर्णनानंतर नाव सांगायची काय गरज. हो, बरोबर ओळखलंत. तेच ते शेलारांचे बबनराव किंवा फक्त बबन!

काही काही माणसांचं व्यक्तिमत्त्व कसं फसवं असतं. ते दिसतात एक अन् असतात काही दुसरेच. म्हणून तर आपण म्हणतो 'वाण गायीचा अन् करणी–' बबनचं व्यक्तिमत्त्वही असंच फसवं. असंच म्हणजे अगदी 'असं'च्या उलटं. 'वाण कसाबाचा अन् करणी गायीची!' बेताची उंची, फाटकी अंगकाठी. मान पुढे काढून पाहण्याची बोलण्याची स्टाईल. एकूणच व्यक्तिमत्त्व पाहिलं, की वाटतं, माणूस बेरकी, पक्का बेरकी असावा ! अशा व्यक्तिमत्त्वामुळे माणूस चटकन जवळ जायला धजत नाही. नवखा माणूस बिचकतो; पण एकदा का जवळ गेलं, थोडंसं बोललं, की लक्षात येतं माणूस दिसतो तसा नाही. काय भुललासी वरलिया रंगा, असा प्रकार आहे. माणूस तसा हरहुन्नरी. मशीनरी हाताळण्यापासून तो साहेबांकडे येणारी माणसं हाताळण्यापर्यंत कुठल्याही कामाची तयारी. साहेबांची शेती पाहणार, म्हणजे पूर्वी पाहत असे. हल्ली हल्ली शेतीचा सारा कारभार लीलाबाई म्हणजे बबनच्या सौ. पाहतात. हा तर शेत पाहणार,



साहेबांची कारही रस्त्यावर ठेवणार आणि साहेबांकडे येणारे एकेक नगही योग्य जागेवर बसवणार. एवढंच नाही तर संघटनेच्या सर्व चळवळीत साहेबांच्या ठाम मागे राहणार. साहेबांची जणू सावली.

*मै वो नही की तुम हो कही और कहीं हूं मै*
*मै हूँ तुम्हारा साया, जहां तुम वही हूं मै।*

या अव्वल तिघांना एकत्र केलं किंवा तिघांना एकटं उभं केलं तरी शेतकरी चळवळीचा महाराष्ट्रातील गेल्या पाव शतकाचा इतिहास डोळ्यासमोर उभा राहतो.

बबन म्हणजे अनेक विरोधाभासाचं एक चालतंबोलतं चित्र. जेमतेम शालेय शिक्षण झालेला, म्हणजे एका अर्थानं केवळ साक्षर; पण ज्ञानाची विलक्षण ओढ! वाचनाची विलक्षण आवड आणि वाचन म्हणजे ललित साहित्य किंवा अर्नाळकर बंधू नव्हे तर वैचारिक, गंभीर साहीत्य. शाळा-कॉलेजातील औपचारिक शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बबनला या मार्गाने भरपाई करावीशी वाटत असावी. भास्करभाऊंकडे कामावर असताना कोपरगाव कॉलेजच्या वाचनालयातून पुस्तके आणण्याची बबनला मुभा होती. त्याची वाचनाची आवड पाहून ग्रंथपालही त्याला लागेल ती पुस्तके देत असत. एकदा सावरकरांवर लिहिलेलं एक पुस्तक त्यानं मागितलं तेव्हा ग्रंथपाल त्याच्याकडे आश्चर्याने पाहतच राहिला. गेल्या कित्येक वर्षानंतर त्या पुस्तकाची मागणी करणारा बबन हा पहिलाच वाचक होता. पुढे एकदा एका आफ्रिकन विद्यार्थ्यांनं चिनी क्रांतीवर लिहिलेल्या पुस्तकाची बबननं मागणी केली तेव्हा ग्रंथपालानं अक्षरशः हात जोडले, "गेल्या आठ वर्षात या पुस्तकाची मागणी करणारे आपण दुसरेच वाचक आहात." त्या ग्रंथपालाला शक्य असतं तर त्यानं बबनचा सत्कार करून प्राचार्यांच्या हस्ते बबनचा मोठा फोटो फ्रेम करून वाचनकक्षात लावला असता!

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जन्मलेल्या, वाढलेल्या बबनची कहाणी 'फ्रॉम रॅग्ज टू रिचेस' अशी आहे. इथे रिचेस हा शब्द सांपत्तिक-आर्थिक संदर्भात नाही वापरलेला, तर बौद्धिक, मानसिक संपन्नता, ज्ञानवैभव या अर्थाने वापरला आहे. नाही तर शालेय शिक्षणही पूर्ण न करू शकलेला कुठला माणूस इतका वाचनसंपन्न असू शकेल? आर्थिकदृष्ट्या संपन्न तर आजही नसेल; पण मानसिकदृष्ट्या तो तृप्त आहे. शरद जोशींसारख्या चौफेर व्यक्तिमत्त्वाच्या नेत्याबरोबर राहण्याचं भाग्य किती लोकांना लाभलं असेल?

बबनचे वडील म्हणजे शेतावर मजुरी करून गुजराण करणारे, एक सामान्य

वकुबाचे माणूस. भल्या आठदहा माणसांचा कुटुंबकबिला आणि कमावता एक माणूस. ती कमाईसुद्धा एका शेतमजुराची. घरातील पोरवाडा सारा लहान पोरापोरींचा. दुसऱ्या कुणाचा आधार नाही. घरची परिस्थिती अशी, की आईची चार बाळंतपणं लहानग्या बबननंच केली. लहान असला तरी साऱ्या भावंडात बबन मोठा होता नं. शेतावर राहणं आणि दवाखाना तर शेतापासून खूपच दूर. शेवटची कळ येईपर्यंत आई घरातली कामं करणार अन् शेवटच्या क्षणी बबनला हाक मारणार. या साऱ्या अनुभवामुळे बबनला फार लवकर मोठं व्हावं लागलं. वयानं नसलं तरी मनानं मोठं व्हावं लागलं. वडिलांची मजुरी ती अशी काय असणार, तेव्हा लवकर शाळा सोडावी लागली. शाळा होती तीही खूप दूर. अगदी लहानपणी पायी पायी हे अंतर तुडवावं लागायचं. पुढे केव्हातरी सायकल मिळाली; पण सायकलीचं सुख शाळेसाठी फार काळ नाही उपभोगता आलं. शाळा सुटली आणि आता शोध सुरू झाला पोटापाण्याच्या उद्योगाचा. शालेय शिक्षणसुद्धा पूर्ण न करू शकलेल्या या पोराला नोकरी ती काय मिळणार आणि देणार तरी कोण? आर्थिक दूरवस्था, अपुरं शिक्षण आणि नोकरीची, कामाची नितांत आवश्यकता या साऱ्या विपरीत परिस्थितीतही खोल कुठे तरी स्वातंत्र्याची ऊर्मी होती. उलट या प्रतिकुल परिस्थितीमुळे ही उर्मी अधिक तीव्र झाली. बबनच्या हिशेबी स्वातंत्र्य म्हणजे तरी काय? ''पैसा कमावणं हा माझा स्वातंत्र्याचा अर्थ नव्हता. स्वातंत्र्य म्हणजे 'मनःपूत समाचरेत' असंही मला अभिप्रेत नव्हतं. भास्करभाऊंसारख्या मोठ्या माणसाच्या मदतीनं मला मोठ्या नोकरीची वाट केव्हाच सापडू शकली असती. मला अभिप्रेत स्वातंत्र्य होते ते बौद्धिक स्वातंत्र्य, माझी धडपड त्यासाठी होती.'' ॲन रॅण्डच्या विचाराचे पुरस्कर्ते असे भारतातही आहेत म्हणायचे! शरद जोशींसारखेच नव्हे तर बबनसारखेही.

जुन्या गोष्टी सांगताना बबनच्या बोलण्यात केव्हाही कटुता येत नाही. अलिप्ततेच्या काचेतून पाहत घटनांचा आढावा घेण्याची वृत्ती अचंबित करणारी आहे. मागील दुरवस्थेची वर्णनं करून सहानुभूती मिळवणारे तर हजारो आहेत. त्यात साहित्यिक, कलावंत, नेतेही आहेत; पण या परिचयासाठी त्याची भेट घेण्यापूर्वी, गेल्या विसावर वर्षांचा स्नेहसंबंध असूनही बबननं आपल्या पूर्वायुष्याविषयी कधी 'ब्र'ही काढलेला नव्हता. थोरामोठ्यांनी आपल्या पूर्वायुष्याची सहानुभूती कॅश केलेली असल्याच्या या पार्श्वभूमीवर बबनची ही स्वाभिमानी वृत्ती खरंच उल्लेखनीय म्हणावी लागेल.

थोरामोठ्यांच्या भेटीचा ओढा मात्र थेट शाळेत असल्यापासून. अगदी



खेळण्याच्या वयापासून. भास्करभाऊ बोरावके हे फार पूर्वीपासून येसगाव वस्तीवर राहायचे. त्यांच्या या वस्तीशेजारच्या वस्तीवर बबन आणि त्याचे वडील सहकुटुंब रहायचे. तिथेच ते कामावरही होते. भाऊंकडे नेहमी बड्या बड्या नेत्यांचा राबता असायचा. पेपरांतून ज्यांची नावं आपण वाचतो, छायाचित्रं पाहतो त्या या मंडळींना जातायेता पाहताना बबनला आनंद वाटायचा. तेव्हाची एक आठवण बबन सांगतो. ''एकदा बॅरिस्टर नाथ पै भाऊंकडे येणार असं समजलं. त्या काळी नाथ पै म्हणजे एक खूप मोठं नाव होतं. समाजवादी चळवळीतले ते एक अग्रणी. ते येणार म्हणल्यावर त्यांना पाहण्याची इच्छा तीव्र झाली. त्यावेळी माझी शाळा संपलेली व शिक्षण अर्धवट सोडावं लागलेलं. त्यामुळे मी तेव्हा रिकामाच होतो. नाथ पै केव्हा येणार हे काही मला माहीत नव्हतं. मी नसताना ते येऊन गेले, असं होऊ नये म्हणून मी भल्या पहाटेपासून भाऊंच्या वस्तीवरच्या वाटेवर येऊन बसलो. कितीतरी तास बसलो. बॅरिस्टर नाथ पैंना पाहिलं आणि सार्थक झाल्यासारखं वाटलं!''

आता शाळा सुटलेली होती. घरची अवस्था पाहता घर संसाराला मदत करण्याच्या दृष्टीने नोकरीची नितांत आवश्यकता होती. सरकारी नोकरी तर करायची नव्हती आणि खासगी नोकरी शोधण्यासाठी काही काळ जाऊ द्यावा लागणार होता. तेव्हा जवळ जवळ वर्षभर एका शेतमळ्यात लिंबं, चिकू ही फळं गोळा करायचं काम करीत होता बबन. ते काम झालं अन् पुढच्याच वर्षी वडिलांच्या बरोबर शेतात मजुरीची कामं सुरू केली. पुढे एका व्यापाऱ्याकडे काही काळ काम केलं. ''ही नोकरी चांगली होती, शारीरिक कष्ट नव्हते, फारसं कामही नव्हतं. तसं पाहिलं तर मला शारीरिक कष्टाची सवय होती; पण ते काम संपल्यावर आपण आपले मालक असायचो. पण ही नोकरी मात्र चोवीस तासांची. दरम्यानच्या काळात ड्रायव्हिंग शिकून घेतलेलं असल्यामुळे ही व्यापाऱ्याकडची नोकरी मिळाली होती. नोकरी चांगली, पगारही चांगला; पण ताबेदारी चोवीस तासांची. स्वतःसाठी काही वेळ देता येत नव्हता. वाचनाची मुळात आवड; पण या आवडीसाठी काही सलग वेळ सापडत नव्हती त्यामुळे. 'पाणीच पाणी चहू बाजूला-थेंब मिळेना पाणी पिण्याला' अशी अवस्था झाली.'' बबन बोलत होता. अस्वस्थ वाटायला लागलं बबनला. मालक चांगला होता. वागणूकही चांगली होती तरी एक घुसमट व्हायला लागली. कामाचं समाधान नव्हतं. यावेळी बबनचं वय ते काय असणार? ''स्वतःची पुरती ओळखही पटलेली नव्हती; पण एक विश्वास वाटायचा, की आपण काही तरी करायला

पाहिजे आणि असं आपण करूही शकतो.'' बबन म्हणाला.

*शायद नही मैं कुछ भी, शायद मैं बहुत कुछ हूं,*
*हां हर्फ नही लेकीन, मैं हर्फ का नुक्ता हूं।*

नेमकं अशावेळी कळलं, भास्करभाऊंना एका ड्रायव्हरची गरज आहे. सध्या बबन करीत होता त्या नोकरीत मिळणाऱ्या पगारापेक्षा हा पगार कमी होता. नाहीतरी पगार हे मुख्य आकर्षण नव्हतंच. ते होतं भाऊंकडील पुस्तकांची, मासिकांची, वृत्तपत्रांची उपलब्धता आणि त्याहीपेक्षा आकर्षण होतं ते त्यांच्याकडे येणाऱ्या थोरामोठ्यांच्या येण्याजाण्याचं. ज्या समाधानासाठी बबनची धडपड चालली होती, ते सारं भास्करभाऊंकडे मिळण्याची शक्यता दिसत असल्यामुळे ही संधी बबनने दोन्ही हातांनी घट्ट धरली. तेव्हापासून बबननं भाऊंच्या गाडीचं चाक जे घट्ट धरलं ते भाऊंनीच साहेबांकडे बबनची बदली करेपर्यंत. तेव्हापासून बबन साहेबांकडे आहे तो अगदी आजपर्यंत. भाऊंकडची नोकरी मिळाली तेव्हा बबन खुश झाला.

*जिंदगी तेरे लिए मैंने बहुत रक्स (नाच) किया*
*अब ये हसरत है, कभी तुझे नचा के देखूं!*

आतापर्यंतच्या संथ आयुष्याला एक गती मिळाली आणि त्याहीपेक्षा दिशा मिळाली. समाधान तर मिळालंच. एव्हाना ७४ साल उजाडलं होतं. आयुष्यात प्रथमच स्थिरावण्याची उमेद मिळाली होती. भास्करभाऊ केवळ विचारानंच समाजवादी होते, असं नाही तर वागण्यातही होते. त्यामुळे बबन त्यांच्या कुटुंबाचा एक भाग बनून राहिला. भास्करभाऊंच घर म्हणजे अनेक सामाजिक, राजकीय, आर्थिक चळवळीचं केंद्र. त्यामुळे अनेक क्षेत्रांतल्या कार्यकर्त्यांचा, नेत्यांचा तिथे राबता, प्रसंगी मुक्कामही असायचा. स्वतः भाऊंचा समाजवादी चळवळीत सहभाग, सेवादलाच्या विश्वस्तांपैकी ते एक. काँग्रेसच्याही अनेक नेत्यांशी त्यांचा स्नेह. या साऱ्यांचा भाऊंकडे राबता. त्यामुळे या साऱ्यांशी बबनचीही ओळख. या साऱ्यांच्या या घरातील येण्या-जाण्यामुळे, चर्चेमुळे बबनची जडणघडण होत गेली. आणीबाणीच्या काळात तर भाऊंचं घर म्हणजे अनेकांचं आश्रयस्थान बनलं. इंदिरा गांधींच्या वधानंतर तर टेहरे मेळाव्यासाठी आलेल्या अनेक शिख लोकांसाठी भाऊंचं घर म्हणजेच आश्रयस्थान बनलं होतं. त्यांची सोय लावण्याची जबाबदारी बबनवरच होती. अशा अनेक ओळखींचा लाभ घेत, कुठेतरी सहकारी कारखान्यात वा इतर खासगी, सहकारी नोकरी मिळवणं बबनला अशक्य नव्हतं; पण भाऊंकडील वातावरणाची आणि अशा



'स्वातंत्र्या'ची चटक लागलेल्या बबनला अशा नोकरीची ही कल्पना पटत नव्हती. 'शेर भूखा मरेगा लेकीन कभी घास नाही खाएगा,' असं स्थितिवादी जगणं बबनला नको होतं. जीवनात एक थरार पाहिजे होता.

*वक्त की लहरों से टकराते हुए बढ जाईए*
*फेरकर मुंह जिंदगी का सामना मुमकीन नही!*

आतापर्यंतची वाटचाल जास्त करून समाजवादी परिसरातूनच होत आलेली होती. ऐंशीच्या सुमारास पेपरातून शरद जोशींचं नाव यायला सुरुवात झाली. सुरुवातीच्या या बातम्यांनी एक कुतुहल निर्माण झालेलं होतं. या बातम्या प्रामुख्याने शेतीसंदर्भातल्या होत्या. बबन तसा शेतकरी नव्हता; पण भास्करभाऊ हे एक शेतकरी होते आणि बबनला देशापुढील एकूणच प्रश्नाबद्दल एक उत्सुकता होती. त्याच सुमारास चाकणचं कांदा आंदोलन आणि निपाणींच तंबाखू आंदोलन झालं. या दोनही आंदोलनांची मात्र वृत्तपत्रांनी व्यापक दखल घेतली. आता शेतकरी समाजानं कान किलकिले केले.

त्या सुमारास माळी समाजाचे एक मोठे कार्यकर्ते श्री. पद्मकांत कुदळे यांनी एक बैठक आयोजित केली. त्यांची एक 'फ्रेंडस् ऑफ फार्मर्स' किंवा तशाच काही नावाची एक संस्था होती. या संस्थेच्या वतीने ही बैठक बोलाविण्यात आली. भास्करभाऊ हे पद्मकांतचे मित्र आणि माळी समाजाचेच नव्हे तर महाराष्ट्रातील एक वजनदार नेते. त्यांनाही या बैठकीचं आमंत्रण होतं आणि या बैठकीला त्यांना हजर ठेवण्याचं काम बबनवर सोपविण्यात आलं होतं. या बैठकीसाठी आमंत्रित व्यक्तींची भलीमोठी यादी होती. या यादीतल एक नाव होतं 'शरद जोशी'. बहुतेक वक्ते राजकीय पुढारी किंवा कृषी विद्यापीठातील प्राध्यापक. केवळ एक नाव वेगळं होतं - 'शरद जोशी.' चाकणचं कांदा आंदोलन आणि निपाणीचं तंबाखू आंदोलन यामुळे त्यांचं नाव चर्चेत आलेलं. त्यांच्याबद्दल या दोघाना म्हणजे भाऊ आणि बबनला विशेष उत्सुकता.

''या बैठकीला हजर राहण्यात आम्हाला एरवी काही स्वारस्य नव्हतं. पत्रकातील वक्त्यांची यादी आम्ही पाहिलेली होती. त्यांची भाषणंही आम्ही ऐकलेली होती. तेच तेच चेहरे पुन्हा पुन्हा पाहण्याची आणि तेच तेच विचार परत परत ऐकण्याची आमची तयारी नव्हती. पण या यादीतलं एक नाव वेगळं होतं. तंबाखू आंदोलनाच्या चमकदार कल्पनेमुळे या माणसाला पाहण्याची, ऐकण्याची आम्हाला उत्सुकता होती. त्या उत्सुकतेपोटी आम्ही कार्यक्रमाला गेलो. एरवी भाऊबरोबर मला जावंच लागलं असतं; पण यावेळी आम्हा दोघांचं

एकमत होतं.''

बबनच्या शब्दांत या बैठकीचं वर्णन :''बैठकीला औपचारिक सुरुवात झाली. सुरुवातीलाच शरद जोशींनी संचालकांना एक चिठ्ठी पाठविली. 'मला आवश्यक कामानिमित्त परगावी तातडीने जाणे आहे. तेव्हा मला आधी बोलण्याची संधी द्यावी.' त्यांच्या विनंतीप्रमाणे त्यांना आधी बोलण्यासाठी आमंत्रित करण्यात आलं. ते बोलायला उभे राहिले आणि त्यांनी जणू बॉम्बगोळाच टाकला. 'या सभेत माझी उपस्थिती विसंगत आहे. तेव्हा मी इथेच आपली रजा घेतो' एवढंच बोलून ते खाली बसले. कागदपत्र घेऊन बॅग सावरली आणि काय होतंय हे कुणाला कळण्याआधीच ते चालायला लागले. सभा या धक्क्यातून सावरेतो ते बाहेरही पडले. त्यांना निघालेलं पाहून भास्करभाऊ, त्यांच्या मागे मी आणि बद्री देवकरचे काका असे तिघेही बाहेर पडलो. त्यांना गाडी तळावर नेऊन सोडलं आणि पुण्याच्या गाडीत बसवूनच आम्ही परतलो.'' बबन सांगितलं, ''त्यावेळी आम्हांपैकी कुणाची शरद जोशींशी ओळखही नव्हती कोपरगावच्या गाडी तळावर काय बोलणं झालं तेवढंच.'' बबनची आणि साहेबांची पहिली भेट झाली ती ही अशी. केवळ धुळभेट!

दुसऱ्या भेटीनं मात्र बराच गुंगारा दिला. लहानपणी आम्ही एक खेळ खेळत असू. ज्याच्यावर राज्य आलं त्यानं कोपऱ्या कोपऱ्यात उभे असलेल्या खेळाडूकडे जायचं अन् म्हणायच, 'आई मला पुरी दे' आणि त्या खेळाडूनं हातावर हात मारून त्याला म्हणायचं, 'जा त्या घरी' आणि असंच त्याला फिरवत राहायचं एका खेळाडूकडून दुसऱ्या खेळाडूकडे. अगदी अस्सा प्रकार झाला दुसऱ्या भेटीत. पहिल्या धुळभेटीनंतर पेपरातून अधूनमधून साहेबांचं नाव यायचं. त्यांना भेटण्याची उत्सुकता वाढतच गेली. मध्येच केव्हातरी कळलं, साहेब नाशिकला आलेले आहेत. म्हणून त्यांना भेटण्यासाठी आम्ही नाशिकला गेलो. कोपरगावाहून नाशिक आमच्या टप्प्यातलं गाव. तेव्हा त्यांना भेटायची ही संधी दवडायची नाही असं या दोघांनी ठरवलं. चौकशी करता साहेब, माधव खंडेराव मोरे आणि इतर कार्यकर्ते नाशिकला अधूनमधून रमण शिसोदिया यांच्याकडे जमतात असं त्यांना समजलं होतं. तेव्हा ते सरळ शिसोदियांकडे गेले. तिथे समजलं शरद जोशींना नाशिकच्या तुरुंगात ठेवलंय म्हणून. तेव्हा ही मंडळी पोहोचली नाशिकच्या तुरुंगात. तिथे कळलं, साहेबांना भेटायला बंदी आहे. फार तर ''शंकरराव वाघांना भेटा, म्हणजे त्यांच्याकडून भेटीची काही व्यवस्था करता येईल,'' तिथे असलेल्या लोकाकडून समजलं.



''शंकरराव वाघ कुठे भेटतील?''

''कोर्टात. साहेबांची जमानत करण्यासाठी गेलेले आहेत.'' जेलच्या आवारात तिघीजणी इवलंसं तोंड करून उभ्या होत्या. त्यांच्या कपड्यांवरून त्या कुणा कैद्याशी संबंधित असतील असं वाटेना. तिघीजणी दिसायला इम्प्रेसीव्ह. एक तिशी, पस्तिसीतली, केसांचा बॉब केलेला. दिसायला खूपच. छान दोघी किशोर वयातल्या त्याही दिसायला स्मार्ट. त्यांच्या संबंधी इकडे तिकडे चौकशी केली, तेव्हा समजलं की त्यापैकी स्त्रीही साहेबांची पत्नी आणि बाकी दोघी साहेबांच्या मुली. त्यांच्याशी भाऊंनी ओळख करून घेतली. थोडासा धीर दिला. 'आम्ही कोर्टाकडेच जात आहोत,' असं सांगून हे दोघे तिथून निघाले ते सरळ पोहोचले नाशिकच्या कोर्टात. कोर्टात दोघांना 'शंकरराव वाघां'चं दर्शन झालं. वाघांच्या खटपटीला यश आलं आणि साहेबांच्या जमानतीचा आदेश घेऊन वाघ निघाले तुरुंगाकडे. भाऊ आणि बबनची ही होती. साहेबांचे कुटुंबीय – पत्नी लीलाताई आणि मुली श्रेया, गौरीची पहिली भेट. इथून पुढे ऋणानुबंध इतके जुळले, की ही जोडी म्हणजे साहेबांच्या घरचे अविभाज्य घटक बनली. हे नातं इतकं घट्ट झालं, की पुढे श्रेयाच्या लग्नात कन्यादान भास्करभाऊंनी केलं आणि १९८३ पासून बबन झाला साहेबांचा चक्रधर, पी. ए., मित्र, सखा आणि त्याहीपेक्षा भक्त आणि आजपावेतो टिकला आहे.

यावेळी भेटलेले शंकरराव वाघ म्हणजे एक वल्लीच! साहेबांच्या प्रेमात विविध ढंगाची, विचारांची माणसं पडली. पैकी एक म्हणजे शंकरराव वाघ. या वाघांची आणि माझी ओझरती भेट झाली होती परभणीच्या संघटना अधिवेशनात. या भेटीचं मैत्रीत रूपांतर झालं त्याच वर्षी चंडीगढला झालेल्या जेलभरो आंदोलनात. यासंबंधी सविस्तर वर्णन माझ्या 'आंदोलन'या पुस्तकात आलेलं आहे. दुर्दैवाने आज शंकरराव हयात नाहीत.

शंकररावांची आणि बबनची खास मैत्री. अर्थात नाशिकच्या कोर्टात झालेल्या पहिल्या भेटीनंतर भाऊ आणि बबन साहेबांच्या सतत संपर्कात येत राहिले आणि त्याचबरोबर शंकररावांच्याही. त्यांची स्टाईल दाखवणारी एक खास आठवण बबन सांगतो. ''कुठेही साहेबांची सभा असली, की शंकरराव हमखास सोबत असायचे. साहेब स्टेजवर आणि हे सभेच्या अवतीभोवती फिरत लोकांच्या प्रतिक्रिया जाणून घ्यायचे. त्यावेळी छातीवर बिल्ला वगैरे काही नसायचं. कृत्रिम धाग्याचा फिकट रंगाचा नेहरू शर्ट आणि खाली विजार, डोईवर पांढरी इस्त्रीची टोपी, बारीक अंगकाठी अन् सामान्य व्यक्तिमत्त्व. हा शेतकरी संघटनेच्या

इतक्या जवळचा, ही शंकाही कुणाला येणं शक्यच नसायचे. आपण त्या गावचेच नाही, असं दाखवत शेजारीच असलेल्या एखाद्या हॉटेलात विडीचे झुरके घेत बसायचे. त्या ठिकाणी सभा ऐकण्यासाठी जमलेली माणसं असतातच. ती माणसं अनुकूल वा प्रतिकूलही असतील. त्या त्या प्रमाणे त्यांच्या प्रतिक्रिया असणार. पण ते समजून घेण्याची वाघांना उत्सुकता. मग विडीचा एक झुरका घेत ते विचारणार,

"कसली सभा आहे हो."

"शेतकरी संघटनेची."

"कोण बोलणार आहे? कुणी बाहेरचा माणूस आहे का?"

"हो. शरद जोशी बोलणार आहेत." शरद जोशी या नावाच्या उच्चारणावरूनच वाघांना अंदाज यायचा प्रतिक्रियेचा. गप्पा गोष्टी अशाच चालू ठेवल्या, की त्या टोळक्याचं एकूणच मतही कळायचं आणि वर चहाचा बोनसही." एरवी भावनांना थाराही न देणारा बबन शंकररावांची आठवणही आली तर किंचितसा का असेना, हळवा होतो. शंकरराव होतेच तसे सच्चे मैतर.

बबनची ही स्थितप्रज्ञता मात्र विलक्षणच. शंकररावांच्या उल्लेखाचा अपवाद सोडला तर गडी सहसा हे लावणार नाही. त्याच्या पत्नीच्या एका मिसकॅरेजनंतर दफन उरकलं, की गडी दौऱ्यावर निघाला. त्याच्या मुलाच्या, अभीच्या जन्मवेळीही असंच. लीलाबाईला - बबनच्या पत्नीला - सतत मिसकॅरेज होत होतं. अभीच्या वेळी मात्र नीट वाढ झालेली. दिवस भरत आलेले तरी पठ्ठ्या दौऱ्यावर. शेवटी बाळ आणि बबन एकाच वेळी अवतरले. "मी असतो तर काय बायकोच्या कळा देणार होतो की वेदना कमी करणार होतो?" आता या प्रतिपादनाला काय म्हणावे? हा प्रकार एवढ्यावर संपत नाही. त्याच्या दोन बहिणींची लग्नं एकाच वेळी होणार होती; पण पठ्ठ्या लग्नाला हजर नाही राहू शकला. दौऱ्यावर होता ना! त्याचा खुलासा असा "आता मी काय मंत्र म्हणणार होतो, की बोहल्यावर उभा राहणार होतो. लग्नाची सारी व्यवस्था झालेली होती अन् मला कामासाठी जाणं आवश्यक होतं; पण माझ्या मेहुण्यांचा आणि बहिणीचा माझ्यावरचा राग इतक्या वर्षांनंतरही गेलेला नाही. मलासुद्धा आणखी माझ्या बहिणाच्या घरी जाता आलं नाही. कधीमधी ती येते, राग करते; पण त्याला इलाज नाही. पुढे एका बहिणीचं प्रकरण कोर्टात चाललं होतं. मला त्या कामासाठी वेळ नव्हता. सारं काम लीलाबाईनं - माझ्या पत्नीनं - सांभाळलं; पण त्याला माझा इलाज नव्हता," असं आहे बबनचं काम.



जिम्मेदारी टाळण्यासाठी नाही; पण अधिक मोठी जबाबदारी पार पाडण्यासाठी या छोट्यामोठ्या गोष्टींकडे, नात्यागोत्याच्या गुंत्याकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता एवढंच. जे साहेबांचं तेच बबनचं. साहेब तो साहेब-बबन सुभान अल्ला!

आत्ता आत्ता कुठे साहेबांची वरवरची ओळख झालेली. शेतकरी संघटनेबाबत उत्सुकता वाढीला लागलेली. कोपरगावी भास्करभाऊ, देवकर अशा बागायतदारांचं नेहमी बैठकीचं एक ठिकाण होतं. त्या ठिकाणाला 'बिगबागायतदार संघ' असं थट्टेनं संबोधलं जाई. सुरुवातीच्या काळात माधवराव खंडेराव मोरे यांनी नगर नाशिक भागात खूप दौरे केले. त्यांचं तुफानी वक्तृत्व ऐकायला लोकही प्रचंड संख्येनं जमत. आपल्या भाषणातून वसंतदादा पाटील, शालिनीताई पाटील ही मंडळी आणि त्यांचे चेलेचपाटे यांच्यावर घणाघाती शब्दांत हल्ले करीत. त्यांची टीका अत्यंत स्पष्ट शब्दात आणि झोंबरी असे. त्यांच्यासारखे जिगरबाज तेच. कोपरगावच्या लोकांवर त्यांचा रोष. ते शेतकरी संघटनेच्या कार्यात खुल्लमखुल्ला येण्यास कचरतात, त्यांच्या भागात सभा ठेवायलाही घाबरतात. तेव्हा या बिगबागायतदार संघानं एक आंदोलन घ्यायचं ठरवलं. त्यासाठी कोपरगाव एक दिवसासाठी 'बंद' करावं, असा निर्णय झाला. या 'बंद'ची जबाबदारी बबनवर टाकण्यात आली. एकतर कोपरगावात तेव्हा शेतकरी संघटनेची स्थापना झालेली नव्हती. त्यामुळे कार्यकर्त्यांचं पाठबळ कमी. शिवाय अवतीभोवतीच्या गावांतूनही कुमक येण्याची शक्यताही कमीच आणि 'बंद' तर करायचाच.

बबननं डोकं लढवलं. बबननं पूर्वी एका व्यापाऱ्याकडे नोकरी केलेली होती. तो फळ व भाजीपाला यांचा ठोक व्यापारी होता. त्यामुळे त्याच्या दुकानावर अवती भवतीच्या गावातल्या आणि प्रत्यक्ष कोपरगावातल्या अनेक फळ, भाजी विकणाऱ्या महिलांची चांगली उठबस होती. त्यांच्या विक्रीच्या व्यवसायामुळे ठोक व्यापाऱ्याकडून माल घ्यायचा आणि दिवसभर विक्री करून पैशाचा चुकारा करायचा. बबन त्याच व्यापाऱ्याच्या कामावर असल्यामुळे या भाजीवाल्या महिलांची त्याची चांगली ओळख झालेली. त्यांचा पाठिंबा मिळविण्यात बबन यशस्वी ठरला. आता कोपरगाव बंद करायचा म्हणजे कोणता रस्ता बंद करायचा हा प्रश्न आला. तेव्हा बबनच्या लक्षात आलं, कोपरगावी शिरायला एका पुलावरून यावं लागतं आणि हा पूल रोखला, की कोपरगावच्या साऱ्या नाड्या आवळल्या जातात. तेव्हा त्याने शे-दीडशे महिलांना सकाळीच त्या पुलाच्या दोन टोकांवर जमायला सांगितलं. बंद सुरू झाला. पुलाच्या दोन्ही टोकाला महिलाच असल्यामुळे कुणाला जुलूम जबरदस्ती करून पुलावर शिरता

येईना. त्यामुळे कोपरगावातील आवक-जाबक आपोआप बंद पडली. थोड्या थोडक्या महिला असत्या, तर एकवेळ त्यांना बाजूला हटवून वाहतूक सुरळीत करता आली असती; पण महिलांची संख्या बरीच असल्याने त्यांना हाताळावं कसं हा प्रश्नच पडला. शेवटी शासनानं तडजोडीसाठी हात पुढे केला. तडजोड उभयपक्षी मान्य झाली आणि हा बंद यशस्वीरित्या पार पडला. माधव खंडेराव मोरेंपुढे आता कोपरगावकर ताठ मानेने जाऊ तर शकत होते. अशा तऱ्हेने शेतकरी संघटनेतील प्रवेशाची ही साठा उत्तराची कहाणी सफल झाली.

या पूल प्रकरणानंतर बबन आणि भाऊ साहेबांच्या भेटीसाठी पुण्याला गेले. तेव्हा साहेब पुण्याला राहत होते सिंधी कॉलनीमधील त्यांच्या घरी. त्यावेळी साहेब, लीलाताई आणि त्यांच्या मुली हे सारे 'वारकरी'च्या अंकाच्या घड्या घालणे, पत्ते चिटकवणे, तिकीट लावणे आदी काम करीत होते. त्यावेळी तिथे शंकरराव वाघही होते. शेतकरी संघटनेच्या प्रचार, प्रसारासाठी साहेब 'वारकरी' या नावाचे साप्ताहिक चालवत होते. बाबूलाल परदेशींच्या छापखान्यात अंक छापून आणायचे आणि वितरणाची पूर्ण तयारी करायची, ही सारे कामे साहेब स्वतः करीत. फक्त खांद्यावर ते गठ्ठे घेऊन गल्लोगल्ली अंक वाटत फिरले नाहीत, एवढंच. बाकी 'वारकरी'चा मजकूर लिहिणे, मुद्रित तपासणे. अंकाच्या घड्या घालणे, पत्ते चिकटवणे ही सारी कामे साहेब स्वतः त्यांच्या कुटुंबीयाच्या मदतीने करीत. या भेटीत भाऊ आणि बबन यांची मदत झाली आणि तेथून होतच राहिली.

या पहिल्या आंदोलनात ताकदीची चाचपणी झाली. त्यानंतर शरद जोशींकडे पुण्याला बरंच जाणं-येणं झालेलं आणि संघटनेचा शिक्का पक्का बसलेला. आता कोपरगाव खऱ्या अर्थानं 'बंद' करण्याचा निर्णय झाला. एव्हाना भास्करभाऊंच नाव डंक्यावर आलेलं. त्यामुळे या 'कोपरगाव बंद'वेळी त्यांना अटक होणार, हे ठरलेलं; पण 'बंद' आधी अटक होऊ द्यायची नाही. त्यामुळे बबन आणि इतरांनी भाऊंना लपून राहण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे भाऊ त्यांच्या एका मित्राच्या वस्तीवर रात्री मुक्कामाला गेले. यावेळी सर्व रस्त्यांवर पोलिस बंदोबस्त पक्का. पोलिस आणि एसआरपींचं कडक पॅट्रोलिंग चालू होतं. 'बंद'च्या तयारीची चाचपणी करण्यासाठी आणि पोलिसांच्या बंदोबस्ताची माहिती घेण्यासाठी बबन मोटारसायकलवर बाहेर पडला. निमित्त होतं पेपर्स आणण्याचं. त्याप्रमाणे हातात पेपर्सचा गठ्ठा घेऊन तो रस्त्याने निघाला. 'बंद'चं ठिकाण 'साई कॉर्नर' ठरलं होतं. पोलिसांनी सकाळपासूनच अडवाअडवी सुरू केलेली. स्टेशनजवळ



बबनच्या मोटारसायकलला भोळे व्यापाऱ्याकडील एका नोकराने लिफ्ट मागितली. दोघांना पाहून पोलिस अडवतील म्हणून बबने नाकारल्यावरही तो माणूस उडी मारून बसलाच मागे. त्याला घेऊन थोडं पुढे जातो तो पॅट्रोलिंग करणाऱ्या एका पोलिसाने काठी मारली. ती लागली नेमकी मागच्या माणसाला. तो माणूस खाली पडला. मात्र बबन जोरात मोटारसायकल चालवत निघून गेला. त्याला पळताना पाहून एसआरपी त्याच्या मागे लागली. जवळ कॉलेजचा परिसर आणि प्रवेशाचं फाटक. त्या फाटकाला आडवा दांडा लावलेला. त्या दांड्याखालून सफाईने बाईक काढून बबन कॉलेजात शिरला. पण आडव्या दांडीमुळे एसआरपींची जीप आत घुसवता आली नाही, म्हणून पाठलाग सोडून एसआरपी परतले. इकडे बबन दुसऱ्या फाटकातून बाहेर रस्त्यावर आला व भाऊंना ठेवलेल्या वस्तीवर आला. तिथे बद्री देवकरही आलेला. त्या दोघांना भाऊंच्या कारमध्ये घेऊन बबन परत निघाला. रस्त्यावर येताच ऐन नाक्यावर एका फौजदारानं गाडी अडवली आणि तो बसला गाडीत. त्याला वाटलं बरी आयती सापडली बद्री अन् भाऊंची जोडी. त्याच वेळेस आणखी एक अनाहूत माणूसही गाडीत बसला. गाडीमागे त्या फौजदाराची जीप. आता अशा पक्क्या पहाऱ्यात ही वरात निघाली. वाटलं आता सुटका नाही. काही तरी बोलावं म्हणून भाऊ त्या फौजदाराला म्हणाले, 'बिगबागायदार संघात बाकी मंडळी बसली आहे, तेव्हा त्यांना बोलून येतो.' फौजदाराला वाटलं, आयतंच घबाड मिळतंय; पण भाऊ आणि त्या मागोमाग बद्रीही उठला आणि मुख्य इमारतीकडे चालायला लागले. ते पाहून फौजदाराला काय शंका आली कोण जाणे; पण तोही थोड्या अंतराने उतरला आणि दोघांच्या मागे निघाला. त्याला मागे येताना पाहून भाऊ आणि बद्रीनं पळायला सुरुवात केली. फौजदार उतरलेल्या पाहून बबननं गाडी पळवली आणि इमारतीच्या दुसऱ्या बाजूला; पण ज्या बोळीतून दोघे पळत होते त्या बोळीच्या दुसऱ्या तोंडाला गाडी आणून उभी केली आणि इंजिन चालूच ठेवलं. बद्री अन् भाऊनं दार चटकन् उघडलं अन् दोघेही गाडीत चढले. तोच बबननं गाडी स्टार्ट केली. एव्हाना फौजदारही आलेला. त्यानं खिडकीतून हात घातला आणि भाऊच्या शर्टची कॉलर धरली; पण गाडीच्या धक्क्यानं शर्ट फाटला आणि फौजदाराचा हात सुटला. तेव्हा फौजदारानं डिकीवर उडी मारली; पण गाडीच्या वेगानं तो खाली पडला आणि भन्नाट वेगाने बबननं गाडी काढली मुख्य शहरातून धारणगाव रोडवर. रस्त्यावर सुदैवानं कुणी अडवलं नाही. गाडी थेट आली बंडू बोरावकेच्या वस्तीवर. तिथे वैरणीच्या एका गंजीत गाडी घुसवली.

वर वैरण टाकून गाडी लपवली. तिथून दोन मोटारसायकलवर बबन, भाऊ आणि बद्री परत गावाकडे निघाले. आता त्यांच्या मागे पोलिसांचा ससेमिरा लागला. तेव्हा दोनही मोटारसायकली जवळच्याच एका उसाच्या फडात घुसवल्या. मोटारसायकली सोडून दिल्या आणि तिथेही आत खोलवर लपून बसले. त्यांना पाहण्यासाठी पोलिसांनी फडाभोवती चकरा मारल्या; पण तिघे अगदी गप्प बसलेले होते. इतक्यात त्यांना उसात खसखस आवाज आला. त्यांना वाटलं पोलिस आले मागावर. म्हणून तिघेही श्‍वास रोखून बसले. खसखस वाढली आणि एक साडी दिसायला लागली. फडात कुणी बाई आहे; पण पोलिस नाहीत म्हणल्यावर तिघांनी निःश्‍वास सोडला. एव्हाना ती साडी जवळ आली आणि लक्षात आलं, साडी नेसून भीम बडदे हा कार्यकर्ता पोलिसांना चुकवत चुकवत फडात आला होता. रस्त्यावर संभाजी काळे याच्याशी बाचाबाची झाली आणि पोलिसांनी त्याला मारहाण केली. त्यांच्या पॅट्रोलिंगमुळे आयतीच वाहतूक बंद झालेली. शिवाय येवला-कोपरगाव रस्त्यावर लोकांनी झाडं तोडून आडवी टाकलेली त्यामुळे तो मुख्य रस्ताही बंद झालेला. अशा तऱ्हेने पोलिसांच्या अशा मदतीने का होईना पण 'कोपरगाव बंद'चा कार्यक्रम पार पडला. या आंदोलनाची तयारी मात्र भाऊंनी चांगली केली होती. भाऊंच्या कारमध्ये बसून ठिकठिकाणी पोस्टर्स भाऊ, बबन व बद्री यांनी स्वतः खळीचं डबडं घेऊन चिटकवली.

बबन म्हणजे जुन्या आठवणींचा खजिना. या परिचयासाठी मी त्याची भेट घेतली. आमच्या गप्पा झाल्या होत्या. मध्येच त्यानं विचारलं,

''विठोबाला साकडं कसं घातलं, तुम्हाला ठाऊक आहे का?''

''नाही. मी ८४ जानेवारीपासून संघटनेत आहे. साकडे कार्यक्रम ८३ सालचा.''

''पंढरपूरला कार्यक्रम घ्यायचं साहेबांनी ठरवलं; पण त्या कार्यक्रमाला बंदी घालण्याचं शासनाचं धोरण ठरलंय अशी चर्चा होती. कार्यक्रम तर करायचा. पंढरपूरलाच आणि तोही बंदीची अडचण सोडवून. साहेबांच्या केव्हा तरी वाचण्यात आलं होतं, की लोकमान्य टिळकांनी पंढरपूरला एक कार्यक्रम घेण्याचा मनोदय जाहीर केला, तेव्हा ब्रिटीश सरकारनंसुद्धा त्या कार्यक्रमावर बंदी घालण्याचा मनोदय जाहीर केला. तरीही तो कार्यक्रम टिळकांनी पार पाडला. ब्रिटिशांचा बंदी हुकूम न मोडता कार्यक्रम टिळक पार पाडू शकतात, तर आपल्याला ते का शक्य होणार नाही? असा साहेबांनी विचार केला.'' बबन सांगू लागला. ''मग पुढे काय झालं?''



''सांगतो ना. साहेबांनी टिळकांच्या चरित्रग्रंथात त्यासाठी संदर्भ शोधले आणि नंतर सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना फोन केला. आम्ही शेतकऱ्यांच्या हितासाठी विठोबाला साकडं घालणार आहो. साकडं या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ काय आहे, तेही सांगितलं आणि या कार्यक्रमासाठी आम्ही पंढरपूर निवडलं, विठोबा हे शेतकऱ्याचं दैवत आहे आणि साकडं घालणं धार्मिक कार्यक्रम आहे. अडचणीच्या वेळी देवाला साकडं घालणं ही मराठी माणसांत प्रथा आहे. या बिनतोड स्पष्टीकरणाला कलेक्टरकडे काही उत्तर नव्हतं.'' सरकारला परवानगी द्यावी लागली; पण आता सुरु झाली राजकीय अडथळ्यांची शर्यत. प्रचारासाठी भाऊ, बद्री अन् बबन हे त्रिकूट पंढरपुरात येऊन ठेपलं. त्यांना उतरण्यासाठी जागाही मिळणार नाही, कामासाठी माणसंही मिळणार नाहीत ही काळजी नेतेमंडळींनी घेतली; पण अशा अडथळ्यांनी हिंमत थोडी हटणार होती!

*हमको मिटा सके ये जमाने मे दम नही*
*हम से जमाना खुदाया है, जमाने से हम नही*

एका आडबाजूच्या धर्मशाळेत तिघांनी मुक्काम केला. चांगले आठ-दहा दिवस भाऊंच्या गाडीत बसून पोस्टर्स गावात चिकटवले, स्वतः खळीचं डबडं घेऊन. प्रसंगी झाडावर चढून बॅनर्स ठिकठिकाणी बांधले आणि साकड्याचा कार्यक्रम प्रचंड उपस्थितीत पार पडला. तेव्हा शासनाच्या कैदेत पडलेल्या विठाबानंसुद्धा कमरेवरचा हात काढून रात्री तोंडात बोट घातलं म्हणे!

८० ते ९० हे दशक अनेक रोमांचक घटनांनी भरलेलं. कार्यकर्त्यांसाठी भारलेले दशक. साहेबांच्या डोक्यातून एकेक कल्पना बाहेर पडायची आणि कार्यकर्त्यांनी ती अंमलात आणायची असं दशक. साकड्याला लागूनच धुळ्याला बैलांचा मोर्चा काढायची टूम निघाली. वास्तविक बैलांचा मोर्चा म्हणजे रस्ता बंदच; पण बंद म्हणायचं नाही. मिठ्ठू मेला म्हणायचं नाही; पण लक्षणं तीच सांगायची. तसं या मोर्चाच्या प्रचारासाठी साहेब, बबन, अनिल अन् शंकरराव अशी चौकडी भाऊंच्या गाडीनं मोहिमेवर निघाली. मोहिमेचा संपूर्ण कार्यक्रम पोलिसांना कळवलेला. एक दोन ठिकाणी प्रचारसभा आटोपून मोहिमेत ठरल्याप्रमाणे कार्यक्रम पार पडल्यावर पोलिस काही तरी निमित्त करून अटकेच्या खटपटीत आहेत, हे मंडळींच्या लक्षात आलं. तेव्हा त्यांनी पोलिसांना दिलेला कार्यक्रम मागेपुढे केला आणि पोलिसांनी झुकांडी दिली. पोलिस आधी त्या गावी जायचे आणि ही चौकडी दुसऱ्याच गावी जायची. पोलिसांच्या हेही लक्षात आल्यावर

त्यांनी चौकडीचा पाठलाग करायला सुरवात केली. अटक करण्याची तयारी झालेली दिसत होती. तेव्हा साहेबांनी चालत्या गाडीत काही सूचना एका कागदावर लिहून देऊन शंकररावांना कोर्टात जाण्यास सांगितले. पुढे साहेबांची गाडी, पाठलागावर पोलिसांची गाडी. एका वळणावर गाडीची गती बबननं कमी केली आणि थांबल्यासारखं केलं. शंकरराव अलगद उतरले, गाडी पुढे दामटली बबननं. शंकरराव उतरले हे पोलिसांना कळलंही नाही. शंकरराव त्याच रस्त्याने; पण उलट दिशेला जाणाऱ्या एका ट्रकमध्ये चढले आणि कोर्टात पोहोचले. तिथे वकिलांना भेटून जमानत मिळवून ठरल्या मुक्कामावर त्रिकूटाला येऊन भेटले. आता अटकेसाठी आलेल्या पोलिसांना हात चोळीत बसावं लागलं. ठरल्या वेळी बैल मोर्चा पार पडला.

गेल्या काही काळात धडाधडा कार्यक्रम पार पाडले जात होते; पण माधवराव खंडेराव मोरे यांची सभा काही आयोजित करण्यात कंपनीला यश आलं नव्हतं. कोपरगाव हे कॉंग्रेसी धेंडांच्या दबावाखालील गाव. त्यांच्या गुंडगिरीला तोड संघटनेत नव्हती आणि माधवराव खंडेराव मोरे म्हणजे नुसती आग. शालिनीताई पाटील आणि वसंतदादा हे शरद जोशी आणि शेतकरी संघटनेवर टीकेची झोड उठवत होते. त्यांची ही टीका पातळी सोडून होती. त्यांना त्यांच्याच पातळीवर जाऊन तोलामोलाच्या नेत्यांनी जवाब देणं आवश्यक होतं. म्हणून माधवरावांचा तोफखाना त्यांच्यावर सोडणं आवश्यक होतं. आता हे व्हावं कसं? दादा, शालिनीताई आणि कोल्हे - काळे यांचा विरोध पत्करून सभा घेणार कोण? चट्कन नाव सुचलं. तात्या बोरावके. तात्या म्हणजे खमक्या माणूस. तोड का मुकाबला. त्याच्या वाटेला जाण्याचं साहस कुणी करीत नसे. त्यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेतली तरी सभा उधळली जाण्याची शक्यता होतीच; पण तो धोका पत्करण्याचं कंपनीनं ठरवलं. तात्या म्हणाले, ''ही सभा आपण आंबेडकर पुतळ्याच्या चौथऱ्यावर घेऊ. पाहू कोण आडवं येतं ते.'' सभेची तयारी झाली. माधवरावांचं नाव एव्हाना दुमदुमत होतं. सारा विरोध झुगारून देऊन सभेला प्रचंड गर्दी झालीच. दूरच्या दुकानात बसून कोल्हे, काळेसुद्धा सभा ऐकू लागले. माधवरावांनी शालिनीताई आणि वसंतदादांचा त्यांच्याच पातळीवर जाऊन उद्धार केला. आजपर्यंत अशा भाषेत त्यांना कुणी बोललेलं नव्हतं. ती हिंमत माधवरावांनी दाखविली. शेतकरी संघटनेचं आवाहन लोकांपर्यंत पोहोचवलं. कोल्हे-काळे दुकानात बसून भाषण ऐकताहेत हे कळल्यावर माधवरावांना तर जास्तच चेव आला. ''अरे या कोल्हे-काळेंना काय घाबरता?



वसंतदादा पाटलांनी पोसलेली ही माणसं आहेत. आपण नाही का, उसाच्या गुऱ्हाळावर गूळ करण्यासाठी भाड्यानं गुळवे आणतो, तसे हे साखर कारखान्यासाठी दादांनी आणलेले भाड्याचे गुळवे आहेत.'' या शब्दांत संभावना केली. तेव्हापासून या दोघांना 'गुळवे' हा शब्द चिकटला. त्यांचा उल्लेख लोक उपहासात 'गुळवे' करू लागले. टाळ्यांच्या, घोषणांच्या गजरात हा कार्यक्रम पार पडला आणि त्रिकुटाचा जीव भांड्यात पडला.

या साऱ्या खटाटोपात, दौऱ्यात आपल्याला घर आहे, काही संसार आहे, हेही बबन विसरला होता. अभीच्या जन्माच्या वेळी एकदा बाळाला त्यानं पाहिलेलं. पुढे जवळजवळ तीन महिने घराचं तोंड नाही पाहता आलं. त्यानंतर बऱ्याच दिवसांनी घरी आला. बायकोने बाळाला पुढे केलं अन् ती म्हणाली, ''बघ बघ तुझे पपा आले...'' बाळाची नजर स्थिरावली तसं बाळानं पपाचं तोंड पाहिलं नव्हतं. ते बाळ पपाला काय ओळखणार! १९८१ पासून बबन साहेबांकडे आहे तो आजपावेतो. भल्याबुऱ्या प्रसंगांत साहेबांच्या मागे ठामपणे राहिला आहे. अनेक आंदोलनांत, तुरुंगांत, आजारपणात, दवाखान्यात आणि एरवी आंबेठाणला साहेबांच्या सतत सेवेत आहे. आता तर साहेबांच्या कुटुंबाचा एक भाग होऊन राहिला आहे. साहेबांच्या सहवासात राहून वैचारिक पक्वता आली आहे. पुष्पासंगे मातीस वास लागे!

■■

## ▫ परिशिष्ट ▫

## अनंत उमरीकर यांची व्यक्तिचित्रे

- इंद्रजित भालेराव

**ग्रामीण** साहित्य म्हणजे फक्त कथा-कविता-कादंबरी नव्हे. ग्रामीण जीवनाविषयी प्रकाशित होणारी माहितीपर आणि वैचारिक स्वरूपाची पुस्तकेही ग्रामीण वाङ्मयातच समाविष्ट असायला हवीत. शेतकऱ्याचा असूड, गावगाडा, शूद्र पूर्वी कोण होते, दासशूद्रांची गुलामगिरी, शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती, शेतीसाठी पाणी, राळेगणसिद्धीचा कर्मयोगी, उदक चालवावे युक्ती यांसारखी पुस्तके ही ग्रामीण लेखकांनी अभ्यासायला हवीत. त्याशिवाय ग्रामजीवनाचे नेमके आकलनच होणार नाही. आपण खेड्यात जन्माला आलो म्हणजे आपणाला खेडं समजलं एवढ्या भांडवलावर आपण ग्रामीण लेखक होऊ शकतो हा समज चुकीचा आहे.

माहितीपर आणि वैचारिक वाङ्मयाची निर्मितीदेखील ग्रामीण लेखकांनी करायला हवी. ग्रामीण साहित्याची चळवळ झाली आणि तिच्या इतिहासाची नोंद करणारा ग्रंथही सिद्ध झाला; परंतु शेतकरी संघटनेनं शेतकऱ्यांचे एवढे मोठे आंदोलन उभे केले, त्याचा दस्तऐवज तयार करावा असे एकाही ग्रामीण लेखकाला वाटले नाही. तुम्हाला लिहिता येतं म्हणून तुम्ही केलेल्या बिनबुडाच्या चळवळीचाही इतिहास तयार होतो आणि खऱ्या अर्थानं ऐतिहासिक ठरलेल्या चळवळीची मात्र कुणी नोंदही घेत नाही, हा मला वाटतं आत्मघातच आहे.

दलित साहित्यापासून स्त्रीसाहित्याच्या चळवळीपर्यंत प्रत्येक वाङ्मयीन चळवळीला तशा स्वरूपाच्या सामाजिक चळवळींचा मजबूत पाया होता; परंतु अशा स्वरूपाच्या शेतकरी आंदोलनांपासून फटकून राहूनच शेतकऱ्यांच्या ग्रामीण साहित्याची चळवळ उभी करण्यात आली. त्यामुळे तिचा शेवटपर्यंत मजबूत तात्त्विक पायाच तयार झाला नाही.

शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी या आंदोलनाला स्वत:च्या लेखनाने मजबूत वैचारिक पाया दिला. फार मोठ्या प्रमाणात अशा स्वरूपाचे वैचारिक लेखन स्वत: शरद जोशी यांनी केले. ते पुस्तकरूपात उपलब्धही आहे; परंतु शरद



जोशी ही जी ऐतिहासिक शेतकरी चळवळ घडवून आणत होते, तिची नोंद अन्य कुणीतरी करणे आवश्यक होते. संघटनेबाहेरच्या माणसाने ती केली असती तर त्यात एक निरपेक्षपणा आला असता. अशा स्वरूपाची सुरुवातीच्या आंदोलनाची नोंद घेणारे 'योद्धा शेतकरी' हे विजय परुळेकर यांचे पुस्तक मला फार मोलाचे वाटते. अरविंद वामन कुळकर्णी यांनीही अशा स्वरूपाच्या वाङ्मयाची निर्मिती केलेली आहे; परंतु हे झाले शेतकरी आंदोलनाच्या सुरुवातीच्या दिवसांविषयी. यानंतरच्या आंदोलनाच्या प्रत्येक टप्प्यावर अशा स्वरूपाची पुस्तकं निर्माण झाली असती तर प्रश्नच नव्हता; परंतु महाराष्ट्रातल्या जातीय स्वरूपाच्या राजकारण, समाजकारण आणि वाङ्मयकारणाने असे घडू दिले नाही. शरद जोशी यांच्या विचारांशी कुणाचं भांडण आणि मतभेद असू शकतात; परंतु शेतकऱ्यांचं आंदोलन राजकारणनिरपेक्षपणे कधीच उभं करता येणार नाही हा दावा फोल ठरवत, जे राष्ट्रीय आंदोलन शरद जोशींनी उभं केलं ते त्यांचं काम ऐतिहासिक स्वरूपाचं आहे हे कुणीच नाकारणार नाही.

अशा पार्श्वभूमीवर आमच्या परभणीचे शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते आणि विधिज्ञ अनंतराव उमरीकर यांचे 'आंदोलन' नावाचे पुस्तक माझ्या वाचण्यात आले. पंजाबमधल्या शेतकरी आंदोलनात शरद जोशी यांच्यासोबत उमरीकर स्वत: सहभागी होऊन जेल भोगून आले होते. त्याच घटनांचा वृत्तांत उमरीकरांनी या पुस्तकात लिहिला होता. हे पुस्तक मला फार आवडून गेले होते आणि त्याच वेळी असंही वाटून गेले की या माणसाने शेतकरी संघटनेने घडवून आणलेल्या आंदोलनाचा दस्तऐवज तयार केला तर फार मोठे काम घडून येईल. साठी ओलांडलेल्या उमरीकरांना आता आपण प्रत्यक्ष आंदोलनात जरी उतरू शकत नसलो, तरी मानसिकदृष्ट्या या आंदोलनात आपण सहभागी असल्याचा आनंद या लेखनाने मिळवता येणार होता. आम्हा सर्वांचा आग्रह त्यांनी हळूहळू मनावर घेतला आणि काही प्रमुख आंदोलनांची नोंद करणारा 'वाटचाल' नावाचा आणखी एक छोटेखानी ग्रंथ सिद्ध केला. कापूस आंदोलन, ज्वारी आंदोलन, परभणी अधिवेशन असे काही टप्पे त्यात आले होते. या पुस्तकातला परभणी अधिवेशनावरचा लेख वाचताना उमरीकरांनी तेव्हाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची अगदी दहाबारा वाक्यांत, सराईत लेखकासारखी उभी केलेली व्यक्तिचित्रे आम्हाला फार भावून गेली आणि त्यातले मर्म लक्षात घेऊन पुढं उमरीकरांनी प्रमुख दहा कार्यकर्त्यांची सलग स्वरूपाची दीर्घ व्यक्तिचित्रे रेखाटणारे 'वेडेपीर' नावाचे एक जाडजूड पुस्तकच लिहिले आणि आमचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्यात

शेतकरी संघटनेला इतिहासकार मिळाल्याचा आनंदही लपला होता. जो पुढं या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या वेळी मुंबईच्या शिवाजी पार्कवर हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत स्वत: शरद जोशी यांच्या तोंडून व्यक्त झाला.

उमरीकरांनी वकिली, पत्रकारिता, आंदोलन आणि चळवळी यांचा, उडी घेऊन स्वत: अनुभव घेतल्यामुळे या लेखनाला एक अधिकृतता प्राप्त झालेली आहे. तिऱ्हाईत साक्षीदाराऐवजी प्रत्यक्ष सहभागी माणसानेच इतिहास लिहिण्याचे एक वेगळे भाग्य या लेखनाला प्राप्त झाले. आपण लिहा म्हटलं, उमरीकरांनी लिहिलं इथपर्यंत ठीक आहे; परंतु हे छापायचं कुणी हा फार मोठा प्रश्न होता. अशा स्वरूपाचं लेखन व्यावसायिक प्रकाशक छापायला तयार नसतात. स्वयंसेवी संस्था किंवा स्वत:च पुस्तक छापले तर त्याचे गठ्ठे तसेच पडून राहणार हे ठरलेले असते. पुस्तक वितरणाची यंत्रणा भयानक भेसूर आहे; परंतु योगायोगाने मराठवाडाभर एक विधायक जनशक्ती वाचक चळवळ उभी करणारा श्रीकांत उमरीकर हा अनंतरावांचा मुलगा नेमका याच वेळी उभा राहिला आणि त्याने शरद जोशींसह उमरीकरांची पुस्तके प्रकाशित केली. उत्तम निर्मितीमूल्य सांभाळत दीडशे पानांपर्यंतचे पुस्तक पन्नास रूपयांपर्यंत उपलब्ध करून देऊन कमाल केली. अगदी शेतकऱ्यांनाही ती विकत घ्यायला परवडू लागले आणि यातून पुस्तक विक्रीचेही एक आंदोलनच उभे राहिले.

आपणाला प्रामुख्याने विचार करावयाचा आहे, तो अनंतरावांच्या 'वेडेपीर' या पुस्तकाचा. ज्यात हेमंत देशमुख, लक्ष्मण वडले, पुरुषोत्तम लाहोटी, सरोज काशीकर, विनय हर्डीकर, सुरेशचंद्र म्हात्रे, वामनराव चटप, रामचंद्रबापू पाटील, श्रीरंगनाना मोरे, भास्करभाऊ बोरावके या दहा जणांची व्यक्तिचित्रे उमरीकरांनी रंगवली आहेत. हे सर्वच शेतकरी संघटनेचे एकनिष्ठ पाईक आहेत. आणखी शेपन्नास वर्षांनी आर्थिकदृष्ट्या संपन्न हिरव्या शेतीचं स्वप्न वास्तवात उतरलेलं असेल, तेव्हा आजचे हे वेडेपीर लोककथा बनून गेलेले असतील असं अनंतराव उमरीकर यांना वाटतं.

आपल्या या लेखनाची दखल संघटनेबाहेरच्या मराठी विश्वानं घ्यावी असं उमरीकरांना फार वाटायचं. परवा केसरी- मराठा या पुण्याच्या मान्यवर संस्थेनं केळकर पुरस्कार देऊन अनंतरावांची ही इच्छा थोड्याफार प्रमाणात का होईना पूर्ण केली. बाकी सामसूम असलेल्या मराठी वाङ्मयविश्वाकडून उमरीकरांनी अन्य अपेक्षा करू नयेत.

'गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ मी शेतकरी संघटनेत काम करतो आहे. या



काळात माझी अनेक कार्यकर्त्यांशी जवळून ओळख झाली आहे. काही लोकांशी फार जवळून संबंध आलेला आहे. पैकी बहुतेक सर्वांची आर्थिक परिस्थिती सामान्य आहे. अनेक लोकांना तर दुपारच्या जेवणाची भ्रांत आहे. तरीही लोक प्रचंड संख्येने शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमात सहभागी होतात. संघटनेत कुठल्याही प्राप्तीची आशा नाही, कुठलंही सत्तेचं पद मिळणार नाही. लोक जवळचं आहे ते खर्चून, पोट बांधून संघटनेचं काम करतात. पृथ्वीवरील स्वर्ग समजल्या जाणाऱ्या स्वित्झर्लंडमधील लठ्ठ पगाराची नोकरी सोडून थेट आंबेठाणसारख्या सर्व सुखसोयींपासून दूर राहिलेल्या गावात राहणाऱ्या शरद जोशींपासून ते संघटना कामात गुंतल्यामुळे पोटच्या पोराच्या लग्नालाही हजर न राहणाऱ्या लाहोटीसारख्या कार्यकर्त्यांना वेडेपीर नाही तर काय म्हणायचे! अशा काही वेड्यापिरांची ओळख या पुस्तकातून करून देतो आहे. बड्या शेतकऱ्यांची संघटना म्हणून शेतकरी संघटनेला हिणवणाऱ्यांचे डोळे हे पुस्तक वाचून तरी उघडतील काय?''

अनंतरावांनी 'वेडेपीर' हे पुस्तक लिहिण्यामागची आपली भूमिका वरीलप्रमाणे मांडली आहे. ती अत्यंत प्रामाणिक आहे हे वेगळं सांगण्याची गरज पडू नये. परभणीचं अनंतरावांचं घर म्हणजे संघटनेच्या कार्यकर्त्यांचा सतत राबता असणारं घर आहे, हे मी स्वत:च्या डोळ्यांनी पाहिलेलं आहे. दुरून एकटा- दुकटा आलेला कार्यकर्ताही शक्यतो त्यांच्याच घरी मुक्कामाला असतो. उमरीकरांचे अख्ख घरदार त्यासाठी प्रेमानं राबत असतं आणि प्रत्यक्ष शरद जोशी येतात तेव्हा तर पाचपन्नास माणसांनी बैठकीपासून स्वयंपाकघरापर्यंत घर कसं गजबजून गेलेलं असतं! आशाताईंनी आठ दिवसांपासून केलेली तयारी अपुरी पडून, कशी तारांबळ उडालेली असूनही काल लावलेल्या आणि साहेबांना आवडणाऱ्या दह्याची कवडी कशी घट्ट झालेली आहे त्याचा आनंद चेहऱ्यावरून ओसंडत असतो. उमरीकरांनी डोक्याला लावलेल्या मेंदीची चेष्टा करत आवडत्या मेथीच्या भाजीचा आस्वाद घेत, शरद जोशीही कसा प्रवासाचा सगळा ताण विसरून गेलेले आहेत आणि मिळेल त्या जागेवर बसून भुकेले कार्यकर्ते हाताला येईल ते घेऊन कसे-बसले आहे, हे दृश्य आम्हा पाहणारांनादेखील स्वर्गीय आनंद देणारे असायचे. आम्ही तो आनंद दोन अपुऱ्या डोळ्यांनी काळजात साठवून घ्यायचो.

शेतकरी चळवळीने जोर धरला तो १९८० सालापासून. ही माणसं शरद जोशी भोवती कशी जमा झाली त्याविषयी उमरीकर लिहितात, 'यासाऱ्यांचा संघटना

प्रवेशाचा एक पॅटर्न तयार झालेला आहे. भाऊ असोत, बापू असोत की नाना असोत. सरोजताई असोत किंवा सुमनताई, शैलाताई. वृत्तपत्रांतून शरद जोशी यांच्या आंदोलनासंबंधी कुठेतरी केव्हातरी वाचलेलं, ऐकलेलं असतं. सामाजिक कार्याची एरवीच आवड असते. राजकारणातील घाणीमुळे थोडीशी दूर ठेवलेली सामाजिक कामांची आवड गप्प बसू देत नाही. कुठेतरी ही आवड उचल खाते, शरद जोशी यांची भेट होते आणि या लोकांची गाडी स्टार्ट होते. शरद जोशी म्हणजे मखनातीस, लोहचुंबक ! त्यांच्याकडे आलेला माणूस त्यांच्या व्यक्तिमत्वाने, विचारप्रणालीने, कामाच्या पद्धतीने भारावून जातो आणि सुरुवात होते एका लांब पल्ल्याच्या प्रवासाची. या प्रवासात शरद जोशी यांच्या स्पष्ट विचारसरणीमुळे आणि प्रश्न हाताळण्याच्या पद्धतीमुळे या संबंधांची वीण अधिकच घट्ट होत जाते. त्यांच्या प्रभावक्षेत्रात आलेला कार्यकर्ता सहसा संघटनेतून बाहेर जात नाही. क्वचित कुणी बाहेर गेला, तरी वैचारिक नाळ तुटत नाही.'

उमरीकर या प्रत्येक व्यक्तीविषयी लिहिताना त्याची सविस्तर चरित्रात्मक पार्श्वभूमी, संघटनेकडे आकर्षित होण्याचा काळ. संघटनेत प्रवेश करण्याचा किंवा शरद जोशी यांची पहिली भेट घेण्याचा प्रसंग आणि संघटनेत आल्यावर तिने पार पाडलेली जबाबदारी या क्रमाने प्रत्येक व्यक्तिचित्र रेखाटत जातात. त्यामुळे वाचकाला त्या व्यक्तीविषयी असलेली प्रत्येक- उत्सुकता, अनंतराव व्यवस्थित तपशील सादर करून पुरवत जातात.

पोटी पुत्र नसलेल्या शरद जोशींनी ज्याला स्वत:चा मुलगाच समजला होता आणि ज्यानं ती भूमिका व्यवस्थित पार पाडली होती आणि ज्याचं अकाली निधन होवून जो सर्वांनाच चटका लावून गेला, तो हेमंत देशमुख. जो वाल्या होता; पण संघटनेनं ज्याला वाल्मीकी बनवलं आणि ज्याच्या सुपीक डोक्यातून पुढं अनेक आकर्षक आणि कल्पक आंदोलनांचा जन्म झाला आणि संघटनेच्या कर्तव्यापोटी ज्याला स्वत:च्या मुलाच्या लग्नालाही उपस्थित राहता आलं नाही तो पुरुषोत्तम लाहोटी. ज्याचं व्यक्तिचित्र वाचतांना सतत क्रांतीसिंह नाना पाटलांची आठवण होत रहाते, तो लक्ष्मण वडले. संघटना राजकारणात उतरल्यावर यशस्वीपणे आमदार होऊन संघटनेचा आवाज बुलंद करणाऱ्या सरोजताई काशीकर. कलेच्या क्षेत्रातली सर्वोत्कृष्ट जाण असूनही आणि श्रेष्ठ दर्जाचं लेखन करूनही जे संघटनेची बौद्धिक बाजू बळकट करत गेले आणि प्रसंगी शरद जोशींनाही सुनावण्याची हिंमत बाळगून



असलेले विनय हर्डीकर. घरादाराचा आणि प्राचार्यपदाचा त्याग करून शरद जोशींच्या सोबत आयुष्याची होळी करणारा आणि 'शेतकरी संघटक'चे संपादन अथकपणे करून एका अर्थी संघटनेचा मीडिया सांभाळणारा माणूस सुरेशचंद्र म्हात्रे. राजकारणातही यशस्वी होवून उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार मिळवणारे वामनराव चटप. आपल्या रांगड्या व्यक्तिमत्त्वाने संघटनेला देशी रूप देऊन संघटना सामान्य शेतकऱ्यापर्यंत पोचवणारे रामचंद्रबापू पाटील. शेतकरी संघटनेच्या आधीही शेतकऱ्यांना संघटित करणारे आणि नंतर संघटना निघताच आपलं सगळं बळ तिच्या पाठीशी उभं करणारे श्रीरंगनाना मोरे आणि संघटनेच्या सुरुवातीच्या काळात तिला बुलंद आवाज देणारे भास्करभाऊ बोरावके असे हे दहा वेडेपीर या पुस्तकात आपणाला भेटतात. वेगवेगळ्या जातीधर्मांची आणि लिंगांची ही माणसं शेतकऱ्यांचं भलं व्हावं या एकाच ध्येयानं झपाटलेली आहेत. खरं तर हे काही नमुने आहेत. अशी अनेक माणसं संघटनेत आहेत आणि पूर्वीही होती. त्यांच्याविषयीही कुणीतरी लिहायला हवं. शरद जोशींच्या चक्रधराचं काम करणारे बबन शेलार, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राहिलेले शंकरअण्णा धोंडगे आणि पाशा पटेल, औंढ्याचे ब. ल. तामसकर ही माझ्या माहितीतली काही नावं. अशी अनेक आहेत, जी मलाही माहीत नसतील.

अनंतराव उमरीकर मराठवाड्यातले असले तरी वेडेपीर मात्र महाराष्ट्रभरातले आहेत. हेमंत देशमुख औरंगाबादचे, लक्ष्मण वडले जालना जिल्ह्यातले, पुरुषोत्तम लाहोटी हिंगोली जिल्ह्यातले, सरोजताई काशीकर वर्ध्याच्या, विनय हर्डीकर पुण्याचे, सुरेशचंद्र म्हात्रे मूळचे कोकणातले, वामनराव चटप चंद्रपुरचे, रामचंद्र बापू पाटील नाशिकचे , भास्करभाऊ बोरावके कोपरगावचे तर श्रीरंगनाना मोरे बीड जिल्ह्यातल्या अंबेजोगाई जवळचे. अशी अवघा महाराष्ट्र व्यापणारी ही माणसं. त्यामुळे कुठलाही प्रादेशिक अभिनिवेश या लेखनात आपणाला सापडणार नाही. अभिनिवेश आहे तो शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी. तिथं मात्र पर्यायाला आणि तडजोडीला ही माणसं तयार नसतात. यांतले काहीजण वयस्क होऊन घरी बसलेले, तर काही जण अजूनही संघटनेत कार्यरत असलेले. शेवटच्या तीनही व्यक्ती आंदोलनात आज सक्रिय नाहीत; परंतु एकेकाळी त्यांनी रान उठवलेले आहे त्याविषयी अनंतराव कृतज्ञतेने लिहितात.

नुसत्या आठवणींवर अवलंबून केलेले हे लेखन नाही. पुन्हा एकदा महाराष्ट्रभर

पसरलेल्या कार्यकर्त्यांना भेटून, त्यांच्याकडून तपशील गोळा करून, हे लेखन साधार करण्यात आलेले आहे. चक्रधरांच्या आठवणी गोळा करत महाराष्ट्रभर, प्रसंगी नांगर चालवणाऱ्याच्या मागं फिरणाऱ्या म्हाइमभट्टांची इथे आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

अधूनमधून येणाऱ्या कॉमेंटस्मूळे वाचक संघटनेचा कार्यकर्ता नसेल. तर दुखावण्याची शक्यता आहे. संघटनेच्या बाहेरच्या वाचकांनाही गृहीत धरायला हवे होते. त्यामूळे या लेखनाला संघटनेच्या इतिहासाचे साधन साहित्य हा दर्जा प्राप्त होण्याऐवजी, प्रचार साहित्याच्या पातळीवर हे लेखन राहाते, परंतु म्हाइमभट्टाने भक्तीचा भाग म्हणून संकलित केलेल्या लीळांनाही पुढं श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मयगुण प्राप्त झाले तसेच इथेही होताना दिसते. संघटनाभक्तीच्या उद्देशातून आलेल्या काही नोंदी दस्तऐवज म्हणूनही अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

काही ठिकाणी लिखाण उगाचच आलंकारिक झाल्यासारखे वाटते. ही अलंकारीकता आणि येणारी अनपेक्षित भाष्यं टाळता आली असती तर नक्कीच पुस्तकाचा दर्जा वाढायला मदत झाली असती; परंतु उमरीकरांचा एरवीचा गप्पीष्ट स्वभाव आणि समोरच्या माणसाला गुंतवून ठेवण्याचा त्यांचा गुण या लेखनातही उतरला आहे. त्यामुळे एखादे व्यक्तिचित्र वाचायला सुरुवात केली, की ते संपवल्याशिवाय आपण थांबतच नाही.

एका अर्थानं हा शेतकरी संघटनेचा इतिहासच आहे. आतापर्यंत मराठी भाषेत व्यक्तिचित्रांची अनेक पुस्तकं प्रकाशित झालेली आहेत. वि. द. घाटे यांच्या 'काही म्हातारे व एक म्हातारी'पासून सुरू झालेल्या या वाङ्मय प्रकाराला पुढं 'व्यक्ती आणि वल्ली' लिहून पु.ल. देशपांडे यांनी आणि 'माणदेशी माणसं' लिहून माडगूळकरांनी समृद्धी प्राप्त करून दिली. आज तर या सुरुवातीच्या पाऊलवाटेला महामार्गाचे रूप प्राप्त झाले आहे; परंतु या सगळ्यांपेक्षा वेडेपीरमधले लेखन वेगळे आहे. यातलं प्रत्येक व्यक्तिचित्र वेगळं असूनही संघटनेच्या धाग्यात ते एकत्रित गुंफण्यात आलेलं आहे. म्हणजे ही दहा माणसांची स्वतंत्र दहा व्यक्तिचित्रं असूनही, सर्वांचं मिळून शेतकरी संघटनेचं एक व्यक्तिचित्र तयार होतं. कारण ही सगळी माणसं, शेतकऱ्यांचं भलं व्हावं या एका समान ध्येयानं झपाटलेली आहेत. याआधीच्या मराठी भाषेत लिहिलेल्या व्यक्तिचित्रलेखनात असे कधी घडले नाही. त्या लेखनात एका व्यक्तिचित्राचा दुसऱ्याशी संबंध नसायचा.



वेडेपीरमधल्या लेखनाचा एक आणखी गुण असा, की सगळ्यांचं ध्येय आणि जगण्याचं सूत्र एक असूनही ही व्यक्तिचित्रं एकसुरी झालेली नाहीत, प्रत्येकाचं वेगळेपण आपणाला ठळकपणे उठून दिसतं. हे छापाचे गणपती नाहीत, तर स्वयंभूपणे आकार घेत विहरणारे हे आकाशातले ढग आहेत. असे घडले नसते तर या लेखनाचा, सर्व व्यक्तिचित्रांचे अंत:सूत्र एक असणं हा गुण दोषात रूपांतरित झाला असता.

या पुस्तकातली सर्वच व्यक्तिचित्रं चांगली उतरली असली तरी मला कुणी पहिला नंबर काढायला सांगितला, तर मी प्रथम पसंती देईन ती श्रीरंग नाना मोरे या व्यक्तिचित्राला. एका उदात्त शोकांतिकेच्या नायकाच्या जागी हे व्यक्तिचित्र जाऊन बसलेले आहे. बाकी सर्वच व्यक्तिचित्रे मी तीनदा वाचली; परंतु एकदाही कंटाळा आला नाही. मला वाटतं उमरीकरांच्या लेखनाचं हे यश समजायला हरकत नाही.

◈◈

(इंद्रजित भालेराव यांच्या 'मऱ्हाटवाडी' लेखसंग्रहातून साभार...)

■ **अनंत उमरीकर यांचे प्रकाशित साहित्य**

□ **शेतकरी संघटनाविषयक**

आंदोलन

वेडेपीर

बँकेनं लुटलं शेतकऱ्याला

□ **ललित**

झी तुझे सलाम

□ **कादंबरी**

गणपा काळे हाजीर हो

होय खून मीच केलाय

महाआतंक

□ **नाटक**

मोगलाई धमाल

■ **आगामी**

□ **अनुवाद**

कय्यर – *मूळ मल्याळम लेखक : टी. शिवशंकर पिळ्ळे*

मोनेर मानूष – *मूळ बंगाली लेखक : सुनील गंगोपाध्याय*

रॉबिन्सन क्रुसो – *मूळ इंग्रजी लेखक : डॅनियल डेफ्पो*

काऊंट ऑफ मॉन्टे क्रिस्टो – *मूळ इंग्रजी लेखक : ॲलेक्झांडर ड्युमा*

रॉबिनहूड – *मूळ इंग्रजी लेखक : हॉवर्ड पेले*


□ **कादंबरी**

संशयाची सुई

खून यानेच केला?

एन्काऊंटर

कारगिल



# शेतकरी संघटना

हेमंत देशमुख
पुरुषोत्तम लाहोटी
सरोजताई काशीकर
विनय हर्डीकर
सुरेशचंद्र म्हात्रे
वामनराव चटप
रामचंद्रबापू पाटील
श्रीरंगनाना मोरे
भास्करभाऊ बोरावके
वैजनाथ रसाळ
माधव खंडेराव मोरे
गोविंद जोशी
शैला देशपांडे
रघुनाथदादा पाटील
बबन शेलार

आणखी शे-पन्नास वर्षांनी आर्थिकदृष्ट्या संपन्न
हिरव्या शेतीचं स्वप्न वास्तवात उतरलेलं असेल तेव्हा
आजचे हे वेडेपीर लोककथा बनून गेले असतील.

जनशक्ती वाचक चळवळ
किंमत : रु. [illegible]